# सनातनधर्मप्रवेश

धर्मजागृतिमाला—पुस्तक २ रें.

# सनातनधर्मप्रवेश

श्रीक्षेत्र काशी येथील सेंट्रल हिंदु-कॉलेजच्या बोर्ड ऑफ
ट्रस्टीजनीं इंग्रजींत प्रसिद्ध केलेल्या
सनातनधर्म-ॲन एलिमेंटरी टेक्स्टबुक ऑफ रिलिजन ॲंड एथिक्स
नामक पुस्तकाचें

**रा. रा. कृष्णराम सीताराम देसाई**
संस्थापक ‘कन्याशाळा’ मालवण
यांनीं केलेलें रूपांतर.

---

प्रकाशक
मराठी थिऑसॉफिकल फेडरेशन, पुणें.

द्वितीयावृत्ति.] [सन १९२५

3

कापडी प्रतीस किंमत १। रु.—निमकापडी प्रतीस किंमत १ रु.

प्रकाशक
राजाराम सखाराम भागवत, एम्. ए.
चिटणीस, मराठी थि. फेडरेशन,
३२१ शनवार पेठ, पुणें शहर.

पुस्तकें मिळण्याचें ठिकाणः—
मॅनेजर धर्मजागृति,
३२१ शनवार पेठ, पुणें शहर.

मुद्रक
अनंत सखाराम मोखले,
'विजय' प्रेस, ५७० शनवार, पुणें.

# प्रकाशकांचे दोन शब्द.

मराठींत उत्तम धर्मग्रंथ प्रसिद्ध करण्याच्या हेतूनें मराठी थिऑसॉफिकल फेडरेशननें धर्मजागृतिमाला नामक पुस्तकमाला काढण्याचा संकल्प १९२२ सालीं केला. त्यास अनुसरून 'मुमुक्षुमार्ग' नांवाचें पहिलें पुस्तक होय. या मालेंत उत्तम उत्तम लेखकांचे धार्मिक ग्रंथ प्रसिद्ध व्हावयाचे आहेत. अधिकारी लेखकांकडून कांहीं पुस्तकें या मालेकरितां मुद्दाम लिहविण्यांत येतील; तसेंच धर्म, आत्मविद्या वगैरे विषयांवरील चांगल्या इंग्रजी पुस्तकांचीं या मालेंत भाषांतरेंही करण्यांत येतील. प्रस्तुत मालेविषयीं या पुस्तकाच्या शेवटीं अधिक माहिती दिली आहे ती जिज्ञासूंनीं पहावी.

सनातनधर्मप्रवेश हें ।Sanatan Dharma–An Elelmentary Text–book of Religion and Ethics नामक इंग्रजी पुस्तकावरून मराठींत उतरलें आहे. रूपांतर करण्याची परवानगी बनारस हिंदु युनिव्हर्सिटीनें आम्हांस दिली याबद्दल आम्हीं फार आभारी आहों. आमचे मित्र रा० रा० कृष्णराव सीताराम देसाई यांनीं हें पुस्तक आम्हांस लिहून दिलें याबद्दल आम्हीं त्यांचे तर अत्यंत ऋणी आहों.

हें पुस्तक सर्व धर्मजिज्ञासूंस अत्यंत उपयोगी आहे; पण त्यांतल्या त्यांत तें विद्यार्थ्यांकरितां लिहिलेलें असल्यामुळें त्यांस अधिक उपयोगी आहे. आईबाप व शिक्षक हें पुस्तक स्वतः वाचून मुलांच्या हातीं देतील व शाळांत सुरू करितील अशी आशा आहे. हिंदु मुलांस शाळेंत धर्म शिकविण्यास पुस्तकाची अडचण सांगण्यांत येते. ती या पुस्तकानें भरून निघेल असा आम्हांस भरंवसा वाटत आहे.

पुस्तकाची प्रस्तावना वाचून पाहिल्यावर पुस्तकाचें धोरण काय आहे हें वाचकांच्या लक्षांत येईलच. हिंदूधर्म मूळांत कसा होता हें दाखविण्याचा या पुस्तकाचा उद्देश आहे. आज हिंदूधर्माची जशी स्थिति आहे ती तशीच रहावी असें सांगण्याचा पुस्तकाचा रोख नाहीं. हिंदूधर्म अनेक बाबतींत आज निकृष्ट झाला आहे. त्यांतल्या पुष्कळ चांगल्या गोष्टी लुप्त झाल्या असून कित्येक अज्ञानमूलक चालीरीति त्यांत शिरलेल्या आहेत.

अनेक तात्त्विक गोष्टींविषयीं लोकांत अज्ञान पसरलें आहे. आणि बरेच संस्कार आज व्हावे तसे होत नसल्यामुळें त्यांचें फळ मिळेनासें झालें आहे. यास्तव सांप्रत धर्मांत सुधारणा करणें अवश्य झालें आहे. पण हा सुधारणेविषयींचा विषय वादग्रस्त आहे. त्याचा निकाल मोठ्या माणसांनीं करावयाचा आहे. विद्यार्थ्यांसमोर तो ठेवण्यांत फायदा नाहीं. यासाठीं प्रस्तुत पुस्तकांत हा भाग आणिलेला नाहीं. पण त्यावरून सर्व जुन्या गोष्टींचें समर्थन करावें असा पुस्तकाचा भाव आहे असा वाचकांचा गैरसमज होऊं नये.

या पुस्तकाचीं प्रुफें तपासण्याचें काम आमचे मित्र व मराठींतील सुप्रसिद्ध लेखक रा० रा० बाळकृष्ण भाऊ जोशी यांनीं आपलें स्वतःचें काम समजून वेळेवर व निरपेक्षपणें करून दिलें, याबद्दल त्यांचे आम्ही फार आभारी आहों.

पुणें,
ता. ५।७।२३.

पंढरीनाथ वामन शिखरे, L.M.S. अध्यक्ष
राजाराम साखराम भागवत, M. A. } चि.म.
मार्तंड सखाराम प्रधान, } थि.फे.

---

## द्वितीयावृत्तीविषयीं.

प्रथमावृत्तींत व या द्वितीयावृत्तींत मजकुराचे दृष्टीनें कांहींच फरक केलेला नाहीं. सर्वांना या धर्मपुस्तकाचा लाभ घेतां यावा म्हणून किंमत मात्र कमी केली आहे.

पुणें,
ता. ५।१।२५.

प्रकाशक.

# प्रस्तावना.†

सेंट्रल हिंदु कॉलेजच्या ट्रस्टींच्या बोर्डानें आपल्या नियंत्रणाखालीं असलेल्या सर्व संस्थांत धार्मिक व नैतिक शिक्षण कसें द्यावयाचें ह्याविषयीं पुढील धोरण निश्चित केलें आहे.

आजच्या काळास उपयुक्त असणाऱ्या पाश्चिमात्य शिक्षणास हिंदुधर्मांतर्गत धार्मिक व नैतिक शिक्षणाची जोड देणें हा सेंट्रल हिंदु कॉलेजचा हेतु असल्यामुळें, तें धार्मिक व नैतिक शिक्षण कोणत्याही विशिष्ट संप्रदायाचें नसून त्याची दृष्टि उदार व उदात्त असावी. पण त्याबरोबरच तें निश्चितपणें व विशेष रीतीनें हिंदुधर्माचेंच असावें हें अवश्य आहे. हिंदुधर्माच्या शिकवणीचे जे अगदीं भिन्न भिन्न प्रकार आहेत, त्या सर्वांचा त्यांत समावेश व्हावयास पाहिजे; तसेंच जी शिकवण हिंदुधर्माच्या कक्षेच्या बाहेर आहे ती त्यांत येतां कामा नये. हिंदुधर्मांत मोडणाऱ्या पंथांमध्यें ज्या मतांसंबंधानें वाद उत्पन्न झाले आहेत तीं मतें त्यांत आणणें इष्ट नाहीं; तसेंच सद्यःकालीन राजकीय व सामाजिक प्रश्नांचा त्यांत ऊहापोह होऊं नये. पण त्या शिक्षणानें धर्माचा व नीतीचा असा दृढ पाया घालावा कीं, विद्यार्थी मोठा झाल्यावर त्यास त्या पायावर स्वतःच्या विचारांस व भावनांस अनुसरून पाहिजे तशी बांधणी करितां येईल. विद्यार्थ्यांचें शील चांगलें होईल; तो धर्मनिष्ठ, कर्तव्यदक्ष, जोमदार, स्वावलंबी, प्रामाणिक, सात्त्विक, सौजन्यपूर्ण व मन समतोल ठेवणारा असा होईल; शीलानें तो सद्गृहस्थ व चांगला नागरिक बनेल हा त्या शिक्षणाचा कटाक्ष असावयास पाहिजे. धर्माचीं मूलतत्त्वें मनुष्यास आयुष्यांतील कर्तव्यें शिकवीत असल्यानें व जीविताविषयीं योग्य ती दृष्टि त्यास शिकवीत असल्यानें अशा प्रकारचें शील उत्पन्न करण्यास तींच पुरेशीं आहेत. हिंदु लोक ज्या सामान्य धर्मानें एकत्र बांधले गेले आहेत तो स्पष्टपणानें व सरळपणानें शिकविण्यांत येऊन, ज्या गोष्टींनीं हिंदु लोकांत तक्रारी उत्पन्न होतात त्यास फांटा दिला पाहिजे. आणखी असें कीं, त्या शिक्षणानें सहिष्णुताबुद्धीचा इतका परिपोष व्हावयास हवा कीं, माणसानें फक्त हिंदु-

† ही मूळ पुस्तकाची प्रस्तावना होय.

हिंदुधर्मांतील भिन्न आचारविचारांविषयीं उदारबुद्धि न ठेवितां त्या उदारबुद्धीचें क्षेत्र विस्तृत करून हिंदुधर्माबाहेरील इतर निरनिराळ्या धर्मांसही त्यांत आणिलें पाहिजे व सर्व धर्म ईश्वराकडे जाण्याचेच मार्ग आहेत हें चांगलें ओळखिलें पाहिजे.

सारांश,

(१) धार्मिक व नैतिक शिक्षण असें असलें पाहिजे कीं, तें सर्व हिंदु लोकांस मान्य होईल;

(२) ज्या विशेष विचारांनीं हिंदुधर्म हा इतर धर्मांहून वेगळा असा ओळखावयास येतो तीं मतें त्यांत यावयास पाहिजेत;

(३) आणि कोणत्याही एकाच संप्रदायाचीं वा पंथाचीं विशिष्ट मतें त्यांत अंतर्भूत होतां कामा नयेत.

वरील धोरणास अनुसरून "सनातनधर्मप्रवेश" हें पुस्तक हिंदुस्थान देशांतील हायस्कुलांमधल्या मध्यम व वरच्या इयत्तांकरितां लिहिण्यांत आलें आहे. या पुस्तकापासून विद्यार्थ्यांस आपल्या राष्ट्रीय धर्माची सामान्य पण निर्दोष रूपरेषा समजून येईल. नंतर त्यांत मोठे वर्गांच्या अभ्यासानें त्यांस अधिक गोष्टींची भर घालतां येईल; पण कोणत्याही महत्त्वाच्या बाबतींत त्या रूपरेषेंत बदल करण्याचें कारण पडणार नाहीं.

जीं मतें व जीं मूलतत्त्वें हिंदुधर्माचीं म्हणून सामान्यतः मानिलेलीं आहेत, त्यांचा या पुस्तकांत अंतर्भाव झाला आहे, पण ज्या तपशिलाच्या बाबींबद्दल वाद उत्पन्न झाले आहेत त्या यांत आणिलेल्या नाहींत. विशिष्ट पंथाच्या आईबापांस किंवा शिक्षकांस या पुस्तकांत कांहीं अधिक गोष्टींचा समावेश व्हावा असें वाटण्याचा बराच संभव आहे, पण त्यांत लिहिलेल्या कोणत्याही गोष्टी त्यांस अमान्य होणार नाहींत असें वाटतें.

या पुस्तकाचा विद्यार्थ्यांनीं स्वतःच अभ्यास करण्यास कांहीं अडचण आहे असें नाहीं. पण तें शिक्षकानें शिकवावें व त्यांतील विषय स्पष्टीकरण करून विशद करावा असा आमचा हेतु आहे. कित्येक प्रकरणांच्या आधारावर एक किंवा अधिक धडे शिक्षकास त्यांस शिकवितां येण्याजोगे आहेत.

प्रकरणांच्या शेवटीं दिलेले श्लोक विद्यार्थ्यांनीं पाठ करावेत, म्हणजे धर्मसंबंधींच्या ग्रंथांतल्या आधारांचा त्यांच्यापाशीं चांगला संग्रह जमेल.

या मालेस* "सनातनधर्म" असें जें नांव दिलें आहे तें पूर्ण विचार करून ठरविण्यांत आलें आहे. धर्माचीं मूलभूततत्त्वें तींत येणार म्हणून तें नांव आम्हांस बरें वाटत आहे. हिंदुस्थानच्या कित्येक प्रांतांत त्या नांवाचा कांहींसा संकुचित अर्थ झालेला आहे, पण "मूळचा शाश्वत धर्म" अशा अर्थानेंच येथें त्या शब्दाचा उपयोग केला आहे.

हिंदुलोकांच्या मुलांच्या मनांत सद्विचाराचा भक्कम पाया घालण्याचे कामीं या पुस्तकाचा उपयोग होवो, व मातृभूमीचे व साम्राज्याचे नीतिमान्,धर्मनिष्ठ, राजनिष्ठ व कर्तव्यदक्ष नागरिक निपजविण्याच्या मार्गीं त्याचें साहाय्य होवो इतकीच या पुस्तकाच्या लेखकांची अपेक्षा आहे.

---

* या मालेंत तीन पुस्तकें आहेत. पहिलें अगदीं लहान विद्यार्थ्यांसाठीं आहे. त्याचें मराठींत भाषांतर झालें असून तें वैद्यबंधु, ठाकुरद्वार, मुंबई यांनीं प्रसिद्ध केलें आहे. प्रस्तुत पुस्तक हें त्या मालेंतील दुसरें पुस्तक होय. तिसरें पुस्तक कॉलेजच्या विद्यार्थ्यांसाठीं आहे. —भाषांतरकार.

# अनुक्रमणिका.


| विषय | पृष्ठ |
|---|---|
| प्रस्तावना ... ... ... ... | |


## भाग १ ला.

### हिंदुधर्माचीं मूलतत्त्वें.


| | |
|---|---|
| उपोद्‌घात ... ... ... ... | १ |
| प्रकरण १ लें—एकं सत् ... ... ... | ८ |
| ,, २ रें—बहुविध सृष्टि ... ... ... | १४ |
| ,, ३ रें—पुनर्जन्म ... ... ... | २४ |
| ,, ४ थें—कर्म ... ... ... | ३१ |
| ,, ५ वें—यज्ञ ... ... ... | ३९ |
| ,, ६ वें—दृश्य व अदृश्य सृष्टि ... ... | ४६ |


## भाग २ रा.

### हिंदूंचे सामान्य धार्मिक आचार व विधि.


| | |
|---|---|
| प्रकरण १ लें—संस्कार ... ... ... | ५२ |
| ,, २ रें—श्राद्ध ... ... ... ... | ५६ |
| ,, ३ रें—शौच ... ... ... ... | ५८ |
| ,, ४ थें—दैनिक पंचयज्ञ ... ... ... | ६३ |
| ,, ५ वें—उपासना ... ... ... | ६६ |
| ,, ६ वें—आश्रमचतुष्टय ... ... ... | ७० |
| ,, ७ वें—चातुर्वर्ण्य ... ... ... | ७७ |

# भाग ३ रा.

## नीतितत्त्वें.


| विषय | | | पृष्ठ |
|---|---|---|---|
| प्रकरण १ लें—नीतिशास्त्र म्हणजे काय? | ... | ... | ८४ |
| ,, २ रें—नीतिशास्त्राचा पाया... | ... | ... | ८७ |
| ,, ३ रें—नीति व अनीति ... | ... | ... | ९० |
| ,, ४ थें—नीति-अनीतीची कसोटी | ... | ... | ९५ |
| ,, ५ वें—सद्‌गुण व त्यांचें मूळ | ... | ... | ९७ |
| ,, ६ वें—सत्, चित् आणि आनंद | ... | ... | १०५ |
| ,, ७ वें—स्वविषयक सद्‌गुण... | ... | ... | १०९ |
| ,, ८ वें—श्रेष्ठांसंबंधींचे सद्‌गुण-दुर्गुण | ... | ... | १२१ |
| ,, ९ वें—स्वसमजनांसंबंधीं सद्‌गुण-दुर्गुण... | | ... | १३६ |
| ,, १० वें—कनिष्ठांसंबंधीं सद्‌गुण-दुर्गुण | ... | ... | १६० |
| ,, ११ वें—सद्‌गुण-दुर्गुणांची अन्योन्य-प्रतिक्रिया | | ... | १७५ |

सत्यमेव जयते नानृतम् ।

उत्तिष्ठत जाग्रत प्राप्य वरान् निबोधत ॥

# सनातनधर्मप्रवेश

## भाग १ ला–हिंदुधर्माचीं मूलतत्त्वें.

### उपोद्घात.

मंगलं दिशतु नो विनायको मंगलं दिशतु नः सरस्वती ।
मंगलं दिशतु नः समुद्रजा मंगलं दिशतु नो महेश्वरी ॥

सनातनधर्म याचा अर्थ शाश्वतधर्म अथवा प्राचीनधर्म असा आहे. प्राचीन काळीं मानवजातीला देण्यांत आलेले पवित्र ग्रंथ जे वेद ते ह्या धर्माचे आधारभूत ग्रंथ होत. आर्यवंशाच्या पहिल्या राष्ट्राचा हा धर्म असल्यामुळें ह्याला आर्यधर्म असेंही म्हणतात. आर्य म्हणजे उदात्त; हे लोक जगाच्या इतिहासांत पूर्वी होऊन गेलेल्या मानववंशांतील इतर लोकांपेक्षां शीलानें व स्वरूपानें उच्च असल्यामुळें त्यांना हें नांव प्राप्त झालें. ह्या लोकांचीं पहिलीं कुटुंबें हिंदुस्थानच्या उत्तरभागांत वसाहत करून राहिलीं; व हे लोक तेथें राहिल्यामुळें त्या भागाला आर्यावर्त असें म्हणूं लागले. हिमवान् व विंध्य-पर्वत आणि पूर्व व पश्चिम समुद्र यांमधील भागाला ज्ञाते लोक आर्यावर्त म्हणतात.†

ह्या धर्माला हिंदुधर्म असें नंतर म्हणूं लागले, व त्याच नांवानें आज तो प्रसिद्ध आहे. आज अस्तित्वांत असलेल्या इतर धर्मांहून हा अत्यंत प्राचीन आहे, व ह्याच्याइतके इतर कोणत्याही धर्मांत मोठे धर्मप्रवर्तक, मोठे ग्रंथ-

---

† आपूर्वसमुद्रादापश्चिमसमुद्राद्धिमवद्विन्ध्ययोश्च यन्मध्यं तमार्यावर्तदेशं पंडिता जानन्ति । मनुस्मृतिः २–२२ टीका. —भाषांतरकार.

कार, ऋषि, संत, मोठे राजे, मोठे योद्धे, मोठे राजकार्यधुरंधर, मोठे परोपकारी व मोठे देशभक्त झालेले नाहींत. त्या धर्माचें तुम्हांला जेवढें अधिक ज्ञान होईल, तेवढें अधिक प्रेम व आदर त्याबद्दल तुम्हांला वाटेल, व अशा धर्माच्या लोकांत आपणांस जन्म प्राप्त झाला म्हणून अधिक धन्यताही वाटेल. परंतु त्याला उचित अशी पात्रता तुम्हीं आपल्यामध्यें आणिल्याशिवाय ह्या मोठ्या व पवित्र धर्माचा तुम्हांला कोणताही फायदा होणार नाहीं.

## सनातनधर्माचा पाया

सनातनधर्मरूपी इमारतीच्या भिंती एका भक्कम पायावर उभारलेल्या आहेत. श्रुति (ऐकून प्राप्त झालेल्या) हा तिचा पाया असून स्मृति (स्मरणानें प्राप्त झालेल्या ) ह्या तिच्या भिंती आहेत.

श्रुति ज्ञानवान् ऋषींना देवांकडून ऐकून प्राप्त झाल्या व त्यांनीं त्यांचा लोकांमध्यें प्रसार केला. ह्या श्रुति अगदीं अलीकडच्या काळापर्यंत ग्रंथरूपानें प्रसिद्ध झाल्या नव्हत्या; त्या तोंडपाठ करून वारंवार म्हटल्या जात असत.

प्रथमतः शिक्षकानें शिष्यांसमोर त्या स्वरांवर म्हणावयाच्या, लगेच त्या म्हणून दाखवावयाच्या व अशा रीतीनें थोडथोड्या शब्दांची संथा देऊन मुखोद्गत करावयाच्या, अशी श्रुति शिकण्याची जुनी पद्धत होती. अगदीं प्राचीन काळीं आपले पूर्वज ज्या रीतीनें पठन करीत असत त्याच रीतीनें पठन करीत असलेले विद्यार्थी आजसुद्धां कोणत्याही वैदिक पाठशाळेमध्यें तुम्हांला आढळून येतील. श्रुतींमध्यें चार वेदांचा समावेश होतो. वेद म्हणजे ज्ञान; ज्या ज्ञानावर धर्माची उभारणी केलेली आहे तें ज्ञान मनुष्याच्या उपयोगाकरितां चार वेदांमध्यें ग्रथित केलेलें आहे. त्या चार वेदांचीं नांवें ऋग्वेद, सामवेद, यजुर्वेद व अथर्व वेद, अशीं आहेत.

प्रत्येक वेदाचे तीन भाग आहेत. १ मन्त्र अथवा संहिता (संहिता म्हणजे एकत्र केलेल्या ), २ ब्राह्मण, आणि ३ उपनिषत्.[†]

---

† 'मंत्रब्राह्मणयोः वेदनामधेयम्' या वचनानुसार कधीं कधीं वेदाचे मंत्र व ब्राह्मण असे दोन भाग करितात व उपनिषदें ही ब्राह्मणाचा भाग समजतात.

मन्त्रप्रकरणांत मन्त्र दिलेले असून त्या मन्त्रांच्या ध्वनीच्या क्रमांत विशिष्ट शक्ति असते, व ती विशिष्ट परिणाम करिते. हे मन्त्र म्हणजे देवांची गाइलेलीं स्तोत्रें होत; व जेव्हां ते योग्य रीतीनें पढलेल्या माणसांकडून म्हटले जातात तेव्हांच त्यांचा परिणाम होतो. ह्यांचा उपयोग धार्मिक संस्कारांच्या वेळीं करितात, व ह्या संस्कारांचें महत्त्व शास्त्रोक्त मन्त्रपठनावरच मुख्यत्वेंकरून अवलंबून असतें.

वेदांतील ब्राह्मणप्रकरणामध्यें धार्मिक विधींची माहिती दिलेली असून, ज्यांत मन्त्रांचा उपयोग केला जातो असे धार्मिक संस्कार कसे करावे ह्यासंबंधीं विवेचन आहे, व तत्संबंधीं गोष्टीही आहेत.

उपनिषत्–प्रकरणांत परब्रह्माचें स्वरूप, परमात्मा व जीवात्मा, मनुष्य व विश्व, तसेंच बंध व मोक्ष ह्यांसंबंधीं गहन तात्त्विक विचार भरलेले आहेत. सर्व तत्त्वज्ञानाचा हा पाया आहे; तुम्ही मोठे झाल्यावर त्याचा अभ्यास करून त्यांतच रंगून जावें, अशा मोलाचे हे विचार आहेत. विशेष सुशिक्षित लोकांनाच फक्त त्याचा अभ्यास करितां येईल; इतरांना तो विषय फार गहन आहे.

प्राचीन काळीं ज्याला क्वचित् उपवेद किंवा तन्त्र म्हणत असा एक वेदाचा चवथा भाग होता. ह्यांत शास्त्रीय ज्ञानाचा समावेश होत असून, तदंगभूत व्यावहारिक माहितीही दिलेली होती. खरें प्राचीन तन्त्र सध्यां फारसें उपलब्ध नाहीं; कारण, ज्या काळांत लोकांची आध्यात्मिक उन्नति कमी असेल अशा काळीं तन्त्रांचा उपयोग करणें योग्य नाहीं म्हणून ऋषींनीं त्याचा लोप केला आहे. तथापि पूजेच्या वेळीं रूढ असलेल्या वैदिक उपचारांऐवजीं, किंवा त्यांच्याबरोबर, कांहीं तान्त्रिक उपचारांचाही उपयोग केला जातो. तन्त्र ह्या नांवाचे हल्लीं उपलब्ध असलेले ग्रंथ वेदाचा भाग म्हणून सामान्यतः मानिले जात नाहींत.

---

ब्राह्मणांपैकीं जो भाग अरण्यांत म्हणावा असें सांगितलें आहे, त्याला आरण्यक असें म्हणतात. "अरण्येऽनूच्यमानत्वादारण्यकम्" असें शंकराचार्यांनीं म्हटलें आहे. आरण्यकांपैकीं ज्या भागांत प्राधान्यानें मोक्षविचार केलेला असतो त्याला उपनिषत् म्हणतात. —भाषांतरकार.

सनातनधर्माच्या प्रत्येक एकनिष्ठ अनुयायाकडून श्रुतिवाक्य हें सर्वांत श्रेष्ठ प्रमाण म्हणून मानिलें जातें. प्रत्येक वादाचा निर्णय करितांना सर्व पंथ व सर्व दर्शनें निर्णायक प्रमाण म्हणून श्रुतीचाच आश्रय करितात.

स्मृति किंवा जिला धर्मशास्त्र असेंही म्हणतात तिला श्रुतीचा आधार असून ती श्रुतीच्या खालोखाल प्रमाण मानितात. ह्यांत ऋषिप्रणीत अशा चार मोठ्या ग्रंथांचा समावेश होत असून त्यांत वैयक्तिक, कौटुंबिक, सामाजिक व राष्ट्रीय आचार-विचारांचे नियम दिलेले आहेत. स्मृतिग्रंथ हे हिंदु-समाजाचा पाया असून त्यांनींच त्याचें नियमन केलें आहे. हे ग्रंथ म्हणजे—

१ मनुस्मृति अथवा मानवधर्मशास्त्र.
२ याज्ञवल्क्यस्मृति.
३ शंखलिखितस्मृति† आणि
४ पराशरस्मृति. असे आहेत.

ह्यांतील मनुस्मृति हा आर्यधर्माचा मुख्य ग्रंथ असून, मनु हा आर्य-वंशाचा मुख्य धर्मप्रणेता होय. हिंदु कालगणनेप्रमाणें जगाच्या इतिहासाचे सात मोठे भाग अथवा कालविभाग होतात; व त्या प्रत्येक भागाच्या प्रारंभीं व अंतीं मनूची उत्पत्ति असल्यामुळें त्या भागाला मन्वंतर अथवा दोन मनूं-मधील अंतर असें म्हणतात.

"स्वयंभूच्या वंशांतील जो हा मनु त्याच्याच वंशांतील उदारमनस्क व तेजस्वी अशा दुसऱ्या सहा मनूंपैकीं प्रत्येकानें प्रजा उत्पन्न केली."‡ ज्या अर्थी प्रत्येक मन्वंतराला दोन मनु असतात, त्या अर्थी आज आम्ही चवथ्या मन्वंतरामध्यें असून विवस्वताचा पुत्र जो सातवा वैवस्वत मनु त्याच्या सत्ते-खालीं आहों. त्यानें केलेले कांहीं नियम मनुस्मृतीमध्यें समाविष्ट झाले आहेत.

साधारणतः मनुस्मृतीला अनुसरूनच याज्ञवल्क्यस्मृतींतील नियम असून मनुस्मृतीपेक्षां ते कमी महत्त्वाचे मानितात. दक्षिण हिंदुस्थानांतील कांहीं

---

†शंख व लिखित ह्या नांवाच्या दोन ऋषींनीं केलेला ग्रंथ. ‡ स्वायंभुवस्यास्य मनोः षड्वंश्या मनवोऽपरे । सृष्टवन्तः प्रजाः स्वाः स्व महात्मानो महौजसः ॥

—मनुस्मृति, १. ६१.

भाग खेरीजकरून हिंदुस्थान देशाच्या इतर भागांत बाकी राहिलेल्या दोन स्मृतींचें विशेषसें अध्ययनही होत नाहीं, व त्यांचें विशेषसें प्रामाण्यही मानिलें जात नाहीं.

सनातनधर्मरूपी इमारतीचे श्रुति व स्मृति हे पाया व भिंती असून पुराणें व इतिहास हे दोन आधारस्तंभ आहेत.

पुराणांमध्यें इतिहास, गोष्टी व रूपकें एवढ्यांचा समावेश होतो; व तीं राष्ट्रांतील अविद्वान् व विशेषत: वेदाध्ययन ज्यांस येत नसे अशा लोकांच्या उपयोगाकरितां रचलेलीं आहेत. पुराणें वाचावयास मनोरंजक असून नाना तऱ्हेच्या माहितीनें परिपूर्ण आहेत. त्यांतील कांहीं रूपकें इतकीं कठिण आहेत कीं, तीं समजण्यास गुरूचीच गरज लागते.

इतिहासांत दोन मोठ्या काव्यग्रंथांचा समावेश होतो.

१. पहिला ग्रंथ रामायण. ह्यांत दशरथ राजाचा मुलगा श्रीरामचंद्र, त्याची पत्नी सीता व त्याचे बंधु ह्यांचा इतिहास दिलेला असून तो वाचावयास मोठा मनोरंजक व आल्हादकारक आहे.

२. दुसरा ग्रंथ महाभारत. ह्यांत उत्तरहिंदुस्थानांतील ज्या कुरुकुलामध्यें कौरव व पांडव विभक्त होऊन त्यांच्यामध्यें भारतीय युद्ध झालें, त्या कुलाचा इतिहास आहे. ह्यांत असंख्य सुंदर गोष्टींचा भरणा असून, उदात्त नैतिक उपदेश व हरतऱ्हेची उपयुक्त माहिती भरलेली आहे.

रामायण व महाभारत ह्या दोन ग्रंथांवरून प्राचीन आर्यावर्त, त्यांतील लोक व त्यांच्या रीतीभाती, राहणीची पद्धति, कला व उद्योगधंदे ह्यांबद्दलची माहिती मिळते. तुम्ही जर हे ग्रंथ वाचाल तर एका काळीं आर्यावर्त हें केवढ्या वैभवास जाऊन पोहोंचलें होतें, व तेंच वैभव त्याला पुन्हा प्राप्त करून देण्यासाठीं आपण कसें वागलें पाहिजे हें तुम्हांला कळेल.†

## सनातनधर्मांतर्गत शास्त्र व तत्त्वविचार.

सनातनधर्मरूपी इमारतीला श्रुति, स्मृति, पुराणें व इतिहास ह्यांचा आधार

---

† रामायण व महाभारत यांच्यासंबंधाचीं सेंट्रल हिंदु कॉलेजमध्यें ॲनी बेझंट डी. एल. यांचीं झालेलीं व्याख्यानें पुस्तकरूपानें प्रसिद्ध झालेलीं आहेत.

असून त्याच धर्मापासून शास्त्रीय व तत्त्वज्ञानविषयक सुंदर वाङ्मयाचा उगम झालेला आहे.

शास्त्रीय विषयाचीं षडंगें अथवा सहा भाग केलेले आहेत, व ज्यास आज आपण लौकिक विषय म्हणतों त्यांचा त्यांत समावेश होतो. प्राचीन काळीं शास्त्र, धार्मिक विषय व व्यावहारिक विषय असा भेद नव्हता.

व्याकरण, व्युत्पत्ति ( किंवा निरुक्त ), ज्योतिष,छंद, चौसष्ट शास्त्रें व कला, अध्ययनपद्धति इत्यादिकांचा षडंगात समावेश होतो. ह्या षडंगांचें अध्ययन करणारा मनुष्य बहुश्रुत व विद्वान् गणला जात असे.

तत्त्वविचाराचेही सहा भाग केले असून त्यांना षड्दर्शनें(पाहाण्याचे सहा प्रकार) असें म्हणतात. परमात्म्याशीं जीवात्म्याचें ऐक्य होऊन दुःखनिवृत्ति व्हावी हें सर्व दर्शनांचें एकच साध्य व ज्ञानविकास हें सर्वांचें एकच साधन; परंतु एकाद्या शहराला जाणारे वेगवेगळे सहा रस्ते असावे त्याप्रमाणें लोकांच्या निरनिराळ्या मानसिक शक्तीला ग्राह्य होतील असे सूचित केलेले त्यांतले मार्ग मात्र वेगवेगळे आहेत.

षड्दर्शनांमध्यें काय सांगितलें आहे ह्याचा ह्या ठिकाणीं थोडक्यांत उल्लेख केला तरी पुरे आहे. न्याय व वैशेषिक दर्शनें जगांतील सर्व वस्तूंचें विशिष्ट वर्गीकरण करितात; व त्या सर्वांचें ज्ञान (१) प्रत्यक्ष प्रमाणानें म्हणजे इंद्रिय-संनिकर्षानें होतें, किंवा (२) अनुमानानें होतें, किंवा (३) उपमानप्रमाणानें म्हणजे सादृश्यानें होतें,किंवा (४) शब्दप्रमाणानें म्हणजे शहाण्या व अनुभवी व्यक्तींच्या शब्दानें—आप्तवाक्यानें--होतें असें म्हणतात. ईश्वरानें हें सर्व पंच-भूतात्मक जग अणु व परमाणु ह्यांपासून कसें तयार केलें, मनुष्यामध्यें चिद्रूपानें राहणाऱ्या त्या ईश्वराचें ज्ञान हेंच सर्वोपयुक्त व सर्वोत्कृष्ट ज्ञान कसें व तें निरनिराळ्या प्रकारांनीं कसें मिळवितां येईल ह्याचें हीं विवेचन करितात.

सांख्यदर्शनामध्यें पुरुष व प्रकृति, किंवा आत्मा व शरीर ह्यांचें स्वरूप व त्यांचा परस्परसंबंध ह्याविषयीं सविस्तर वर्णन केलें आहे.

योगदर्शनावरून आपणांला असें समजतें कीं, सध्यां साधारणतः माहीत असलेलीं पांच ज्ञानेंद्रियें व पांच कर्मेंद्रियें ह्यांशिवाय आणखीही सूक्ष्म ज्ञानें-द्रियें व कर्मेंद्रियें आहेत. आत्मस्वरूपी ईश्वराचें ज्ञान करून घेण्याची इच्छा

बाळगणाऱ्या मनुष्यानें त्यांचा विकास कसा करावा ह्याचें त्या शास्त्रांत सविस्तर विवेचन आहे.

मीमांसादर्शनांत धार्मिक व लौकिक कर्मांचा ऊहापोह केलेला आहे; म्हणजे कर्म कोणत्याही प्रकारचें असो, त्याची उत्पत्ति व परिणाम काय व त्यामुळें इहलोकीं व परलोकीं मनुष्य कसा बद्ध होतो ह्याचें विवेचन केलेलें आहे.

वेदान्तदर्शनांत ईश्वर अथवा आत्मा ह्याच्या वास्तविक स्वरूपाचा निर्णय करून, तात्त्विकदृष्ट्या जीवात्मा हा ईश्वराचा अंश आहे, व मनुष्यानें कसें वागलें असतां त्याचीं कर्में त्याला बंधनकारक होणार नाहींत, ह्याचें सविस्तर विवेचन केलें आहे; व सरतेशेवटीं ईश्वर ज्या आपल्या मायाशक्तीनें सर्व विश्वाची उत्पत्ति, स्थिति व लय हीं घडवून आणतो ती मायाशक्ति काय आहे, व योगाभ्यासानें ईश्वरस्वरूपीं लीन होऊन जीव-ईश्वर-ऐक्य किंवा मोक्ष मनुष्याला कसा प्राप्त होईल ह्याचाही त्यांत विचार आलेला आहे.

## प्रकरण पहिलें.

# एकं सत्

सर्वत्र खरोखरी एकच वस्तु अस्तित्वांत आहे—ती अनंत, शाश्वत, निर्विकार आहे. जें सर्व आहे तें ती वस्तु होय.

त्या वस्तूपासूनच सर्व विश्वाची उत्पत्ति होते व त्यांतच सर्व विश्वाचा लयही होतो. "तें एकच, अद्वितीय आहे", दुसरें कांहीं नाहीं.†

त्यामध्येंच आजपर्यंत झालेल्या, आज अस्तित्वांत असणाऱ्या व पुढें उत्पन्न होऊं शकणाऱ्या सर्व वस्तूंचा अंतर्भाव होतो. समुद्रामध्यें ज्या-प्रमाणें लाट उत्पन्न होते; त्याचप्रमाणें त्या वस्तूच्या ठिकाणीं विश्वाची उत्पत्ति होते; व लाटेचा जसा समुद्रामध्यें लय होतो तसाच विश्वाचा त्या वस्तूमध्यें लय होतो. समुद्र म्हणजे एकच पाणी, परंतु लाट हा त्या पाण्याचा विशिष्ट आकार किंवा व्यक्त स्वरूप; त्याचप्रमाणें ही एकच वस्तु आहे व विश्व हें त्याचें व्यक्त स्वरूप आहे. "हें (विश्व) सर्व ब्रह्मच आहे."‡

हेंच धर्माचें आद्यतत्त्व होय. त्या वस्तूला भिन्न भिन्न नांवें देण्यांत आलेलीं आहेत. सनातनधर्मात त्याला 'ब्रह्म' असें म्हणतात, व इंग्रजी भाषेंत त्याला ईश्वर ( God ) म्हणतात, व अर्थ विशेष स्पष्ट करण्यासाठीं त्याला "मूळ स्वरूपी" (God, In His Own Nature) हे शब्द जोडतात. हिंदु लोक कधीं कधीं त्याला निर्गुण ब्रह्म असेंही म्हणतात. ब्रह्माचें अव्यक्त स्वरूप व व्यक्त स्वरूप हीं स्पष्ट लक्षांत यावीं एवढ्याच साठीं अव्यक्ताला निर्गुण ब्रह्म, व व्यक्ताला (म्हणजे परमेश्वर व त्याचें विश्व ह्याला) सगुण ब्रह्म असें म्हणतात. हीं ब्रह्माचीं दोन रूपें होत.†

हा विषय गहन असल्यामुळें मुलांनीं एवढें लक्षांत ठेविलें तरी पुरें आहे कीं, सगुण ब्रह्म म्हणजे निर्गुणाचेंच प्रकट झालेलें स्वरूप किंवा सत्;

---

† एकमेवाद्वितीयम्—छांदोग्योपनिषत्. ६, २, १.

‡ सर्वं खल्विदं ब्रह्म—३, १४, १ ( इदम् = विश्व.)

† द्वे वाव ब्रह्मणो रूपे मूर्तं चैवामूर्तं च—बृहदारण्यकोपनिषद् २, ३. १.

चित् व आनंद स्वरूपी परमेश्वर होय, भिन्न ब्रह्म नव्हे. तो स्वयंभू असून सर्व विश्वाचें मूळ व आदिकारण होय. त्याला कधीं कधीं पुरुषोत्तम, परमात्मा, किंवा आत्मा असेंही म्हणतात. स्वतः आत्मतत्त्व बनून निर्गुण ब्रह्माची दुसरी बाजू जी मूल-प्रकृति ती हा व्यक्त करितो. प्रकृति ( किंवा द्रव्य ) आकारक्षम असल्यामुळें तिच्यापासून निरनिराळ्या प्रकारचीं व आकाराचीं शरीरें तयार होतात. त्वचा, जीभ, नाक, डोळे व कान ह्या पंच ज्ञानें-द्रियांनीं जेवढ्याचें ज्ञान होतें ती प्रकृति; एवढेंच नव्हे, तर त्याच्याही पलीकडे ती आहे. आमच्या ज्ञानेंद्रियांचीं परिपूर्ण वाढ झाली नसल्यामुळें त्यांना तिचा कांहीं भाग अगम्य आहे. रसायनशास्त्रांत सांगितलेले घन, प्रवाही व वायुरूप पदार्थ हे प्रकृतीचेच बनलेले आहेत. दगड, वृक्ष, प्राणी, मनुष्य वगैरे आमच्या सभोंवतालचे सर्व पदार्थ प्रकृतीचेच आहेत; परंतु त्यांत प्रकृतीखेरीज, कान, डोळा, रसना नाक, स्पर्श इत्यादि इंद्रियांस अगम्य असें आत्मतत्त्व, असा ईश्वराचा अंशही आहे. तें आत्मतत्त्व प्रकृतीनें आच्छादिलेलें असल्यामुळें त्या प्रकृतीला शरीर किंवा कोश[१] किंवा उपाधि असें म्हणतात. ईश्वर हा सर्व वस्तूंमध्यें आहे व तोच त्यांना जिवंतपणा देतो. सर्वांच्या अंतर्यामीं राहणारा असा तो अविनाशी कूटस्थ आत्मा होय. ज्या-मध्यें तो नाहीं अशी एकही वस्तु नाहीं. प्रकृतीचा आश्रय, अर्थात् देह, घेऊन राहाणाऱ्या ईश्वरी अंशाला जीवात्मा असें म्हणतात.

आत्मा व प्रकृति ( किंवा द्रव्य ) ह्यांमध्यें वर सांगितलेला व आणखी दुसरे विशेष महत्त्वाचे असे कांहीं भेद आहेत. ज्ञानेंद्रियांची पूर्ण वाढ झाल्या-नंतर त्यांना प्रकृति गोचर होऊं शकेल, परंतु आत्मा गोचर होणार नाहीं. तसेंच प्रकृतीला आकार धारण करितां येतात, परंतु आत्मा निराकार आहे. आत्मा हीच आमची चिच्छक्ति; तोच विचार करितो, तोच जाणतो, तोच पाहातो; आम्हां प्रत्येकामधील "मी" तो तोच. आत्मा एक असून प्रत्येक मनुष्यांमध्यें व प्रत्येक वस्तूमध्यें तोच भरला आहे. परंतु प्रकृतीला विचार करितां येत नाहीं, जाणतां येत नाहीं, पहातां येत नाहीं; ती जड व चैतन्यविरहित आहे; त्याचप्रमाणें नेहमीं अनेक रूपें धारण करण्याकडे तिचा

---

१. कोश हा शब्द कोष असाही लिहितात.

कल असतो. म्हणूनच आत्मा व प्रकृति ह्यांना परस्परविरोधी मानिलीं जातात. आत्म्याला ज्ञाता व प्रकृतीला ज्ञेय असें म्हणतात.

विद्यार्थ्यांनीं हे भेद नीट लक्षांत ठेवून आत्मा व प्रकृति ह्यांमध्यें घोटाळा करितां कामा नये; कारण ज्या द्वंद्वांचें हें विश्व बनलें आहे, त्यांतील आत्मा व प्रकृति हें पहिलें द्वंद्व होय.

ज्याप्रमाणें सत् ( अस्तित्व ), चित् ( विचारशक्ति ) आणि आनंद हे आत्म्याचे तीन गुण, त्याचप्रमाणें सत्त्व, रज आणि तम हे प्रकृतीचे तीन गुण होत. तमोगुणामुळें प्रकृतीला प्रतिकारित्व† व स्थिरता प्राप्त होतात, रजोगुणामुळें चंचलत्व प्राप्त होतें, व सत्त्वगुणामुळें त्या चंचलतेला नियमबद्धता प्राप्त होते. दगड आपण होऊन हालत नाहीं असें तुम्ही म्हणाल, परंतु त्या दगडांतील तुमच्या चक्षूंना अदृश्य असणारा प्रत्येक परमाणु जोरानें व नियमितपणानें फिरत असतो. किंवा शास्त्रीय परिभाषेप्रमाणें बोलावयाचें झाल्यास, आंदोलन पावत असतो.

ईश्वराच्या ज्या दैवी शक्तीमुळें प्रकृति साकार बनते तिलाच माया, अगर कधीं कधीं दैवी प्रकृति असें म्हणतात. हिलाच "जगाचें धारण करणारी अशी परा म्हणजे श्रेष्ठ प्रतीची जीवस्वरूपी दुसरी प्रकृति" असें भगवान् श्रीकृष्ण म्हणतात.

सृष्टींतील मोठें द्वंद्व ईश्वर व मूल प्रकृति हें होय. ईश्वर जणूं काय मूल प्रकृतीच्या समोर उभा राहून व आपल्या तेजोबलानें तिच्या गुणांचें परस्परांवर कार्य करवून निरनिराळे आकार तिला घ्यावयास लावतो. ज्या शक्तीनें तो हें करितो त्या शक्तीलाच माया असें म्हणतात. व म्हणून ईश्वराला मायेचा प्रभु असें म्हणतात.

---

† प्रतिकारित्व या गुणास इंग्रजींत Inertia म्हणतात. तमोगुणामुळें प्रत्येक पदार्थ आहे त्या स्थितींत रहातो, व त्या स्थितींत बदल उत्पन्न करण्याचा प्रयत्न केल्यास तो त्याचा प्रतिकार करतो. म्हणून तमोगुणामुळें पदार्थमात्रास प्रतिकारित्व हा गुण प्राप्त होतो असें वर म्हटलें आहे. चाक फिरत नसलें तर त्यास फिरविण्यास प्रयत्न लागतो व तसा प्रयत्न करण्यास त्या चाकाचा विरोध होतो; उलट, चाक फिरत असलें तर तें थांबविण्यास प्रयत्न लागतो व त्या प्रयत्नासही विरोध होतो हें सर्वांच्या परिचयाचें आहे. —भाषांतरकर्ता.

अगदीं लहान विद्यार्थ्यांनींसुद्धां हीं नांवें व त्यांचा अर्थ लक्षांत ठेविला पाहिजे; कारण त्याशिवाय भगवद्गीतेचें रहस्य त्यांना समजणार नाहीं, व तें तर प्रत्येक हिंदु विद्यार्थ्यानें समजून घेण्याचा प्रयत्न केला पाहिजे. ह्या ठिकाणीं एवढें सांगणें अवश्य आहे कीं, मूल प्रकृति ह्या शब्दांतील मूल हा शब्द वगळून फक्त प्रकृति असाच शब्द त्याच्या ऐवजीं बहुतकरून वापरतात.

ज्ञेयं यत्तत्प्रवक्ष्यामि यज्ज्ञात्वाऽमृतमश्नुते ।
अनादिमत् परं ब्रह्म न सत् तन्नासदुच्यते ॥
सर्वतः पाणिपादं तत्सर्वतोऽक्षिशिरोमुखम् ।
सर्वतः श्रुतिमल्लोके सर्वमावृत्य तिष्ठति ॥
सर्वेंद्रियगुणाभासं सर्वेंद्रियविवर्जितम् ।
असक्तं सर्वभृच्चैव निर्गुणं गुणभोक्तृच ॥
बहिरन्तश्च भूतानामचरं चरमेवच ।
सूक्ष्मत्वात्तदविज्ञेयं दूरस्थं चान्तिके च तत् ॥
अविभक्तं च भूतेषु विभक्तमिव च स्थितम् ।
भूतभर्तृ च तज्ज्ञेयं ग्रसिष्णु प्रभविष्णु च ॥
ज्योतिषामपि तज्ज्योतिस्तमसः परमुच्यते ।
ज्ञानं ज्ञेयं ज्ञानगम्यं हृदि सर्वस्य धिष्ठितम् ॥†

जें आपण जाणलें पाहिजे, व जें जाणल्यानें "अमृत" म्हणजे मोक्ष मिळतो तें तुला सांगतों. तें अनादि परब्रह्म होय. त्याला "सत्" असें म्हणत नाहींत; व "असत्" असेंही म्हणत नाहींत.

त्याला सर्व बाजूंनीं हातपाय आहेत; सर्व बाजूंनीं डोळे, डोकीं व तोंडें आहेत; सर्व बाजूंनीं कान आहेत; आणि तेंच ह्या लोकीं सर्व व्यापून राहिलें आहे.

त्यांत सर्व इंद्रियांच्या गुणांचा आभास होणारा असून त्याला कोणतेंच इंद्रिय नाहीं; तें असक्त म्हणजे सर्वांपासून अलग असूनही सर्वांचें धारण करणारें; आणि निर्गुण असूनही गुणांचा उपभोग घेणारें आहे.

तें सर्व भूतांच्या आंत व बाहेरही आहे; अचर आहे, व चरही आहे; सूक्ष्म असल्यामुळें ओळखण्यासारखें नाहीं, आणि दूर असूनही जवळ आहे.

---

† भगवद्गीता, १३. १२-१७.

तें अखंड असतांही सर्व भूतमात्रांत जणुं काय विभागून राहिलेलें आहे; व सर्व भूतमात्राला धारण करणारें, ग्रासणारें व उत्पन्न करणारेंही तेंच समजलें पाहिजे.

त्यालाच तेजाचेंही तेज, व अंधकारापलीकडचें म्हणतात; ज्ञान, ज्ञेय म्हणजे जें जाणावयाचें तें, व ज्ञानगम्य म्हणजे ज्ञानानेंच कळणारेंही तेंच असून सर्वांच्या हृदयांत तेंच अधिष्ठित झालेलें आहे.

आसीदिदं तमोभूतमप्रज्ञातमलक्षणम्
अप्रतर्क्यमविज्ञेयं प्रसुप्तमिव सर्वतः ॥
ततः स्वयंभूर्भगवानव्यक्तो व्यञ्जयन्निदम् ।
महाभूतादि वृत्तोजाः प्रादुरासीत्तमोनुदः ॥
योऽसावतींद्रियग्राह्यः सूक्ष्मोऽव्यक्तः सनातनः ।
सर्वभूतमयोऽचिन्त्यः स एव स्वयमुद्बभौ ॥†

हें सर्व अंधकारमय, अज्ञात, लक्षणविरहित ( एकजिनसी ), अतर्क्य, अज्ञेय व सर्व बाजूंनीं सुप्तावस्थेमध्यें होतें.

नंतर अव्यक्त भगवान् स्वयंभू हें महाभूतादि विश्व व्यक्त करण्यासाठीं आपण दिव्य शक्तीनें प्रकट झाला व त्यानें अंधकाराचा नाश केला. इंद्रियांच्या पलीकडे गेल्याशिवाय ज्याचें ज्ञान होणें शक्य नाहीं; जो सूक्ष्म, अव्यक्त, सनातन आहे; ज्यामध्यें सर्व भूतमात्रांचा समावेश होतो; व जो अचिन्त्य असा आहे तो प्रभु स्वतः प्रकट झाला.

अहमात्मा गुडाकेश सर्वभूताशयास्थितः ।
अहमादिश्च मध्यं च भूतानामन्त एव च ॥*

हे गुडाकेश ( अर्जुना ), सर्व भूतमात्रांच्या हृदयामध्यें राहिलेला आत्मा मी आहें; त्याचप्रमाणें त्यांचा आदि, मध्य व अंत मीच आहें.

द्वाविमौ पुरुषौ लोके क्षरश्चाक्षर एव च ।
क्षरः सर्वाणि भूतानि कूटस्थोऽक्षर उच्यते ॥
उत्तमः पुरुषस्त्वन्यः परमात्मेत्युदाहृतः ।
यो लोकत्रयमाविश्य बिभर्त्यव्यय ईश्वरः ।

---

† मनुस्मृति, १.५-७. * भगवद्गीता, १०-२०.

यस्मात्क्षरमतीतोऽहमक्षरादपि चोत्तमः ॥
अतोऽस्मि लोके वेदे च प्रथितः पुरुषोत्तमः ॥†

ह्या सृष्टीमध्यें क्षर ( नाशवंत ) व अक्षर ( अविनाशी ) असे दोनच पुरुष आहेत; सर्व भूतमात्राला क्षर म्हणतात, व त्या भूतमात्राच्या आंत असलेल्या जीवांना अक्षर म्हणतात.

उत्तम पुरुष ह्यांहून वेगळा आहे. त्याला परमात्मा म्हणतात; हा अविनाशी ईश्वर त्रैलोक्यामध्यें भरून राहून त्याचें धारण व पोषण करितो.

ज्याअर्थी असा हा मी क्षराच्या पलीकडचा असून अक्षराहूनही उत्तम आहें, त्याअर्थी लोकांमध्यें व वेदांमध्यें मला पुरुषोत्तम म्हणतात.

ममैवांशो जीवलोके जीवभूतः सनातनः ।
मनःषष्ठानींद्रियाणि प्रकृतिस्थानि कर्षति ॥*

माझाच अंश जीवलोकीं सनातन (शाश्वत रहाणारा) जीव बनून प्रकृतींत असणारीं मनासह सहा इंद्रियें स्वतःभोंवतीं ओढून घेतो.

समं सर्वेषु भूतेषु तिष्ठन्तं परमेश्वरम् ।
विनश्यत्स्वविनश्यन्तं यः पश्यति स पश्यति ॥
यदाभूतपृग्भावमेकस्थमनुपश्यति ।
तत एव च विस्तारं ब्रह्म सम्पद्यते तदा ॥
यथा प्रकाशयत्येकः कृत्स्नं लोकमिमं रविः
क्षेत्रं क्षेत्री तथा कृत्स्नं प्रकाशयति भारत ॥‡

परमेश्वर भूतमात्रांच्या ठिकाणीं एकरूपानें सारखा व्यापून राहिला असून, ह्या भूतमात्रांचा नाश झाला असतांही त्याचा नाश होत नाहीं, हें ज्याला समजलें त्यालाच सर्व समजलें.

ह्या भूतमात्रांचीं निरनिराळीं रूपें एकाच आत्म्यांत एकवटलेलीं असून, त्यापासूनच विस्तार पावलीं आहेत, असें जेव्हां मनुष्याला ज्ञान होतें तेव्हां तो ब्रह्मरूप होतो.

---

† भगवद्गीता, १५.१६-१८.

* भगवद्गीता, १५.७.   ‡ भगवद्गीता, १३. २७, ३०, ३३.

हे भारता, जसा एकटा सूर्य हें सर्व जग प्रकाशित करितो, तद्वत् ह्या शरीरामध्यें असणारा आत्मा सर्व शरीराला प्रकाशित करितो;

भूमिरापोऽनलो वायुः खं मनो बुद्धिरेव च ।
अहंकार इतीयं मे भिन्ना प्रकृतिरष्टधा ॥
अपरेयमितस्त्वन्यां प्रकृतिं विद्धि मे पराम् ।
जीवभूतां महाबाहो ययेदं धार्यते जगत् ॥†

पृथ्वी, आप, अग्नि, वायु, आकाश, मन, बुद्धि व अहंकार अशा आठ प्रकारांनीं माझी प्रकृति विभागलेली आहे.

हे महाबाहो, ही जड प्रकृति कनिष्ठ प्रतीची असून जीवरूपी माझी दुसरी एक श्रेष्ठ प्रकृति आहे हेंही तूं लक्षांत ठेव. तीच ह्या सर्व जगाचा आधार आहे.

सत्त्वं रजस्तम इति गुणाः प्रकृतिसम्भवाः ।
निबध्नन्ति महाबाहो देहे देहिनमव्ययम् ॥‡

हे महाबाहो, सत्त्व, रज आणि तम हे तीन गुण प्रकृतीपासून उत्पन्न झाले असून ते ह्या अविनाशी आत्म्याला देहामध्यें बांधून टाकतात.

---

## प्रकरण दुसरें

# बहुविध सृष्टि.

ज्या वेळीं ईश्वराचें तेज प्रकृतीवर पडून प्रकृति आकार धारण करावयास लागते, त्या वेळीं जे पहिले आकार दिसूं लागतात ते त्रिमूर्तींचे होत. ब्रह्मांड अथवा विश्व उत्पन्न करण्यासाठीं ईश्वरानेंच धारण केलेलीं तीं तीन व्यक्त स्वरूपें होत. जें स्वरूप धारण करून ईश्वर सृष्टि निर्माण करितो त्या स्वरूपाला ब्रह्मा असें म्हणतात; अर्थात् ब्रह्मा हा सृष्टिकर्ता आहे. ज्या स्वरूपानें ईश्वर सृष्टि धारण करितो, अथवा सृष्टीचें पालन करितो, त्या स्वरूपाला विष्णु

---

† भगवद्गीता, ७.४,५. ‡ भगवद्गीता, १४. ५.

असें म्हणतात; अर्थात् विष्णु हा पालनकर्ता आहे. जेव्हां सृष्टीचें वैभव नाहींसें होऊन ती जीर्ण व निरुपयोगी होते, तेव्हां तिचा संहार ईश्वर ज्या स्वरूपानें करितो त्यास शिव अथवा महादेव असें म्हणतात; अर्थात् शिव हा संहारकर्ता आहे. ब्रह्मा, विष्णु व महेश अशीं हीं तीन ईश्वराचीं पहिलीं व्यक्त स्वरूपें होत, त्याच्या तीन दिव्य मूर्ति होत. एकच सगुण ब्रह्म अथवा परमेश्वर या तीन प्रकारांनीं व्यक्त होतो.

सृष्टिकर्ता ब्रह्मा मूळ प्रकृतीचे सात विभाग करितो; त्यांना सात तत्त्वें असें म्हणतात. पहिल्या दोन तत्त्वांना निरनिराळीं नांवें आहेत. आपण पहिल्याला महत्बुद्धि किंवा शुद्ध बुद्धि असें म्हणूं, व प्रकृतीचे अणु-प्रमाण विभाग करणारें जें दुसरें तत्त्व त्याला अहंकार म्हणूं. बाकी पांच तत्त्वें आकाश, वायु, अग्नि, आप व पृथ्वी हीं होत.† ह्यांलाच भूतादि सृष्टि म्हणतात, व ह्या-

---

† हीं तत्त्वें म्हणजेच महाभूतें होत. रसायनशास्त्रांत सुमारें सत्तर मूल पदार्थ किंवा मूलतत्त्वें सांगितलेलीं आहेत. तीं मूलतत्त्वें व हीं महाभूतें भिन्न आहेत. या दोहोंस कधीं कधीं एकाच संज्ञेनें संबोधिल्यामुळें घोंटाळा होण्याचा संभव असतो. रसायनशास्त्र भूलोकाच्या पलीकडे विचार करीत नाहीं. भूलोकचे सर्व पदार्थ सुमारें सत्तर मूलतत्त्वांपासून झाले आहेत असें रसायनशास्त्राचें म्हणणें आहे. ज्या पदार्थाचें आणखी पृथक्करण करतां येत नाहीं, तें "मूलतत्त्व," अशी रसायनशास्त्राची "मूलतत्त्व" याची व्याख्या आहे. सनातनधर्माच्या दृष्टीनें पाहिल्यास हीं सत्तर "मूलतत्त्वें" खरीं मूलतत्त्वें नव्हेत. कारण हीं सर्व एका पदार्थाचीं खरोखरी बनलीं आहेत. दृश्य-अदृश्य सर्व विश्व निर्गुण ब्रह्मापासून बनलें असल्यामुळें रसायनशास्त्राच्या अर्थानें मूलतत्त्व हा शब्द योजल्यास सर्व विश्वांत एकच मूलतत्त्व आहे असें म्हणावें लागेल सनातनधर्मांत "मूलतत्त्व" किंवा "महाभूत" हा शब्द 'द्रव्याची एक विशिष्ट अवस्था' या अर्थानें योजण्यांत येतो. पाणी घनावस्थेंत "बर्फ" होतें, प्रवाही अवस्थेंत नेहमींच्या परिचयाचें पातळ पाणी होतें, वायुरूप अवस्थेंत "वाफ" होतें. या जशा पाण्याच्या "अवस्था" तशाच प्रकृतीच्या पृथ्वी, आप, वगैरे ज्या अवस्था त्यांस सनातनधर्मांत मूलतत्त्वें किंवा महाभूतें म्हणतात. सर्व दृश्य जग "पृथ्वी" या महाभूताचें बनलें आहे. पलीकडचें जग "आप" याचें बनलें आहे. इ०

—भाषांतरकार.

पासूनच सर्व वस्तु अंशतः उत्पन्न होतात. ह्या भूतादि सृष्टीमध्यें सत्त्वरजोगुणापेक्षां तमोगुणाचेंच प्राबल्य असल्यामुळें तन्निर्मित वस्तु जड व मंद असतात; व ह्या प्रकृतीचें आवरण दाट व जड असल्यामुळें आंतील जीवशक्ति प्रकट होत नाहीं.

ह्या तत्त्वांच्या मागाहून दशेंद्रियें निर्माण होतात. हीं प्रथमतः ब्रह्मदेवाच्या मनोमय सृष्टींत तयार होतात, व नंतर त्यांना जड तत्त्वाचें आवरण प्राप्त होतें. त्वगिंद्रिय, चक्षुरिंद्रिय, रसनेंद्रिय हीं मूळ पांच ज्ञानेंद्रियें होत; व कान, त्वचा, डोळे, जीभ व नाक हीं त्यांचीं पांच इंद्रियद्वारें होत. त्याचप्रमाणें पांच सूक्ष्म कर्मेंद्रियें असून हात, पाय, तोंड, गुद व उपस्थ हीं त्यांचीं द्वारें होत. ह्या इंद्रियांमध्यें सत्त्व व तमोगुणापेक्षां रजोगुणाचें प्राबल्य असतें; म्हणून तीं विशेष चंचल असतात, व आंतील जीवशक्ति त्यांच्या द्वारें अधिक प्रकट होते.

इंद्रियांनंतर ब्रह्मदेवानें आपल्या मनोमय भूमिकेवर इंद्रियांशीं संबंध असणारे देव निर्माण केले, व तसेंच मन हें आणखी एक इंद्रिय निर्माण केलें; म्हणजे पूर्वींचीं पांचच इंद्रियें मानिलीं तर हें सहावें, व दहा मानिलीं तर अकरावें होय. बाह्यसृष्टीपासून इंद्रियद्वारें जें ज्ञान प्राप्त होतें तें स्वतःच्या अंतरंगांत नेऊन मन त्यास व्यवस्थित स्वरूप देतें व त्यावर विचार करतें. देवता व मन ह्यांच्या ठिकाणीं रजोगुण व तमोगुण ह्यांच्यापेक्षां सत्त्वगुण प्रबल असतो.

विद्यार्थ्यांनीं एक गोष्ट लक्षांत ठेविली पाहिजे कीं, हे तीनही गुण केव्हांही पृथक्पणानें असत नाहींत, सर्वच गुण पदार्थांत असतात, मात्र एका पदार्थांत एका गुणाचें विशेष प्राबल्य असूं शकतें. जेव्हां तमोगुणाचें प्राबल्य असतें तेव्हां त्यास तामसिक, रजोगुणाचें प्राबल्य असतें तेव्हां राजसिक व सत्त्वगुणाचें प्राबल्य असतें तेव्हां सात्त्विक असे विभाग करितां येतील.†

नंतर ब्रह्मदेवानें आपल्या मनोमय सृष्टीमध्यें ईश्वरी नियमांची अंमलबजावणी करणारे, व सर्व विश्वाची व्यवस्था योग्य प्रकारें पाहणारे असे असंख्य दुसरे 'देव' निर्माण केले. ज्याप्रमाणें एखादा राजा असून त्याचें मंत्रिमंडळ असतें, त्याचप्रमाणें ईश्वर हा एक प्रभु व देव हे त्याचे मंत्री होत.

---

† भगवद्गीता, अध्याय १४, १७ व १८ पहा.

विद्यार्थ्यांनीं परमेश्वर आणि देव ह्यांमधील भेद स्पष्ट लक्षांत ठेवावा. ज्याप्रमाणें आम्ही मनुष्य ह्या एका पृथ्वीतलापुरते त्या ईश्वराच्या खालच्या दर्जाचे अधिकारी आहों, त्याचप्रमाणें देव हे ब्रह्मांडापुरते त्याचे वरिष्ठ दर्जाचे अधिकारी आहेत.

प्रत्येक मनुष्याला आपल्या कर्माप्रमाणें फलनिष्पत्ति होत आहे किंवा नाहीं हें हे देव पहातात. त्यांस सुर असेंही नांव आहे. प्रत्येक मनुष्याला ज्याच्या त्याच्या योग्यतेप्रमाणें ऐहिक गोष्टींत ते जय किंवा अपजय देत असतात. जेव्हां मनुष्य त्यांची सेवा करण्याचा प्रयत्न करितात तेव्हां ते त्यांना अनेक प्रकारचें साह्य करितात; व लोक जेव्हां त्यांच्यासंबंधीं आपलीं कर्तव्यें विसरतात, तेव्हांच भयंकर तुफानें, भयंकर सांथी, भयंकर दुष्काळ व अशाच इतर राष्ट्रीय आपत्ति उद्भवतात. देव असंख्य असून, इंद्र, वायु, अग्नि, वरुण व कुबेर ह्या पांच अधिपतींच्या हाताखालीं त्यांची विभागणी झालेली आहे. इंद्राचें आधिपत्य आकाशावर, वायूचें हवेवर, अग्नीचें विस्तवावर, वरुणाचें पाण्यावर व कुबेराचें पृथ्वीवर आहे. प्रत्येक अधिपतीच्या हाताखालील देवांना निरनिराळीं नांवें आहेत; तीं आपणांला पुराणांमध्यें व इतिहासामध्यें आढळून येतात. उदाहरणार्थ, कुबेराचे जे यक्ष त्यांजबरोबर भीमानें केलेल्या लढाईविषयींची हकीकत विद्यार्थ्यांच्या वाचनांत आली असेलच.

ह्या देवांमध्यें रजोगुणाचें प्राबल्य असतें, म्हणूनच "कर्म हा त्यांचा स्वभाव आहे" असें मनूनें म्हटलें आहे.†

देवाचे शत्रु जे असुर त्यांच्यामध्यें तमोगुणाचें प्राबल्य असल्यामुळें प्रकृतीमधील प्रतिकारित्व हा गुण त्यांच्या ठिकाणीं दिसतो.

नंतर ब्रह्मदेवानें खनिज व उद्भिज्ज पदार्थ, पशुपक्ष्यादि प्राणी व मनुष्यप्राणी निर्माण करून आपल्या मनोमय भूमिकेवर जगताचा चित्रपट तयार केला. या चित्रपटांतील जगत्प्रवृत्तीला संस्कृतांत संसार असें म्हटलें आहे; व सतत परिभ्रमण करणाऱ्या चक्राशीं त्याची तुलना केलेली आहे. ह्या संसारचक्रालाच सर्व जीव बांधले गेले आहेत.

---

† "कर्मात्मनां च देवानाम्"—मनुस्मृति, १.२२.

ह्याप्रमाणें सृष्टि निर्माण करण्याच्या उद्योगापैकीं आपलें काम ब्रह्मदेवानें पूर्ण केलें; परंतु ह्या निर्माण झालेल्या आकारांना स्थूल द्रव्याचें आवरण देऊन अद्यापि कार्यक्षम बनवावयाचें होतें. सृष्टीचें पालन व रक्षण करणारा सर्वव्यापी जो विष्णु त्याचें हें काम होतें. ह्या सर्व आकारांमध्यें त्यानें आपला प्राण ओतला, म्हणजे एका पुराणांत सांगितल्याप्रमाणें विष्णु हा त्यांस जाणीव देणारा सर्व आकारांच्या अंतर्यामींचा प्राण झाला. अर्थात् यामुळें सर्व ब्रह्मांड प्राणमय व चैतन्यमय बनलें. परंतु मनुष्यप्राणी निर्माण होण्याच्या वेळीं एवढ्यानेंही भागेना. ईश्वराच्या दोन मूर्तींनीं आपआपलें काम केलें होतें; परंतु आकाराचा नाश करून जीवांची मुक्तता करावी व त्यांना योगावस्थेमध्यें नेऊन आनंदानुभव द्यावा हें तिसऱ्या मूर्तीचें काम होण्याचें राहिलें होतें. ईश्वराच्या त्रिगुणत्वाचें पूर्ण प्रतिबिंब दर्शविणारें जीवाचें त्रिगुणत्व पुरें करण्यासाठीं महादेवाची शक्ति खर्च व्हावयास पाहिजे होती. हें कार्य तेव्हां करण्यांत आलें. जीवांनीं पूर्वीच्या कल्पामध्यें खनिज कोटि, उद्भिज्ज कोटि व प्राणि कोटींमधून आपली उत्क्रांति करून घेतली होती; त्यांनीं आतां मानव होऊन ह्या कल्पांत आपला दीर्घ मानवी उत्क्रांतिमार्ग आक्रमण्यास सुरवात केली. मनुष्यामध्यें "प्रज्ञानेन संपन्नतम" होईपर्यंत व "मर्त्येन अमृत" होण्याची त्यास इच्छा होईपर्यंत उद्भिज्ज व प्राणी ह्या कोटींमधून मनुष्यकोटीपर्यंतच्या जीवाच्या उत्क्रांतिमार्गाचें सुंदर वर्णन ऐतरेयारण्यकामध्यें† व सनातनधर्माच्या कांहीं पुस्तकांमध्यें* विद्यार्थ्यांना वाचावयास मिळेल.

विष्णूच्या मुख्य अवतारांचाही येथें उल्लेख केला पाहिजे. अवतार ह्या शब्दाचा धात्वर्थ, तॄ म्हणजे पलीकडे जाणें, व अव म्हणजे खालीं, ह्यावरून 'खालीं उतरणें' असा आहे. ईश्वर ज्या वेळीं एखादें विशेष कार्य घडवून आणण्यासाठीं कोणतें तरी रूप धारण करून विशेष प्रकारानें प्रकट होतो, त्या वेळीं हा शब्द योजितात. जेव्हां जगताची घडी बिघडते, व व त्याला उत्क्रांतीच्या योग्य मार्गावर आणण्याची जरूरी असते, तेव्हां विष्णु असें रूप धारण करून अवतार घेतो व नीट व्यवस्था लावतो.

† ऐतरेयारण्यक, २. ३. * Advanced Text Book. ह्याच सनातनधर्मग्रंथमालेंतील तिसरें पुस्तक.

त्याच्या इतर अवतारांपेक्षां दहा अवतार विशेष महत्त्वाचे मानिले गेले आहेत, व त्यांना दशावतार अशी संज्ञा आहे. ते असेः—

१ **मत्स्यः**—वैवस्वत मनूनें एकदां एक लहान मासा पाण्यासाठीं तळमळतांना पाहिला, तेव्हां त्यानें त्याला एका वाटींत ठेविलें. तो वाढला, म्हणून त्यानें त्याला एका मोठ्या भांड्यांत ठेविलें. पण तो एकसारखा वाढत असल्यामुळें त्याला क्रमाक्रमानें डोहांत, तलावांत, नदींत व समुद्रांत असें ठेवण्यांत आलें; तरीही त्यानें सर्व जागा व्यापिली. तेव्हां मनु समजला कीं, आपल्या कार्याशीं ह्या मत्स्याचा संबंध आहे; व पुढें महाप्रलयांतून जीवबीजांचें रक्षण करण्याचा समय आला त्या वेळीं तो मनु आवश्यक जीवबीजें घेऊन ऋषींसह नौकेंत चढला व ती नौका ज्या ठिकाणीं मनूला कार्य करावयाचें होतें त्या ठिकाणीं त्या महामत्स्यानें ओढून नेली. मत्स्यावताराबरोबर ह्या जगांत प्राणिकोटीची उत्क्रांति सुरू झाली.

२ **कूर्मः**—कूर्मावतारामध्यें जरूर ते सर्व देह तयार व्हावे म्हणून प्रकृतिरूपी जलनिधीचें मंथन करणारा दंड विष्णूनें आपल्या पृष्ठावर धारण केला. कूर्म हा उत्क्रांतिपथांतील पुढच्या एका पायरीचा नमुना आहे.

३ **वराहः**—पाण्यामध्यें बुडालेली पृथ्वी विष्णूनें वर काढिली, व वराहाप्रमाणें कोरड्या जमिनीवर राहणारे सस्तन प्राणी उत्पन्न केले.

उत्क्रांतीच्या ह्या तीन अवस्था अर्वाचीन शास्त्राला संमत आहेत, व हिंदुधर्मामध्यें त्या या तीन अवतारांनीं सूचित केल्या आहेत.

४ **नृसिंहः**—दैत्यांच्या त्रासापासून पृथ्वीची सुटका करण्यासाठीं हा अवतार झाला. ह्या दैत्यकुलामध्यें प्रल्हाद नांवाचा एक मुलगा जन्मास आला. तो बालपणापासूनच विष्णूचा मोठा भक्त होता. त्याबद्दल त्याच्या बापानें त्यास भय दाखविलें व क्रूरपणानेंही वागविलें. इतकेंच नव्हे, तर पुनः पुन्हा आपल्या मुलाला मारण्याचा प्रयत्न त्यानें केला. पण प्रत्येक वेळीं त्याचें रक्षण विष्णूनें केलें. सरतेशेवटीं नृसिंहाच्या रूपानें विष्णु खांबांतून प्रगट झाला व त्यानें त्या दैत्य राजाला ठार मारलें.

५ **वामनः**—सरतेशेवटीं मानववंशाच्या उत्क्रांतीला मदत करण्यासाठीं तो मनुष्यरूपानें प्रगट झाला, व आपल्या तीन पदांनीं जितकी भूमि आक्र-

मितां येईल तेवढ्यावर त्यानें आपलें प्रभुत्व बळीकडून कबूल करून घेतलें. एका पदानें सर्व भूमि व्यापून टाकिली, व मनुष्याला त्याच्या उत्क्रांतीसाठीं जागा करून दिली.

६ परशुरामः—लोकांवर जुलूम करणाऱ्या क्षत्रियांना शिक्षा करावी, व आपल्या सत्तेचा उपयोग प्रजेच्या हिताकडे न करितां त्यांना छळणें हें किती अनर्थावह आहे हें दुष्ट नराधिपांना शिकवावें, एवढ्याचकरितां हा अवतार होता.

७ रामः—ह्यालाच श्रीरामचंद्र असें म्हणतात. हा दशरथाचा पुत्र होय. तो अनुकरणीय, क्षत्रिय आदर्शवत् नृपति व मानवी सदाचरणाचा एक उत्कृष्ट नमुना म्हणून जगापुढें आला. आज्ञाधारक व प्रेमळ पुत्र, प्रेमळ पति, ममताळू बंधु, शूर योद्धा, शहाणा शास्ता व प्रजाहिततत्पर अधिपति, ह्या दृष्टीनें तो निःसंशय पूर्ण होता. त्याचें दिव्य चारित्र, वाल्मीकिरामायणामध्यें गाइलेलें आहे; व त्याचेंच तुळसीदासकृत सुंदर रूपांतर उत्तर हिंदुस्थानांत घरोघर माहीत आहे.

८ कृष्णः—दिव्यप्रेमाची व ज्ञानाची ही मूर्ति असून असंख्य लोक त्याचे भक्त आहेत. तो व्रज व वृंदावन येथील अतुल पराक्रमी बालक, अर्जुनाचा सखा, भगवद्गीतेचा उपदेष्टा व पांडवाचा कुशल मंत्री होता; भीष्माचार्यांनासुद्धां तो पूज्य होता; अशा त्या मूर्तीचें चरित्र कोणत्या हिंदुपुत्राला माहीत नसणार ? महाभारतामधील ही मुख्य भूमिका आहे, व त्याचें चरित्र कित्येक पुराणांमध्येंही आढळतें.

९ बुद्धः—ह्या कुलीन राजपुत्रानें परिव्राजक बनून सत्याचा उपदेश करण्याकरितां आपल्या राज्याचा व वैभवाचा त्याग केला. त्याला शाक्यमुनि, गौतम, सिद्धार्थ अशीं नांवें आहेत; लक्षावधि लोक ज्याचे अनुयायी आहेत अशा एका मोठ्या धर्माचा तो संस्थापक आहे. त्याच्या द्वारें विष्णूनें असंख्य अनार्य लोकांना उपदेश केलेला आहे.

१० कल्किः—हा अवतार पुढें व्हावयाचा असून त्यानें कलियुगाची समाप्ति होणार आहे. हा अवतार होईल तेव्हां नव्या वळणाला सुरवात होईल व पुन्हा सत्ययुगाला प्रारंभ होईल.

ह्या अवतारांनीं मानवी जीवाची उन्नति व पूर्णावस्था सूचित केलेली आहे.

पश्यामि देवांस्तव देव देहे सर्वांस्तथा भूतविशेषसंघान् ।
ब्रह्माणमीशं कमलासनस्थं ऋषींश्च सर्वानुरगांश्च दिव्यान् ॥
रुद्रादित्या वसवो ये च साध्या विश्वेऽश्विनौ मरुतश्चोष्मपाश्च ।
गन्धर्वयक्षासुरसिद्धसंघा वीक्षन्ते त्वां विस्मिताश्चैव सर्वे ॥🕇

हे देवा, तुमच्या देहामध्यें सर्व देव निरनिराळ्या प्रकारच्या प्राण्यांचे समुदाय, कमलाच्या आसनावर बसलेला सर्वांचा प्रभु जो ब्रह्मदेव, सर्व ऋषि आणि दिव्य सर्प हेही मला दिसतात.

हे प्रभो, रुद्र, आदित्य, वसु, साध्य ( रुद्रगण ), विश्वेदेव, आश्विनी-कुमार, मरुद्गण, पितर, गंधर्व, यक्ष, असुर व सिद्ध ह्यांचे समुदाय विस्मित होऊन तुमच्याकडे पहात आहेत.

इन्द्रं मित्रं वरुणमग्निमाहुरथो दिव्याः स सुपर्णो गरुत्मान् ।
एकं सद्विप्रा बहुधा वदन्ति अग्निं यमं मातरिश्वानमाहुः ॥*

त्यालाच ते इंद्र, मित्र, वरुण, अग्नि असें म्हणतात, व तोच दिव्य सुवर्णपक्ष गरुत्मान् आहे. तो एक असून विप्र त्याला अनेक नांवें देतात. ते त्याला अग्नि, यम, मातरिश्व असें म्हणतात.

आत्मैव देवताः सर्वाः सर्वमात्मन्यवस्थितम् ।†

सर्व देवसुद्धां आत्माच आहे, व सर्वांचें अधिष्ठानही तोच आहे.

एतमेके वदन्त्यग्निं मनुमन्ये प्रजापतिम् ।
इन्द्रमेकेऽपरे प्राणमपरे ब्रह्म शाश्वतम् ॥‡

कोणी त्याला अग्नि म्हणतात, कोणी मनु म्हणतात, कोणी प्रजापति म्हणतात, कोणी इंद्र म्हणतात, कोणी प्राण म्हणतात, तर कोणी शाश्वत ब्रह्म म्हणतात.

यथा सुदीप्तात्पावकाद्विस्फुलिङ्गाः सहस्रशः प्रभवन्ते सरूपाः ।
तथाक्षरा द्विविधाः सोम्य भावाः प्रजायन्ते तत्र चैवापि यन्ति॥

---

🕇 भगवद्गीता, ११. १५. २२. * ऋग्वेद, १. १६४. ४६. † मनुस्मृति, १२,११९. ‡ मनुस्मृति, १२. १२३.

एतस्माज्जायते प्राणो मनः सर्वेन्द्रियाणि च ।
खं वायुर्ज्योतिरापः पृथिवी विश्वस्य धारिणी ॥
तस्माच्च देवा बहुधा सम्प्रसूताः साध्या मनुष्या पशवो वयांसि ।†

ज्याप्रमाणें प्रदीप्त झालेल्या अग्नीपासून एकाच स्वरूपाच्या हजारों ठिणग्या निघतात, त्याचप्रमाणें हे सोम्य, त्या अक्षरब्रह्मापासून नानाप्रकारचे जीव उत्पन्न होतात व तेथेंच पुन्हा लय पावतात.

ह्यापासूनच प्राण, मन, सर्व इन्द्रियें, आकाश, वायु, अग्नि, आप व सर्वाधार अशी पृथ्वी हीं उत्पन्न होतात.

त्यापासूनच देव, साध्य, मनुष्य, पशु व पक्षी हे निरनिराळ्या प्रकारांनीं उत्पन्न होतात.

सत्वात्संजायते ज्ञानं रजसो लोभ एव च ।
प्रमादमोहौ तमसो भवतोऽज्ञानमेव च ॥
ऊर्ध्वं गच्छन्ति सत्वस्था मध्ये तिष्ठन्ति राजसाः ॥
जघन्यगुणवृत्तिस्था अधो गच्छन्ति तामसाः ॥¶

सत्त्वगुणापासून ज्ञान उत्पन्न होतें, रजोगुणापासून लोभ उत्पन्न होतो आणि तमोगुणापासून प्रमाद, मोह व अज्ञान हीं उत्पन्न होतात.

जे सत्त्वगुणी आहेत ते उत्तम स्थितीप्रत उत्क्रांत होतात; जे रजोगुणी आहेत ते मध्यम स्थितींत राहतात; आणि कनिष्ठ गुणामध्यें असणारे जे तामस ते अधोगतीस जातात.

सत्त्वं सुखे सञ्जयति रजः कर्माणि भारत ।
ज्ञानमावृत्य तु तमः प्रमादे सञ्जयत्युत ॥
रजस्तमश्चाभिभूय सत्त्वं भवति भारत ।
रजः सत्त्वं तमश्चैव तमः सत्त्वं रजस्तथा ॥
सर्वद्वारेषु देहेऽस्मिन्प्रकाश उपजायते ।
ज्ञानं यदा तदा विद्याद्विवृद्धं सत्त्वमित्युत ॥

---

† मुण्डकोपनिषत्, २. १. १, ३, ७. ¶ भगवद्गीता, १४. १७, १८.

लोभः प्रवृत्तिरारम्भः कर्मणामशमः स्पृहा ।
रजस्येतानि जायन्ते विवृद्धे भरतर्षभ ॥
अप्रकाशोऽप्रवृत्तिश्च प्रमादो मोह एव च ।
तमस्येतानि जायन्ते विवृद्धे कुरुनंदन ॥†

हे भारता, सत्त्वगुणामुळें सुखावर आसक्ति जडते, रजोगुणांमुळें कर्मावर आसक्ति उत्पन्न होते, व तमोगुणामुळें ज्ञानाचा लोप होऊन कर्तव्याविषयीं विसर उत्पन्न होतो.

रज व तम यांचा पाडाव करून सत्त्व प्रबल होतें ( तेव्हां त्याला सात्त्विक म्हणावयाचें ) त्याचप्रमाणें सत्त्व व तम यांचा पाडाव करून रज प्रबल होतें व सत्त्व आणि रज यांचा पाडाव करून तम प्रबल होतें.

ह्या देहामध्यें सर्व इंद्रियांच्या ठिकाणीं जेव्हां ज्ञानाचा प्रकाश पडतो, म्हणजे निर्मल ज्ञान उत्पन्न होतें, तेव्हां सत्त्वाची वृद्धि झाली आहे असें समजावें.

हे भरतश्रेष्ठा, लोभ, कर्माकडे प्रवृत्ति व त्यांचा आरंभ, अतृप्ति व इच्छा हीं चिन्हें रजोगुणाची वृद्धि झाली असतां होतात.

अंधार ( विवेकाचा नाश ), उद्योगाचा कंटाळा, कर्तव्याचा विसर आणि मोह हीं चिन्हें तमोगुणाची वृद्धि झाली असतां होतात.

यदा यदा हि धर्मस्य ग्लानिर्भवति भारत ।
अभ्युत्थानमधर्मस्य तदात्मानं सृजाम्यहम् ॥
परित्राणाय साधूनां विनाशाय च दुष्कृताम् ।
धर्मसंस्थापनार्थाय संभवामि युगेयुगे ॥ १ ॥‡

हे अर्जुना, जेव्हां जेव्हां धर्माची ग्लानि होते व अधर्म वाढतो तेव्हां तेव्हां मी अवतार घेतों.

साधूंचें रक्षण करण्याकरितां, दुष्टांचा समूळ नाश करण्याकरितां, व धर्मसंस्थापना करण्याकरितां मी प्रत्येक युगीं अवतार घेतों.

---

† भगवद्गीता, १४. ९, १३. ‡ भगवद्गीता, ४. ७, ८.

## प्रकरण तिसरें.

# पुनर्जन्म.

मागील प्रकरणांत सांगितल्याप्रमाणें जीव हा उत्क्रांतिपथाचें आक्रमण करीत असतां निरनिराळीं शरीरें धारण करितो, व जसजशी त्याची अंतः-शक्ति प्रगट होत जाते तसतशीं त्याचीं शरीरेंही सुधारत जातात; ह्यालाच पुनर्जन्म, पुनर्देहधारण असें म्हणतात. पुनर्देहधारण ह्या शब्दाचा अर्थ पुन्हा देह घेणें, किंवा पुन्हा स्थूल देहामध्यें प्रवेश करणें हा होय; पुनर्जन्म म्हणजे पुन्हा जन्मास येणें असा अर्थ आहे. दोन्ही शब्द समानार्थकच आहेत. ह्या शब्दांनीं सूचित केलेली क्रिया काय आहे तें आतां आपण पाहूं या.

जीव हा ब्रह्माचा अंश आहे, व श्रीकृष्णानें "ममैवांशो जीवभूतः" असेंच म्हटलें आहे. ब्रह्माच्या सर्व शक्ति त्यामध्यें आहेत, व तो ब्रह्मच आहे. "तत्त्वमसि" असेंच श्रुतिही सांगतात. ज्याप्रमाणें वृक्ष व बीज ह्यांमध्यें कालावकाशामुळें भेद आहे, त्याचप्रमाणें ब्रह्म व जीव ह्यांमध्यें भेद आहे. वृक्षापासून बीज उत्पन्न होतें व त्याचे सर्व गुण त्यामध्यें असतात. वृक्षावरून बीज खालीं जमिनीवर पडतें; हळुहळू वृद्धि पावतें; त्याच्या सर्व गूढ शक्ति प्रगट होतात व पुन्हा मूळ वृक्षाप्रमाणें त्याचा वृक्ष बनतो. मूळ वृक्षांतीलच सर्व गुण त्यामध्यें असल्यामुळें त्याचें भिन्न स्वरूप होणें शक्य नाहीं; त्याचप्रमाणें जीवाची स्थिति आहे. बीजाप्रमाणेंच तो ईश्वरापासून सुटून प्रकृतीमध्यें पडतो व त्या ठिकाणीं वृद्धि पावतो, त्याच्या सर्व गूढ शक्ति प्रगट होतात आणि तो पुन्हा ईश्वर बनतो. सर्व ईश्वरी गुण त्याच्यामध्यें बीजांतल्या गुणाप्रमाणें असल्यामुळें तो ईश्वरस्वरूपाहून भिन्न होणें शक्य नाहीं.

ईश्वर हा सर्वज्ञ व सर्वशक्तिमान् आहे, आणि जीव हा अज्ञानी व असमर्थ आहे असें म्हणतात;† परंतु जीवाचें ज्ञान व सामर्थ्य वृद्धिंगत होतें, व ह्या वृद्धीलाच उत्क्रांति असें म्हणतात.

---

† श्वेताश्वतरोपनिषत, १. ९. ज्ञाज्ञौ द्वावजावीशानीशौ.

जीव हा खनिज कोटीपासून ह्या स्थूल सृष्टीमध्यें आपल्या दीर्घ प्रवासाला सुरवात करतो हें पूर्वी आपण पाहिलेंच आहे. त्या स्थितीमध्यें तो बाह्य सृष्टींविषयीं अप्रबुद्ध असतो. बाहेरून बसणारे जोराचे आघात व तडाखे ह्यांमुळें बाह्य सृष्टीकडे त्याचें लक्ष ओढलें जातें, व तिच्या अस्तित्वाची जाणीव त्यास पटविली जाते. भूकंप, ज्वालामुखी पर्वत, पर्वतस्खलन, प्रचंड लाटा व असेच इतर भयंकर उत्पात ह्यामुळें आपण एकटेच नसून आपल्या बाहेर आणखी कांहीं आहे, ह्या गोष्टीकडे जीवाचें लक्ष लागतें. पृथ्वीचा अगदीं पूर्वकालीन वृत्तांत जर कोणीं वाचला तर असंख्य भयंकर उत्पातांचें वर्णन ऐकून तो चकितच होईल; परंतु जीवाच्या जागृतीसाठीं त्यांची आवश्यकताच होती. बऱ्याच दीर्घकालानंतर हे जीव खनिज शरीरांपेक्षां मृदु व पाहिजे तशीं वागवितां येणारीं शरीरें धारण करण्यास पात्र होण्याइतके जागृत झाले, व त्यांनीं उद्भिज्ज शरीरें धारण केलीं; व ईश्वरापासून मागाहून सुटून आलेले जीव खनिज सृष्टींत राहिले.

उद्भिज्ज सृष्टींतील जीवांना बाह्य सृष्टीची जाणीव विशेष होऊं लागली; सूर्याची उष्णता, मंद वायूच्या लहरी व जीवनदाता पर्जन्य ह्यांचें ज्ञान होऊं लागलें. जसजसा काल जाऊं लागला, व त्यांची ज्ञानग्राहकता वाढूं लागली, तसतसे ते अधिकाधिक दीर्घायुषी वृक्ष बनत चालले; त्यांची अंतःशक्तिही अधिकाधिक प्रगट होऊं लागली. सरतेशेवटीं प्राणिकोटीमध्यें जाण्यास तयारी झाल्यामुळें ते त्या कोटींत गेले. मग एक पायरी मागें असलेले जीव उद्भिज्जकोटीमध्यें आले; व त्यांच्याही मागचे जीव खनिज कोटीमध्यें शिरले. प्राणिकोटीमध्यें जीवांचा प्रवास अधिक जलद होऊं लागला, व उपजीविकेकरितां दुसरे प्राणी मारून खाणें, प्राण्यांनीं एकमेकांशीं लढाई करणें, व जीवनकलहांत एकमेकांवर मात करणें वगैरे गोष्टींमुळें त्याच्या इंद्रियशक्ति व मनाच्या प्राथमिक शक्ति प्रगट होऊन वाढूं लागल्या. सरतेशेवटीं प्राणिशरीरेंही त्यांना पुरेशीं नाजुक न राहिल्यामुळें, व उत्क्रांतीचा पुढचा मार्ग त्यांस आक्रमण करावयाचा असल्यामुळें त्यांना मानवी शरीराची आवश्यकता भासूं लागली.

कोणी असा प्रश्न करितील कीं, जीवाला पाहिजे तसा शरीराचा विकास

कसा होत जातो ? तर त्याला उत्तर जीवाचे स्वतःचे प्रयत्न हें होय. आपल्याला वेढून असणाऱ्या जड प्रकृतींतून बाहेर पाहण्याची त्याला इच्छा होते. तो पाहण्याचा प्रयत्न करितो. तेव्हां त्याच्या बाहेर पडूं इच्छिणाऱ्या शक्तीचा परिणाम जड प्रकृतीवर होऊन अगदीं हळूहळू नेत्रेंद्रिय बनत जातें. ह्याचप्रमाणें इतर इंद्रियें व इंद्रियद्वारें ह्यांसंबंधानें आहे. अंतःशक्तीमुळें बहिर्मुख इंद्रियद्वारें आंतून पाडण्यांत आलीं असें आर्यधर्म शिकवितो. बाह्यसृष्टीमध्यें आपल्या शक्तीचा उपयोग करण्यास योग्य होतील अशींच इंद्रियें जीव बनवीत असतो, व त्यांना उपयुक्त अशीं साधनें पुरवून देव जीवाला मदत करीत असतात. जीव जेव्हां पाहाण्याचा प्रयत्न करीत असतो तेव्हां त्याला अग्नीकडून प्रकाशकिरणांनीं आंदोलन पावणारा तेजोमय द्रव्याचा कांहीं भाग प्राप्त होतो. जेव्हां जीवाला चव घेण्याची इच्छा होते तेव्हां वरुण आपल्या रसमय द्रव्याचा कांहीं भाग त्याला देतो व तेणेंकरून त्याला चव घेतां येते. ह्याचप्रमाणें इतर इंद्रियांसंबंधानें आहे. येणेंप्रकारें जीव आपलीं शरीरें तयार करतो, व असें प्रत्येक शरीर तयार करून तें उपयोगास लावितो. पुढें त्याला त्याचा उपयोग होईनासा झाला म्हणजे तें टाकून देतो व दुसरें तयार करितो. पुढें पुढें त्याची उत्क्रांति अधिक झपाट्यानें सुरू होते; कारण, त्याच्या शक्ति अधिकाधिक स्वतंत्र होत जातात, व त्यांचीं कार्यें पूर्वींपेक्षां अधिकाधिक जलद घडून येतात.

स्थूलमानानें अशा तऱ्हेचा हा उत्क्रांतिमार्ग आहे; ह्या मार्गाचा हा सरळ असा क्रम आम्हीं येथें सांगितला आहे, कारण विद्यार्थ्यांना त्यांतील आधारभूत कल्पना ग्रहण करितां याव्या. परंतु सृष्टीमध्यें खरोखरी हा उत्क्रांतीचा ओघ एकसारखा पुढें जात असतां त्याला मधून मधून पुष्कळ वळणें व आडफांटेही फुटलेले असतात. ह्यामुळें जीव केव्हां केव्हां मागेंही जाऊं शकतो, व त्याला दीर्घकाळापूर्वीं सोडलेल्या अवस्थेमध्यें पुन्हा कांहीं काळ काढावा लागतो. कोणत्या तरी गोष्टींचा परिपूर्ण अनुभव घ्यावयाचा राहिलेला असतो, कोणत्या तरी शक्तीचा पुरा विकास व्हावयाचा राहिलेला असतो; ह्यामुळें ज्याप्रमाणें शाळेंतील एकाद्या मुलाला आळसांत वेळ घालविल्यामुळें खालच्या वर्गांत केव्हां केव्हां बसावें लागतें, त्याप्रमाणें

जीवालाही खालच्या अवस्थेमध्यें जावें लागतें. केव्हां केव्हां मानवी अवस्थेपर्यंत येऊन पोहोंचलेला जीव तो आपल्या मानवी शरीराचा उपयोग अधिक चांगला करण्यास शिकेपर्यंत, एखाद्या प्राण्याच्या, किंवा एखाद्या उद्भिज्ज पदार्थांच्या किंवा तामस वृत्ति फारच प्रबळ असल्यास एखाद्या खनिज पदार्थांच्या देहांत कोंडला जाऊं शकतो. तो मनुष्य जीवसमाजांतून हांकून लाविलेल्या एखाद्या कैद्याप्रमाणें तुरुंगांत असतो; व त्याला स्वतंत्रता नसल्यामुळें आपल्या मानवी शक्तीचा उपयोग करण्यास तो तितका वेळ असमर्थ असतो.

जीव जन्ममृत्यूच्या फेऱ्यांत कायमचा जखडला जात नाहीं. ह्या फेऱ्यांत त्याला जखडणारे बंध म्हणजे त्याच्या वासना होत. जोंपर्यंत ह्या पृथ्वीवरील विषय त्यास हवेसे वाटत असतात तोंपर्यंत ते विषय उपभोगण्याकरितां त्याला पृथ्वीवर जन्म घेणें भाग होतें; परंतु जेव्हां त्या विषयांवरील त्याची वासना नाहींशी होते, त्या वेळीं त्याचे बंध तुटतात व तो सुटा होतो. पुन्हा जन्म घेण्याची त्याला जरूरी नसते. कारण तो मुक्त झालेला असतो. ह्या वेळीं त्याला मुक्त ( म्हणजे मोकळा झालेला जीव ) ही संज्ञा प्राप्त होते.

असे मुक्त झालेले पुष्कळ जीव इतर जीवांची मुक्तता लवकरच व्हावी म्हणून ह्या जगामध्येंच राहून त्यांच्या उत्क्रांतीला मदत करीत असतात. वेद, पुराणें व इतिहास ह्यांमध्यें अशा मुक्तांच्या हकीकती आपण वाचतों. कधीं कधीं ते मोठे ऋषि किंवा राजे असलेले आढळतात, व कधीं कधीं ते अगदीं साधारण लोक असतात. बाह्यतः ते कसेही असले तरी ते पवित्र, निर्लोभ व शांतचित्त असून इतरांना साहाय्य करण्यासाठींच त्यांचें जीवित असतें. जगाच्या कल्याणासाठीं झीज सोसण्यांतच त्यांना आनंद वाटतो, व आपण ईश्वराशीं एकरूपच आहोंत असा त्यांस अनुभव असतो.

---

देहिनोऽस्मिन्यथा देहे कौमारं यौवनं जरा ।
तथा देहान्तरप्राप्तिर्धीरस्तत्र न मुह्यति ॥ †

---

† भगवद्गीता, २, १३.

ज्याप्रमाणें जीवाच्या ह्या देहामध्यें बालपण, तरुणपण व म्हातारपण ह्या तीन व्यवस्था होतात, त्याचप्रमाणें जीवाला दुसऱ्या देहाची प्राप्ति होते; त्याबद्दल ज्ञानी मोहांत पडत नाहीं.

अंतवंत इमे देहा नित्यस्योक्ताः शरीरिणः ।
अनाशिनोऽप्रमेयस्य तस्माद्युध्यस्व भारत ॥
य एनं वेत्ति हन्तारं यश्चैनं मन्यते हतम् ।
उभौ तौ न विजानीतो नायं हन्ति न हन्यते ॥
न जायते म्रियते वा कदाचित् नायं भूत्वा भविता वा न भूयः ।
अजो नित्यः शाश्वतोऽयं पुराणो न हन्यते हन्यमाने शरीरे ॥
वेदाविनाशिनं नित्यं य एनमजमव्ययम् ।
कथं स पुरुषः पार्थ कं घातयति हन्ति कम् ॥
वासांसि जीर्णानि यथा विहाय नवानि गृह्णाति नरोऽपराणि ।
तथा शरीराणि विहाय जीर्णान्यन्यानि संयाति नवानि देही ॥
देही नित्यमवध्योऽयं देहे सर्वस्य भारत ।
तस्मात्सर्वाणि भूतानि न त्वं शोचितुमर्हसि ॥‡

नित्य, अविनाशी व अचिंत्य असा जो आत्मा त्याला प्राप्त होणारे देह नाशवंत आहेत असें म्हटलें आहे. म्हणून हे भारता, तूं युद्ध कर.

आत्मा मारणारा आहे किंवा मारला जाणारा आहे असें जे समजतात ते दोघेही अज्ञानी आहेत. कारण हा कोणाकडून मारला जात नाहीं व कोणास मारीतही नाहीं.

हा आत्मा कधीं उत्पन्न होत नाहीं व कधीं मरतही नाहीं. हा मागें असून पुन्हा असणार नाहीं असेंही नाहीं; कारण, हा जन्मरहित, नित्य, शाश्वत व पुरातन आहे, आणि शरीराचा वध झाला तरी ह्याचा वध होत नाहीं.

पार्था, आत्मा अविनाशी, नित्य, जन्मरहित व अव्यय आहे असें जो जाणतो तो पुरुष कोणास कसा मारवील व कोणास मारील ?

जसा मनुष्य जुनीं वस्त्रें टाकून देतो व नवीं घेतो, तसा आत्मा जुनीं शरीरें टाकून नवीं धारण करितो.

---

‡ भगवद्गीता, २. १८, १९, २०, २१, २२, ३०.

अर्जुना, सर्वांच्या शरीरांत असणारा शरीराचा मालक जो आत्मा तो कधींही वध पावत नाहीं; म्हणून सर्व (कोणत्याही) भूताबद्दल शोक करणें तुला योग्य नाहीं.

तद्यथा पेशस्कारी पेशसो मात्रामुपादायान्यन्नवतरं कल्याणतरं रूपं तनुत एवमेवायमात्मेदं शरीरं निहत्याविद्यां गमयित्वाऽन्यन्नवतरं कल्याणतरं रूपं कुरुते ।†

ज्याप्रमाणें एखादा सुवर्णकार सुवर्णाचा तुकडा घेऊन त्याला नवीन व सुंदर असें रूप देतो, त्याचप्रमाणें आत्मा अविद्येचा नाश करून व हें शरीर सोडून दुसरें नवीन व अधिक सुंदर असें शरीर तयार करितो.

ब्रह्मण्याधाय कर्माणि संगं त्यक्त्वा करोति यः ।
लिप्यते न स पापेन पद्मपत्रमिवाम्भसा ॥
कायेन मनसा बुद्ध्या केवलैरिन्द्रियैरपि ।
योगिनः कर्म कुर्वन्ति संगं त्यक्त्वाऽऽत्मशुद्धये ॥
युक्तः कर्मफलं त्यक्त्वा शान्तिमाप्नोति नैष्ठिकीम् ।
अयुक्तः कामकारेण फले सक्तो निबध्यते ॥*

जो आसक्तिविरहित राहून सर्व क्रिया ब्रह्मार्पणबुद्धीनें करितो, तो कमळाचें पान जसें पाण्यांत असूनही भिजत नाहीं, तसा पापानें लिप्त होत नाहीं.

योगी हे आत्मशुद्धीकरितां केवळ शरीराची, मनाची, बुद्धीची व इन्द्रियांची अशीं चार प्रकारचीं कर्में फलासक्ति टाकून करितात.

आत्मनिष्ठ पुरुष हा कर्मफलांचा त्याग करून अढळ शांति प्राप्त करून घेतो; आणि आत्मनिष्ठ नसणारा मनुष्य वासनेनें प्रेरित होऊन फलासक्त झाल्यामुळें बद्ध होतो.

विद्याविनयसंपन्ने ब्राह्मणे गवि हस्तिनि ।
शुनि चैव श्वपाके च पण्डिताः समदर्शिनः ॥
इहैव तैर्जितः सर्गो येषां साम्ये स्थितं मनः ।
निर्दोषं हि समं ब्रह्म तस्माद्ब्रह्मणि ते स्थिताः ॥

---

† बृहदारण्यकोपनिषत् ४. ४. ४.   * भगवद्गीता, ५. १०–१२.

न प्रहृष्येत्प्रियं प्राप्य नोद्विजेत्प्राप्य चाप्रियम् ।
स्थिरबुद्धिरसंमूढो ब्रह्मविद्ब्रह्मणि स्थितः ॥
बाह्यस्पर्शेष्वसक्तात्मा विन्दत्यात्मनि यत्सुखम् ।
स ब्रह्मयोगयुक्तात्मा सुखमक्षय्यमश्नुते ॥†

ज्ञाते जे आहेत त्यांची दृष्टि विद्या व नम्रता ह्या गुणांनीं युक्त असा ब्राह्मण, गाय, हत्ती, कुत्रा व चांडाळ ह्या सर्वांच्या ठिकाणीं समान असते.

ज्यांचें मन साम्यावस्थेमध्यें स्थिर झालें आहे, त्यांनीं ह्या लोकींच जन्म व मरण जिंकलें. कारण, ब्रह्म हें दोषरहित व सम आहे. म्हणून ते पुरुष ब्रह्माच्या ठिकाणीं स्थित म्हणजे येथल्या येथेंच ब्रह्मभूत झालेले असतात.

प्रिय म्हणजे इष्ट वस्तु प्राप्त झाली असतां आनंदून जाऊं नये आणि अप्रिय प्राप्त झालें असतां खिन्नही होऊं नये. याप्रमाणें ज्याची बुद्धि स्थिर असते व जो मोह पावत नाहीं, तोच ब्रह्मवेत्ता ब्रह्माच्या ठायीं स्थिर झाला म्हणावयाचा.

ज्या पुरुषाचें मन बाह्य विषयांच्या ठिकाणीं आसक्त नसतें, त्याला आत्म्याच्या ठिकाणचें जें सुख आहे तें मिळतें; व ब्रह्माशीं मिळून युक्त झालेला तो पुरुष अक्षयसुखाचा अनुभव घेतो.

योऽन्तःसुखोऽन्तरारामस्तथाऽन्तर्ज्योतिरेव यः ।
स योगी ब्रह्मनिर्वाणं ब्रह्मभूतोऽधिगच्छति ॥
लभन्ते ब्रह्मनिर्वाणमृषयः क्षीणकल्मषाः ।
छिन्नद्वैधा यतात्मानः सर्वभूतहिते रताः ॥
कामक्रोधवियुक्तानां यतीनां यतचेतसाम् ।
अभितो ब्रह्म निर्वाणं वर्तते विदितात्मनम् ॥‡

जो योगी अंतःकरणांत सुखी झाला व अंतरांतच आराम पावूं लागला व ज्याला अंतःप्रकाश मिळाला आहे तो ब्रह्मरूपच होऊन ब्रह्मपदाला जातो.

ज्यांचीं पापें नाहींशीं झालीं आहेत, ज्यांचा द्वैतभाव गेला आहे, व जे आत्मसंयमनानें सर्व भूतांच्या हिताविषयीं तत्पर आहेत, असे ऋषि ब्रह्मपदाला जातात.

---

† भगवद्गीता, ५. १८–२१. ‡ भगवद्गीता, ५. २४–२६.

कामक्रोधविरहित होऊन ज्यांनीं चित्त स्वाधीन ठेविलें आहे व आत्मस्वरूप जाणिलें आहे, अशा योग्यांच्या सभोंवतींच (संनिधच) ब्रह्मनिर्वाण असतें.

---

## प्रकरण चवथें.

# कर्म.

कर्म ह्या संस्कृत शब्दाचा अर्थ क्रिया असा आहे; परंतु साधारणतः ह्या शब्दाचा उपयोग सध्यां घडत असलेली क्रिया व तिचा भावी परिणाम ह्या दोहोंमधील विशिष्ट संबंध दाखविण्याकडे होतो. कोणत्याही गोष्टी अकारण, अनिमित्त किंवा अव्यवस्थित रीतीनें घडून येत नाहींत; त्या नियमित क्रमानेंच एकामागून एक घडतात.

जमिनींत बीं पेरिलें असतां त्याचा रोपा तयार होतो, त्याला पानें येतात फुलें येतात, फळें येतात व फळांमध्यें पुन्हा बीं तयार होतें. तें बीं पुन्हा पेरिलें म्हणजे पूर्ववत् क्रम सुरू होतो. ज्या प्रकारचें बीं त्याच प्रकारचे रोपे तयार होतात. भाताच्या बीजापासून भाताचा रोपा तयार होतो, बाजरीच्या बीजापासून बाजरीचा, गव्हाच्या बीजापासून गव्हाचा व निवडुंगाच्या बीजापासून निवडुंगाचा होतो. धोतऱ्याचें बीं पेरिलें तर मधुर द्राक्षाच्या पिकाची आशा कोणीं करितां कामा नये; व कांटेरी निवडुंगाचें बीं पेरिलें तर मधुर आम्रफळाची आशा करूं नये. ह्यालाच कर्म म्हणतात; व ज्या मनुष्याला तें समजतें तो आपणाला ज्याप्रकारचें फळ पाहिजे असेल त्याच प्रकारचें बीं पेरितो, ही गोष्ट प्रथमतः लक्षांत ठेविली पाहिजे.

मनुष्याच्या हातून घडणारी क्रिया प्रथमदर्शनीं जितकी साधी दिसते तितकी साधी असत नाहीं. जर आपण एखाद्याला प्रश्न केला, "आपण शहरामध्यें कां गेलां होतां?" तर, "मला अमुक एक जिन्नस पाहिजे होती व तेथें ती मिळेल असें मला वाटलें;" किंवा, "मला एका मित्राला भेटावयाचें होतें, व तो शहरांत आहे असें मला वाटलें," ह्याप्रमाणें निरनिराळ्या गोष्टींविषयींची पण नेहमीं एकाच स्वरूपाचीं उत्तरें तो देईल. मला पाहिजे व

मला वाटलें म्हणून मीं केलें; ह्या तिन्ही गोष्टींची असल्या उत्तरांत नेहमीं सांगड असते.

आतां हें जें पाहिजे ह्यालाच इच्छा असें म्हणतात. कांहीं तरी मिळविण्याची इच्छा उत्पन्न होते, ही पहिली पायरी; नंतर ती वस्तु कशी मिळवावी ह्याचा आम्ही विचार करितों, ही दुसरी पायरी; व नंतर ती वस्तु मिळविण्याचा प्रयत्न करितों, ही तिसरी पायरी. हा नियमित क्रम आहे. प्रत्येक प्रयत्नाच्या पूर्वीं विचार असतो, व प्रत्येक विचाराच्या पूर्वीं इच्छा असते.

प्रयत्न, विचार व इच्छा ह्या तीन गोष्टी म्हणजे कर्मरज्जूचे तीन धागेच आहेत. आमच्या हातून घडणाऱ्या कृत्यांनीं आमच्या सभोंवतालच्या लोकांना सुख किंवा दुःख प्राप्त होतें. जर आम्हीं त्यांना सुख दिलें तर आम्हीं सुखाचें बीज पेरिलें; व त्याचें सुखमय फळ आम्हांला प्राप्त होईल. जर आम्हीं त्यांना दुःख दिलें तर आम्हीं दुःखाचें बीज पेरिलें; व त्याचें दुःखमय फळ आम्हांला भोगावें लागेल. जर आपण दुष्टपणाचें आचरण केलें तर आपण दुष्टपणाचें बीज पेरिलें; व त्याचें फळ स्वतःशीं दुसरे दुष्टपणा करितील हें होय. त्याचप्रमाणें जर आपण ममतेचें वर्तन केलें तर आपण ममतेचें बीज पेरिलें; व त्याचें फळ आपणांस दुसऱ्यांकडून ममता मिळेल हें होय. आमच्या हातून घडणाऱ्या कृत्यांनीं जें जें कांहीं पेरितों तें तें आम्हांला परत मिळतें. ह्यालाच कर्म असें म्हणतात.

परंतु क्रियेच्या पूर्वीं विचार असतो. ह्या विचारानेंच आपला स्वभाव किंवा मन बनत असतें. एखाद्या गोष्टीसंबंधानें आपण बराच विचार केला म्हणजे तद्वतच आपलें मन बनतें. आपले विचार कृपाळूपणाचे असतील तर आपण कृपाळू बनतों, दुष्टपणाचे असतील तर दुष्ट बनतों, लुच्चेगिरीचे असतील तर लुच्चे बनतों व प्रामाणिकपणाचे असतील तर प्रामाणिक बनतों. ह्याप्रमाणें आमच्या विचारांनीं आमचा स्वभाव बनतो; व ज्यावेळीं आपण पुन्हां जन्मास येतों त्यावेळीं आजच्या आपल्या विचारांनीं बनलेला स्वभाव हा आपला मूळस्वभाव होतो. ज्याअर्थीं आपलें वर्तन आपल्या स्वभावाला अनुसरून असतें, म्हणजे ममताळू मनुष्य ममतेनें वागतो व दुष्ट मनुष्य दुष्टपणानें वागतो, त्याअर्थीं आपलें पुढील जन्मांतील वर्तन ह्या जन्मांतील विचारांवर अवलंबून असतें हें उघडच आहे. याचेंच नांव कर्म.

परंतु विचाराच्या पूर्वी इच्छा असते. ह्या इच्छेमुळेंच इष्टवस्तु आपणांस प्राप्त होते. लोहचुंबक ज्याप्रमाणें लोखंडाचें आकर्षण करितो, तद्वतच इच्छा इष्ट वस्तूला जवळ ओढिते. जर आपणांस द्रव्याची इच्छा असेल तर पुढील जन्मीं आपणांला धनिक होण्याची संधि मिळेल. व विद्येची इच्छा असेल तर पुढील जन्मीं विद्वान् होण्याची संधि मिळेल. व अधिकाराची इच्छा असेल तर अधिकार प्राप्त होण्याची संधि मिळेल. हेंच कर्म.

ह्या विषय पूर्णपणें अवगत होईपर्यंत विद्यार्थ्यांनीं ह्याचा पुनःपुन्हां विचार करावा. त्याचें रहस्य समजलें तरच कर्मांचे कठीण सिद्धांत त्यांना उलगडणें शक्य आहे. " पेरावें तसें घ्यावें " ह्या एका वाक्यांत कर्माचें रहस्य आहे.

आतां असा प्रश्न येईल कीं, " जर माझें वर्तन हें माझ्या पूर्व विचाराचा परिणाम आहे; व जर माझा विचार ह्या तत्पूर्वीच्या माझ्या इच्छेचा परिणाम आहे तर मी सर्वस्वी परतंत्र नाहीं काय ? ज्याप्रमाणें माझे विचार त्याच-प्रमाणें माझें वर्तन झालेंच पाहिजे; व ज्याप्रमाणें इच्छा त्याप्रमाणें माझे विचारही असलेच पाहिजेत." हें खरें आहे, परंतु फक्त अंशतः खरें आहे. कारण, जसजसे नवीन अनुभव आम्हांला मिळतात, तसतसे आम्ही नेहमीं बदलत जातों. जीव अधिकाधिक ज्ञान संपादन करून त्यायोगें आपल्या इच्छा बदलीत असतो. ह्याचा अर्थ असा कीं, जरी आमच्या इच्छा, विचार व क्रिया पूर्वी एका विवक्षित मार्गानें खरोखरी आम्हीं नेल्या असल्या, तरी त्या वेळींही ते विचार व त्या इच्छा अन्य मार्गानें नेण्याची शक्यता किंवा सामर्थ्य आम्हांमध्यें होतें; आणि पूर्वी आपल्या हातून प्रत्यक्ष घडलेल्या कृत्यांचे दुष्परिणाम नवीन अनुभवामुळें आमच्या नजरेस येतांच ही शक्यता आपणांस कोणत्याही वेळीं कृतींत उतरवितां येते.

कल्पना करा कीं, एखाद्याला आपण दुष्टपणाचें आचरण केलें असें आढळून आलें, व हें आपलें वर्तन आपल्या प्राक्कालीन दुष्ट विचारांमुळें घडलें, व ते विचार, फक्त दुष्टपणानेंच मिळणें शक्य अशी वस्तु मिळ-विण्याच्या इच्छेमुळें उत्पन्न झाले असें समजलें. पण त्याला आतां असेंही अनुभवास आलें आहे कीं, आपल्या दुष्टपणामुळें लोकांना दुःख होतें, लोक आपला तिरस्कार करितात, त्यांस आपली दहशत वाटते त्यामुळें आपणांस

त्यांही मिळत नाहींत व आपण दुःखी होतों; तेव्हां ह्या गोष्टीचा तो विचार करूं लागतो, व आपला स्वभाव बदलण्याचा तो निश्चय करितो; परंतु प्राक्कालीन इच्छा व विचार ह्यांच्या जोराला प्रतिबंध करणें त्याला कठीण जातें. तेव्हां तो ( म्हणजे तो जीव ) ह्या संकटाच्या मुळाकडे—म्हणजे दुष्ट-पणाशिवाय न मिळणाऱ्या वस्तूंच्या इच्छेकडे—वळतो व म्हणतो, " मी त्या वस्तूंची आतां इच्छा करणार नाहीं, व माझी इच्छा तिकडे गेलीच तर तिनें मला दुःख दिलें आहे, ह्याचें मी स्मरण करीन. " इच्छेचा पगडा विचारां-वर बसविण्याऐवजीं तो आतां विचारांचा पगडा इच्छेवर बसवितो. उधळ-लेल्या घोड्याप्रमाणें इच्छांनीं आपणाला पाहिजे तिकडे नेण्याऐवजीं तो आतां विचाररूपी लगामानें हळुहळू इच्छा आपल्या ताब्यांत ठेवितो. फक्त सुखो-त्पादक अशा वस्तूंकडेच आतां तो त्यांना जाऊं देतो.

अनुभवशून्य जीव आपल्या वासनांच्या तावडींत सांपडून त्यांना मोकळ्या सोडितो, व तेणेंकरून आपल्यावर संकटें ओढून घेतो; व अनुभवपूर्ण जीव ज्ञानसंपन्न असल्यामुळें, ज्या विषयांच्या प्राप्तीमुळें दुःख उत्पन्न होतें असा त्याला पूर्वीं अनुभव आलेला असतो त्या विषयांकडे जेव्हां त्याची वासना धांव घेते तेव्हां पूर्वीं अनुभविलेल्या दुःखाचें स्मरण करून तो आपल्या वासनेला आंवरून धरितो.

म्हणून ज्याला स्वतः सुखानुभव घ्यावयाचा असेल व दुसऱ्यांनाही सुख द्यावयाचें असेल त्यानें आपल्या वासनांसंबंधानें योग्य खबरदारी घेतली पाहिजे; व कोणते विषय अंतीं सुखोत्पादक आहेत व कोणते दुःखोत्पादक आहेत हें बारीक निरीक्षणानें ठरविलें पाहिजे, व नंतर फक्त सुखोत्पादक विषयांवरच आपली वासना ठेवण्याचा प्रयत्न केला पाहिजे.

एखाद्या विशिष्ट प्रकारच्या आयुष्यक्रमानें जन्ममृत्यूच्या बंधनांपासून आपली सुटका होते असें नाहीं, तर श्रीकृष्ण म्हणतात त्याप्रमाणें " जो योगी एकात्मभावनेनें सर्व भूतांत असणाऱ्या मला भजतो, त्याचा आयुष्यक्रम कोणत्याही प्रकारचा असला तरी तो माझ्या स्वरूपाच्या ठिकाणींच असतो, "†

† सर्वभूतस्थितं यो मां भजत्येकत्वमास्थितः ।
सर्वथा वर्तमानोऽपि स योगी मयि वर्तते ॥—भगवद्गीता, ६. ३१.

ही गोष्ट जाणणें फार महत्त्वाचें आहे. क्षत्रिय राजा जनक व तुलाधार नांवाचा वैश्य ह्या दोघांनाही सारखाच मोक्ष प्राप्त झाला, परंतु तो अरण्यांत पळून जाऊन नव्हे, तर ऐहिक वासनेच्या अभावानें झाला.

मिथिला नगरींतील विदेहांचा राजा जो जनक त्यानें शांत चित्त झाल्यानंतर म्हटलें आहे, "माझी संपत्ति विपुल असूनही मी निर्धन आहें. सर्व मिथिला नगरी जरी अग्नीनें भस्म झाली तरी माझें कांहीं गेलें असें नाहीं."† हें सांगून त्यानें मांडव्याला उपदेश केला आहे कीं, मनुष्याचें जें जें कांहीं धन असेल तें तें दुःखमूलक आहे, व वासनाक्षयापासून होणाऱ्या सुखाचा एक षोडशांशसुद्धां इहलोकीं किंवा स्वर्गलोकीं वासना तृप्त झाल्यानें माणसास मिळणार नाहीं. ज्याप्रमाणें गाईचीं शिंगें गाईबरोबरच वाढतात, त्याप्रमाणें धनप्राप्तीबरोबरच धनाशाही वाढते. धनाचा जितका चांगल्या कामीं उपयोग करितां येईल तितका करावा, परंतु धनाशा ही दुःखोत्पादक आहे. सर्व भूतांस आपल्या सारखे समजणारा ज्ञानी सर्व दुःखांपासून मुक्त होतो. याज्ञवल्क्यमुनीच्या उपदेशानें जनक राजा मुक्त झाला; कारण त्या उपदेशानें मंगल, अविनाशि व दुःखातीत असें ब्रह्म त्याला प्राप्त करून दिलें.॥ येणेंप्रमाणें ज्ञान मिळवून तो स्वतः गुरु झाला; आणि व्यासांनीं सुद्धां आपला मुलगा शुक ह्याला मोक्षधर्म शिकण्याकरितां त्याजजवळ पाठविलें.

जाजलीनें मोठी तपश्चर्या केली, व तो अभिमानानें व्याप्त झाला. एके दिवशीं त्याच्या मनांत आलें कीं, "आपल्यासारखा ह्या अफाट सागरामध्यें व विस्तीर्ण पृथ्वीतलावर कोण आहे?" तेव्हां आकाशवाणी झाली कीं, "असें म्हणूं नको. क्रयविक्रय करण्यांत गुंतलेल्या तुलाधारानें सुद्धां असें म्हणूं नये, व तूं तर त्याच्या बरोबरीलाही येणार नाहींस." आपण ब्राह्मण व तपस्वी असूनही यःकश्चित् एखाद्या वाण्याला आपल्यापेक्षांही श्रेष्ठ मानण्यांत यावा हें पाहून जाजलीस फार आश्चर्य वाटलें व तो तुलाधाराला शोधून काढून हें कोडें उलगडण्यासाठीं निघाला. क्रोधाविष्ट होऊन तो वाराणशी नगरीला आला व तेथें

---

† अनंतमिव मे वित्तं यस्य मे नास्ति किंचन ।
मिथिलायां प्रदीप्तायां न मे दह्यति किंचन ॥ म. भा. शांतिपर्व १७८. २.

॥ महाभारत, शांतिपर्व ३१८.

त्याला तो तुलाधार आढळला. आलेल्या गिऱ्हाइकाला जिन्नस विकण्याचें त्याचें काम चालूंच होतें. जाजलीला पाहतांच तुलाधार उठून उभा राहिला, व आदरपूर्वक त्या ब्राह्मणाला नमस्कार करून अभिमानानें उन्मत्त करणाऱ्या त्याच्या महातपाची गोष्ट त्यानें त्याला सांगितली व तो म्हणाला, "हे ब्राह्मणश्रेष्ठा, आपण क्रोधाविष्ट होऊन मजकडे आलां आहां, तर आपली कोणती सेवा माझ्या हातून घडली पाहिजे तें सांगा." † आपल्या पूर्वकाळच्या गोष्टींची माहिती ह्या यःकश्चित् वाण्याला आहे हें पाहून जाजलीला आश्चर्य वाटलें, व हें तुला कसें समजलें, असें मोठ्या उत्सुकतेनें त्यानें त्याला विचारिलें; तेव्हां प्राचीन नीतिशास्त्र तुलाधारानें त्याला शिकविलें. हें शास्त्र म्हणजे कोणालाही उपद्रव न देणें, व ज्या ठिकाणीं उपद्रव सर्वस्वीं टाळतां येत नसेल त्या ठिकाणीं तो शक्य तेवढा कमी होईल असें आपलें आचरण ठेवणें हें होय. हें सर्व प्रसिद्ध असलें तरी त्याप्रमाणें आचरण फारच थोड्यांचें होत असतें. तुलाधार स्वतः कोणाचा ऋणी झाला नाहीं, कोणाशीं त्याचें वैर नव्हतें. रागद्वेष त्यानें जिंकले होते व निंदास्तुतीचा त्याग करून सर्वांशीं समदृष्टि झाला होता. जो मनुष्य कोणाला भीत नाहीं व ज्याची कोणांला भीति वाटत नाहीं; ज्याला प्रिय, अप्रिय कांहीं राहिलें नाहीं, व जेव्हां त्याचेपासून कोणालाही पीडा होत नाहीं, तेव्हांच तो ब्रह्मपदाला जातो. दुष्टपणामुळें मनुष्य व इतर प्राणी ह्यांना कशी पीडा होते, यज्ञ म्हणजे काय, खरी यात्रा कोणती व निरुपद्रवीपणामुळें मोक्ष कसा मिळवितां येईल ह्याचेंही त्या प्रसंगीं तुलाधारानें फारच सुंदर विवेचन केलेलें आहे.

---

कामसय एवायं पुरुष इति स यथाकामो भवति तत्क्रतुर्भवति ।
यत्क्रतुर्भवति तत्कर्म कुरुते यत्कर्म कुरुते तदभिसम्पद्यते ‡

मनुष्य हा वासनेनें बनलेला आहे; वासनेप्रमाणें त्याचा विचार असतो, विचाराप्रमाणें कर्म असतें, व कर्माप्रमाणें त्याला फळ मिळतें.

तदेव सक्तः सहकर्मणैति लिङ्गं मनो यत्र निषक्तमस्य ॥§

---

† महाभारत, शांतिपर्व २६१. ‡ बृहदारण्यकोपनिषत्, ४. ४. ५.
§ बृहदारण्यकोपनिषत्, ४. ४. ६.

ज्या विषयामध्यें त्याचें मन आसक्त असतें त्या विषयाकडे कर्मानें तो जातो.

अथ खलु क्रतुमयः पुरुषो यथाक्रतुरस्मिँल्लोके पुरुषो
भवति तथेतः प्रेत्य भवति । †

खरोखर मनुष्य हा विचारनिर्मित आहे; इहलोकीं जसे त्याचे विचार असतात तसा तो परलोकीं बनतो.

न मां कर्माणि लिम्पन्ति न मे कर्मफले स्पृहा ।
इति मां योऽभिजानाति कर्मभिर्न स बध्यते ॥
एवं ज्ञात्वा कृतं कर्म पूर्वैरपि मुमुक्षिभिः ।
कुरु कर्मैव तस्मात्त्वं पूर्वैः पूर्वतरं कृतम् ॥ †

कर्में मला बद्ध करीत नाहींत, आणि कर्मफलाविषयीं माझी आसक्तिही नाहीं; असा मी आहें असें जो जाणतो त्यालाही कर्में बद्ध करीत नाहींत.

हें जाणून पूर्वीच्या मुमुक्षूंनीं कर्में केलीं. म्हणून पूर्वीच्या लोकांनीं पूर्वकाळीं केल्याप्रमाणें तूंही कर्म कर.

यस्य सर्वे समारम्भाः कामसंकल्पवर्जिताः ।
ज्ञानाग्निदग्धकर्माणं तमाहुः पण्डितं बुधाः ॥
त्यक्त्वा कर्मफलासंगं नित्यतृप्तो निराश्रयः ।
कर्मण्यभिप्रवृत्तोऽपि नैव किंचित्करोति सः ॥
निराशीर्यतचित्तात्मा त्यक्तसर्वपरिग्रह ।
शारीरं केवलं कर्म कुर्वन्नाप्नोति किल्बिषम् ॥
यदृच्छालाभसंतुष्टो द्वंद्वातीतो विमत्सरः ।
समः सिद्धावसिद्धौ च कृत्वापि न निबध्यते ॥
गतसंगस्य मुक्तस्य ज्ञानावस्थितचेतसः ।
यज्ञायाचरतः कर्म समग्रं प्रविलीयते ॥‡

---

† छांदोग्योपनिषत्, ३.१४.१. † भगवद्गीता, ४. १४, १५.

‡ भगवद्गीता, ४. १९–२३.

ज्याच्या सर्व कर्मांचे आरंभ, संकल्प व फलाची इच्छा ह्यांविरहित असतात, त्याला ज्ञानी लोक 'ज्ञानाग्नीनें सर्व कर्मे दग्ध झालेला पण्डित' असें म्हणतात.

जो कर्माच्या फलाची इच्छा सोडून नित्य तृप्त राहून कशाचाही आश्रय करीत नाहीं, तो सर्व कर्मे करीत असला तरी वस्तुतः कांहींच करीत नाहीं.

ज्यानें सर्व इच्छा सोडून आपलें चित्त व बुद्धि हीं स्वाधीन ठेविलीं आहेत, व सर्वसंगपरित्याग केला आहे, त्यानें शरीरानें कर्मे केलीं तरी त्याला कर्माचा दोष लागत नाहीं.

सहजगत्या मिळेल त्यांत संतुष्ट असणारा, हर्षशोकादि द्वंद्वांच्या पलीकडे राहणारा, मत्सररहित, आणि कर्माची सिद्धि झाली वा न झाली तरी मन सम ठेवणारा असा पुरुष संपूर्ण कर्मे करीत असतांही कर्मबंधानें लिप्त होत नाहीं.

ज्यानें सर्वसंग सोडिला आहे, जो मुक्त आहे, आणि ज्याचें चित्त ज्ञानाच्या ठिकाणीं स्थिर झालें आहे, तो जरी यज्ञासाठीं कर्म करीत असला तरी त्याचें तें सर्व कर्म लय पावतें.

यदा सर्वे प्रमुच्यन्ते कामा येऽस्य हृदि श्रिताः ।
अथ मर्त्योऽमृतो भवत्यत्र ब्रह्म समश्नुते ॥ †

हृदयामध्यें असलेल्या सर्व वासना जेव्हां नष्ट होतात तेव्हां मर्त्य आहे तो अमर्त्य होतो, व इहलोकींच ब्रह्मसुख भोगतो.

आत्मानं रथिनं विद्धि शरीरं रथमेव तु ।
बुद्धिं तु सारथिं विद्धि मनः प्रग्रहमेव च ॥
इन्द्रियाणि हयानाहुर्विषयांस्तेषु गोचरान् ।
आत्मेन्द्रियमनोयुक्तं भोक्तेत्याहुर्मनीषिणः ॥
यस्त्वविज्ञानवान्भवत्ययुक्तेन मनसा सदा ।
तस्येन्द्रियाण्यवश्यानि दुष्टाश्वा इव सारथेः ॥
यस्तु विज्ञानवान्भवति युक्तेन मनसा सदा ।
तस्येन्द्रियाणि वश्यानि सदश्वा इव सारथेः ॥

---

† कठोपनिषत, २. ६–१४.

यस्त्वविज्ञानवान्भवत्यमनस्कः सदाऽशुचिः ।
न स तत्पदमाप्नोति संसारं चाधिगच्छति ॥†

आत्मा हा रथाचा मालक, शरीर हा त्याचा रथ, बुद्धि हा सारथि व मन हे लगाम असें जाण.

इंद्रियें हे घोडे व विषय हें त्यांचें क्षेत्र व इंद्रियें आणि मन ह्यांनीं युक्त असा आत्मा हा त्यांचा भोक्ता असें ज्ञाते म्हणतात.

जो अविद्वान् व शिथिल मनाचा असतो त्याचीं इंद्रियें सारथ्याच्या उच्छृंखल घोड्यांप्रमाणें त्याच्या स्वाधीन रहात नाहींत.

जो विद्वान् व स्थिरचित्त असतो त्याचीं इंद्रियें सारथ्याच्या चांगल्या घोड्यांप्रमाणें त्याच्या स्वाधीन असतात.

जो अज्ञानी व अविचारी व सदा अपवित्र असतो त्याला तें ध्येय साध्य होत नाहीं; तो संसारामध्येंच येतो.

---

## प्रकरण पांचवें.

# यज्ञ.

यज्ञाचा विधि हिंदुस्थानांत सर्वांस परिचित आहे; परंतु सर्व यज्ञांच्या मुळाशीं कोणतें तत्त्व आहे हें विद्यार्थ्यांना समजलें पाहिजे प्रत्येकानें परहिताकरितां आत्मयज्ञ करावा; व तो कसा करावा हें शिकण्यासाठीं इतर सर्व यज्ञांची योजना आहे, ही गोष्ट विद्यार्थ्यांस समजली पाहिजे.

पहिली गोष्ट लक्षांत ठेवावयाची ती ही कीं, सृष्ट्युत्पत्ति हाच एक मोठा यज्ञ आहे. सर्व विश्व प्रगट व्हावें म्हणून प्रकृतीमध्यें ईश्वरानें आपणांस कोंडून व मर्यादित करून घेतलें आहे. श्रुति व स्मृति हेंच सांगतात. ऋग्वेदांतील पुरुषसूक्तांत हेंच सांगितलें आहे, व भूतमात्रांच्या उत्पत्तीला कारण हा यज्ञच होय, असा उल्लेख श्रीकृष्णांनींही केला आहे.* आध्या-

---

† कठोपनिषत्, १. ३. ३–७.

* भूतभावोद्भवकरो विसर्गः कर्मसंज्ञितः ।—भगवद्गीता, ८. ३.

त्मिक भाषेमध्यें प्रकृतिप्रवेशालाच मृत्यु असें म्हणतात. स्वतःचेच अंश जे जीव त्यांस परस्परांहून अलग असें अस्तित्व मिळावें व प्रकृतीच्या अनंत रूपांतून आपल्या सर्व शक्तींचा त्यांनीं विकास करावा म्हणून ईश्वरानें आत्मयज्ञ केला. हा मूळ यज्ञ आहे, व ह्यावरच यज्ञधर्म रचिला आहे. परहितासाठीं आपलें चैतन्य खर्च करणें हाच यज्ञाचा अर्थ आहे.

यज्ञधर्म हाच सर्व जीवांचा जीवितधर्म आहे. उत्क्रांतीच्या पूर्वदशेमध्यें त्यांचा बळजबरीनें यज्ञ केला जातो, व त्यांच्या संमतीवांचून किंवा त्यांना समजल्यावांचून त्यांची आपोआप प्रगति होते. त्यांचीं शरीरें त्यांच्या-कडून हिसकून घेतलीं जातात, व किंचित् अधिक कार्यक्षम अशा नवीन शरीरांत त्यांस घातलें जातें. ह्याप्रमाणें खनिज कोटींतील जीवांचीं शरीरें वनस्पतींच्या पोषणाकरितां फोडिलीं जाऊन त्या कोटींतील जीव उद्भिज्ज सृष्टीमध्यें जाण्यास तयार केले जातात. उद्भिज्ज सृष्टींतील जीवांच्या शरीराचा उपयोग प्राणिकोटींतील जीवांच्या पोषणाकरितां केला जाऊन ते जीव प्राणिकोटीमध्यें शिरण्यास तयार केले जातात. प्राणिकोटींतील जीवांचीं शरीरें, इतर प्राणी व रानटी किंवा दुसऱ्या कांहीं प्रकारचे लोक ह्यांच्या पोषणासाठीं योजिलीं जाऊन ते जीव मनुष्यकोटींत जाण्यास तयार केले जातात. त्याचप्रमाणें मानवी शरीरें हीं नरमांसभक्षक मनुष्यांच्या पोषणा-साठीं किंवा लढाई वगैरे कारणांनीं नाशिलीं जाऊन ते जीव उच्च जाती-मध्यें जाण्यास तयार केले जातात.

ह्या सर्व ठिकाणीं शरीरी जे जीव त्यांच्या संमतीवांचून त्यांच्या शरीरांचा यज्ञ परहितासाठीं केला जातो. अनंत काळ लोटल्यानंतरच ह्या धर्माची सर्वव्यापकता जीवाला कळून येते, व नंतर तो परहितासाठीं जाणूनबुजून आपल्या उपाधींचा यज्ञ करूं लागतो. ह्यालाच आत्मयज्ञ किंवा स्वार्थत्याग असें म्हणतात; यांत जीवाचें दैवी स्वरूप प्रदर्शित होतें. जीव हा ईश्वर-स्वरूपीच आहे हें त्यानें सिद्ध होतें.

महाभारतामध्यें पूर्ण स्वार्थत्यागाची अशी एक आश्चर्यकारक गोष्ट आहे. देवांचा राजा इंद्र ह्यानें एकदां आपल्या दुर्वर्तनानें एका ऋषीचा अपराध केला; तेव्हां त्याच्या रागापासून वृत्र नांवाचा एक असुर जन्मास आला. त्यानें दैत्यांचा पुढारी होऊन व इंद्राचा आणि त्याच्या सैन्याचा लढाईमध्यें

पराभव करून त्याला त्याची राजधानी जी अमरावती तीमधून हांकून लाविलें, आणि त्याचें राज्य बळकाविलें. देव आपल्या राजासह दीर्घकाळपर्यंत हद्दपार होऊन भटकत होते, व पुनः पुन्हा आपली राजधानी जिंकण्याचा प्रयत्न करीत होते, परंतु पुनः पुन्हा त्यांचा पराजय होत असे. सरतेशेवटीं, त्यांना असें समजलें कीं, दुसऱ्या कोणत्या तरी ऋषीला दया येऊन त्यानें स्वार्थत्याग केल्याशिवाय ह्या ऋषीचा राग शांत होणार नाहीं; व एखाद्या पवित्र ऋषीनें स्वयंस्फूर्तीनें दिलेल्या स्वतःच्या अस्थींच्या बनविलेल्या वज्राशिवाय दुसऱ्या कोणत्याही शस्त्रानें वृत्र मारला जाणार नाहीं. तेव्हां ते मोठ्या उत्सुकतेनें दधीचि ऋषीकडे गेले व आपली कष्टमय हकीकत त्यांनीं त्याला सांगितली. दधीचीला दया उत्पन्न झाली व तो म्हणाला, "मी तुम्हांला माझें सर्व शरीर खुषीनें देतों, तुम्हांला वाटेल तो त्याचा उपयोग करा." नंतर देवांचा शिल्पकार विश्वकर्मा जेव्हां पवित्रतेनें व तपश्चर्येनें तेजस्वी झालेल्या त्या त्याच्या शरीरावर आपलें कठोर शस्त्र चालविण्यास कांकूं करूं लागला, तेव्हां दधीचि हांसला व म्हणाला, "हें शरीर मिठानें आच्छादून टाका व पुष्कळ गाईस घेऊन या. म्हणजे मिठाबरोबर माझें मांसही त्या खाऊन टाकतील. व तुम्हांला फक्त अस्थि पाहिजेत त्या शिल्लक राहतील; त्या घेऊन चला; म्हणजे ह्या शरीराचा कोणताही भाग व्यर्थ जाणार नाहीं." त्याप्रमाणें त्यांनीं केलें, व अशा त्या अद्भुत यज्ञानें उत्पन्न झालेल्या शक्तीनें वृत्रास मरण आलें.†

ऋषींच्या वचनांत ही शिकवणूक आहे. पुढें फायदा व्हावा म्हणून तात्कालिक फायदा सोडून स्वतःच्या धनादिकांचा यज्ञ करावा असें ते मनुष्यास शिकवितात. जेव्हां एखादा इतरांकरितां यज्ञ करितो तेव्हां त्यानें यज्ञार्पण केलेलें धन बहुगुणित होऊन त्याला पुढें परत मिळतें असेंही ते सांगतात. मनुष्य जर आपल्या धनापैकीं कांहीं भाग यज्ञार्पण करील—व हा भाग त्या माणसाचाच बाह्य अंश असें मानणें रास्त आहे तर या भागाचा स्वतःच्या सुखाकडे उपयोग न केल्यामुळें तो बहुगुणित होऊन त्याकडे परत येतो असें त्यांचें अभिवचन आहे. शिवाय सद्यःसुखाचा त्याग करून अशाच प्रकारचे यज्ञ त्यानें करावे व त्यामुळें त्यानें मृत्यूनंतर स्वर्गामध्यें स्वतःकरितां बहुगुणित सुखाचा संग्रह करावा असा जीवाला पुढचा उपदेश आहे.

† महाभारत, वनपर्व १००.

ह्याप्रमाणें फलाच्या आशेनें स्वधनाचा यज्ञ करितां करितां यज्ञ करण्याचा प्रघात अंगवळणीं पडला म्हणजे दुसऱ्याची सेवा करण्याकरितां स्वत्वाचा यज्ञ करणें, व त्या सेवेच्या आनंदामध्येंच त्याचें फल आहे असें जाणणें हें आपलें कर्तव्य आहे हें त्यास समजूं लागतें.

सभोंवतालच्या भूतमात्रांशीं मनुष्याचा संबंध आहे; त्याचें जीवित एकाकी पृथक् नसून सर्व जीव परस्परावलंबी आहेत; व हें परस्परावलंबन जेव्हां ते ओळखतील तेव्हांच त्यांचा कायमचा विकास होईल. यज्ञापासून हा दुसरा धडा मनुष्याला शिकविण्यांत येतो. ऋषि, देव, पितर, मनुष्य, भूतमात्र ह्यांच्याकरितां रोज यज्ञ करावे असें ऋषि सांगतात. कारण, ज्या अर्थीं ह्या सर्वांनीं त्याचें जीवित समृद्ध करण्यासाठीं आत्मयज्ञ केलेला आहे. त्या अर्थीं तो त्यांचा ऋणी आहे व तें ऋण त्यानें यज्ञ करून फेडिलेंच पाहिजे. ज्या अर्थीं तो आत्मपोषणासाठीं दुसऱ्यावर अवलंबून असतो, त्या अर्थीं प्रामाणिकपणानें म्हटलें म्हणजे त्यानें दुसऱ्यांच्या पोषणाचाही भार सोशिला पाहिजे. आम्ही दुसऱ्यांकरितां यज्ञ करणें हा त्यांचा आमच्यावरील हक्क आहे व आम्ही त्यांचे ऋणी असल्यामुळें यज्ञ करणें हें आमचें कर्तव्य आहे.

सरतेशेवटीं जीवाला जेव्हां आपल्या उत्पत्तिस्थानाची ओळख होते व ईश्वराशीं आपलें ऐक्य त्याला समजून येतें, तेव्हांच यज्ञ त्याला सुखावह व आनंदकारक होतो. दुसऱ्यांकारितां आत्मयज्ञ करणें म्हणजे अंतर्गत दैहिक शक्तीचा आनंदजनक उपयोग करणें होय, असाच त्याला प्रत्यय येतो. आपणाला किती अधिक घेतां येईल व किती थोडें देतां येईल हें पहाण्याऐवजीं आपणाला किती कमी घेतां येईल व किती अधिक देतां येईल हें तो आतां पाहूं लागतो. आपल्या उपाधींच्या रक्षणाकरितां आपण किती घेतों हें तो लक्षपूर्वक पाहतो व स्वरक्षणाकरितां खालच्या कोटींतील जीवांना केलेल्या आघातानें उत्पन्न होणारें दुःख कमी कमी करण्याचा तो प्रयत्न करितो. जेणेंकरून ज्ञान असलेल्या प्राण्यांना दुःख होईल अशा प्रकारचें अन्न व क्रीडा तो वर्ज्य करितो, व भूतसखा बनण्याचा प्रयत्न करितो. प्राण्यांनीं प्राण्यांवर झडप घालावी, मनुष्यांनीं मनुष्यांना लुटावें, अन्नाकरितां व गमतीखातर मनुष्यानें प्राण्यांना

मारावें, ह्या गोष्टी, जरूर त्या इंद्रियशक्ति व जीवितबळ ह्यांचा विकास होण्याकरितां उत्क्रांतिपथाच्या ठराविक मर्यादेपर्यंत जरी आवश्यक आहेत, तरी मनुष्यानें हळुहळू स्वतः उत्क्रान्त होऊन या परिस्थितीच्या पलीकडे गेलें पाहिजे, व खालच्या पायरीवरील प्राण्यांच्या आहुति, बलि म्हणून घेण्याऐवजीं त्यांना मदत करणें आवश्यक आहे असें समजून, त्यांच्यासंबंधानें सौम्यपणा, सहानुभूति व मार्दव हे गुण वाढविले पाहिजेत हें त्याला कळून येतें.

खालच्या कोटींतील जीवांसंबंधानें अशी अभेदभावाची कल्पना मनुष्याच्या विचारामध्यें येऊं लागली म्हणजे वरच्या कोटींतील जीवांशीं व जगज्जनक जो ईश्वर त्याच्याशींही अभेदभाव त्याला वाटूं लागतो. ज्याप्रमाणें ईश्वराचें अस्तित्व सर्वांसाठीं आहे, त्याचप्रमाणें आपलेंही जीवित सर्वांसाठीं असणें हें आपलें खरें कर्तव्य आहे हें तो हळूहळू जाणतो व ईश्वरी शक्ति त्याच्यामध्यें उत्पन्न होऊन ईश्वरी इच्छा तडीस नेण्यास तो खुषीनें व स्वसंतोषानें साह्य करितो. नंतर त्याचें प्रत्येक कर्म ईश्वरार्पित यज्ञस्वरूपी बनतें व अशा प्रकारचीं कर्में त्याला बंधनकारक होत नाहींत. ह्याप्रमाणें यज्ञधर्म हा मोक्षधर्म सुद्धां बनतो.

---

सहयज्ञाः प्रजाः सृष्ट्वा पुरोवाच प्रजापतिः ।
अनेन प्रसविष्यध्वमेष वोऽस्त्विष्टकामधुक् ॥
देवान्भावयतानेन ते देवा भावयन्तु वः ।
परस्परं भावयन्तः श्रेयः परमवाप्स्यथ ॥
इष्टान्भोगान् हि वो देवा दास्यन्ते यज्ञभाविताः ।
तैर्दत्तानप्रदायैभ्यो यो भुङ्क्ते स्तेन एव सः ॥
यज्ञशिष्टाशिनः सन्तो मुच्यन्ते सर्वकिल्बिषैः ।
भुञ्जते ते त्वघं पापा ये पचन्त्यात्मकारणात् ॥
अन्नाद्भवन्ति भूतानि पर्जन्यादन्नसंभवः ।
यज्ञाद्भवति पर्जन्यो यज्ञः कर्मसमुद्भवः ॥
कर्मब्रह्मोद्भवं विद्धि ब्रह्माक्षरसमुद्भवम् ।
तस्मात्सर्वगतं ब्रह्म नित्यं यज्ञे प्रतिष्ठितम् ॥†

---

† भगवद्गीता, ३, १०–१५.

सृष्टीच्या आरंभीं यज्ञासह प्रजा उत्पन्न करून ब्रह्मदेव त्यांना म्हणाला, "तुम्ही ह्या यज्ञमार्गानें वृद्धि पावा व तो यज्ञ तुमचे इच्छित मनोरथ पूर्ण करील.

"ह्या यज्ञानें देवांची तुम्ही समृद्धि करीत जा. ते देव उलट तुमची समृद्धि करोत; ह्याप्रमाणें तुम्ही परस्परांना संतुष्ट करून आपलें कल्याण करून घ्या.

"यज्ञानें संतुष्ट झालेले देव तुम्हांला तुमचे इच्छित भाग देतील. देवांनीं दिलेले भाग त्यांना अर्पण न करितां जो स्वतः भोगतो तो चोर समजावा.

"यज्ञाचा अवशिष्ट प्रसाद जे ग्रहण करितात ते श्रेष्ठ पुरुष सर्व पापांपासून मुक्त होतात; पण जे प्राणी आपल्याकरितांच अन्न शिजवून भोजन करितात, ते पातकच सेवन करितात.

"अन्नापासून प्राणि उत्पन्न होतात; अन्न पर्जन्यापासून होतें; पर्जन्य यज्ञापासून होतो; व यज्ञ कर्मापासून उत्पन्न होतो.

"कर्म वेदांपासून उत्पन्न होतें असें समजा; वेद अक्षर जें ब्रह्म त्यापासून होतात; ह्याकरितां सर्वगत जें ब्रह्म तें नित्य यज्ञामध्यें वास करितें.

काङ्क्षन्तः कर्मणां सिद्धिं यजन्त इह देवताः ।
क्षिप्रं हि मानुषे लोके सिद्धिर्भवति कर्मजा ॥†

कर्मफलाच्या प्राप्तीची इच्छा करणारे लोक ह्या लोकीं देवतांचें यजन करितात; कारण, ह्या मनुष्यलोकीं कर्मापासून फलप्राप्ति त्वरित होते.

आवां राजानावध्वरे ववृत्यां हव्येभिरिन्द्रावरुणा नमोभिः ।
अस्मे इन्द्रावरुणा विश्ववारं रयिं धत्तं वसुमन्तं पुरुक्षुम् ।
इयमिन्द्रं वरुणमष्टमे गीः प्रावत्तोके तनये तूतुजाना ।*

हे इंद्रवरुण राजांनो, आमच्या हव्यांनीं व नमस्कारांनीं तुमचें लक्ष आमच्या यज्ञाकडे वळो. हे इंद्रवरुणांनो, विपुल धन, अन्न व आशीर्वाद

---

† भगवद्गीता, ४. १२. * ऋग्वेद, ७. ८४. १, ४, ५.

आम्हांला द्या. हें माझें गीत इंद्रवरुणांपर्यंत जावो व त्यांच्या शक्तीनें पुत्र व संतति निर्माण होवो.

एतेषु यश्चरते भ्राजमानेषु यथाकालं चाहुतयो ह्याददायन् ।
तन्नयन्त्येताः सूर्यस्य रश्मयो यत्र देवानां पतिरेकोऽधिवासः ॥
एह्येहीति तमाहुतयः सुवर्चसः सूर्यस्य रश्मिभिर्यजमानं वहन्ति ।
प्रियां वाचमभिवदन्त्योऽर्चयन्त्य एष वः पुण्यः सुकृतो ब्रह्मलोकः ॥ ✝

जो कोणी ह्या देदीप्यमान ( पूर्वी उल्लेखिलेल्या सात ) ज्वालांमध्यें योग्य वेळीं आहुति देऊन यज्ञ करील त्याला हे सूर्यरश्मि देवाधिपतीच्या वसतिस्थानाला नेतील.

"ये, ये," असें म्हणून त्या यजमानाला ह्या दिव्य आहुति सूर्यरश्मीच्या मार्गानें नेतात व त्याची पूजा करून त्याला गोड शब्दांनीं सांगतात कीं, "हा तुझा पवित्र व उचित असा ब्रह्मलोक आहे."

यज्ञशिष्टामृतभुजो यान्ति ब्रह्म सनातनम् ।
नायं लोकोऽस्त्ययज्ञस्य कुतोऽन्यः कुरुसत्तम ॥ ‡

हे कुरुकुलश्रेष्ठा, यज्ञाचा अवशिष्ट प्रसाद घेणारे लोक सनातन ब्रह्माप्रत जातात. यज्ञ न करणाऱ्याला इहलोकच नाहीं, मग परलोक कोठून मिळणार ?

गतसंगस्य मुक्तस्य ज्ञानावस्थितचेतसः ।
यज्ञायाचरतः कर्म समग्रं प्रविलीयते ॥ †

जो सर्वसंगपरित्याग करून मुक्त झाला आहे, आणि ज्याचें चित्त ज्ञानाच्या ठिकाणीं स्थिर झालें आहे, व जो यज्ञासाठीं कर्म आचरीत असतो, त्याचें सर्व कर्म लय पावतें.

यत्करोषि यदश्नासि यज्जुहोषि ददासि यत् ।
यत्तपस्यसि कौंतेय तत्कुरुष्व मदर्पणम् ॥
शुभाशुभफलैरेवं मोक्ष्यसे कर्मबंधनैः ॥ ×

---

✝ मुण्डकोपनिषत्, १. २. ५, ६.
† भगवद्गीता, ४. ३१.
‡ भगवद्गीता, ४. ३२.
× भगवद्गीता, ९.२७,२८.

अर्जुना, तूं जें जें कांहीं करितोस, जें भक्षण करितोस, जें हवन करितोस, आणि जें तप करितोस, तें सर्व मला अर्पण कर.

ह्याप्रमाणें केल्यावर शुभ व अशुभ फळ देणाऱ्या कर्मबंधापासून तूं मोकळा होशील.

---

## प्रकरण सहावें.

# दृश्य व अदृश्य सृष्टि.

ज्याचें इंद्रियजन्य ज्ञान आम्हांला होतें असें आमच्या सभोंवतालचें एकच जग आम्हांला माहीत आहे. भौतिकशास्त्र सांगतें कीं, ह्या जगाचे आणखी असे पुष्कळ भाग आहेत कीं, त्यांचें ज्ञान होण्याइतकीं आमचीं इंद्रियें तीक्ष्ण नाहींत; डोळ्यांना न दिसण्याइतके ते भाग सूक्ष्म आहेत. इतर इंद्रियांनाही ते अगोचर आहेत. आमच्या इंद्रियांना अगोचर परंतु भौतिकशास्त्राला संमत असलेले हे भाग माणसाला अदृश्य असले तरी स्थूलच आहेत. ते आमच्याच (स्थूल द्रव्याच्या ) बनलेल्या भूलोकाचे भाग आहेत. स्थूल द्रव्यामध्यें घन, द्रव, वायु व आकाश ( ईथर ) ह्यांचा समावेश होतो; व ते सर्व एकाच प्रकारच्या परमाणूंचे बनलेले आहेत.

परंतु ह्यांशिवाय आणखीही लोक आहेत असें ऐकण्यांत येतें. ते अदृश्य असून ह्या भूलोकांत त्यांचा समावेश होत नाहीं. भूलोकावरील मनुष्य मरण पावल्यानंतर तो त्या लोकांमध्यें जातो. त्रिलोकी–( तीन लोक) संबंधानें पुष्कळांनीं वाचिलेलें आहे, व प्रत्येकाला त्याच्याविषयींचें कांहीं तरी ज्ञान असलें पाहिजे. कारण, त्याच त्रिलोकांमध्यें जीवाला जन्ममृत्यूचें बंधन आहे, व त्यांतच त्याची उत्क्रान्ति होते. ज्याला ब्रह्मदेवाचा दिवस म्हणतात, त्या अफाट कालाच्या प्रारंभीं हा त्रिलोक निर्माण झाला व त्याच्या अंतीं तो लय पावणार. ब्रह्मांडांत आणखी चार लोक आहेत; परंतु ब्रह्मदेवाच्या अयुष्यापर्यंत त्यांचें अस्तित्व टिकतें. आम्हांला ह्या ठिकाणीं त्यांचें विवेचन करण्याचें कारण नाहीं. 'त्रिलोकी'मध्यें आणखीही पोटविभाग

आहेत, त्यांनाही "लोक" अशीच संज्ञा आहे; उदाहरणार्थ, भुवर्लोकामध्यें प्रेतलोक व पितृलोक, आणि स्वर्गलोकामध्यें इंद्रलोक व सूर्यलोक, असे विभाग आहेत.

ज्या तीन लोकांशीं आमचा संबंध आहे ते हेः—१ भूर्लोक म्हणजे स्थूल सृष्टि अथवा पृथ्वी, २ भुवर्लोक म्हणजे पृथ्वी व स्वर्ग ह्यांच्या मधला लोक, व ३ स्वर्गलोक. ह्या तिहींपैकीं भूर्लोक हा आम्हांला अंशतः दृश्य व अंशतः अदृश्य आहे; भुवर्लोक व स्वर्ग लोक हे अदृश्य आहेत. भूर्लोकामध्यें सर्व रूपांत पृथ्वीतत्त्व हें मूळ तत्त्व आहे. ह्या तत्त्वाच्या सात अवस्था आहेत. घन, द्रव, वायु, तेज, आकाश, पराकाश व परमाणु. शेवटच्या चार्हींना "आकाश" (ईथर) अशीच संज्ञा आहे. भुवर्लोकामध्यें अशाच सात अवस्था आहेत, परंतु मूळ तत्त्व आप हें आहे. स्वर्ग लोकामध्येंही तशाच सात अवस्था आहेत; परंतु तेथें तेज हें मूळ तत्त्व आहे.

ह्या लोकांत उपयोगी पडणारे असे जीवाचे तीन कोश आहेत. ते अन्नमय कोश, प्राणमय कोश व मनोमय कोश होत. पहिल्यास अन्नमय कोश म्हणण्याचें कारण आम्ही जें अन्न खातों त्याचा तो बनलेला आहे, व पृथ्वीच्या दृश्य भागाच्या पडताळ्याचा तो असून घन, द्रव व वायु अशा तीन अवस्थांच्या द्रव्याचा तो बनला आहे. प्राणमय कोशाचा पृथ्वीच्या अदृश्य भागाशीं पडताळा आहे व तो आकाश म्हणजे ईथर याचा बनलेला आहे. प्राण म्हणजे जीवितशक्ति. भौतिकशास्त्रामध्यें ज्यांना चुंबक आणि विद्युत्शक्ति म्हणतात त्यांचा प्राणांत समावेश होतो. पण 'प्राण' यांत आणखीही शक्ति मोडतात. ह्या दोन्ही कोशांचा भूर्लोकाशीं संबंध असतो.

मनोमय कोशाचे दोन भाग आहेत. एक स्थूल; त्यांत वासनांची उत्पत्ति होते व त्याचा संबंध भुवर्लोकाशीं असतो. दुसरा सूक्ष्म; त्या ठिकाणीं चांगल्या भावना व उच्च विचार उत्पन्न होतात, व त्याचा संबंध स्वर्गलोकाशीं असतो.

निराळ्या दृष्टीनें वर्गीकरण करून ह्याच कोशांना दुसरींही नांवें दिलेलीं आढळतात. परंतु त्यामुळें विद्यार्थ्यानें घोटाळ्यांत पडण्याचें कारण नाहीं;

कारण जसजसा तो मोठा होत जाईल व त्याचें ज्ञान वृद्धिंगत होईल तसतसा त्याला हा विषय अधिक समजूं लागेल. आपण विशेष प्रचारांत असलेल्या नांवांचाच येथें विचार करूं.

स्थूल शरीर व अन्नमय कोश हे एकच असून ते घन, द्रव व वायु यांचे बनलेले आहेत. सूक्ष्म शरीरामध्यें प्राणमय कोश व मनोमय कोश ह्यांचा अंतर्भाव होतो. ह्या दोन कोशांशिवाय आणखी विज्ञानमय कोशाचाही त्यांत समावेश होतो. ह्या विज्ञानमय कोशानें त्रिलोकांच्या पलीकडे असणाऱ्या महर्लोकाशीं जीवाचा संबंध जोडिला जातो. हा महर्लोक ब्रह्मदेवाच्या दिनसमाप्तीस वस्ती करण्यास अयोग्य होतो, परंतु त्याचा समूळ नाश होत नाहीं. सूक्ष्म शरीराचा हा विज्ञानमय कोश नामक भाग सापेक्ष रीतीनें नित्य आहे व अनेक जन्मांत तो बदलत नाहीं.

हें दोन प्रकारचें वर्गीकरण व त्याचा लोकांशीं संबंध खालील कोष्टकावरून स्पष्ट होईल.

| शरीर. | | लोक. | | कोश. |
|---|---|---|---|---|
| स्थूल. | ... | भुर्लोक. | ... | अन्नमय कोश. |
| सूक्ष्म. | ... | ,, | ... | प्राणमय कोश. |
| ,, | ... | भुवर्लोक. | ... | मनोमय कोश. |
| ,, | ... | स्वर्गलोक. | ... | ,, |
| [ ह्या कोषांना जन्ममृत्यु आहे. ] | | | | |
| ,, (कारण) | | महर्लोक | | विज्ञानमय कोश. |
| [ ह्या कोशाला जन्ममृत्यु नाहीं. ] | | | | |

हस्त, पाद, वाक्, पायु आणि उपस्थ हीं कर्मेंद्रियद्वारें स्थूल शरीरामध्यें असतात; परंतु त्यांना चलन देणारीं व नियमित करणारीं खरीं कर्मेंद्रियें सूक्ष्म शरीरांत असतात. म्हणूनच आनंद, दुःख किंवा दुसऱ्या कोणत्याही तीव्र मनोविकाराचा पगडा प्रथमतः ह्या मूळ इंद्रियांवर होतो व त्यांच्या द्वारें इंद्रियद्वारांवर होतो. उदाहरणार्थ, मनुष्य फार संतापला म्हणजे जीभ अडखळते व हातपाय कांपूं लागतात. ज्ञानेंद्रियें सुद्धां मूळचीं सूक्ष्म शरीरांत असतात, परंतु त्यांचीं द्वारें चक्षु, श्रोत्र, जिव्हा, घ्राण आणि त्वक् हीं स्थूल शरीरांत असतात.

आतां मृत्यूच्या वेळीं काय प्रकार होतो तो पाहूं. जीव प्राणमय कोश ओढून घेतो, अर्थात् त्याबरोबर सूक्ष्म शरीर ओढिलें जातें व तें स्थूल शरीरापासून निराळें होतें. ह्यामुळें स्थूल शरीर प्रेतवत् म्हणजे निर्जीव द्रव्याचा गोळा बनतें; म्हणजे ज्या प्राणशक्तीनें तें द्रव्य एकत्र धरलें गेलें होतें, ती शक्ति त्यांतून निघून जाते. पण स्थूल शरीराच्या पेशींमध्यें पुष्कळ चैतन्य असतें. ( व त्या चैतन्यामुळेंच त्या पेशी परस्परांस सोडून अलग होऊं लागतात व पृथक्करण होऊन देह कुजूं लागतो.) मात्र त्या पेशींचें नियमन करणारी प्राणशक्ति गेलेली असते. ह्या वेळीं जीव आपल्या सूक्ष्म शरीरांत असतो. लवकरच तो आपला प्राणमय कोशही टाकतो; व नंतर मनोमय कोशाचा स्थूल भाग हेंच त्याचें बाह्य आवरण राहतें. त्याला त्यावेळीं प्रेत† अशी संज्ञा असते व त्याची वस्ती प्रेतलोकांत असते. जर तो भूलोकीं सदाचरणानें राहिला असेल तर ह्या स्थितीमध्यें सुखानें तो मनोराज्य करीत काळ घालवितो; दुराचरणानें राहिला असेल तर ऐहिक भोगाची त्याला अनिवार तळमळ लागलेली असते; व त्याला ते भोग आतां मिळणें शक्य नसल्यामुळें प्रेतस्थितीमध्यें त्याला अतिशय दुःख होतें. ह्या ऐहिक वासना जितक्या प्रबळ असतील त्या मानानें त्या निर्जीव होण्यास कमीअधिक काळ लागतो. त्यानंतर मनोमय कोशाचा स्थूल भाग नाश पावतो, व तो जीव पितृलोकांत जातो. त्यास मग "पितृ" असें म्हणतात. त्या ठिकाणीं स्वर्गाला अनुचित अशीं त्याच्या मनोमय कोशाची घटक द्रव्यें नष्ट होऊन तो शुद्ध होईपर्यंत त्याचा काळ जातो आणि नंतर त्या शुद्ध मनोमय कोशानें तो स्वर्गलोकीं जातो व संचित फलांचा उपभोग घेतो.

जेव्हां उपभोगाचें हें सर्व कार्य पुरें होतें तेव्हां पुन्हा भूलोकीं येण्याचा समय प्राप्त होतो, व शुद्ध मनोमय कोश नाश पावून जीव विज्ञानमय कोशामध्यें राहतो. तो पुन्हा ताबडतोब नवीन शरीरें तयार करण्यास लागतो, व खालच्या सृष्टीमधील आपल्या जन्माकरितां नूतन मनोमय कोश तयार करितो.

---

† मराठींत मृत माणसाच्या स्थूल देहास प्रेत म्हणतात. पण खरोखर "येथून गेलेला" असा प्रेत शब्दाचा अर्थ आहे व जो जीव देह सोडून दुसरीकडे गेलेला असतो, त्यास संस्कृतांत "प्रेत" अशी संज्ञा आहे. —भाषांतरकर्ता.

देव त्याच्यासाठीं त्याच्या कर्मानुरूप प्राणमयकोश बनवितात, व याप्रकारें तो पुन्हा भूर्लोकामध्यें जन्मास येतो.

येणेंप्रमाणें जीवाला ह्या स्थितींतून पुन्हा पुन्हा जावें लागतें. प्रथमतः दृश्य जगांतील त्याची वसति, नंतर मृत्यु, तदनंतर अदृश्य जगांतील वसति व शेवटीं पुनर्जन्म; असा हा क्रम आहे. पुन्हा पुन्हा ह्याच्या आवृत्ति होतात. सरतेशेवटीं ह्या त्रिलोकीला जीव कंटाळतो व श्रेष्ठतर व सूक्ष्मतर अनुभवाची व विकसित चैतन्याची लालसा त्याला उत्पन्न होते. ध्यान, पूजा व निराश्रितांना सदय अंतःकरणानें मदत, ह्यांमध्येंच त्याला आनंद वाटतो. तो आतां स्वतःकरितां सुख मिळविण्यासाठीं आपल्या शरीरांच्या सामर्थ्यांचा उपयोग न करितां परसेवेमध्येंच त्यांचा उपयोग करितो, व त्यामुळें तीं शरीरें त्याच्या जाणिवेस बंधनकारक होत नाहींत. मग आपली जाणीव श्रेष्ठ लोकांत ठेवून तेथील आपलीं कनिष्ठ लोकांतील शरीरें आपल्या उद्योगास साधन म्हणून हवींतशीं त्यास वळवितां येतात. आतां तो ईश्वराचा सहकार्यकारी झाला; लोकसंग्रहासाठीं तो आपले देह कायम ठेवील किंवा त्याचा त्याग करून तो ब्रह्मांत प्रविष्ट होईल.

---

अथ त्रयो वाव लोका मनुष्यलोकः पितृलोको देवलोक इति । †

मनुष्यलोक, पितृलोक व देवलोक हे खरोखर तीन लोक आहेत.

जातस्य हि ध्रुवो मृत्युर्ध्रुवं जन्म मृतस्य च ।
तस्मादपरिहार्येऽर्थे न त्वं शोचितुमर्हसि ॥
अव्यक्तादीनि भूतानि व्यक्तमध्यानि भारत ।
अव्यक्तनिधनान्येव तत्र का परिदेवना ॥ ‡

“ जो जन्माला आला त्याला मृत्यु निश्चित आहे; व जो मेला त्याला जन्म निश्चित आहे. ही गोष्ट टाळतां येणार नाहीं. म्हणून त्याबद्दल शोक करणें तुला योग्य नाहीं.

“ हे भारता, हीं सर्व भूतें आरंभीं अव्यक्त स्थितीमध्यें असतात, मध्यंतरीं व्यक्त होतात, व शेवटीं पुन्हा अव्यक्त होतात. तेव्हां त्यांच्याबद्दल शोक कसला करावयाचा ?”

---

† बृहदारण्यकोपनिषत्, १. ५. १६.　‡ भगवद्गीता, २. २७, २८.

सहस्रयुगपर्यन्तमहर्यद्ब्रह्मणो विदुः ।
रात्रिं युगसहस्रान्तां तेऽहोरात्रविदो जनाः ॥
अव्यक्ताद् व्यक्तयः सर्वाः प्रभवन्त्यहरागमे ।
रात्र्यागमे प्रलीयन्ते तत्रैवाव्यक्तसंज्ञके ॥ †

सहस्र युगांचा काल हा ब्रह्मदेवाचा एकएक दिवस; तेवढाच काल ब्रह्मदेवाची रात्र असते. असें ज्यांना समजतें त्यांनाच अहोरात्रवेत्ते समजतात.

दिवस सुरू झाला म्हणजे अव्यक्तांतून सर्व भूतें व्यक्त होतात; आणि रात्र सुरू झाली म्हणजे त्याच अव्यक्तांमध्यें त्यांचा लय होतो.

त्रैविद्या मां सोमपाः पूतपापाः
यज्ञैरिष्ट्वा स्वर्गतिं प्रार्थयन्ते ।
ते पुण्यमासाद्य सुरेन्द्रलोक-
मश्नन्ति दिव्यान्दिवि देवभोगान् ॥
ते तं भुक्त्वा स्वर्गलोकं विशालम्
क्षीणे पुण्ये मर्त्यलोकं विशन्ति ।
एवं त्रयीधर्ममनुप्रपन्ना
गतागतं कामकामा लभन्ते ॥ *

तीन वेद जाणणारे, सोमपान करणारे व निष्पाप झालेले यज्ञाच्या योगानें माझें पूजन करून स्वर्गप्राप्तीविषयीं इच्छा करितात; व ते पवित्र अशा सुरेंद्रलोकास जाऊन तेथें दिव्य असे देवांचे भोग भोगितात.

ते त्या विशाल स्वर्गलोकाचा उपभोग घेऊन पुण्य संपल्यावर मृत्युलोकांत येतात; आणि ह्याप्रमाणें तीन वेदांत सांगितलेल्या धर्माला अनुसरणारे व काम्यभोगाची इच्छा करणारे लोक जन्ममृत्यूच्या येरझारा करतात.

बहूनां जन्मनामन्ते ज्ञानवान्मां प्रपद्यते ।
वासुदेवः सर्वमिति स महात्मा सुदुर्लभः ॥ ×

ज्ञानी पुरुष बहुत जन्मांनंतर माझ्या हातीं येऊन पोहोंचतो. 'सर्व जें आहे तें वासुदेव आहे' असें याच्या अनुभवास येतें. असा महात्मा फार दुर्लभ आहे.

---

† भगवद्गीता, ८. १७, १८. * भगवद्गीता, ९. २०, २१.
× भगवद्गीता, ७. १९.

# सनातनधर्मप्रवेश.

## भाग २ रा. हिंदूंचे सामान्य धार्मिक आचार व विधि.

### प्रकरण पहिलें.

### संस्कार.

प्रत्येक धर्मामध्यें त्याच्या अनुयायांनीं पाळावयाचे पुष्कळ विधि सांगितलेले असतात. साधारणतः ह्या विधींचे उपयोग असे आहेत–१ जीवाला आपले देह पवित्र राखून त्यांवर ताबा ठेवण्यास मदत करणें; २ देव व ऋषि ह्यांचें त्याला साह्य मिळवून देणें; व ३ त्याच्या सभोंवतालचें वातावरण शुद्ध करून तेणेंकरून त्याचें मन त्याला स्थिर व एकाग्र करण्यास सुलभ होईल असें करणें.

हे इष्ट परिणाम सिद्ध व्हावे म्हणून, निरनिराळ्या वस्तु, अंगविक्षेप व आसनें आणि मंत्र ह्यांची काळजीपूर्वक योजना करून त्यांचा उपयोग करण्यांत येतो.

ज्या पदार्थांमध्यें योग्य प्रकारची अदृश्य शक्ति असते असे पदार्थ विधीमध्यें उपयोगांत आणतात. पुष्कळ बाबतींत–उदाहरणार्थ, एखाद्या विशिष्ट देवतेला विशिष्ट प्रकारचींच फुलें वाहणें–त्या वस्तूमध्यें उपास्य देवतेच्या अगर ध्यानविषयाच्या अदृश्य शक्तीचा अंश असतो, व तेणेंकरून ती देवता व पूजक यांच्यामध्यें संबंध जुळूं शकतो. म्हणूनच श्रीकृष्णाच्या पूजेमध्यें तुलसीमालेचा उपयोग करितात, व महादेवाच्या पूजेमध्यें रुद्राक्ष-मालेचा उपयोग करितात.

अंगविक्षेप व आसनें ह्यांचा परिणाम, पुष्कळ अंशीं शरीरांत अभिसरत असणाऱ्या अनेक प्राणप्रवाहांवर होतो. त्यांपैकीं कांहींच्या योगानें शरीराची अदृश्य शक्ति सभोंवतालच्या वातावरणांत फुकट जाण्याचें बंद होऊन शांत व स्थिर विचाराला योग्य अशा रीतीनें त्या शक्तीचे प्रवाह देहांत वाहूं लागतात.

उपरिनिर्दिष्ट तिन्ही हेतु साधण्याकरितां मंत्रांचा उपयोग होतो. त्या मंत्रांनीं कंप उत्पन्न होतात; ते नियमित व सम असल्यामुळें सूक्ष्म शरीराचे कंपही नियमित व सम करितात. कारण, सूक्ष्म शरीर संस्कारक्षम व सहज परिणामक्षम असतें. जेव्हां ह्या सूक्ष्म शरीरावर उत्पन्न झालेल्या लहरी नियमित असतात, तेव्हां विचार व भक्ति स्थिर करण्यास जीवाला सोपें जातें. योग्य प्रकारच्या मंत्रांनीं मंत्रोच्चार करणाऱ्या मनुष्याकडे देवांचें व ऋषींचें लक्ष आकर्षिलें जातें व ते त्याला साहाय्य करितात. शिवाय योग्य मंत्रांच्या योगानें विरोध करणारे अदृश्य जीव व अनिष्ट प्रकारची अदृश्य शक्ति या दूर होतात व तेणेंकरून मंत्रोच्चार करणाराची परिस्थिति सुधारते.

मंत्र म्हणजे एक विवक्षित ध्वनिपरंपरा असून ते ध्वनि कांहीं विशिष्ट पद्धतीनें रचिलेले असतात. ध्वनि बदलले कीं कंप बदलतात व परिणामही बदलतात. म्हणूनच मंत्रांचें भाषांतर करितां येत नाहीं. एकाद्या वाक्यांतील शब्दांचीं अक्षरें क्रम मोडून हवीं तशीं एकापुढें एक लिहिलीं म्हणजे जसा त्याचा अर्थ होणार नाहीं, तद्वतच मंत्रांचें भाषांतर केल्यास त्याचा परिणाम होणार नाहीं.

मंत्रांसंबंधानें दुसरी एक गोष्ट लक्षांत ठेविली पाहिजे, ती ही कीं, मंत्रोच्चार करणारा मनुष्य पवित्र आचरणानें वागण्याचा प्रयत्न करीत नसेल तर मंत्रानें त्याचें हित होण्याऐवजीं अहितच होतें. कारण, जेव्हां ते सूक्ष्म शरीरावर परिणाम करितात तेव्हां दुष्ट वासना व दुष्ट विचार ह्यांना विरोधी अशी शक्ति सूक्ष्म शरीराच्या ठिकाणीं ते उत्पन्न करितात; व ज्या अर्थी दुष्ट विचारांच्या लहरी एका बाजूनें त्याला ओढितात व मंत्रोत्पादित लहरी दुसऱ्या बाजूनें ओढितात, त्या अर्थी त्याच्या शरीराची बळकट ओढाताण होऊन त्याला इजा होऊन तें नाश पावण्याचाही संभव असतो. जेव्हां शुद्ध आचरणाचा त्याचा प्रयत्न असतो तेव्हां मंत्रांशीं सहकारितेनें त्या प्रयत्नाचें कार्य होतें व विरोध उत्पन्न होत नाहीं; मग ते प्रयत्न कितीही दुर्बल असले तरी त्यांची मदतच होते, अडथळा होत नाहीं.

मंत्र मोठ्यानेंच उच्चारले पाहिजेत असें नाहीं. वास्तविक मंत्र मोठ्यानें म्हणण्यापेक्षां मनामध्यें म्हणण्यांतच त्यांची शक्ति अधिक असते. ते जड द्रव्यापेक्षां सूक्ष्म द्रव्यावरच अधिक परिणाम करितात.

हिंदूंच्या आयुष्यक्रमांतील विधींपैकीं कांहीं विधि महत्त्वाचे आहेत; ते आयुष्यक्रमांतील मुख्यमुख्य भागांचे दर्शक आहेत. प्राचीनकाळीं हे विधि पुष्कळ होते व त्यांपैकीं दहा मुख्य होते; परंतु हल्लीं ह्या दहांपैकींसुद्धां थोडेच पाळिले जातात. ह्या संस्कारांपैकीं सात बालपणांतले आहेत. ह्या सातांपैकीं सहावा म्हणजे अन्नप्राशनविधि (मुलाला अन्न खाऊं घालणें) हा सार्वत्रिक पाळला जातो; आणि सातवा म्हणजे चूडाकरण—म्हणजे वपन व त्याबरोबर कर्णवेध-हाहीं बहुतेक सार्वत्रिकच आहे.[1] ह्यानंतरचा महत्त्वाचा आठवा संस्कार उपनयन, म्हणजे मुलाला यज्ञोपवीत देणाऱ्या व गायत्रीमंत्र शिकविणाऱ्या गुरूजवळ नेणें, हा होय. ह्या दीक्षेनें तो मुलगा द्विज बनतो.

उपनयन हा विद्यार्थिदशेचा प्रारंभ आहे. ह्या आश्रमामध्यें पूर्ण ब्रह्मचर्यव्रत पाळणें व निरलस अध्ययन करणें हें मुलाचें कर्तव्य असतें. ह्या आश्रमाच्या शेवटीं समावर्तन, म्हणजे गुरुगृहाहून मुलानें स्वगृहीं यावयाचें; त्यानंतर तो दुसऱ्या आश्रमामध्यें म्हणजे गृहस्थाश्रमामध्यें शिरण्यास पात्र असतो. दहावा संस्कार विवाह; हा गृहस्थाश्रमांत शिरण्याची, व त्याचीं कर्तव्यें अंगावर घेण्याची पात्रता दर्शविणारा आहे. अर्वाचीन काळीं हिंदुस्थानांत हे उपयुक्त नियम पाळले जात नाहींत; फक्त उपनयन व विवाह हे संस्कार उपचार म्हणून पाळले जातात. विद्यार्थिदशेंतच अयुक्त रीतींनें विवाह केला जातो व बाल्यावस्थेंतील व प्रौढावस्थेंतील कर्तव्यें मिश्रित झाल्यामुळें दोहोंनाही अपाय होतो. प्राचीन नियम पुन्हा लवकरच सुरू होणें आवश्यक आहे.

एकः शब्दः सुप्रयुक्तः स्वर्गे लोके कामधुग्भवति ।

योग्य रीतीनें उच्चारलेला एकच शब्द स्वर्गलोकामध्यें इष्टफलदायी होतो.

मंत्रो हीनः स्वरतो वर्णतो वा
मिथ्याप्रयुक्तो न तमर्थमाह ।

---

[1] कान टोचण्याचा विधि महाराष्ट्रांत व दक्षिण हिंदुस्थानांत पुष्कळच अगोदर करण्याची चाल आहे. —भाषांतरकार.

* पतञ्जलिकृत महाभाष्य, १. १, ८४.

स वाग्वज्रो यजमानं हिनास्ति
यथेन्द्रशत्रुः स्वरतोऽपराधात् ॥ †

ज्याचे स्वर किंवा वर्ण दूषित आहेत असा मंत्र उच्चारला तर तो मिथ्या होऊन अर्थहीन होतो. स्वर चुकल्यामुळें इंद्रशत्रु ह्या शब्दानें जसा वृत्राचा घात झाला तद्वत् चुकीचा मंत्र वाणीरूपी वज्राप्रमाणें यजमानाचा घात करितो. *

वैदिकैः कर्मभिः पुण्यैर्निषेकादीभिर्द्विजन्मनाम् ।
कार्यः शरीरसंस्कारः पावनः प्रेत्य चेह च ॥ +

द्विजांचे निषेकादि संस्कार (गर्भाधानादि शरीरसंस्कार) पुण्य अशा वैदिक विधींनीं करावे, कारण ते इहलोकीं व परलोकीं पवित्र करणारे आहेत.

चित्रकर्म यथाऽनेकै रागैरुन्मील्यते शनैः ।
ब्राह्मण्यमपि तद्वत्स्यात्संस्कारैर्विधिपूर्वकैः ॥ ÷

ज्याप्रमाणें एखादें चित्र अनेक रंगांमुळें हळूहळू खुलूं लागतें, त्याचप्रमाणें विधिपूर्वक संस्कारांनीं ब्राह्मण्यही तेज पावतें.

गर्भाधानं पुंसवनं सीमन्तो जातकर्म च ।
नामक्रिया निष्क्रमोऽन्नप्राशनं वपनक्रिया ॥
कर्णवेधो व्रतादेशो वेदारम्भक्रिया विधिः ।
केशान्तः स्नानमुद्वाहो विवाहाग्निपरिग्रहः ॥
प्रेताग्निसंग्रहश्चैव संस्काराः षोडश स्मृताः ॥×

---

† वृत्रानें यज्ञ करून इंद्राचा नाश व्हावा म्हणून मंत्र म्हटला. पण मंत्र अयुक्त प्रकारें उच्चारल्यामुळें इंद्राचा नाश न होतां वृत्राचा झाला. —भाषांतरकार.

* पाणिनिशिक्षा; ५२ + मनुस्मृति, २. २६.

÷ पराशरगृह्यसूत्र, हरिहर भाष्य, पान २६०. × तेंच, पान. २६९

## प्रकरण दुसरें.

# श्राद्ध.

मरणसमयीं आपल्या स्थूल शरीराचा त्याग केल्यावर जीवाला ह्या जगामध्यें त्याच्या मागें राहिलेल्या मनुष्यांनीं साहाय्य करण्यासाठीं केलेल्या विधीला श्राद्ध असें म्हणतात. दृश्य शरीराचा त्याग केलेल्या जीवाला प्रेत अशी संज्ञा आहे. आणि ह्या स्थितीमध्यें असलेल्या जीवाच्या साहाय्यार्थ जो श्राद्धविधि करितात त्याला प्रेतक्रिया असें म्हणतात. हें दृश्य शरीर नाश पावून त्याचीं घटक द्रव्यें शक्य तितकीं जलद पृथक् होऊन आपआपल्या तत्त्वाशीं मिळून जावीं म्हणून तें दहन करण्यांत येतें. तिसऱ्या दिवशीं त्याची राख जमा करितात व एखाद्या वहात्या प्रवाहांत किंवा विशेषतः एखाद्या पवित्र नदीमध्यें टाकितात. अन्नमय कोशाचा नाश झाला म्हणजे लगेच प्राणमय कोशाचाही नाश होतो. दहनाच्या वेळीं म्हटलेल्या कित्येक मंत्रांनीं ही क्रिया फार जलद होते. मृत शरीराचा नाश करण्यास दहन हाच उत्तम उपाय आहे; व शरीराचा लवकर नाश होणें हें शरीरांतून निघून गेलेल्या त्या जीवाला व त्याच्या मागें राहिलेल्या मंडळीलाही महत्त्वाचें आहे. जोंपर्यंत दृश्य देह नष्ट झालेला नसतो तोंपर्यंत प्राणमय कोश त्याच्या जवळच असतो. कारण त्या दोहोंमध्यें आकर्षण असतें. त्यामुळें मरणोत्तर जीवाचा भूलोकाशींच संबंध राहतो व तसें होणें त्याला अनिष्ट असतें. दुसरें असें कीं, दृश्य देह न जाळतां जमिनींत पुरला तर कुजत चाललेल्या त्या देहापासून हळुहळू विषारी वायु बाहेर पडतात व ते मागें राहिलेल्या मंडळीला अपायकारक असतात.

दहन होऊन गेल्यानंतर जी श्राद्धें करण्यांत येतात, त्यांनीं कांहीं अंशीं त्या वेळीं उपयोगांत आणिलेल्या वस्तूंच्या अदृश्य शक्तीमुळें, व कांहीं अंशीं मंत्रांनीं उत्पन्न झालेल्या कंपांमुळें, मनोमय कोशाच्या घटक द्रव्यांची पुनर्रचना होण्याच्या कामीं मदत होते. कांहीं काळानंतर सपिंडीकरण विधि केला जातो. जीवाला प्रेतलोकाहून पितृलोकीं जाण्यास त्यामुळें सुलभ होतें, व नंतर भुवर्लोकांतील अधिक सूक्ष्म प्रदेशांत राहणाऱ्या पितृलोका-

मध्यें जाऊन तो दाखल होतो. भूर्लोकांतील एक व भुवर्लोकांतील सहा मिळून सात पिढ्यांचा परस्पर संबंध असतो. जीव जेव्हां स्वर्गलोकांत जातो तेव्हां श्राद्धानें केलेल्या मदतीची त्याला गरज नसते.

---

देशे काले च पात्रे च श्रद्धया विधिना च यत् ।
पितॄनुद्दिश्य विप्रेभ्यो दानं श्राद्धमुदाहृतम् ॥†

पितरांच्या कल्याणासाठीं, योग्य काळीं, योग्य ठिकाणीं व योग्य ब्राह्मणाला श्रद्धेनें व विधियुक्त दान दिलें जातें त्याला श्राद्ध म्हणतात.

कुर्यादहरहः श्राद्धमन्नाद्येनोदकेन च ।
पयोमूलफलैर्वापि पितृभ्यः प्रीतिमावहन् ॥ ‡

पितरांना समाधान देणारें श्राद्ध, अन्न व पाणी, किंवा क्षीर, मुळें व फळें ह्यांनींसुद्धां नित्य करावें.

पंचभ्य एव मात्राभ्यः प्रेत्य दुष्कृतिनां नृणाम् ।
शरीरं यातनार्थीयमन्यदुत्पद्यते ध्रुवम् ॥
तेनानुभूय ता यामीः शरीरेणेह यातनाः ।
तास्वेव भूतमात्रासु प्रलीयन्ते विभागशः ॥
यद्याचरति धर्मं स प्रायशोऽधर्ममल्पशः ।
तैरेव चावृतो भूतैः स्वर्गे सुखमुपाश्नुते " ॥ ×

दुराचरणी लोकांना, मरणानंतर त्यांनीं यातना भोगाव्या म्हणून पंच-महाभूतांचें बनविलेलें नवीन सूक्ष्म शरीर प्राप्त होतें.

त्या शरीरानें त्यांनीं यमाच्या राज्यांतल्या यातना भोगल्यानंतर त्याचें महाभूतामध्यें पुन्हा क्रमाक्रमानें पृथक्करण होतें.

जीव जर बराचसा धर्मवान् व थोडा अधर्मवान् असेल तर त्याच पंच-भूतांनीं परिवेष्टित होत्साता सुख भोगण्यासाठीं स्वर्गांत जातो.

---

† ब्रह्माण्डपुराण. ‡ मनुस्मृति, ३. ८२.
× मनुस्मृति, १२. १६, १७, २०.

चितामोक्षप्रभृति च प्रेतत्वमुपजायते ॥†

दहनविधि पुरा झाल्यानंतर जीव प्रेतत्व पावतो.

वर्षं यावत्खगश्रेष्ठ मार्गे गच्छति मानवः ।
ततः पितृगणैः सार्धं पितृलोकं स गच्छति ॥
दत्तैः षोडशभिः श्राद्धैः पितृभिः सह मोदते ।
पितुः पुत्रेण कर्तव्यं सपिंडीकरणं सदा ॥ ×

हे खगश्रेष्ठ, जीव आपल्या मार्गावर ( प्रेतलोकांत ) एक वर्षपर्यंत राहतो; नंतर तो पितरांबरोबर ( राहण्यास ) पितृलोकांत जातो.

सोळा श्राद्धांच्या योगानें पितरांबरोबर जीव आनंदानें राहतो. म्हणून मुलानें बापाचें नेहमीं सपिंडीकरण करावें.

---

## प्रकरण तिसरें.

# शौचम्.

शौच म्हणजे शारीरिक पवित्रता. शरीर शुद्ध राखून जेणेंकरून निश्चयानें प्रकृति चांगली ठेवितां येईल असे कांहीं नियम आहेत. रोग हें कोणत्यातरी सृष्टिनियमभंगाचें द्योतक आहे. आणि सृष्टिनियम हेच ईश्वरी नियम व ईश्वराच्या अस्तित्वाचें व्यक्त स्वरूप होत, व जीव हा प्रकृतीनें वेष्टिलेला ईश्वराचाच अंश आहे, हें जाणून सृष्टिनियम पाळणें हें एक धार्मिक कर्तव्य आहे असें ऋषींनीं मानिलें आहे.

दृश्य शरीर व त्याचीच अदृश्य प्रतिमा प्राणमय कोश हीं भौतिक द्रव्याचीं बनलेलीं असल्यामुळें त्यांना शुद्ध करणें व शुद्ध राखणें ह्यासाठीं भौतिक साधनांचाच उपयोग करणें आवश्यक आहे, व ह्या शुद्धीकरणासाठीं त्या साधनांचें ज्ञान आपणांस असलें पाहिजे.

दृश्य शरीर म्हणजे अन्नमय कोश. हा आपण खातों त्या अन्नाच्या, पितों त्या पेय पदार्थांच्या, श्वासोच्छ्वास करितों त्या हवेच्या, व आमच्या

---

† गरुडपुराण, २. ५. ३६.    × गरुडपुराण, २. १६. ६. १०

भोंवतालीं असणाऱ्या वस्तु व लोक ह्यांपासून सतत निघून आमच्या शरीरावर पडणाऱ्या ( परंतु आमच्या चक्षूंना अगोचर अशा ) सूक्ष्म परमाणूंचा बनलेला आहे. हें शेवटचें विधान थोडेंसें विलक्षण वाटेल, परंतु तें सत्य आहे. आमचीं शरीरें मृत द्रव्याचीं बनलेलीं नाहींत,[†] कारण, वस्तुतः मृत द्रव्य असें सृष्टींत नाहींच. सजीव परमाणूंचें अगर सजीव परमाणुसंघाचें सर्व द्रव्य बनलेलें असतें. धुळीचा एक कण म्हणजे असंख्य सूक्ष्म सजीव प्राण्यांचा समूह होय. ह्या सूक्ष्मजीवांच्या असंख्य चढत्या पायऱ्या असून त्यांतच सूक्ष्मदर्शक यंत्रानें दिसणारे सूक्ष्म जंतु मोडतात. हे सूक्ष्म व त्याहूनही लहान इतर जीव हवेमध्यें तरंगत असतात. आमचीं शरीरें व इतर वस्तु त्यांच्याच बनलेल्या आहेत. दगड, वनस्पती, प्राणी, मनुष्य, आणि आमच्या सभोंवतालच्या सर्व कृत्रिम वस्तु, घरें, सामानसुमान, कपडालत्ता ह्या सर्वांपासून ह्या परमाणूंचे थवेच्या थवे सतत बाहेर पडत असतात. आमच्या जवळच्या वस्तूंचे व विशेषतः ज्यांना आम्ही स्पर्श करितों त्यांचे परमाणु आमच्यामध्यें येतात व आमचे त्यांच्यामध्यें जातात. जर आम्हांला निरोगी व्हावयाचें असेल तर फक्त शुद्ध तेवढेच परमाणु आमच्या शरीरांत आम्हीं घेतले पाहिजेत व अशुद्ध तेवढे बाहेर घालविले पाहिजेत. हें कसें साधावें एवढेंच दाखविण्याचा शौचानियमांचा उद्देश आहे.

जें अन्न आम्ही खातों तें शुद्ध असलें पाहिजे. सृष्ट पदार्थांमध्यें चैतन्यशक्ति कधीं अधिकाधिक व्यक्त होत असते तर ती कधीं अधिकाधिक लुप्त होत असते; म्हणजे कांहीं पदार्थ विकसित होण्याच्या मार्गांत असतात, कांहीं मृत होण्याच्या मार्गांत असतात. शुद्ध अन्नामध्यें ही चैतन्यशक्ति विकसित होत असते. तें अधिक सजीव होण्याच्या क्रमांत असतें. तीं अन्नें अधिक समृद्ध व्हावीं, अधिक श्रेष्ठ प्रकारची त्यांची पुढें संघटना व्हावी असा सृष्टिक्रम असतो. ताजीं फळें, पानें, मुळें व धान्यें यांत चैतन्याचा विकास होत असतो. आपण तीं भक्षण केलीं तर त्यांतील चैतन्य आपल्या देहाच्या वाढीस साहाय्य करतें. पण हेच पदार्थ शिळे झाले

---

[†] जेव्हां शरीरांतून प्राण निघून जातो तेव्हां त्या मृत शरीराला प्रेत असें आपण म्हणतों; परंतु ज्या परमाणूंचें तें बनलेलें असतें ते सर्व सजीव असतात. मृत शरीर कुजूं लागलें म्हणजे हे सजीव परमाणु पृथक् होऊं लागतात.

म्हणजे ते अशुद्ध होतात, कारण चैतन्य जाऊं लागून ते मृत्युपंथास लागलेले असतात. मांस हें, थोडें म्हणा वा फार म्हणा, अशुद्धच होय, कारण त्यांतल्या चैतन्याची आपण हकालपट्टी केलेली असते. पुढें त्यापासून कनिष्ठ पायरीची संघटना व्हावी अर्थात् पृथक्करण होऊन कमी प्रतीचे पदार्थ निर्माण व्हावे अशी त्याची भवितव्यता असते. मांस कुजण्यास सुरवात झालेली असते. अर्थात् मांसाहारानें बनलेलें शरीर उद्भिज्ज पदार्थांनीं बनलेल्या शरीरापेक्षां रोगांस अधिक पात्र होतें, जखमा झाल्या असतां लवकर बऱ्या होत नाहींत, व ज्वरादिकांचा जोर वाढतो.

पेय पदार्थांमध्यें शुद्ध पाणी हें आरोग्याला आवश्यक आहे. त्यामध्यें चहा काफी, कोको इत्यादि वनस्पती घालून त्यांचें परिमित सेवन केल्यास तोटा न होतां पुष्कळ वेळां उपयोगही होतो. दूध हें सर्वांत शुद्ध पेय असून अन्नही आहे. ज्या पेय पदार्थांत मद्यार्क (Alcohol) असतो तो प्रत्येक पदार्थ अशुद्ध असून शरीराला अतिशय अपायकारक असतो. हीं पेयें आंबलेलीं असतात. म्हणजे तीं कुजण्यास सुरवात झालेली असते व त्यामुळें शरीरघटक द्रव्यांना इजा होते, व मेंदूवर त्याचा उघडपणें विषासारखा परिणाम होतो. विशेषतः उष्ण देशांमध्यें मदिरेसारखे पदार्थ फारच अपायकारक होतात व त्यापासून देह अकालीं निःसत्त्व होऊन मृत्युही येतो. त्याचप्रमाणें भांगेसारखे आरोग्यविनाशक मादक पदार्थ ज्यांत मिसळलेले असतात तीं पेयेंसुद्धां अशुद्धच होत.

शुद्ध अन्न व पेय ह्यांप्रमाणेंच शुद्ध हवाही आरोग्याला आवश्यक आहे. जेव्हां आम्ही श्वास बाहेर सोडितों तेव्हां कार्बन डायॉक्साइड नांवाचा वायु बाहेर पडतो; त्या वायूमध्यें मनुष्याला गुदमरल्यासारखें होतें. एखाद्या आकुंचित जागेमध्यें आम्ही कोंडलेले राहूं तर तेथील सर्व हवा, त्या वायूनें दूषित होऊन, श्वासोच्छ्वास करण्यास अयोग्य होईल. ह्याशिवाय आमच्या श्वासाबरोबर शरीरांतून निरुपयोगी कण बाहेर पडत असतात, व बाहेरील शुद्ध हवेनें ते जर आमच्यापासून दूर घालविले गेले नाहींत तर ते पुन्हा श्वासाबरोबर आमच्या किंवा इतरांच्या फुप्फुसांत शिरतात व त्यांचा परिणाम विषवत् होतो.

आमचीं शरीरें शुद्ध परमाणूंचीं बनविलीं पाहिजेत, एवढेंच नव्हे तर नित्य स्नानानें व धुण्यानें शरीराची बाह्य त्वचाही स्वच्छ ठेविली पाहिजे. सर्व शरीराला दिवसांतून एकदां तरी निदान स्नान पाहिजे, व स्नानाच्या वेळीं तें चांगलें चोळलें पाहिजे; अशासाठीं कीं, सर्व विगलित कण धुऊन जावे आणि त्वचा स्वच्छ व ताजीतवानी व्हावी. शरीराचा कोणताही भाग—हात, पाय, वगैरे मलिन झाला असेल तर तो धुऊन टाकावा, व अन्न घेण्याच्यापूर्वी व नंतर धुण्यास तर केव्हांही विसरतां नये. हात न धुतां जेवणें म्हणजे मातीच्या व इतर अपायकारक कणांनीं अन्न दूषित करण्यासारखें आहे; जेवल्यानंतर हात धुणें हें तर अवश्य कर्तव्य आहे. शरीराला लागून असणारे कपडेही रोज धुवावे.

बाह्य जग हें अंतरात्म्याचें प्रतिबिंब आहे अशी हिंदूंची नित्य कल्पना असल्यामुळें त्यांनीं बाह्यशुद्धीशीं अंतःशुद्धिचें सहकार्य ठेविलें आहे. जेव्हां ते स्नान करितात तेव्हां अंतःशुद्धीकरितां तोंडानें मंत्र म्हणत असतात. अशा रीतीनें त्यांच्या नित्यक्रमांतील अगदीं साध्या गोष्टीलासुद्धां धार्मिक स्वरूप प्राप्त झालेलें असतें.

आपल्या ऋषींचा स्वच्छपणाविषयीं इतका कटाक्ष कां आहे हें विद्यार्थ्यांच्या आतां लक्षांत येईल. ज्या मनुष्याचें शरीर व कपडे घाणेरडे असतात तो आपल्या भोंवतालची हवा व लोक ह्यांना अशुद्ध परमाणूंनीं दूषित करितो. आम्ही स्वतःच्याच हिताकरितां नव्हे तर सभोंवतालच्या लोकांच्या हिताकरितां स्वच्छता राखिली पाहिजे. घाणेरडे लोक, घाणेरडे कपडे, घाणेरडीं घरें हीं विषाचीं केंद्रस्थानें असून सर्वांनाही अपायकारक आहेत.

प्राणमय कोशाची पवित्रता आंतील अदृश्य शक्तीच्या प्रवाहांवर अवलंबून असते. सभोंवतालच्या पदार्थांतील अदृश्य शक्तींचा त्यावर ताबडतोब परिणाम होतो. म्हणून ह्याविषयींसुद्धां आपण फार काळजी घेतली पाहिजे. कांदे, लसूण इत्यादि कांहीं उद्भिज्ज पदार्थ अन्नमय कोशाला अपायकारक नसले तरी प्राणमय कोशाला फार अपायकारक असतात. मांसापेक्षांही यांतली अदृश्य शक्ति वाईट असते. मादक पदार्थांनीं व इतरांच्या प्राणमय कोशांनीं ह्या कोशाला फार अपाय होतो. ह्याच्याहीपेक्षां महत्त्वाची गोष्ट म्हटली म्हणजे आपल्या स्वतःच्या मनोमय कोशानें व तद्द्वारा इतरांच्या

मनोमय कोशांनींही त्याला अपाय होतो. म्हणूनच वाईट संगतीचे दुष्परिणाम होतात. आतां मनोमय कोशाची पवित्रता जीवाच्या पवित्र विचारांवर व वासनांवर अवलंबून असते, व तेथेंच अन्नमय कोश व प्राणमयकोश ह्यांच्या अपवित्रतेचें मुख्य उगमस्थान असतें. जर विचार व वासना अशुद्ध असतील तर हे दोन कोश (अन्नमय व प्राणमय) शुद्ध व आरोग्यसंपन्न होणार नाहींत. शौचासंबंधीं नियम मनुष्यानें जरी अगदीं कडक रीतीनें पाळिले, तरी जर तो गर्विष्ठ, विकारवश, कठोर, दांभिक व संशयी असेल, तर त्यामुळें या कोशांत इतकी जलद घाण उत्पन्न होते कीं, कोणत्याही नियमास ती धुऊन टाकतां येणार नाहीं. देवांच्या व ऋषींच्या दृष्टीनें असला मनुष्य नित्य अशुचिच होय.

---

दूरादावसथान्मूत्रं दूरात्पादावसेचनम् ।
उच्छिष्टान्नं निषेकं च दूरादेव समाचरेत् ॥ †

वसतिस्थानापासून मलमूत्र, पाय धुतलेलें पाणी, उच्छिष्ट अन्न व आंघोळीचें पाणी हें सर्व दूर टाकावें.

आचम्य प्रयतो नित्यमुभे संध्ये समाहितः ।
शुचौ देशे जपञ्जप्यमुपासीत यथाविधि ॥ ×

आचमनानें शुद्ध होऊन व पवित्र जागीं यथाविधि जप करून स्थिर चित्तानें प्रातःकाळीं व सायंकाळीं संध्योपासना करावी.

उपस्पृश्य द्विजो नित्यमन्नमद्यात्समाहितः ।
भुक्त्वा चोपस्पृशेत्सम्यगद्भिः खानि च संस्पृशेत् ॥ †

नित्य स्नान करून, स्थिरचित्त होऊन द्विजानें अन्न ग्रहण करावें. जेवणानंतर स्वच्छ रीतीनें आंचवून नाक, डोळे वगैरे इंद्रियद्वारांनाही पाणी लावावें.

ज्ञानं तपोऽग्निराहारो मृन्मनो वार्युपाञ्जनम् ।
वायुः कर्मार्ककालौ च शुद्धेः कर्तॄणि देहिनाम् ॥ ‡

---

† मनुस्मृति, ४. १५१. × मनुस्मृति, २. २२२. † मनुस्मृति, २.५३.
‡ मनुस्मृति, ५. १०५.

ज्ञान, तप, अग्नि, आहार मृत्तिका, मन, पाणी, सारवण, वायु, विधि, सूर्य व काल हीं सर्व शुद्धीचीं साधनें आहेत.

आद्भिर्गात्राणि शुध्यन्ति मनः सत्येन शुध्यति ।
विद्यातपोभ्यां भूतात्मा बुद्धिर्ज्ञानेन शुध्यति ॥ †

शरीर पाण्यानें शुद्ध होतें, मन सत्यानें शुद्ध होतें, जीवात्मा विद्या व तप यांच्या योगानें शुद्ध होतो. व बुद्धि ज्ञानानें शुद्ध होते.

नहि ज्ञानेन सदृशं पवित्रमिह विद्यते । *

ज्ञानासारखें ह्या जगांत दुसरें कांहीं पवित्र नाहीं.

अपि चेत्सुदुराचारो भजते मामनन्यभाक् ।
साधुरेव स मंतव्यः सम्यग्व्यवसितो हि सः ॥
क्षिप्रं भवति धर्मात्मा शश्वच्छांतिं निगच्छति ।
कौंतेय प्रतिजानीहि न मे भक्तः प्रणश्यति ॥ ¶

अत्यंत दुराचारी असूनही जर कोणी एकनिष्ठपणानें माझें भजन करूं लागला तर तो साधूच समजला पाहिजे. कारण: त्याचा निश्चय योग्य प्रकारचा झालेला असतो.

हे अर्जुना, तो लवकर धर्मात्मा होतो व त्याला निरंतर शांति प्राप्त होते. सारांश, माझा भक्त कधींही नाश पावत नाहीं, हें तूं पक्कें जाण.

---

## प्रकरण चवथें.

# दैनिक पंचयज्ञ.

आपण मागें पाहिलेंच आहे कीं, यज्ञधर्म म्हणून कांहीं आहे व त्याप्रमाणें आपण होऊन स्वसंतोषानें वागणें ह्यांतच मनुष्याचें वैभव आहे. आतां सनातनधर्मानें आपल्या अनुयायांना ह्या उद्दिष्ट मार्गाकडे कसें लाविलें आहे तें आपणांस पहावयाचें आहे.

---

†मनुस्मृति, ५. १०९. *भगवद्गीता, ४. ३८. ¶भगवद्गीता, ९.३०, ३१.

धार्मिक ग्रंथांमध्यें जे निरनिराळ्या प्रकारचे अनेक यज्ञ सांगितले आहेत ते तूर्त आपण बाजूस ठेवून दररोज करावयाच्या महायज्ञांचाच विचार करूं ते येणेंप्रमाणें आहेत:--

| | | | | |
|---|---|---|---|---|
| १ ब्रह्मयज्ञ | ( ऋषींस किंवा वेदांस करण्याचा ) | | | |
| २ देवयज्ञ | ( देवांस | ,, | ,, | ) |
| ३ पितृयज्ञ | ( पितरांस | ,, | ,, | ) |
| ४ मनुष्ययज्ञ | ( मनुष्यांस | ,, | ,, | ) |
| ५ भूतयज्ञ | ( भूतांस | ,, | ,, | ) |

ह्यांपैकीं प्रत्येकाला बाह्यस्वरूप व अंतःस्वरूप हीं आहेत. त्यांपैकीं अंतःस्वरूप हें यज्ञाचें रहस्य प्राप्त करून देतें. हीं दोन्ही स्वरूपें समजून घेण्याचा आपण प्रयत्न करूं.

ब्रह्मयज्ञाचें बाह्य स्वरूप अध्ययन व अध्यापन हें आहे. प्रत्येक दिवशीं मनुष्यानें कोणत्यातरी पवित्र ग्रंथाचें अध्ययन करावें व हळुहळू ज्ञान प्राप्त करून घ्यावें; कारण त्याशिवाय त्याला स्वतःचें, स्वतःच्या स्थितीचें व स्वतःच्या कर्तव्याचें खरें ज्ञान होणार नाहीं. त्याचप्रमाणें आपल्याहून अज्ञ माणसांना तें ज्ञान देण्यालाही त्यानें नित्य तयार असलें पाहिजे; म्हणूनच ह्या यज्ञाचें वर्णन "अध्यापन" ह्या शब्दानें मनूनें केलें आहे. भगवद्गीता, अनुगीता, हंसगीता किंवा इतर पवित्र ग्रंथ ह्यांतील कांहीं श्लोक दररोज वाचून व त्यांचें काळजीपूर्वक मनन करून मनुष्यानें हा यज्ञ करावा. पुष्कळ वाचण्यापेक्षां काळजीपूर्वक व खोल विचार करून वाचणें हें अधिक महत्त्वाचें आहे. आपलें सगळेंच अध्ययन यज्ञाच्या दृष्टीनें करणें, म्हणजे अध्यापनासाठीं अध्ययन करणें, हें ब्रह्मयज्ञाचें अंतः-स्वरूप होय.

देवयज्ञाचें बाह्य स्वरूप होम हें होय. सृष्टीमध्यें अव्यक्त रूपानें वावरणाऱ्या क्रियावान् देवतांकडून होणारें आमचें संरक्षण व प्रेमपूर्वक सेवा ह्याबद्दल आम्ही त्यांचे ऋणी आहों ही कबुली देणें व त्या रक्षणा-बद्दल व सेवेबद्दल आमच्या धनापैकीं अंशतः कांहीं देऊन त्या ऋणाची फेड करणें याचेंच नांव होम होय. स्थूलातीत सृष्टीशीं आमचा संबंध

आहे, व सर्व सृष्टीचा परस्परसंबंध आहे ह्याची जाणीव हें अंतःस्वरूप होय. सर्व सृष्टीशीं, सर्व भूतमात्रांशीं सलोख्यानें व एकवाक्यतेनें राहण्यास आम्हीं शिकलें पाहिजे.

आमच्या कुटुंबांतील आमच्या पूर्वजांना पाण्याच्या द्वारें संतृप्त करणें हें पितृयज्ञाचें बाह्य स्वरूप होय. आमच्यापूर्वी ह्या पृथ्वीवर वसति करणारे आमच्या पूर्व पिढींतील लोक, ज्यांनीं ह्या पृथ्वीवर सुधारणा घडवून आणून व तिला संपन्न करून आपल्या वंशजांच्या स्वाधीन करावी म्हणून जिवापाड श्रम केले व कष्ट सोशिले, त्यांचे आपण ऋणी आहों ही जाणीव असणें हें अंतःस्वरूप होय. आपल्या पूर्वजांचे आपण ऋणी आहों, ही ज्याला जाणीव नाहीं तो खरोखर मनुष्यच नव्हे.

आतिथ्य हें मनुष्ययज्ञाचें बाह्य स्वरूप. खऱ्या आर्यवंशीय मनुष्यानें आपल्यापेक्षां कोणत्याही गरीब मनुष्याला दररोज अन्न घातलें पाहिजे. मानवजातीला मदत करून तिची सेवा करणें, भुकेल्याला अन्न देणें, वस्त्रहीनाला वस्त्र देणें, निराश्रिताला आश्रय देणें, आणि दुःखितांचें सांत्वन करणें, हें त्याचें कर्तव्य आहे. हें या यज्ञाचें अंतःस्वरूप होय. श्रीमंत लोक हीं गरिबांचीं कोठारें आहेत.

जेवणाच्या पूर्वी आपल्या भोंवतालच्या खालच्या कोटींतील अदृश्य जीवांकरितां जमिनीवर थोडेंसें अन्न टाकणें, आणि भिकाऱ्यांकरितां व भटकणाऱ्या जनावरांकरितां आपलें उच्छिष्टान्न योग्य जागीं नेऊन ठेवणें हें भूतयज्ञाचें बाह्यस्वरूप होय. मानवी कोटींतील व इतर खालच्या कोटींतील निकृष्ट जीवांची काळजी घेण्याचें कर्तव्य, ते आपली सेवा करितात त्याबद्दल त्यांचे आपण ऋणी आहोंत ही जाणीव, व त्यांच्यासंबंधानें आदर व प्रेम, हें ह्या यज्ञाचें अंतःस्वरूप होय.

येणेंप्रमाणें हे दैनिक पंचमहायज्ञ मनुष्याचा संबंध, त्याच्या सभोंवतालच्या त्याच्यापेक्षां वरिष्ठ, त्याच्या बरोबरीच्या व त्याच्यापेक्षां कनिष्ठ जीवांशीं आहे हें दाखवितात. ह्या यज्ञांच्या योगानें, ज्याच्यावर कौटुंबिक व राष्ट्रीय भरभराट अवलंबून असते असा एकवाक्यतेचा संबंध सिद्ध होतो. त्यामुळेंच ईश्वरेच्छेला अनुसरून संसारचक्र चालू होतें व जगाच्या उत्क्रांतीला मदत होते. प्रत्येक मनुष्य हा एकाकी नसून ह्या अफाट विश्वाचा एक अंश आहे,

विराट शरीरांतील एक पेशी आहे. व आपलें सुख व सुधारणा जर सार्वत्रिक सुख व सुधारणा ह्यांना पोषक असतील तरच सुरक्षित आहेत, अशी भावना उत्पन्न होते.

---

अध्यापनं ब्रह्मयज्ञः पितृयज्ञस्तु तर्पणम् ।
होमो दैवो बलिर्भौतो नृयज्ञोऽतिथिपूजनम् ॥†

अध्यापन करणें हा ब्रह्मयज्ञ. तर्पण करणें हा पितृयज्ञ. होम करणें हा देवयज्ञ, बलि देणें हा भूतयज्ञ, व अतिथींची पूजा करणें हा मनुष्ययज्ञ होय.

स्वाध्याये नित्ययुक्तः स्याद्दैवे चैवेह कर्मणि ।
दैवे कर्मणि युक्तो हि बिभर्तीदं चराचरम् ॥ §

मनुष्यानें नेहमीं वेदाध्ययनामध्यें व देवकर्मामध्यें गुंतलेलें असावें. देवकर्मामध्यें गुंतल्यानें चराचर सृष्टीचें पोषण होतें.

ऋषयः पितरो देवा भूतान्यतिथयस्तथा ।
आशासते कुटुम्बिभ्यस्तेभ्यः कार्यं विजानता ॥
स्वाध्यायेनार्चयेतर्षीन्होमैर्देवान्यथाविधि ।
पितृञ्छ्राद्धेन नॄनन्नैर्भूतानि बलिकर्मणा ॥ ×

ऋषि, पितर, देव, भूतें व अतिथि ह्यांना गृहस्थापासून आशा असते; म्हणून ज्ञात्यानें त्यांच्याकरितां कांहीं तरी केलें पाहिजे.

ऋषींची वेदाध्ययनानें, देवांची होमानें, पितरांची श्राद्धानें, मनुष्यांची अन्नानें व भूतांची बलीनें यथाविधि पूजा करावी.

---

## प्रकरण पांचवें

## उपासना.

विश्वाच्या परस्परावलंबी अंशांपैकीं आपण एक आहों अशा भावनेनें दैनिक पंचमहायज्ञ करून सुद्धां त्या धार्मिक मनुष्याच्या आकांक्षा पूर्णपणें

---

† मनुस्मृति, ३.७०. § मनुस्मृति, ३. ७५. × मनुस्मृति, ३. ८०,८१.

तृप्त होत नाहींत. जगत्प्रभु जो ईश्वर, किंवा जिचा आपण एक अंश आहो अशी जी परम चिच्छक्ति, तिच्याशीं बुद्धिपुरस्सर आपला संबंध घडावा अशी उत्कट इच्छा होते. ह्या इच्छेची पूर्तता मनुष्याला उपासनेच्या योगानें करतां येते. परब्रह्माचें श्रेष्ठ सत्यत्व जाणणारा, व सर्व जीवांच्या कल्याणासाठीं सदैव झटणारा व्यासमुनि ह्याला, लोकशिक्षणासाठीं महाभारत व ब्रह्मसूत्रें लिहिल्यानंतर सुद्धां जेव्हां मनःशांति प्राप्त होईना तेव्हां, ईश्वराची स्तुति करण्याबद्दल नारदानें उपदेश केला, म्हणून त्यानें श्रीमद्भागवत हा ग्रंथ लिहून न मिळालेली मनःशांति प्राप्त करून घेतली.†

परमेश्वराविषयींचें प्रेम, त्याच्याविषयींचा आदर, त्याच्याशीं बुद्धिपुरस्सर संबंध जोडण्याची आकांक्षा, त्याशीं योग घडविण्याची, जीवात्म्यानें परमात्म्याशीं एकरूपता अनुभविण्याची उत्कंठा या सर्व भावना उपासनेमध्यें प्रकट होत असतात. ईश्वराच्या पूर्णत्वाबद्दल स्तुति करणें, आपल्या अपूर्णत्वाच्या भावनेनें त्याची प्रार्थना करणें, त्याच्या प्रेमाची याचना करणें, त्याच्या सामर्थ्याची जाणीव ठेवणें, त्याच्या स्वरूपाचें ध्यान करणें, त्याचें स्वरूप अनावृत व्हावें याविषयीं अतिशय उत्कंठा वाटणें वगैरे (उपासकाच्या उत्क्रान्तीच्या पायरीप्रमाणें किंवा त्याच्या स्वभावानुसार) उपासनेचे अनेक प्रकार आहेत. उपासना हें ब्रह्मप्राप्तीच्या उत्कट इच्छेचें द्योतक चिन्ह आहे. मग ती उपासना एखाद्या गांवढळानें केलेली असो, अगर एखाद्या तत्त्वदर्शी मनुष्यानें केलेली असो, उपासनेचें बाह्यस्वरूप माणसाच्या भावनात्मक अगर बौद्धिक उन्नतीप्रमाणें निरनिराळें असूं शकेल; परंतु आंतील मूलभूत तहान एकच प्रकारची असते.

निर्गुण ब्रह्म केव्हांही उपासनाविषय होऊं शकणार नाहीं. ज्यांच्यावर मन स्थिर करितां येईल व ज्यांच्या योगानें मनोवृत्ति जाग्रत होतील अशा गुणांची उपासनेला आवश्यकता असते. सगुण ब्रह्म जो ईश्वर तोच उपासनेचा विषय; सर्व स्तुतिस्तोत्रांचा व प्रार्थनांचा विषय तोच; व सर्व ध्यानाचाही विषय तोच; त्याची उपासना शिव किंवा विष्णु, महादेव किंवा नारायण, दुर्गा किंवा लक्ष्मी, गणेश किंवा इंद्र, अग्नि किंवा सरस्वती किंवा अवतार म्हणून राम, कृष्ण अथवा बुद्ध, कोणत्याही स्वरूपानें करितां येईल. कोणत्याही नांवानें अगर स्वरूपानें केली तरी ईश्वर हाच एक उपासनेचा विषय होय.

† विष्णुभागवत, १. ४, ५.

कधीं शिवाला तर कधीं विष्णूला परमेश्वर कां म्हणतात, व एक पुराण एकाला तर दुसरें दुसऱ्याला श्रेष्ठ कां ठरवितें, ही शंका वरील विवेचनावरून दूर होते. हीं सर्व ईश्वराचीं रूपें आहेत; पण ईश्वर एकच आहे. उपासक स्वतःला प्रिय अशा स्वरूपामध्यें ईश्वराचीच उपासना करितो, व ईश्वराचेंच ध्यान करितो. ज्याप्रमाणें पत्नीला पतिप्रेमामुळें तो वापरीत असलेले कपडेही कधीं प्रिय वाटले तरी तिचें खरें प्रेम पतीवर असतें, त्याच्या कपड्यांवर नसतें; त्याचप्रमाणें उपासक प्रतिमेची उपासना करीत नसतो, तदंतर्गत ईश्वराची उपासना करितो. तो ईश्वराच्या एखाद्या दैवी स्वरूपामध्यें प्रगट झालेलें ईश्वरी प्रेम, सौंदर्य व शक्ति ह्यांची उपासना करितो. आम्ही अपूर्ण असल्यामुळें आम्हांला त्या ईश्वरी गुणांचें अंशतःच आकलन करितां येतें; पण जें थोडें आकलन उपासनाद्वारा होतें तें त्या एका ईश्वराच्याच अंशाचें होतें.

ह्यामुळेंच निरनिराळ्या धर्मांमध्यें व धर्मग्रंथांमध्यें जे कलह होतात ते मूर्खपणाचे व अज्ञानमूलक होत. सर्व एका ईश्वराचीच उपासना करितात; व जे भेद आहेत ते उपासकांमधील भिन्नत्वामुळें फक्त नांवामध्यें झाले आहेत; उपासनेच्या विषयामध्यें नाहींत.

आपल्या प्रचारांत देवपूजा हा एक ह्या उपासनेचा सोपा प्रकार आहे. पूजेंत एकादें चित्र अगर मूर्ति घेतात, मंत्र म्हणतात, फुलें वाहतात व अर्घ्य देतात. आणि ह्या बाह्योपचारद्वारें अंतस्थ प्रेम प्रगट होऊन तें ह्या प्रतिमांच्या पलीकडचा जो उपासनाविषय तेथपर्यंत जाऊन पोहोंचतें. पूजेंत ईश्वराचें चिन्ह म्हणून जी प्रतिमा असते, ती कधीं कधीं कुलदेवाची अगर कुलदेवतेची असते, व कधीं कधीं इष्टदेवतेची असते. तिची योजना स्वतः पूजकानें अगर त्याच्या गुरूनें केलेली असते.

उपासना ह्या शब्दामध्यें सनातनधर्मानुयायांनीं करावयाची रोजची संध्या, ध्यान वगैरे पुष्कळ पूजाप्रकारांचा समावेश होतो. संध्येचे वैदिक व तांत्रिक असे दोन भाग आहेत; व प्रत्येकानें आपापल्या जातिधर्माप्रमाणें व कुलाचाराप्रमाणें संध्या करावयाची असते. त्यानें ती योग्य गुरूकडून शिकावी व नित्य करावी. ध्यानाचे विशिष्ट असे प्रकार आहेत. ते लहानांकरितां नसून मोठ्या माणसांकरितां आहेत.

---

नैष्कर्म्यमप्यच्युतभाववर्जितं न शोभते ज्ञानमलं निरंजनम् ।
कुतः पुनः शश्वदभद्रमीश्वरे न चार्पितं कर्म यदप्यकारणम् ॥ †

अच्युत जो ईश्वर त्याच्या ठिकाणीं जर भक्ति नसेल तर पूर्ण व निष्कलंक ज्ञान व पूर्ण निष्काम कर्म ह्यांचें सुद्धां तेज पडत नाहीं. मग जीं कर्में अपवित्र आहेत, अथवा जीं कर्में निष्काम असून सुद्धां ईश्वराला अर्पण केलेलीं नसतील त्यांचें तेज कसें पडेल ?

ये त्वक्षरमनिर्देश्यमव्यक्तं पर्युपासते ॥

× × ×

ते प्राप्नुवन्ति मामेव सर्वभूतहिते रताः ॥
क्लेशोऽधिकतरस्तेषामव्यक्तासक्तचेतसाम् ।
अव्यक्ता हि गतिर्दुःखं देहवद्भिरवाप्यते ॥
ये तु सर्वाणि कर्माणि मयि संन्यस्य मत्पराः ।
अनन्येनैव योगेन मां ध्यायन्त उपासते ॥
तेषामहं समुद्धर्ता मृत्युसंसारसागरात् ।
भवामि न चिरात्पार्थ मय्यावेशितचेतसाम् ॥ ❀

अनिर्देश्य, अव्यक्त असें जें अविनाशी ब्रह्म त्याची जे उपासना करितात व जे प्राणिमात्रांचें हित करण्याविषयीं तत्पर असतात ते मलाच येऊन मिळतात.

अव्यक्त ब्रह्माची उपासना करणाऱ्या देहधारी पुरुषांना उपासनेचे कष्ट अधिक पडतात. कारण अव्यक्तोपासनेचा मार्ग फार प्रयासानेंच प्राप्त होतो.

जे मत्पर होऊन सर्व कर्में मला अर्पण करितात, व माझें ध्यान करून अनन्यभावानें माझी उपासना करितात,

पार्था, त्या माझ्या ठिकाणीं चित्त समर्पण केलेल्या भक्तांचा मी जन्ममरण-युक्त संसारसमुद्रापासून लवकरच उद्धार करितों.

ईश्वरः सर्वभूतांना हृद्देशेऽर्जुन तिष्ठति ।
भ्रामयन्सर्वभूतानि यन्त्रारूढानि मायया ॥

---

† विष्णुभागवतत्र, १. ५. १२.  ❀ भगवद्गीता, १२. ३–७.

**तमेव शरणं गच्छ सर्वभावेन भारत ।**
**तत्प्रसादात्परां शान्तिं स्थानं प्राप्स्यसि शाश्वतम् ॥ †**

आपल्या मायाशक्तीनें संसारचक्रावर आरूढ झालेल्या सर्व भूतमात्रांना फिरविणारा ईश्वर, हे अर्जुना, सर्व भूतांच्या हृदयांत आहे.

हे भारता, सर्वभावेंकरून तूं त्यालाच शरण जा. त्याच्या प्रसादानें तुला परम शांति आणि शाश्वत स्थान प्राप्त होईल.

**ये यथा मां प्रपद्यन्ते तांस्तथैव भजाम्यहम् ।**
**मम वर्त्मानुवर्तन्ते मनुष्याः पार्थ सर्वशः ॥❀**

अर्जुना, जे ज्या रीतीनें मजकडे येतात त्याच रीतीनें मी त्यांना भेटतों. सर्वत्र मनुष्यें जीं येत आहेत तीं माझ्याच मार्गानें येत आहेत.

**यो यो यां यां तनुं भक्तः श्रद्धयाऽर्चितुमिच्छति ।**
**तस्य तस्याचलां श्रद्धां तामेव विदधाम्यहम् ॥ ‡**

जो जो भक्त ज्या ज्या देवतेच्या ठायीं भक्ति ठेवून श्रद्धेनें आराधना करूं इच्छितो, त्याची ती श्रद्धा मी स्थिर करितों.

---

## प्रकरण सहावें

# आश्रमचतुष्टय.

व्यक्तींचे जसे कांहीं विशिष्ट गुण असतात तसेंच राष्ट्रांचेही कांहीं विशिष्ट गुण असतात. प्राचीन हिंदु राष्ट्राच्या विशिष्ट गुणांमध्यें शिस्त व समतोलपणा हे दोन गुण होते. सनातनधर्मानें हे गुण लोकांमध्यें उत्पन्न केले, व तेणेंकरून सर्वतोपरि उन्नत व सारासारविचारी अशा प्रकारचे सन्माननीय मनुष्य तयार झाले. सनातनधर्माच्या खऱ्या अनुयायांमध्यें ह्या गुणांचें महत्त्व इतकें आहे कीं, श्रीकृष्णानें “ समत्व हाच योग आहे ”* असें म्हटलें आहे.

---

† भगवद्गीता, १८. ६१, ६२.　　❀ भगवद्गीता, ४. ११.

‡ भगवद्गीता, ७. २१.　　* भगवद्गीता २. ४८. समत्वं योग उच्यते ।

वेदामध्यें जीविताविषयीं जो व्यापक दृष्टीनें विचार केलेला आहे तोच ह्या गुणांचें मूळ कारण होय. सर्व वस्तु आत्म्यासाठीं व आत्म्याच्या इच्छेनेंच उत्पन्न झालेल्या आहेत. जें ज्ञान प्राप्त व्हावें अशी त्याची इच्छा असते तें त्याला देण्यासाठींच त्यांचें अस्तित्व आहे. आत्मा हा सदा अंतरंगामध्यें शाश्वत अधिकार चालविणारा राजा आहे; आणि या खालच्या लोकांमध्यें आपल्या शक्ति विकसित कराव्या व अंतरंगाप्रमाणें जडद्रव्याच्या या बहिरंगाच्या लोकांतही आपण स्वयंसिद्ध अधिपति व्हावें अशी त्याची इच्छा असते. स्वतः शाश्वत असल्यामुळें त्याच्या कार्यामध्यें घाई नसते, व क्रमाक्रमानें एकएक अनुभव घेऊन प्रमाणशीर व सुसंगत रीतीनें आत्मविकास करणें सर्वांत चांगलें हें तो जाणतो. सृष्टीमधील खालच्या कोटींतील जीवांना परमात्मरूपी ईश्वरानें हाच क्रम लावून दिला आहे. बीं, मुळें, खोड, पानें, फुलें व फळें हीं क्रमानें एकामागून एक अशा व्यवस्थित रीतीनें येतात व प्रत्येकाचें कार्य व सौंदर्य त्या त्या ऋतूमध्यें दृग्गोचर होतें. त्याचप्रमाणें बाल्य, कौमार्य, तारुण्य, प्रौढता व जरा हा क्रम मनुष्याला त्यानें लावून दिला आहे. हा क्रम मनुष्याला बदलतां येणार नाहीं. परंतु उत्क्रांत होणारा मनुष्यांतील जीवात्मा, जिच्यावर अजून त्याचें प्रभुत्व स्थापन झालें नाहीं अशा जड प्रकृतीनें आच्छादिलेला असल्यामुळें, व ज्याच्यावर कामाचा पगडा आहे अशा मनाच्या स्वाधीन झाल्यामुळें अंध होऊन अनियमितपणानें भलत्या मार्गानें जातो, व एका स्थितींत असतांना दुसऱ्याच स्थितींतील गोष्टींना हात घालूं पहातो, व तेणेंकरून प्रत्येक स्थितींत नियत असलेल्या आपल्या उन्नतीला अडथळे उत्पन्न करून घेतो. बालक तरुण होऊं पहातो, तरुण प्रौढ होऊं पहातो व जरठ तारुण्योपभोग घेऊं पहातो. म्हणूनच ह्या आयुष्यांतील गंभीरता नाहींशी होऊन तें अधें अधिक निरुपयोगी झालें आहे.

व्यवस्थित क्रम सोडून भलतीं कर्तव्यें करण्याचा जो हा मोह, त्यास आळा बसावा म्हणून महान् ऋषींनीं आर्यवंशांतील सर्वांत श्रेष्ठ लोकांस कांहीं एक ठराविक व्यवस्था लावून दिली. जन्मापासून मरेपर्यंतचें जें माणसाचें आयुष्य त्यास, तसेंच अनेक जन्ममरणांच्या फेऱ्यांमधून उत्तरोत्तर विकास पावत असणारें जीवाचें जें लांबच लांब आयुष्य त्यासही त्यांनीं

व्यवस्थित घटना लावून दिली. या दोहोंचेही त्यांनीं चार चार भाग पाडले. जन्मापासून मरेपर्यंतच्या आयुष्याच्या चार भागांस चार आश्रम ( राहण्याचीं चार स्थळें ) व असंख्य जन्मांतील आयुष्याच्या चार भागांस चार वर्ण ( रंग किंवा जाति ) अशीं नांवें आहेत.

ह्या ठिकाणीं आम्हांस आश्रमाविषयींच विचार करावयाचा आहे. वर सांगितल्याप्रमाणें ज्या चार अवस्था आहेत त्या ह्याः—ब्रह्मचर्य ( विद्यार्थिदशा ); गार्हस्थ्य ( गृहस्थदशा ); वानप्रस्थ्य ( वनांत किंवा एकांतवासांत राहण्याची स्थिति ); व संन्यास† ( सर्वसंगपरित्याग ).

ह्यांपैकीं कोणत्याही आश्रमांतील मनुष्यानें इतर तीन आश्रमांतील विशिष्ट कर्तव्यें आपल्या अंगावर घेतां कामा नयेत. विद्यार्थ्यानें गृहस्थ, वानप्रस्थ अगर संन्यासी होतां नये; गृहस्थानें ब्रह्मचारी, वानप्रस्थ अगर संन्यासी होतां नये; वानप्रस्थानें पुन्हा गृहस्थाश्रमाचा अनुभव घेतां नये; किंवा संन्याशानें वानप्रस्थांतील शांतानुरागाची इच्छा करितां नये. प्रत्येक आश्रमाचीं विशिष्ट कर्तव्यें व विशिष्ट सुखानुभव नेमलेले आहेत. त्या त्या आश्रमामध्यें तीं तीं कर्तव्यें बजाविलीं व ते ते सुखानुभव घेतले म्हणजे जीवात्म्याचा सुव्यवस्थित रीतीनें विकास होतो, आणि आश्रम–व्यवस्था पाळिली नाहीं तर उत्क्रांतीला विलंब लागतो.

हल्लींची परिस्थिति इतकी बदललेली आहे कीं, आश्रमव्यवस्था प्राचीन नियमांप्रमाणें अक्षरशः पाळणें अशक्य आहे; परंतु प्रत्येक आश्रमांतील प्रधान कर्तव्यांची स्पष्ट कल्पना जर आपणांला होईल तर अजून सुद्धां आपलें जीवित व्यवस्थित रीतीनें उन्नतीच्या मार्गाला लावितां येईल.

विद्यार्थिदशेला उपनयनविधीनें–द्वितीय जन्मानें–प्रारंभ होतो. तेथपासून विद्यार्थ्यानें कांहीं विवक्षित गुण संपादन करण्याचा प्रयत्न केला पाहिजे. शारीरिक मेहनत पाहिजे व संवयींत साधेपणा पाहिजे. म्हणजे शरीर मजबूत राहून निरोगी होतें. ह्यासाठीं चैनीनें व आळसानें पडून न राहतां विद्यार्थ्यानें सकाळीं लवकर उठलें पाहिजे, स्नान केलें पाहिजे, परिमित व साधें अन्न खाल्लें पाहिजे व पुष्कळ व्यायाम केला पाहिजे.

---

† मनुस्मृति. ६, ८७.

अशा रीतीनें राहणाऱ्या मुलाची, व जो उशीर होईपर्यंत निजून उठत नाहीं, जो गोड गोड व मोठमोठ्या पक्वान्नांवर बेसुमार ताव मारितो, जो व्यायाम मुळींच करीत नाहीं व मऊ मऊ बिछान्यावर लोळण्यांतच वेळ घालवितो, अशा मुलाची तुलना करा. पहिला तरतरीत, मजबूत, बांधेसूद, उत्साही व चपळ असेल; मोठेपणीं बळकट व निरोगी होईल; दुसरा मंद, शिथिल, तुंदिल, आळशी अथवा अतिशय बारीक व अशक्त होऊन लवकरच रोगी व दुःखी होईल.

विद्यार्थ्यानें उद्योग, आज्ञाधारकता, नम्रता व सेवातत्परता हे गुण अंगांत आणण्याचा प्रयत्न केला पाहिजे. तारुण्य हा आयुष्यांतील तयारीचा काल आहे; व ज्ञान संपादन करण्यासाठीं नेटानें अध्ययन करणें ही गोष्ट गृहस्थाश्रम सुफल करण्याला आवश्यक आहे. आज्ञाधारकपणा म्हणजे आपल्या आचरणाला नीट वळण लावण्यासाठीं वडिलांच्या अनुभवाचा उपयोग करून घेणें होय. ह्यामुळें आपल्या पूर्ववयांतील बऱ्याच संकटांचा परिहार होतो; व ज्याला आज्ञा पाळावी हें समजलें तोच पुढें आज्ञा करण्याला योग होतो. नम्रतेनें त्याची स्थिति जलद सुधारते; कारण नम्र मनुष्याला स्वतःशीं असलेलें देण्यास पुष्कळ लोक खुषीनें तयार होतात. कुटुंबाच्या अगर विद्यालयाच्या संकुचित मर्यादेमधील सेवातत्परतेमुळें पुढें सर्व मानवजातीची सेवा करण्यास योग्य असा विद्यार्थ्याचा स्वभाव बनतो.

विद्यार्थी विचारानें व आचारानें शुद्ध आणि मनानें व शरीरानें ब्रह्मचारी असला पाहिजे. त्यानें आपल्या विचारांची चांगली काळजी घेतली पाहिजे; कारण ज्याच्या विचारांत अशुद्धपणा नाहीं त्याच्या हातून अशुद्ध आचरण घडावयाचें नाहीं. स्त्रीपुरुषविषयक विचार त्याच्या मनांत येतां कामा नयेत, किंवा मन भटकूं देणाऱ्या मोहाला त्यानें वश होतां नये. जो शरीरानें व विचारानें शुद्ध, तोच निर्दोषपणानें व सुखानें गृहस्थाश्रमाचा अनुभव घेईल. विद्यार्थ्याला ब्रह्मचारी अशीच संज्ञा आहे. हल्लीं ह्या शब्दाचा अर्थ आजन्म अविवाहित असा सार्वत्रिक झाला आहे. प्राचीन नियमांच्या विरुद्ध विद्यार्थिदशेमध्यें लग्न झाल्यानें अकालीं जरा, क्षीणता, रोग व वंशक्षय हीं उद्भवतात.

आपला प्राथमिक व उच्च शिक्षणक्रम पुरा करून मनुष्य पुढलीं गृहस्था-

श्रमाचीं कर्तव्यें व जबाबदाऱ्या पत्करण्यास लायक झाला म्हणजे त्याचा विवाह होऊन त्याच्या गृहस्थाश्रमाला सुरवात होते. सर्व आश्रमांमध्यें ह्याच आश्रमाला फार महत्त्व आहे; कारण, इतर सर्व आश्रम ह्याच्यावर अवलंबून आहेत असें म्हटलें आहे. कुटुंबाचें व राष्ट्राचें हित गृहस्थाश्रम्यांवर अवलंबून आहे; व त्यांचें सुख व वैभव हीं त्यांच्याच हातांत आहेत.† जो चांगला पति, चांगला पिता, चांगला धनी व चांगला नागरिक तोच मनुष्यांमध्यें श्रेष्ठ होय. निष्कामता, सदयता, मृदुता, परिमितता, पवित्रता, सेवातत्परता, दक्षता, उद्योगशीलता, न्यायकुशलता व दानशीलता ह्या गुणांची उत्पत्ति व वृद्धि करणारी शाळा "गृह" ही होय. "गृहस्थ" म्हणजे या गुणांची व्याप्ति घरांत किंवा देशांत जे आपणास जवळ असतील त्यांपुरती जो करतो तो. परंतु त्याच गुणांची व्याप्ति भूतमात्रांपुरती माणसास करतां आली म्हणजे तो साधु किंवा ऋषि होतो. गृहस्थाश्रमांतील उच्च ध्येयाचा ऱ्हास झाल्यामुळें हल्लींचा जीवनक्रम निकृष्ट व क्षुद्र बनला आहे. विद्यार्थिदशेंतच विवाहाची घाई केल्यामुळें असा अनिष्ट परिणाम झाला आहे कीं, अर्धवट ब्रह्मचर्याश्रम व अर्धवट गृहस्थाश्रम असें होऊन दोहोंच्याही कर्तव्यांची अनवस्था होते. अशानेंच गृहस्थाश्रमांत शिरण्याचें प्राचीन महत्त्व व वैभव दिसेनासें झालें आहे. अपक्व फळ तोडून खाल्लें म्हणजे खाणाराला त्यांतील गोडपणाचा स्वाद मिळत नाहीं.

पूर्वीं कांहीं कुलीन परंतु अविचारी ब्राह्मण तरुणांनीं आपल्या घरांचा अकालीं त्याग करून वानप्रस्थाश्रमी होण्यासाठीं वनाचा आश्रय केला, असें महाभारतांत लिहिलें आहे. त्या वेळीं इंद्राला त्यांची कींव आली व त्यानें सुवर्णपक्ष्याचें रूप धारण करून त्यांना उपदेश केला कीं, "तुम्ही गृहस्थाश्रमाचा आश्रय करा; सर्व सद्गुणांच्या विकासाचें स्थान तोच आहे. तो पवित्र आहे. देवपूजा, अध्ययन, पितृऋणाची फेड म्हणजे ज्याप्रमाणें वडिलांनीं आमचें पालनपोषण केलें त्याचप्रमाणें आपणही लहानांचें पालनपोषण करणें—हीच सर्वांत तीव्र तपश्चर्या आहे; गृहस्थाश्रमांतील कर्तव्यांचा भार सहन करा; जे आपलें कर्तव्य टाकून पळतात ते पापामध्यें

---

† मनुस्मृति, ३. ७७, ८९, ९०.

पडतात; गरजवंताची गरज भागवून जें अवशिष्ट राहील तें भक्षण करणें म्हणजे यज्ञावशिष्ट भक्षण करण्यासारखेंच आहे." ✝

जेव्हां आपले मुलगे गृहस्थाश्रमाचा भार घेण्यास समर्थ होतील, स्वतःवर वृद्धावस्थेचीं चिन्हें दिसूं लागतील, व नातवंडें सभोंवार खेळूं लागतील तेव्हां गृहस्थाला व त्याच्या पत्नीला घरचा अधिकार मुलांवर सोपवून प्रापंचिक यातायातींपासून व कर्मप्रधान संसारापासून निवृत्त होण्याचा समय प्राप्त होतो. शांत व कांहींसा एकांत जीवनक्रम, व त्यामध्यें अध्ययन करणें, परहितार्थ स्वार्थत्याग करणें व तरुणांना उपदेश करणें हाच हल्लींच्या काळामध्यें तृतीयाश्रम होऊं शकेल.

शेवटीं वृद्धपणीं चवथ्या आश्रमांत शिरणें योग्य आहे. संन्यासी आपले शेवटचे दिवस उपासना व ध्यान यांमध्यें घालवितो. अखेरची इहलोकची यात्रा आनंदानें संपवून पूर्व आयुष्यांतल्या पुण्यकर्मांचीं फळें भोगण्यास तो परलोकीं जातो व भावी उत्क्रान्तीसाठीं नंतर पुनः येथें जन्म घेऊन येतो.

---

ब्रह्मचारी गृहस्थश्च वानप्रस्थो यतिस्तथा ।
एते गृहस्थप्रभवाश्चत्वारः पृथगाश्रमाः ॥❀

ब्रह्मचारी, गृहस्थ, वानप्रस्थ व संन्यासी हे चार निरनिराळे आश्रम गृहस्थापासूनच उत्पन्न होतात.

वेदानधीत्य वेदौ वा वेदं वापि यथाक्रमम् ।
अविप्लुतब्रह्मचर्यो गृहस्थाश्रममावसत् ॥
गृहस्थस्तु यदा पश्येद्वलीपलितमात्मनः ।
अपत्यस्य तथाऽपत्यं तदारण्यं समाश्रयेत् ॥
वनेषु तु विहृत्यैवं तृतीयं भागमायुषः ।
चतुर्थमायुषो भागं त्यक्त्वा संगान्परिव्रजेत् ॥ ¶

ब्रह्मचर्यव्रत न मोडतां सर्व वेदांचें, किंवा दोन वेदांचें, किंवा एका वेदाचें तरी यथाक्रम अध्ययन करून गृहस्थाश्रम स्वीकारावा.

---

✝ महाभारत, शांतिपर्व, ११ ❀ मनुस्मृति, ६. ८७.

¶ मनुस्मृति, ३. २ व ६. २, ३३

अंगावर सुरकुत्या दिसूं लागल्या, केश पांढरे झाले व नातवंड पाहिलें म्हणजे गृहस्थानें अरण्याचा आश्रय करावा.

आयुष्याचा तिसरा भाग वनांत काढून व सर्वसंगपरित्याग करून चौथ्या भागामध्यें संन्यासी होऊन फिरावें.

अनधीत्य द्विजो वेदाननुत्पाद्य तथा प्रजाम् ।
अनिष्ट्वा चैव यज्ञैश्च मोक्षमिच्छन्व्रजत्यधः ॥ †

मोक्षाची इच्छा करणाऱ्या द्विजानें जर वेदाध्ययन केलें नाहीं, प्रजोत्पादन केलें नाहीं व यज्ञ केले नाहींत तर तो अधःपतन पावतो.

अनारोग्यमनायुष्यमस्वर्ग्यं चाति भोजनम् ।
अपुण्यं लोकविद्विष्टं तस्मात्तत्परिवर्जयेत् ॥ *

अतिभोजन हें आरोग्य, आयुष्य, स्वर्ग व पुण्य ह्यांना विघातक आहे व लोकांनाही अप्रिय आहे, म्हणून त्याचा त्याग करावा.

नोदितो गुरुणा नित्यमप्रणोदित एव वा ।
कुर्यादध्ययने यत्नमाचार्यस्य हितेषु च ॥
वर्जयेन्मधु मांसं च गंधमाल्यं रसांस्त्रियः ।
शुक्तानि चैव सर्वाणि प्राणिनां चैव हिंसनम् ॥
कामं क्रोधं च लोभं च नर्तनं गीतवादनम् ॥
द्यूतं च जनवादं च परिवादं तथानृतम् ॥
एकः शयीत सर्वत्र न रेतः स्कन्दयेत्क्वचित् ।
कामाद्धि स्कन्दयन् रेतो हिनस्ति व्रतमात्मनः ॥ ‡

गुरूच्या आज्ञेनें असो किंवा आज्ञा न करितां असो, विद्यार्थ्यानें अध्ययनासाठीं व गुरूच्या हितासाठीं प्रयत्न केले पाहिजेत.

विद्यार्थ्यानें मद्य, मांस, सुगंध, माळा, चमचमीत अन्न, स्त्रिया, आम्ल पदार्थ व प्राणहिंसा हीं सर्व वर्ज करावीं.

तसेंच काम, क्रोध, लोभ, नाचणें, गाणें, वाजवणें, द्यूत, गप्पा, निंदा व असत्य हीं वर्ज करावीं.

---

† मनुस्मृति, ६. ३७. * मनुस्मृति, ३. ५७.

‡ मनुस्मृति, २. १९१, १७७–१८०

विद्यार्थ्यानें एकटें झोंपावें व रेतःस्खलन करूं नये; कामवासनेनें जो रेतःस्खलन करितो तो आपल्या व्रताचा नाश करितो.

यथा वायुं समाश्रित्य सर्वे जीवन्ति जन्तवः ।
तथा गृहस्थमाश्रित्य वर्तन्त इतराश्रमाः ॥
सर्वेषामपि चैतेषां वेदश्रुतिविधानतः ।
गृहस्थ उच्यते श्रेष्ठः स त्रीनेतान्बिभर्ति हि ॥
यथा नदीनदाः सर्वे समुद्रे यान्ति संस्थितिम् ।
तथैवाश्रमिणः सर्वे गृहस्थे यान्ति संस्थितिम् ॥†

ज्याप्रमाणें सर्व जीव वायूच्या आधारावर राहातात, त्याप्रमाणें इतर सर्व आश्रम गृहस्थाश्रमाच्या आधारावर राहतात.

वेद म्हणतात त्याप्रमाणें सर्व आश्रमांत गृहस्थाश्रम श्रेष्ठ आहे; कारण तोच या तिहींचें पोषण करतो.

ज्याप्रमाणें सर्व नदीनद समुद्रामध्यें जाऊन राहातात, त्याप्रमाणें सर्व आश्रमांचे लोक गृहस्थाकडे जाऊन आश्रयास राहातात.

अनाश्रितः कर्मफलं कार्यं कर्म करोति यः ।
स संन्यासी च योगी च न निरग्निर्न चाक्रियः ॥❀

जो अग्निहोत्रादि किंवा इतर कोणतींच कर्में करीत नाहीं, तो संन्यासी नव्हे; तर जो कर्माच्या फलाची इच्छा न करितां विहित कर्में करितो तोच संन्यासी व तोच योगी होय.

---

## प्रकरण सातवें

# चातुर्वर्ण्य.

असंख्य जन्म घेऊन जीवाला जो दीर्घ प्रवास करावा लागतो त्यांत ठळक असे चार टप्पे आहेत. त्यांना वर्ण असें म्हणतात. मनूनें घालून दिलेल्या सामाजिक व्यवस्थेमध्यें त्यांना सामाजिक वर्ग अथवा जाति असें म्हणतात.

---

† मनुस्मृति, ३. ७७, ६.८९,९० ❀ भगवद्गीता, ६. १

हे टप्पे सार्वत्रिक आहेत, व सर्व जीवांना त्यांतून जावें लागतें, परंतु सनातनधर्माचा विशेष आहे तो हाच कीं, त्यानें त्यांना सामाजिक व्यवस्थेचे आधारस्तंभ बनविलें आहे. प्राचीनकाळीं जातींचा आणि वर्णांचा मेळ असे; म्हणजे ज्या ज्या वर्णाचे जीवात्मे असत त्या त्या वर्णानुरूप शरीरामध्यें ते जन्म घेत. म्हणून सर्व समाजाची समाधानवृत्तीनें प्रगति होत असे. परंतु कुरुक्षेत्रावर विषण्णहृदय झालेल्या अर्जुनानें सूचित केल्याप्रमाणें हल्लींच्या काळीं सर्व आर्यावर्तभर वर्णसंकर झालेला आहे. एका वर्णाचे जीवात्मे इतर वर्णानुरूप शरीरांत आज जन्म घेत आहेत; व त्यामुळें पूर्वी जीवात्मा व शरीर ह्यांच्या वर्णाचा पडताळा जमत असतांना जशी समाजाची सुखासमाधानानें प्रगति होत असे, तें सर्व बदलून हल्लीं जीव व देह ह्यांच्यांतील विरोधामुळें समाजांत अव्यवस्था होऊन प्रगति खुंटली आहे. आतां ही स्थिति सुधारून चांगली कशी करितां येईल हा प्रश्न जाणत्या मनुष्यांनीं विचार करून सोडविला पाहिजे. अनभिज्ञ मुलांना तो सोडवितां येणार नाहीं. आम्हांला ह्या ठिकाणीं वर्ण किंवा जाति म्हणजे काय इतकेंच पहावयाचें आहे.

हे चार वर्ण किंवा जाति म्हणजे चार टप्पे किंवा पायऱ्या आहेत हें वर सांगितलेंच आहे.

पहिल्या टप्प्यांत शैशवावस्थेंत अगर यौवनावस्थेंत असलेल्या जीवात्म्यांचा समावेश होतो. जीवात्मा आपले लहानपणचे गुण प्रगट करून आपली आज्ञाधारकता, सेवातत्परता व सहिष्णुता ह्या गुणांचा विकास या अवस्थेंत करीत असतो; त्याच्या जबाबदाऱ्या कमी असतात, व त्याचें कर्तव्य म्हणजे सेवा करणें एवढेंच असतें. ज्या ठिकाणीं वर्णसंकर नाहीं तेथें हे तरुण जीवात्मे समाजांतील फक्त खालच्या जातीमध्यें जन्मास येतात. ते कामकरी, कारागीर, सेवक किंवा सर्व प्रकारची मजूरी करणारे असे असतात. सनातनधर्माच्या सामाजिक व्यवस्थेमध्यें ते शूद्र जातींत येतात. हल्लींच्या वर्णसंकराच्या काळीं हिंदुस्थानांत शूद्र जातींत जन्मास आलेले अगर इतर देशांत तत्सजातीय वर्गांत जन्मास आलेले हे तरुण जीवात्मे सुखासमाधानानें राहून समाजास उपयोगी होतात. परंतु हल्लींप्रमाणें जेथें ते वरच्या जातीमध्यें किंवा वर्गांमध्यें पुष्कळदां जन्मास आलेले असतात, तेथें वरच्या वर्गांतील श्रेष्ठ कर्तव्यें बजावण्यास किंवा इतर जबाबदाऱ्यांचा भार सहन

करण्यास ते अपात्र असल्यामुळें समाजाचें त्यांच्याकडून अहितच होतें. त्याच-प्रमाणें श्रेष्ठ जीवात्मे कनिष्ठ जातीमध्यें जन्मास आले म्हणजे तेही आपल्या परिस्थितीमध्यें समाधान न पावून असंतुष्ट व बंडखोर होतात, व समाजांत संकटें उत्पन्न होतात. खरोखरच अध्यात्मदृष्टीनें श्रेष्ठ जीवात्मा असेल तर तो कोणत्याही शरीरमध्यें संतुष्ट असतो; परंतु अर्धवट प्रगतीला गेलेले जीवात्मे स्वाभाविकपणेंच आपल्या प्रतिकूल परिस्थितीशीं झगडावयास लागतात; व त्यांच्या त्या चळवळीचा उपयोग ईश्वरास उत्क्रांतिक्रम पुढें चालू करण्यास व आहे या स्थितींत आवश्यक असणारे फेरबदल घडवून आणण्यास होतो.

दुसऱ्या टप्प्यांत प्रौढ दशेंतील प्रथमार्धांतले जीवात्मे येतात. ह्या स्थितींत द्रव्यसंचय करून त्याचा उपभोग घेणें व उपयोग करणें, श्रमविभाग करून त्याची उपयुक्तता वाढविणें, मोठमोठीं जोखमाचीं कामें अंगावर घेणें व मिळविलेल्या मालमत्तेची योग्य व्यवस्थ करणें ह्या कामांना ते योग्य असतात. ह्या वर्गांत व्यापारी, वाणी-उदमी, कारखानदार, भांडवलवाले, पेढीवाले व मोठमोठ्या कारखान्यांचे व्यवस्थापक ह्यांचा समावेश होतो. सनातनधर्माच्या समाजव्यवस्थेमध्यें हे जीवात्मे वैश्यजातींत जन्मास येत असत. ह्या जातीमध्यें स्वतःच्याच हिताकडे न पाहतां सार्वजनिक हित व सार्वजनिक उन्नति करणें हें ध्येय आहे, ह्या गोष्टींचें त्यांना हळुहळू शिक्षण मिळत जात असे.

तिसऱ्या वर्णांत प्रौढदशेंतील पुढल्या अर्ध्या भागांतले जीवात्मे येतात. ह्या स्थितींत त्यांच्या जबाबदारीची व अधिकाराची मर्यादा राष्ट्रापर्यंत जाते; व कायदे करणें, राज्यकारभार चालविणें, निरपेक्ष बुद्धीनें राष्ट्रहितार्थ झटणें व आपल्या अधिकाराचा उपयोग स्वतःच्या बडेजावाकडे न करितां इतरांच्या रक्षणाकडे व नियमनाकडे करणें हें त्यांचें कर्तव्य असतें. ह्या वर्गांत राजे, न्यायाधीश, कायदे करणारे, योद्धे व राष्ट्रामध्यें नियंत्रण करून व्यवस्था राखणारे इत्यादि येतात. सनातनधर्माच्या सामाजिक व्यवस्थेमध्यें हे प्रौढ जीवात्मे क्षत्रिय जातींत जन्म घेत असत आणि राष्ट्ररक्षणाकरितां लढणें व राज्यकारभाराचा बोजा उचलणें हीं कामें त्यांना करावीं लागत.

चौथ्या वर्णांत पोक्त जीवात्म्यांचा समावेश होतो. ह्या स्थितींमध्यें ऐहिक विषयासंबंधानें वैराग्य उत्पन्न होतें, व ते अज्ञ जीवांना उपदेश

करून त्यांचे मित्र व साहाय्यकर्ते होतात. ह्या वर्गांत धर्मोपदेशक व सर्व प्रकारचे शिक्षक अर्थात् ग्रंथकर्ते, शास्त्रवेत्ते, कवि व तत्त्ववेत्ते हे येतात. सनातनधर्माच्या सामाजिक व्यवस्थेमध्यें हे स्वतः विशेष अपेक्षा न करितां नेहमीं दातृत्वशील असे ज्ञानवृद्ध निष्काम ब्राह्मण होऊन त्या जातींत जन्म घेत असत. हिंदुस्थानांत वर्णसंकरानें ह्याच जातीची सर्वांत अधिक निकृष्टावस्था केली; कारण श्रेष्ठांचें पतन हें कनिष्ठांच्या पतनापेक्षां अधिक अनर्थावह असतें. ब्राह्मणशरीरांत शूद्र जीवात्मा जन्मास येणें हें सनातन-धर्मावरील महत्संकट होय.

एका जातीचे लोक दुसऱ्या जातीचीं कामें अंगावर घेऊं पहातात; व प्रत्येकजण जातीच्या हक्कांकडे पहातो, कर्तव्याकडे लक्ष देत नाहीं; त्यामुळेंच आज बराचसा अनर्थ माजला आहे. ब्राह्मणांनीं व क्षत्रियांनीं आपल्या हक्कांकडे दृष्टि ठेविली; परंतु ते स्वकर्तव्यापासून पराङ्मुख झाले. ह्या गोष्टी-मुळें स्वाभाविकपणेंच वैर उत्पन्न झालें, व सहकारिता आणि प्रेम ह्यांच्या-ऐवजीं द्वेष मात्र माजला. म्हणूनच सर्वांना समाधानवृत्तीनें प्रगतीच्या मार्गाला लावण्याऐवजीं जातिव्यवस्था हें एक सामाजिक असंतोषाचें उगम-स्थान बनलें आहे.

आतां ही स्थिति सुधारून चांगली स्थिति उत्पन्न करण्यास प्रत्येक मुलाला निदान येवढें तरी करितां येईल कीं, त्यानें अभिमान, दुराग्रह व हक्कांची हांव सोडून आपल्या जातीचे विशिष्ट गुण अंगीं आणण्याचा प्रयत्न करावा. शूद्रांनीं आपणांमध्यें उद्योग, प्रामाणिकपणा हे गुण येऊं द्यावे; वैश्यांनीं तत्परता, तारतम्य व दातृत्व ह्या गुणांचा विकास होऊं द्यावा; धैर्य, उदारपणा व उत्साह ह्या गुणांनीं क्षत्रियांनीं मंडित व्हावें; आणि सहनशीलता, पवित्रता, ज्ञान, स्वार्थत्याग व सत्य ह्या गुणांचा ब्राह्मणांनीं आपणांमध्यें उत्कर्ष होऊं द्यावा. ह्याप्रमाणें जातींनीं आपआपले धर्म जर पाळले तर कदाचित् आजचा वर्णसंकर हलुहळू नाहींसा होईल.

---

ब्राह्मणोऽस्य मुखमासीद्बाहू राजन्यः कृतः।
ऊरू तदस्य यद्वैश्यः पद्भ्यां शूद्रो अजायत ॥ †

---

† ऋग्वेद, १०. ९०. १२. सर्व पुरुषसूक्त वाचलें म्हणजे ब्राह्मण त्या ईश्वराच्या

ब्राह्मण हे त्याचें तोंड, क्षत्रिय हे त्याचे दोन हात, वैश्य ह्या त्याच्या दोन मांड्या व शूद्र हा त्याच्या दोन पायांपासूनच झालेला आहे.

सर्वस्यास्य तु सर्गस्य गुप्त्यर्थं स महाद्युतिः ।
मुखबाहूरुपज्जानां पृथक्कर्माण्यकल्पयत् ॥
अध्यापनमध्ययनं यजनं याजनं तथा ।
दानं प्रतिग्रहं चैव ब्राह्मणानामकल्पयत् ॥
प्रजानां रक्षणं दानमिज्याध्ययनमेव च ।
विषयेष्वप्रसक्तिं च क्षत्रियस्य समादिशत् ॥
पशूनां रक्षणं दानमिज्याध्ययनमेव च ।
वणिक्पथं कुसीदं च वैश्यस्य कृषिमेव च ॥
एकमेव तु शूद्रस्य प्रभुः कर्म समादिशत् ।
एतेषामेव वर्णानां शुश्रूषामनसूयया ॥ †

त्या तेजोमय ईश्वरानें सर्व सृष्टीच्या रक्षणाकरितां, आपलें मुख, बाहू, ऊरु व पाय ह्यांपासून उत्पन्न झालेल्यांना निरनिराळीं कामें नेमून दिलीं.

अध्यापन व अध्ययन करणें यज्ञ करणें, व दुसऱ्यांकडून यज्ञ करविणें, दान देणें व घेणें हीं कामें ब्राह्मणांना नेमून दिलीं.

लोकांचें रक्षण करणें, यज्ञ करणें, दान देणें, अध्ययन करणें व विषयांच्या ठिकाणीं अनासक्ति ठेवणें हीं कामें क्षत्रियांना नेमून दिलीं.

पशूंचें रक्षण करणें, दान देणें, यज्ञ करणें, अध्ययन करणें, व्यापार करणें, पैशांची देवघेव करणें व शेती करणें हीं कामें वैश्यांना नेमून दिलीं.

मत्सरभाव न धरतां ह्या सर्व वर्णांची केवळ सेवा करणें हें एकच काम प्रभूनें शूद्रांना नेमून दिलें. †

---

मुखापासून, क्षत्रिय त्याच्या बाहूपासून व वैश्यशूद्र त्याच्या ऊरू व पायापासून उत्पन्न झाले असा त्या सूक्ताचा अभिप्राय नाहीं हें उघड समजून येतें. ब्राह्मण हा मुखाचे ठायीं तसेंच क्षत्रिय, वैश्य व शूद्र हे बाहु, ऊर व पाय यांचे ठायीं असून या सर्व अवयवांनीं ईश्वर ( पुरुष ) बनतो; इतकेंच पुरुषसूक्तांत अलंकारिक भाषेनें सांगितलें आहे. —भाषांतरकर्ता.

† मनुस्मृति, १. ८७-९१. † विष्णु भागवत, ७. ९. ३५.

यस्य यल्लक्षणं प्रोक्तं पुंसो वर्णाभिव्यञ्जकम् ।
यदन्यत्रापि दृश्येत तत्तेनैव विनिर्दिशेत् ॥ †

ज्या वर्णाच्या मनुष्यांचीं जीं लक्षणें म्हणून सांगितलीं आहेत तीं जर दुसऱ्या वर्णाच्या मनुष्यामध्यें दिसून आलीं तर त्या लक्षणांनीं युक्त अशा वर्णाचा तो आहे असें समजावें.

न योनिर्नापि संस्कारो न श्रुतं न च संततिः ।
कारणानि द्विजत्वस्य वृत्तमेव तु कारणम् ॥ ¶

जन्म, संस्कार, अध्ययन व कुलपरंपरा या कारणांनीं द्विजत्व प्राप्त होतें असें नाहीं. त्याचें आचरण हेंच द्विजत्वाचें एक कारण आहे.

सत्यं दानं क्षमाशीलमानृशंस्यं तपो घृणा ।
दृश्यन्ते यत्र नागेन्द्र स ब्राह्मण इति स्मृतः ॥
शूद्रे तु यद्भवेल्लक्ष्यं द्विजे तच्च न विद्यते ।
नैव शूद्रो भवेच्छूद्रो ब्राह्मणो न च ब्राह्मणः ॥
यत्रैतल्लक्ष्यते सर्प वृत्तं स ब्राह्मणः स्मृतः ।
यत्र नैतद्भवेत्सर्प तं शूद्रमिति निर्दिशेत् ॥ ‡

सत्य, दातृत्व, क्षमा, सदाचार, मार्दव, तप आणि दया हे गुण, हे नागेंद्रा, ज्याच्यामध्यें आहेत त्यालाच ब्राह्मण म्हणावें.

जर हीं लक्षणें शूद्रामध्यें असतील किंवा ब्राह्मणामध्यें दिसून येत नसतील, तर तो शूद्र शूद्र नव्हे व ब्राह्मण ब्राह्मण नव्हे.

हे सर्पा, ज्याच्यामध्यें हें आचरण दिसून येतें त्याला ब्राह्मण म्हणावें, व ज्याच्यामध्यें तें दिसून येत नसेल तो शूद्र समजावा.

आचारहीनं न पुनन्ति वेदा
यद्यप्यधीताः सह षड्भिरङ्गैः ।

---

† यावरून अध्ययनाचें कर्तव्य तिन्ही वर्णांस मनूनें नेमून दिलें आहे हें उघड होतें.—भाषांतरकर्ता. ¶ महाभारत, वनपर्व ३१३, १०८. ‡ महाभारत, वनपर्व १८०. २०, २५, २६.

छंदांस्येनं मृत्युकाले त्यजन्ति
  नीडं शकुन्ता इव जातपक्षाः ॥
आचारहीनस्य तु ब्राह्मणस्य
  वेदा षडङ्गास्त्वखिलाः सयज्ञाः ।
कां प्रीतिमुत्पादयितुं समर्था
  अन्धस्य दारा इव दर्शनीयाः ॥ †

ज्याचें आचरण शुद्ध नाहीं त्यानें षडंगांसहित सर्व वेदांचें जरी अध्ययन केलें तरी त्यानें तो पुनीत होत नाहीं; ज्याप्रमाणें पंख फुटलेले पक्षी घरटें सोडून जातात, त्याप्रमाणें मृत्युसमयीं त्या मनुष्याला ते वेद सोडून जातात. ज्याप्रमाणें अंधाला आपल्या लावण्यवती स्त्रियांचें सौंदर्यसुख मिळत नाहीं, त्याचप्रमाणें आचारहीन ब्राह्मणाला सर्व वेद, त्यांचीं षडंगें व सर्व यज्ञ ह्यांच्यापासून कोणतें सुख मिळणार !

---

† वाशिष्ठस्मृति, ६. ३, ४

# सनातनधर्मप्रवेश.

## भाग ३ रा.—नीतितत्त्वें.

### प्रकरण पहिलें.

### नीतिशास्त्र म्हणजे काय ?

कोणत्याही विषयांतल्या ज्ञात गोष्टींची विवक्षित रीतीनें व क्रमबद्ध रचना झाली म्हणजे त्यालाच शास्त्र असें म्हणतात. नुसती माहिती संकलित केली म्हणजे त्या समुच्चयाला शास्त्र म्हणत नाहींत. प्रत्येक गोष्टीचा परस्पर संबंध दाखविला जाईल अशा रीतीनें विषयाची पद्धतशीर रचना झाली पाहिजे, व त्या गोष्टीचा संबंध दाखविणारीं मूलभूत तत्त्वें ज्ञात झालीं पाहिजेत, म्हणजेच त्याला शास्त्र असें म्हणतां येईल. सुबुद्ध जीवांचें परस्परांशीं व इतर प्राणिमात्रांशीं जें आचरण त्यालाच नीति असें म्हणतात. अर्थात् नीतिशास्त्र म्हणजे सद्गुण व दुर्गुण यांची केवळ यादी नव्हे. नीतिशास्त्र म्हणजे परस्परसंबंध असणाऱ्या आचारविषयक गोष्टींची व त्या संबंधाच्या मूलभूत तत्त्वांची क्रमबद्ध व व्यवस्थित मांडणी होय.

नीति म्हणजेच सदाचार. सत् म्हणजे चांगला व असत् म्हणजे वाईट; चांगला आचार कोणता व वाईट कोणता हें समजण्यासाठीं मनुष्य व त्याची परिस्थिति ह्यांचें ज्ञान आपणांला प्रथमतः झालें पाहिजे.

सर्व जीवांचें कल्याण होणें हाच नीतिशास्त्राचा उद्देश होय; व मनुष्यांनीं परस्परांशीं व आपल्या परिस्थितीशीं सलोख्यानें कसें रहावें हें नीतिशास्त्राच्या द्वारें समजून लोक तसे वागले म्हणजे, हा उद्देश साध्य होतो. ईश्वर प्रेममय आहे. आपल्या विश्वांत सुखसमृद्धि व्हावी अशी त्याची इच्छा असते व त्याप्रमाणें तो हळुहळू घडवूनही आणीत असतो. म्हणजे न्याय्य गोष्ट करतेवेळीं

ती नेहमींच दुःखावह असते असा अर्थ नव्हे; तर ज्या आचरणानें कायम व अबाधित सुख प्राप्त होतें, ईश्वरप्राप्तीचा परमानंद मिळतो व अंतीं मोक्ष प्राप्त होतो तें आचरण चांगलें, असें म्हणण्याचा आमचा भावार्थ आहे. ज्याप्रमाणें बैलांच्या मागोमाग गाडीचीं चाकें जात असतात, त्याचप्रमाणें पापाचरणाच्या मागोमाग दुःख व पुण्याचरणाच्या मागोमाग सुख हीं चालत येतात. पापाचरणाचें फळ चाखतांना गोड लागत असेल, परंतु तें विषवत् असतें व त्यापासून मागाहून तीव्र दुःख उत्पन्न होतें व कधीं कधीं दीर्घकालिक विकारही उत्पन्न होतात. ज्याप्रमाणें एखाद्या अज्ञानी मुलानें बाहेरून गोंडस दिसणारें व जिभेला मधुर लागणारें विषयुक्त फळ चाखावें व नंतर दुःखानें विव्हल होऊन पडावें, त्याचप्रमाणें तात्कालिक सुख देणारें पापाचरण करणाऱ्या मनुष्याची स्थिति होय. प्रत्येक पापाचरण हें विषवत् आहे असें शिष्याच्या मनांत बिंबवून देणें हें नीतिशास्त्र शिकविणाऱ्या प्रत्येक गुरूचें आद्य कर्तव्य होय.

आचारलक्षणो धर्मः संतस्त्वाचारलक्षणाः ।
आगमानां हि सर्वेषामाचारः श्रेष्ठ उच्यते ॥
आचारप्रभवो धर्मो धर्मादायुर्विवर्धते ।
आचाराल्लभते ह्यायुराचाराल्लभते श्रियम् ॥
आचारात्कीर्तिमाप्नोति पुरुषः प्रेत्य चेह च ॥ †

आचार हें धर्माचें लक्षण आहे; व सज्जनाचेंही तेंच लक्षण आहे. सर्व वेदशास्त्रापेक्षांही ( उपदेशापेक्षां ) आचार श्रेष्ठ आहे.

आचारापासून धर्म उत्पन्न होतो, व धर्मापासून आयुष्याची वृद्धि होते. आचारापासून आयुष्य व वैभव प्राप्त होतें.

आचारापासून मनुष्याला इहलोकीं व परलोकीं कीर्ति प्राप्त होते.

आचारः परमो धर्मः श्रुत्युक्तः स्मार्त एव च ।
तस्मादस्मिन् सदायुक्तो नित्यं स्यादात्मवान् द्विजः ॥
एवमाचारतो दृष्ट्वा धर्मस्य मुनयो गतिम् ।
सर्वस्य तपसो मूलमाचारं जगृहुः परम् ॥ ‡

---

† महाभारत, अनुशासनपर्व १०४. ‡ मनुस्मृति, १. १०८, ११०.

श्रुतिस्मृतिनिर्दिष्ट आचार हाच श्रेष्ठ धर्म होय; म्हणून आत्महितेच्छु द्विजानें नेहमीं त्याप्रमाणें वागलें पाहिजे.

ह्याप्रमाणें धर्म हा आचारापासून उत्पन्न झालेला आहे, व सर्व तपाचें तें मूळ आहे, हें जाणून मुनींनी त्याचाच स्वीकार केला.

प्रभवार्थाय भूतानां धर्मप्रवचनं कृतम् ।
यः स्यात्प्रभवसंयुक्तः स धर्म इति निश्चयः ॥
धारणाद्धर्ममित्याहुर्धर्मेण विधृताः प्रजाः ।
यः स्याद्धारणसंयुक्तः स धर्म इति निश्चयः ॥
अहिंसार्थाय भूतानां धर्मप्रवचनं कृतम् ।
यः स्यादहिंसया युक्तः स धर्म इति निश्चयः ॥†
सर्वेषां यः सुहृन्नित्यं सर्वेषां च हिते रतः ।
कर्मणा मनसा वाचा स धर्म वेद जाजले ॥☼

सर्व जीवांच्या अभ्युदयासाठीं धर्म सांगण्यांत आला. जेणेंकरून जीवांचा अभ्युदय होतो तोच धर्म हें निश्चित आहे.

तो सुव्यवस्थित रीतीनें एकत्र धारण करितो म्हणून त्याला धर्म असें म्हणतात. धर्मानेंच सर्व जीवांचें धारण होतें. म्हणून जो धारण करितो तो धर्म असें निश्चित समज.

जीवांची हिंसा होऊं नये म्हणून धर्म सांगण्यांत आला. जेणेंकरून अहिंसा स्थापित होते तो धर्म हें निश्चयानें समज.

हे जाजले, जो सर्वांचा मित्र, व जो कर्मानें, मनानें, वाणीनें सर्वांचें हित करण्याविषयीं तत्पर, त्यालाच धर्म समजला.

न कुर्यात्कर्हिचित्सङ्गं तमस्तीव्रं तितीरिषुः ।
धर्मार्थकाममोक्षाणां यदत्यन्तविघातकम् ॥
तत्रापि मोक्ष एवार्थ आत्यन्तिकतयेष्यते ।
त्रैवर्ग्योऽर्थो यतो नित्यं कृतान्तभयसंयुतः ॥ §

---

† महाभारत, शांतिपर्व १९९. ☼ महाभारत, शांतिपर्व ८८.

§ विष्णुभागवत, ४. २२. ३४, ३५

ज्याला हा तीव्र तमोमय संसार तरून जाण्याची इच्छा आहे त्यानें केव्हांही विषयासक्त होऊं नये; कारण ही आसक्ति धर्म, अर्थ, काम व मोक्ष ह्यांना अत्यंत विघातक आहे.

ह्या चारही पुरुषार्थांमध्येंसुद्धां मोक्ष हेंच श्रेष्ठ अंतिम ध्येय होय; कारण इतर तीनही पुरुषार्थांना सदा काळाचें भय असतें.

धर्मं चार्थं च कामं च यथावद्वदतां वर ।
विभज्य काले कालज्ञः सर्वान्सेवेत पण्डितः ॥
मोक्षो वा परमं श्रेय एषां राजन्सुखार्थिनाम् ॥ †

हे वक्तृशिरोमणे, योग्य समय जाणणाऱ्या पंडितानें धर्म, अर्थ व काम ह्यांमध्यें आपल्या कालाची विभागणी करून त्या सर्वांचें आचरण करावें.

परंतु, हे राजा, सुखाची इच्छा करणाऱ्या सर्व जीवांना मोक्ष हाच परम श्रेयस्कर होय.

---

## प्रकरण दुसरें.

# नीतिशास्त्राचा पाया.

"एकमेवाद्वितीयम्" हें आद्य तत्त्व धर्मानें कंठरवानें सांगितलेलें आपण पूर्वींच ऐकिलें आहे.* जीवात्मे अनंत आहेत असें बाह्यतः आपणांला दिसून येतें; परंतु ते सर्व एकाच परमात्म्याचे अंश किंवा प्रतिबिंबें आहेत. हें जीवात्म्यांचें भिन्नत्व अशाश्वत असून त्यांचें ऐक्य मात्र शाश्वत आहे. एखाद्या विहिरींतून पुष्कळ पोहरे पाण्यानें भरून काढितां येतील; परंतु त्या सर्वांतील पाणी एकस्वरूपीच असतें. तद्वत् ह्या आत्मजलधींतून अनंत उपाधी बुडवून काढिलेल्या आहेत, म्हणून तदंतर्गत आत्मतत्त्व हें सर्व एकस्वरूपीच आहे. धर्माचें हें आद्य तत्त्वच नीतिशास्त्राचा पाया होय.

म्हणून नीतिशास्त्राचा विचार करितांना आत्म्याचें हें एकत्व आपण लक्षांत

---

† महाभारत, वनपर्व ३३. ४२, ४३.
* सनातनधर्मप्रवेश, भाग १, प्रकरण १ लें.

ठेविलें पाहिजे. परंतु येवढ्यानेंच भागणार नाहीं; कारण आत्मैक्यामध्यें "मी" व "तूं" हें शिल्लक रहात नाहीं, व नीतिशास्त्राला तर "मी" व "तूं" ह्यांची अपेक्षा असते. म्हणून अनात्मवस्तूंचें विविधत्वही आपण लक्षांत ठेविलें पाहिजे. म्हणजे शरीरें अथवा उपाधि अनंत असून त्या प्रत्येकामध्यें परमात्म्याचा अंश अथवा प्रतिबिंब जीवरूपानें असतें हें लक्षांत ठेविलें पाहिजे. शरीरें अनेक आहेत, मनेंही अनेक आहेत; हीं जीं मनें व शरीरें, त्यांचा एकमेकांशीं संबंध येतो. आपण एकच आहों, जें सर्वांना साहाय्यकारक तेंच प्रत्येकालाही साहाय्यकारक असतें, व जें एकाला अपायकारक तें सर्वांना अपायकारक असतें, हें तत्त्व विसरून जर प्रत्येक मन व देह दुसऱ्या मनाशीं व देहाशीं वर्तूं लागेल, तर व्यवहार केव्हांही न्याय्य व योग्य होणार नाहीं. दुसऱ्याला अपाय करणें म्हणजे खरोखर स्वतःलाच अपाय करणें होय. हातानें जर पायावर घाव घातला तर पायांतून रक्त वाहूं लागेल, हातांतून नाहीं, हें खरें; तथापि लगेच हाताला क्षीणता येईल; कारण, रक्ताचा प्रवाह सर्व शरीरांत असतो व सर्व अवयवांना एकाच ठिकाणाहून रक्ताचा पुरवठा होतो. त्याचप्रमाणें मनुष्याचें आहे. जर एखादा मनुष्य दुसऱ्याला अपाय करील तर ज्याला अपाय झाला असेल त्याच्याइतकेंच अपाय करणाऱ्यालाही दुःख भोगावें लागतें. फरक येवढाच कीं, त्या दुःखाची जाणीव त्याला ताबडतोब न होतां कालांतरानें होऊं लागते.

तर हाच शुद्धबुद्धीला मान्य असा सद्वर्तनाचा पाया होय. मुलांनीं प्रथमतः मोठमोठ्या ऋषींनीं शास्त्रग्रंथांतून केलेला नैतिक उपदेश प्रमाण धरूनच चाललें पाहिजे; कारण त्यासंबंधानें सारासार विचार करण्याची त्यांची योग्यता नसते व तेवढा वेळही त्यांना नसतो; परंतु आपल्या प्रौढवयामध्यें त्यांना हा सनातनधर्मांतर्गत नैतिक उपदेश आपल्या शुद्धबुद्धीच्या कसोटीला लावून त्याचें सत्यत्व अनुभवितां येईल.

सर्व भूतमात्रांमध्यें एकच आत्मतत्त्व भरलेलें आहे. सर्व जीवात्मे हे त्या एकाच परमात्मतत्त्वाचे अंश अथवा त्याचीं प्रतिबिंबें होत. हें तत्त्व प्रत्येक माणसाच्या हृदयांत पूर्णपणें बिंबून, आपण दुसऱ्याला पीडा केली तर त्याचा प्रत्याघात स्वतःवरच होतो हें त्याला समजून आलें पाहिजे. श्रीकृष्ण म्हण-

तात, हे अर्जुना, सर्व भूतांच्या अंतर्यामीं असणारा आत्मा तो मी, व सर्व भूतांचा आदि, मध्य व अंतही मीच आहें. †

एको देवः सर्वभूतेषु गूढः
सर्वव्यापी सर्वभूतान्तरात्मा ।
कर्माध्यक्षः सर्वभूताधिवासः
साक्षी चेता केवलो निर्गुणश्च ॥ ‡

सर्व प्राणिमात्रांमध्यें गुप्तरूपानें असणारा एकच देव ( आत्मा ) आहे. तो सर्वव्यापी आहे व सर्व भूतांचा अंतरात्मा आहे. सर्व कर्मांवर नजर ठेवणारा तोच आहे व तोच सर्व भूतमात्रांचें आश्रयस्थान आहे. तो सर्वसाक्षी आहे, चैतन्यरूप आहे, एकच आहे व निर्गुण आहे.

एकस्तथा सर्वभूतान्तरात्मा रूपं रूपं प्रतिरूपो बभूव ॥ +

सर्व भूतमात्रांच्या अंतर्यामीं असणारा आत्मा एकच असून निरनिराळ्या आकारांमुळें पृथक् रूपानें दिसतो.

यस्तु सर्वाणि भूतान्यात्मन्येवानुपश्यति ।
सर्वभूतेषु चात्मानं ततो न विजिगुप्सते ॥
यस्मिन्सर्वाणि भूतान्यात्मैवाभूद्विजानतः ।
तत्र को मोहः कः शोक एकत्वमनुपश्यतः ॥ ¶

जो आत्माच्या ठिकाणीं सर्व भूतमात्रांना पाहातो व जो सर्व भूतमात्रांच्या ठिकाणीं एकच आत्मा आहे असें जाणतो तो कोणालाही अप्रिय मानीत नाहीं.

ज्या ज्ञानी मनुष्याला सर्व भूतें आत्मा आहेत असा प्रत्यय आला त्या एकत्व पाहणाऱ्या पुरुषाला मोह व शोक कसे होणार?

सर्वभूतस्थमात्मानं सर्वभूतानि चात्मनि ।
ईक्षते योगयुक्तात्मा सर्वत्र समदर्शनः ॥ ×

---

† अहमात्मा गुडाकेश सर्वभूताशयस्थितः ।
अहमादिश्च मध्यं च भूतानामंत एव च ॥—भगवद्गीता, १०. २०.

‡ श्वेताश्वतरोपनिषत्, ७. २. + कठोपनिषत्, ५. १०.

¶ ईशोपनिषत्, ६. ७. × भगवद्गीता, ६. २९.

ज्याचा आत्मा योगयुक्त झाला त्याची दृष्टि सर्वत्र सम होऊन सर्व भूतांच्या ठायीं आत्मा व आत्म्याच्या ठायीं सर्व भूतें असल्याचें त्याला दिसूं लागतें.

---

## प्रकरण तिसरें.

# नीति व अनीति.

नीति व अनीति हे शब्द प्रत्येकाला माहीत आहेत; परंतु त्यांचा बरोबर अर्थ प्रत्येकाला सांगतां येईल असें नाहीं. म्हणून त्यांचा बरोबर अर्थ काय तें आपण पाहूं या.

भूलोक, भुवर्लोक व स्वर्लोक ह्या तीन लोकांशीं विशेषतः आमचा संबंध आहे हें आपण मागें पाहिलेंच आहे.* ब्रह्मा हे तीनही लोक उत्पन्न करितो, विष्णु त्यांचें रक्षण करितो व महेश त्यांचा लय करितो, हेंही आपणांला माहीत आहे. हे तीन लोक उत्पन्न होतात त्या वेळचा आपण विचार करूं. ह्यांची उत्पत्ति म्हणजे एक प्रकारची प्रवृत्ति होय. अनेक रूपें तयार होतात, तीं वाढतात व विकास पावतात. त्यांना भिन्नत्व प्राप्त होऊन त्या अनेक व्यक्ति बनतात. बाह्य सृष्टींतील अनुभवानें त्या प्रगल्भ बनतात. बाह्य सृष्टींतील नाना प्रकार आपल्या अंतरंगांत नेऊन व ते सर्व आपल्या अंतरंगाशीं एकजीव करून त्या व्यक्तींच्या देहांचा व मनांचा विकास होतो. ह्यालाच प्रवृत्तिमार्ग ( प्र+वृत्ति=पुढें जाणें ) असें म्हणतात. ह्या मार्गावर जीवात्मा बाह्य सृष्टींतील अनेक गोष्टींचा स्वीकार करून आपण इतरांहून निराळी व्यक्ति आहों या भावनेचा परिपोष करीत आपल्या 'अहं'-बुद्धीस दृढता आणितो आणि स्वतःची चिकित्सक बुद्धि बलवान् करितो. ही 'अहं'बुद्धि पूर्णपणें दृढ झाल्यावर सर्वगत अहंस्वरूपी जो ईश्वर त्याचा आपण केवळ एक अंश अथवा प्रतिबिंब आहों, व ह्याच दृष्टीनें जर आपण आपल्या सर्व शक्तींचा उपयोग केला तरच सुख प्राप्त होईल हें जीवात्म्याला पुढें

---

* सनातनधर्मविचार, पूर्वार्ध, भाग १ ला, प्रकरण ६ वें.

शिकावयाचें असतें. नंतर ह्या विविध विश्वाच्या आंत त्याला एकत्व दिसूं लागतें व तो आपला संकुचित व एकाकी अहंभाव सोडून सर्वव्यापी आत्मस्वरूपाकडे आपली दृष्टि लावितो. आपण संपादन केलेल्या शरीरबलाचा व मनोबलाचा उपयोग आपल्याहून दुर्बळ परंतु आपणाशीं वस्तुतः एकस्वरूपी अशा भिन्न देहधारी व भिन्नमनोधारी जीवाच्या कल्याणाकडे करण्यास तो प्रवृत्त होतो. ह्यालाच निवृत्तिमार्ग ( नि+वृत्ति=मागें फिरणें ) असें म्हणतात. ह्या मार्गावर जीवात्मा इतर जीवांप्रीत्यर्थ आपल्या सर्वस्वाचा न्यास करून त्यांच्याशीं तादात्म्य पावण्याचा प्रयत्न करीत असतो.

हे दोन्ही मार्ग म्हणजेच संबंध उत्क्रान्ति होय. ह्या मार्गांनेंच ईश्वरी शक्ति विष्णूच्या स्वरूपानें विश्वास दिशा लावीत असते. ह्या ईश्वरी शक्तीला अनुसरून वागणें म्हणजेच नीति किंवा सद्वर्तन व त्याविरुद्ध वागणें म्हणजेच अनीति किंवा असद्वर्तन होय.

आतां एकंदरीनें सर्व विश्व प्रवृत्तिमार्गावरून निवृत्तिमार्गाकडेच वळावयाच्या स्थानाशीं पोहोंचलेलें आहे. सध्यां बहुतेक सर्व जीव प्रवृत्तिमार्गावरच आहेत; परंतु त्यांची पुढील उत्क्रांति निवृत्तिमार्गांनेंच व्हावयाची आहे. म्हणून ईश्वराशीं तादात्म्यस्थितीला नेऊन पोहोंचविणारा जो निवृत्तिमार्ग त्याचें आक्रमण करण्यास स्वतःला व इतरांना साहाय्यक असणाऱ्या इच्छा, विचार व कर्में करीत असणें हेंच सदाचरण, हीच नीति होय. भिन्नत्व नाहींसें करून ऐक्यवृद्धि करणें हेंच आपलें उद्दिष्ट असलें पाहिजे. जेणेंकरून भिन्नत्व नाहींसें होऊन ऐक्याची वृद्धि होते, ती नीति, तें सत्; व जेणेंकरून ऐक्य मोडून भिन्नत्व वाढतें, ती अनीति, तें असत्. मात्र खालच्या कोटींतील प्राण्यांचें, रानटी मनुष्यांचें व ज्यांचा विकास झालेला नाहीं अशा जीवात्म्यांचें भिन्नत्व हेंच उद्दिष्ट होय. म्हणूनच विकास पावलेल्या जीवांचे नीतीचे व सदाचरणाचे नियम त्यांना लागू पडावयाचे नाहींत. नीति सापेक्ष आहे असें म्हणतात त्याचा हा अर्थ आहे. उत्क्रांतिपथावर आम्ही कोठें आहों यावरच, आमची "नीति" कोणती व "अनीति" कोणती हें अवलंबून आहे.

भीष्मानें युधिष्ठिराला सांगितलें आहे, "नीतिशास्त्र फार सूक्ष्म आहे. मी तुला जी नीति सांगणार आहें ती फक्त वेदाक्षरांच्या आधारानें नव्हे तर

ज्ञान व अनुभव ह्यांच्या कसोटीला वेदांचा जो अर्थ उतरेल त्या अर्थाच्या आधारानें सांगणार आहे. केवळ एकांगी नीतितत्त्वांच्या साहाय्यानें कोणालाही आपली संसारयात्रा पूर्ण करतां येणार नाहीं. सारासार विचारानेंच धर्मग्रंथाचा अर्थ लाविला पाहिजे; नाहींतर भयंकर, विपरीत परिणाम होतील. वेद जर शुद्ध बुद्धीच्या कसोटीला उतरत नसतील तर ते वेदच नव्हेत, हें तत्त्व उशनसूनें फार प्राचीन काळीं सांगितलेलें आहे. संशययुक्त ज्ञान असणें म्हणजे ज्ञान नसल्यासारखें आहे. विशिष्ट परिस्थितीचा विचार न करतां केवळ ग्रंथांतल्या शब्दांच्या आधारावर उभारलेलें नीतिशास्त्र केव्हांही चुकीचेंच ठरणार. भयंकर दुष्काळाच्या प्रसंगीं विश्वामित्रानें चांडाळाकडील निषिद्ध मांसान्न सेवन केलें, व देवादिकांनाही यज्ञद्वारें तेंच अन्न स्वीकारावयास लावून आपलें आचरण निर्दोष ठरवून घेतलें. क्षमाशीलता ही संन्याशाची वृत्ति; ती राजाला नेहमीं उपयोगी नाहीं. स्वतःचें व राष्ट्राचें कल्याण करण्याची जर त्याला इच्छा असेल तर आपल्या प्रजेपैकीं एकाद्या यःकश्चित् मनुष्याचाही कोणी अन्याय केल्यास त्या अन्यायाकडे त्यानें दुर्लक्ष करितां नये. अवध्य मनुष्याचा वध केल्यानें जें पातक लागतें तेंच पातक ज्याचा वध करणें योग्य आहे त्यास न मारल्यास लागतें. राजानें नेहमीं निश्चयानें, इतकेंच नव्हे, तर प्रसंगवशात् कडकपणानेंसुद्धां आपल्या प्रजेला आपापलीं उचित कर्तव्यें करावयास लाविलें पाहिजे. तसें न केल्यास सर्व लोक पशुवत् अनियंत्रितपणानें वागूं लागतील. दुर्बळांचे खून पडतील व प्रत्येकाचा नाश होईल. 'मनोहर भाषण करणारी तीच पत्नी, वडिलांना संतोष देणारा तोच पुत्र, ज्याच्यावर बिनधोक विश्वासून राहातां येईल तोच मित्र व उदरपोषण जेथें होतें तीच मातृभूमि' असें म्हटलेलें आहे. "जुलुमाचा अवलंब न करितां जो कांटेतोलपणानें राज्यकारभार करितो, ज्याच्या राज्यांत सदाचारी लोक निर्भय राहूं शकतात, जो अनाथांचें रक्षण करितो व दुष्टांना शासन करितो तोच खरा राजा होय."†

विशिष्ट काळीं व विशिष्ट परिस्थितींत मनुष्यानें कोणत्या गुणाचा परिपोष केला पाहिजे हें त्याला समजावें व त्याची यथाक्रम उत्क्रांति घडून यावी ह्या हेतूनें वर्णाश्रमांची योजना केलेली आहे. ईश्वरी इच्छा काय आहे हें स्वतःच

† महाभारत–शांतिपर्व, १३९, १४१, १४२.

समजून घेण्याचें सामर्थ्य किंवा वेळ सर्वांनाच नसतो. म्हणून ती त्यांना सांगावी व नीति आणि अनीति ह्यांतील भेद समजून द्यावा, येवढ्यासाठींच शास्त्रांची उत्पत्ति आहे. जेथें एखाद्या प्रश्नामध्यें येणाऱ्या गोष्टी स्पष्ट किंवा असंदिग्ध नसतात तेथें शास्त्रांनीं घालून दिलेले विशेष नियम लागू करणें सुलभ नसतें; किंवा आवश्यकही नसतें. अशा ठिकाणीं उपयोगी पडावें म्हणून कांहीं सामान्य नियम व्यासादिकांनीं शास्त्रग्रंथांमधून सांगितलेले आहेत. त्यांतले कांहीं खालीं दिले आहेतः—

"परोपकार हें पुण्य व परपीडा हें पाप होय."

"आपणांला अप्रिय होईल असें जें वर्तन इतरांनीं आपल्याशीं करूं नये असें एखाद्याला वाटतें त्याच प्रकारचें वर्तन त्यानेंही इतरांशीं करूं नये; व जें स्वतःला प्राप्त व्हावें अशी त्याची इच्छा असते तेंच इतरांनाही प्राप्त व्हावें अशी त्यानें इच्छा करावी."

"जें इतरांना अप्रिय होतें, व जें करतांना आपणांला लाज वाटते असें वर्तन कोणींही करूं नये."†

"स्वतःला अहितकारक असें वर्तन इतरांशीं करूं नये."

सुखाभ्युदयिकं चैव निःश्रेयसिकमेव च ।
प्रवृत्तं च निवृत्तंच द्विविधं कर्म वैदिकम् ॥

---

† अष्टादशपुराणेषु व्यासस्य वचनद्वयम् ।
परोपकारः पुण्याय पापाय परपीडनम् ॥
यदन्यैर्विहितं नेच्छेदात्मनः कर्म पूरुषः ।
न तत्परेषु कुर्वीत जानन्नप्रियमात्मनः ॥
यद्यदात्मनि चेच्छेत तत्परस्यापि चिंतयेत् ॥

—महाभारत, शांतिपर्व २६०, २०, २१, २२.

यदन्येषां हितं न स्यादात्मनः कर्म पौरुषम् ।
अपत्रपेत वा येन न तत्कुर्यात्कथंचन ॥

—महाभारत, शांतिपर्व, १२४. ६७.

अतो यदात्मनोऽपथ्यं परेषां न तदाचरेत् ॥

—याज्ञवल्क्यस्मृति, ३६. ५.

इह चामुत्र वा काम्यं प्रवृत्तं कर्म कीर्त्यते।
निष्कामं ज्ञानपूर्वं तु निवृत्तमुपदिश्यते ॥
प्रवृत्तं कर्म संसेव्य देवानामेति साम्यताम्।
निवृत्तं सेवमानस्तु भूतान्यत्येति पंच वै ॥ †

प्रवृत्त व निवृत्त असे वैदिक कर्मांचे दोन प्रकार आहेत, पहिलें सुखोत्पादक असतें व दुसरें मोक्षदायक असतें.

इहलोकीं अथवा परलोकीं आपणांस अमुक एक मिळावें अशा हेतूनें जें प्रेरित असतें त्याला प्रवृत्त कर्म म्हणतात; व जें वासनारहित व ज्ञानपूर्वक असतें त्याला निवृत्त कर्म म्हणतात.

प्रवृत्त कर्मांच्या आचरणानें मनुष्य देवांशीं साम्य पावतो; व निवृत्त कर्मांच्या आचरणानें पंचमहाभूतांच्या पलीकडे जातो ( मोक्ष पावतो ).

अन्ये कृतयुगे धर्मास्त्रेतायां द्वापरेऽपरे।
अन्ये कलियुगे नृणां युगह्रासानुरूपतः ॥ ❋

कृतयुगांतले धर्म वेगळे, त्रेता व द्वापार यांतले वेगळे, कलियुगांतलेही वेगळे. युगें बदलल्यानें तदनुरूप धर्म वेगळे होतात.

यतः प्रवृत्तिर्भूतानां येन सर्वमिदं ततम्।
स्वकर्मणा तमभ्यर्च्य सिद्धिं विंदति मानवः ॥
श्रेयान्स्वधर्मो विगुणः परधर्मात्स्वनुष्ठितात्।
स्वभावनियतं कर्म कुर्वन्नाप्नोति किल्बिषम् ॥
ईश्वरः सर्वभूतानां हृद्देशेऽर्जुन तिष्ठति।
भ्रामयन्सर्वभूतानि यन्त्रारूढानि मायया ॥
तमेव शरणं गच्छ सर्वभावेन भारत।
तत्प्रसादात्परां शांतिं स्थानं प्राप्स्यसि शाश्वतम् ॥ ✤

• ज्याच्यापासून सर्व भूतांची उत्पत्ति झाली, व ज्यानें हें सर्व विश्व विस्तारिलें आहे, त्याची पूजा आपल्या प्राप्त कर्मांनीं केली म्हणजे मनुष्याला सिद्धि प्राप्त होते.

---

† मनुस्मृति, १२. ८८, ८९, ९०. ❋ महाभारत, शांतिपर्व २३१. २७.
✤ भगवद्गीता, १८. ४६. ४७, ६१, ६२;

परक्याचा धर्म चांगला आचरितां आला तरी त्यापेक्षां आपल्या धर्माचें सदोष आचरणही श्रेयस्कर आहे. आपल्या स्वभावानें नियत केलेलें (ठरलेलें) कर्म केल्यास पाप लागत नाहीं. सदोष असला तरी आपलाच धर्म आपणांस अधिक श्रेयस्कर आहे. आपलें स्वभावसिद्ध कर्म करीत असतां त्यांत कोणतेंही पाप लागत नाहीं.

हे अर्जुना, ईश्वर सर्व भूतांच्या हृदयांत राहून यंत्रावर चढविल्याप्रमाणें सर्व भूतांना आपल्या मायेनें चालवीत असतो.

म्हणून हे भारता, सर्वभावानें त्यालाच शरण जा. त्याच्या अनुग्रहानें परम शांति व नित्य स्थान तुला प्राप्त होईल.

वेदोऽखिलो धर्ममूलं स्मृतिशीले च तद्विदाम्।
आचारश्चैव साधूनामात्मनस्तुष्टिरेव च॥ †

सर्व वेद हें धर्माचें उगम स्थान होय. स्मृति, तसेंच वेदज्ञ ऋषींचें शील, साधूंचा आचार व अंतःकरणाचें समाधान हींही धर्माचीं उगमस्थानें आहेत.

---

## प्रकरण चवथें.

# नीति-अनीतीची कसोटी.

ऐक्याच्या अवस्थेपर्यंत जरी अद्यापि पुष्कळ जीवात्मे येऊन पोहोंचलेले नाहींत, तरी आज आपण उत्क्रांतिपथाच्या ज्या पायरीवर आहों त्या ठिकाणीं 'ऐक्य' हींच आमच्या कर्माची सर्वसाधारण कसोटी आहे. बहुजनसमाजासंबंधानें विचार करीत असतांना अमुक एक गोष्ट नीतीची आहे किंवा नाहीं हें ठरविण्यासाठीं "ती गोष्ट ऐक्यवर्धक आहे काय?" आणि "ती गोष्ट भेदवर्धक आहे काय?" या दोन प्रश्नांच्या कसोटीवर ती घांसून पाहावी. जर पहिल्या प्रश्नास 'होय' असें उत्तर येत असेल तर ती नीतीची आहे, आणि जर दुसऱ्या प्रश्नास 'होय' असें उत्तर येत असेल तर ती अनीतीची

---

† मनुस्मृति, २. ६.

आहे असें समजावें. मनुष्यांनीं परस्परांशीं व आपल्या परिस्थितीशीं सलोख्यानें कसें राहावें हें नीतिशास्त्राच्या योगानें समजतें, असें जें पहिल्या प्रकरणांत म्हटलें आहे, तें याचकरितां होय. सलोख्यानें राहाणें म्हणजेच ऐक्याचें संवर्धन करणें होय.

श्रीकृष्णांनीं दैवी संपत्ति व आसुरी संपत्ति असे जे दोन विभाग केलेले आहेत, त्यांत ज्या गुणांच्या योगानें ऐक्य वाढतें त्यांस दैवी संपत्ति व ज्यांच्या योगानें भेद वाढतो त्यांना आसुरी संपत्ति असें म्हटलें आहे. अभय, शुद्ध सात्त्विक वृत्ति, ज्ञानयोगामध्यें एकनिष्ठता, दातृत्व, दम, यज्ञ, शास्त्राध्ययन, तप, सरळपणा, अहिंसा, सत्य, अक्रोध, त्याग, शांति, कुटिलतेचा अभाव, सर्व भूतांच्या ठायीं दया, आसक्तीचा अभाव, मार्दव, विनय, चंचलबुद्धीचा अभाव, तेजस्विता, क्षमा, धैर्य, शुचिर्भूतपणा, मत्सराचा व अतिमानाचा अभाव, हे गुण मनुष्यांमध्यें ऐक्य घडवून आणणारे असून, वस्तुतः सर्व जीव एक आहेत हें ज्ञान त्यांच्या मुळाशीं आहे. तसेंच दंभ, दर्प, अतिमान, क्रोध, निष्ठुरता आणि अज्ञान हे आसुरी म्हणजे वियोग उत्पन्न करणारे गुण आहेत, हें आपण लक्षांत ठेविलें पाहिजे. श्रीकृष्णांनीं आसुरी मनुष्याचें जें वर्णन केलें आहे त्यावरून तो मनुष्य अहंकार, दर्प व स्वार्थ यांनीं भरलेला असतो असें आढळून येतें.

विद्यार्थ्यानें नीति व अनीति ह्यांतील भेद पूर्णपणें ओळखावयास शिकावें व त्याप्रमाणें आपलें आचरण ठेवावें. पुढें पुष्कळ अध्ययन झाल्यावर नीति-अनीतीसंबंधीं आणखीही विचार त्याला सुचतील, त्यांतील बारिकसारिक भेदही त्याला कळून येतील व त्यांतील बरेच गुंतागुंतीचे प्रश्नही त्याला सोडवावे लागतील. परंतु नीति व अनीति यांची वरील कसोटी कायम रहाणार आहे हें त्यानें ध्यानांत बाळगावें. कारण त्या कसोटीस उत्क्रांतीचा आधार आहे व ती ईश्वरी संकेतास धरूनही आहे.

सर्वेषामपि चैतेषामात्मज्ञानं परं स्मृतम्।
तद् ह्यग्र्यं सर्वविद्यानां प्राप्यते ह्यमृतं ततः॥
सर्वमात्मनि संपश्येत्सच्चासच्च समाहितः।
सर्वं ह्यात्मनि संपश्यन्नाधर्मे कुरुते मनः॥
आत्मैव देवताः सर्वाः सर्वमात्मन्यवस्थितम्।

एवं यः सर्वभूतेषु पश्यत्यात्मानमात्मना ।
स सर्वसमतामेत्य ब्रह्माभ्येति परं पदम् ॥ †

ह्या सर्वांमध्यें आत्मज्ञान हें श्रेष्ठ आहे. त्याच्यायोगानें ब्रह्मप्राप्ति होते, म्हणून तें सर्व विद्यांमध्येंही श्रेष्ठ आहे.

सत् व असत् ह्या सर्वांचा आत्मतत्त्वामध्यें समावेश होतो, हें समचित्त होऊन जाणावें. आत्मतत्त्वामध्यें सर्वांचा समावेश होतो असें जाणणाऱ्याची अधर्माकडे प्रवृत्ति होत नाहीं.

आत्मा म्हणजेच सर्व देवता होत; व त्यामध्येंच सर्वांचा समावेश होतो.

ह्याप्रमाणें सर्व भूतांच्या ठिकाणीं आत्मा आहे असें जो आत्मदृष्टीनें जाणतो तो सर्वत्र समता पावून श्रेष्ठ अशा ब्रह्मपदाला जातो.

---

## प्रकरण पांचवें

# सद्गुण व त्यांचें* मूळ.

परस्परांसाठीं केलेले यज्ञ, किंवा ज्याला परस्परसेवा असेंही म्हणतां येईल ती प्रत्येकानें करावी असें सनातनधर्माचें निक्षून सांगणें आहे, हें आपण पूर्वींच पाहिलें आहे; ज्याअर्थीं त्यायोगें ऐक्यसिद्धि होते, त्याअर्थीं तें सत्कर्म आहे, ती नीति आहे हें सांगावयास नकोच. दैनिक पंचमहायज्ञांच्या योगानें यज्ञ करणारा मनुष्य आणि देव, ऋषि, पितर, मनुष्यें आणि भूतमात्र ह्यांच्यामध्यें ऐक्यभाव वाढतो.

मनुष्याला ऋण तीन प्रकारचें असतें. पहिलें ऋषींचें ऋण. हें मुख्यतः ब्रह्मचर्याश्रमात अध्ययन करून व गुरूची सेवा करून फेडावयाचें असतें. दुसरें पितरांचें ऋण; हें मुख्यतः गृहस्थाश्रमांमध्यें कुटुंबपोषण व दानधर्म करून फेडावयाचें असतें. तिसरें देवांचें ऋण; हें मुख्यतः वानप्रस्थाश्रमामध्यें यज्ञ व तप करून फेडावयाचें असतें. नीति-अनीति किंवा सदाचार-दुराचार लोकांस दाखवून देण्याची सनातनधर्माची दुसरी रीत वरील ऋणें फेडण्याच्या कल्पनेंत अंतर्भूत आहे.

---

† मनुस्मृति, १२.८५,११८,११९,१२५. * भाग १ ला, प्रकरण ४ थें पहा.

आपण दुसऱ्याचें जें देणें लागतों तें ऋण. आपण तें घेतलेलें आहे, म्हणूनच तें आपण देणें लागतों. जें देणें लागतों तें देणें, त्या ऋणाची फेड करणें म्हणजेच कर्तव्य बजावणें होय. तें कर्तव्य बजावणें हाच सद्गुण. न बजावणें हा दुर्गुण. सद्गुणी मनुष्य आपलीं कर्तव्यें व जबाबदाऱ्या ओळखतो व ऋणांची फेड करतो. दुर्गुणी मनुष्य कर्तव्यें ओळखीत नाहीं व ऋणें फेडीत नाहीं.

भीष्मांनीं सद्गुणांना सत्याचीं स्वरूपें असें म्हटलें आहे; कारण सत्य हेंच सत् किंवा भीष्मांनीं म्हटल्याप्रमाणें खरोखरच "सनातन-ब्रह्म"* आहे. सत्य हा ब्रह्माचा स्वभाव होय; व ब्रह्माचें प्रतिबिंबरूप अशी जी बाह्यसृष्टि तींत हें सत्य आपणांला आढळून येतें. कारण सर्व सृष्टिनियम म्हणजे सत्याच्या छाया प्रतिमा आहेत; म्हणूनच सृष्टीच्या नियमांत कदापि बदल न होतां त्यांचें काम अगदीं बिनचूक होत असतें. नानाविध अनात्मवस्तूंमध्यें, कोट्यवधि उपाधींमध्यें एकच आत्मा अनुस्यूत आहे हें परम सत्य आहे. ही सत्याची मुहूर्तमेढ आहे. इतर सर्व सत्यांत जें सत्यत्व आलें आहे, इतर सर्व नियमांत जी सत्ता आली आहे त्याचें कारण इतकेंच कीं, हीं सर्व सत्यें व नियम त्या मुहूर्तमेढीवर अवलंबून आहेत. त्या परम सत्याच्या नाना उपाधींमध्यें प्रतिमा व पडछाया पडलेल्या आहेत. आम्हांपैकीं प्रत्येकाच्या मनांत इतरांसंबंधीं आत्मवत् भावना असली पाहिजे. त्यांच्यामध्यें व आपल्यामध्यें अभेद, निदान सादृश्य तरी, वाटलें पाहिजे; हीच त्या परम सत्याची नीतिशास्त्रांत पडलेली प्रतिमा होय. तें सादृश्य वाटून आपणांला सत्यच बोललें पाहिजे; कारण असत्य बोलणें म्हणजे दुसऱ्यावर गैरविश्वास करणें. तो आपणांहून विसदृश व भिन्न आहे किंवा आपला प्रतिपक्षी आहे असें मानणें होय. सर्व जर मुळांत एकच आहेत, तर जें ज्ञान सर्वांस मिळालें पाहिजे तें असत्य बोलल्यानें दुसऱ्यास मिळण्यास अडथळा करण्यासारखें होतें. समजून-उमजून अथवा न समजतां असत्य भाषण करून हा भेदभाव स्थापित केल्यानें अनंत अपाय होतात व दुर्गुण उद्भवतात. सद्गुणस्वरूपाची ही उपपत्ति पूर्वीं आम्हीं ठरविलेल्या नीतिशास्त्राच्या कसोटीशीं अगदीं तंतोतंत जुळते;

---

* महाभारत, शांति पर्व १६२.

कारण सत्यानें ऐक्यवृद्धि, योगवृद्धि होते व असत्यानें भेदबुद्धि, वियोगवृद्धि होते.

हिंदु वाङ्मयामध्यें उदारचरित मनुष्यांचीं जीं स्वभाववर्णनें केलेलीं आहेत त्यांत सत्याला प्रमुख स्थान मिळालेलें आहे. "माझ्या मुखांतून असत्य वाणी केव्हांही निघालेली नाहीं" असे स्वाभिमानपूर्वक उद्गार सर्व महापुरुषांनीं काढिलेले आहेत. कुरुक्षेत्रावर मी हातामध्यें शस्त्र धरणार नाहीं असें श्रीकृष्णानें वचन दिलें होतें; परंतु अर्जुनाला मदत करण्यासाठीं हातांत चाबूक घेऊन जेव्हां तो भीष्मावर चाल करून गेला, तेव्हां त्यानें दिलेल्या वचनाला स्मरून अर्जुनानें त्याची मदत घेण्याचें नाकारिलें.† ह्याच प्रतिज्ञेस्तव युधिष्ठिरानेंही जयासंबधानें अगदीं निराशा झाली असतां देखील श्रीकृष्णाची मदत घेतली नाहीं.¶ उलटपक्षीं जेव्हां युधिष्ठिर अत्यंत संकटावस्थेमध्यें सत्य विसरला व द्रोणाचार्याला मारण्यास उद्युक्त होऊन असत्य बोलला, तेव्हां पृथ्वीला स्पर्श न करितां चालण्याची त्याच्या रथाची शक्ति नाहींशी होऊन तो रथ जमिनीवर आला.* पांडव वनवासांत असतांना कौरवांचा नाश करण्यासाठीं सैन्य पाठवावें असें एकदां श्रीकृष्णानें युधिष्ठिराला सुचविलें; परंतु तसें केल्यानें तेरा वर्षें वनवास करण्याच्या वचनाचा भंग होतो, हें जाणून युधिष्ठिर श्रीकृष्णाला म्हणाला कीं, "आम्ही पाण्डुपुत्र सत्यापासून निवृत्त होणार नाहीं"× नुकसान होत असलें तरीसुद्धां वचनभंग होऊं नये. जेव्हां प्रल्हादानें इंद्राकडून तिन्ही लोकांचें आधिपत्य मिळविलें तेव्हां इंद्र ब्राह्मणाचें रूप घेऊन शिष्य म्हणून त्याजपाशीं राहिला; व त्याची एकनिष्ठेनें सेवा केली. शेवटीं प्रल्हाद त्याजवर इतका खूष झाला कीं, तो मागेल तें त्याला देण्यास कबूल झाला. इंद्रानें प्रल्हादाचें शील मागितलें; परंतु तें देणें म्हणजे आत्मनाश करून घेण्यासारखें आहे—व त्याप्रमाणें तो झालाही—पण हें माहित असूनही केवळ वचनभंग होऊं नये म्हणून तें त्यानें त्यास दिलें! ऽ

---

† महाभारत, भीष्मपर्व ५९. ¶ महाभारत, भीष्मपर्व ५१.

* महाभारत, द्रोणपर्व २०३. × सत्ये स्थिताः केशव पांडवेयाः—महाभारत, वनपर्व. १८२ ऽ महाभारत, शांतिपर्व १२४.

भीष्माची सावत्र आई सत्यवती हिनें भीष्माला राज्यस्वीकार करून विवाह कर असा त्याच्या प्रतिज्ञेविरुद्ध जेव्हां उपदेश केला तेव्हां भीष्मानें तिला जें उत्तर दिलें आहे तें कोण विसरेल ? तो म्हणाला, "मी तीनही लोकांचा त्याग करीन, स्वर्गाधिपत्य मिळालें तर त्याचाही त्याग करीन किंवा त्याहूनही एखादी श्रेष्ठ वस्तु असेल तर तिचाही त्याग करीन, परंतु सत्य सोडणार नाहीं. कदाचित् पृथ्वी आपला गंध टाकील, जल रसाचा त्याग करील, प्रकाश आपला गुण सोडील, हवेचा स्पर्शगुण नाहींसा होईल, सूर्याचें तेज नष्ट होईल, अग्नीची उष्णता त्याला जाईल, चंद्राचे थंड किरण त्याला सोडून जातील, आकाशाचा ध्वन्युत्पादक गुण लुप्त होईल, इंद्राचें सामर्थ्य नामशेष होईल किंवा न्यायदेवता आपला निःपक्षपातीपणा सोडील, परंतु मी सत्य सोडणार नाहीं."†

महाभारतामध्यें अशी एक गोष्ट आहे कीं, महातेजस्वी, महा अभिमानी परंतु अत्यंत सरळ वृत्तीचा कर्ण अभेद्य कवचासह जन्मास आला. कर्णार्जुनांच्या आगामि द्वंद्वयुद्धामध्यें ह्या अभेद्य कवचामुळें कदाचित् अर्जुनाचा पराजय होईल अशी पांडवपक्षपाती देवांना फार काळजी उत्पन्न झाली. प्रत्येक दिवशीं पूर्वाभिमुख बसून मध्यान्ह होईपर्यंत वेदाध्ययन करावें, व त्या अवधीमध्यें एखादा ब्राह्मण येऊन आपल्याजवळ जर कांहीं याचना करूं लागला तर तो मागेल तें त्याला द्यावें असा कर्णाचा नित्यनियम असे. तेव्हां, दुसरा कांहीं उपाय नाहीं असें जाणून एके दिवशीं देवांचा राजा इंद्र, वृद्ध ब्राह्मणाचें रूप घेऊन कर्णाजवळ आला; व कांहीं मागावयाचें आहे असें म्हणाला. आपल्या आटोक्यांतलें असेल तर तें मी निश्चयानें देईन असें कर्णानें वचन दिलें; तेव्हां तुझ्या शरीरावर उपजतच असलेलें हें कवच मला दे असें इंद्रानें सांगितलें. हें ऐकतांच कर्ण म्हणाला, "तूं साधा निष्कपट ब्राह्मण नव्हेस. तूं देवांचा राजा पांडवांच्या कार्याला मदत करण्याकरितां ब्राह्मणाचें रूप घेऊन आला आहेस हें मला आतां समजलें. परंतु मला माझें वचन अक्षरशः पाळावयाचें आहे. तूं जें मागत आहेस तें देणें म्हणजे माझा प्राणच नव्हे तर प्राणापलीकडचीही वस्तु देण्यासारखें आहे; कारण माझा

† महाभारत, आदिपर्व १०३

प्रतिस्पर्धी योद्धा जो अर्जुन त्याला लढाईंत जिंकण्याचें तें माझें एकच साधन आहे; तरीही तें मी तुला देतों." असें म्हणून त्यानें आपल्या शरीरापासून तें नैसर्गिक कवच स्वहस्तानें कापून काढिलें, व इंद्राला दिलें आणि अर्जुनाचा पराजय करून जी कीर्ति मिळविणार होता त्यापेक्षांही मोठी कीर्ति व दीर्घायुष्य मिळविलें.†

सूर्यवंशांतील दशरथ राजानें देवांनीं विनंति केल्यावरून क्षत्रियधर्माला अनुसरून दैत्यांशीं युद्ध केलें. त्या युद्धांत त्याची कनिष्ठ पत्नी कैकेयी सारथ्याचें काम करीत होती. आणि जेव्हां राजा जखमा होऊन मूर्च्छित पडला तेव्हां मोठ्या चातुर्यानें आपला रथ सुरक्षित जागीं नेऊन तिनें त्याचे प्राण वांचविले. राजानें ह्याबद्दल तिला दोन वर देऊं केले; परंतु पुढें जरूर लागेल त्या वेळीं मागेन, असें म्हणून तिनें ते तसेच ठेविले. नंतर बऱ्याच काळानें आपण वृद्ध झाल्यामुळें वडील पुत्र राम ह्याला युवराज म्हणून अभिषेक करावा असा जेव्हां दशरथानें बेत केला, त्या वेळीं तिनें ते दोन्ही वर मागितले; व राजाचा सर्वांत वडील व लाडका पुत्र राम ह्यानें राज्यत्याग करून वनवास पत्करावा व आपला पुत्र भरत ह्याला राज्याभिषेक व्हावा अशी मागणी केली. हे वर देणें म्हणजे आपल्यावर मृत्युच ओढून घेणें होय, हें जाणूनसुद्धां केवळ वचन पाळण्यासाठीं त्यानें ते तिला दिले व शेवटीं शोकातिरेकामुळें तो मरण पावला. राजाच्या वचनाचा भंग व्हावा व सत्याचा नाश व्हावा, ह्यापेक्षां राजाला मृत्यु आल्यास तो अधिक श्रेयस्कर होय.*

दैत्यांचा राजा बलि स्वर्गलोक जिंकून तीनही लोकांचा अधिपति झाला. त्याला प्रतिस्पर्धी कोणीही राहिला नाहीं. त्याच्या आज्ञेनें अश्वमेधयज्ञाची सर्व तयारी झाली; तेव्हां त्या यज्ञाच्या ठिकाणीं विष्णु वामनरूप धारण करून आला, व आपल्या तीन पावलांनीं व्यापिली जाईल येवढी भूमि आपणाला दे म्हणून म्हणूं लागला. बलीनें तें कबूल केलें. तेव्हां त्याचा गुरु शुक्राचार्य ह्यानें, तो विष्णु आहे, त्याला भूमि देऊं नको असें सांगितलें; परंतु बलि म्हणाला, "हा प्रल्हादाचा नातू केव्हांही असत्य बोलणार नाहीं. विष्णु हा जरी माझा शत्रु असला तरी त्याला दिलेलें वचन मी पाळणार आहें."

---

† महाभारत, वनपर्व ३०३–३०९ * रामायण, अयोध्याकांड.

आणि जेव्हां विष्णूनें आपल्या दोन पावलांनीं त्रिलोक व्यापून टाकिले व तिसरें पाऊल कोठें ठेवूं असें म्हटलें, तेव्हां बलीनें आपलें मस्तक पुढें केलें व आपल्या सर्व राज्यावर मोठ्या आनंदानें पाणी सोडिलें. "तुझी सर्व संपत्ति गेली, वैभव नष्ट झालें, शत्रूंनीं तुला जर्जर केलें, मित्रांनीं सोडिलें, तुझ्या गुरूनें तुझी निंदा करून तुला शाप दिला, तरीसुद्धां तूं सत्य सोडिलें नाहींस." असें म्हणून विष्णूनें बलीला आशीर्वाद दिला.† पुराणांत असें म्हटलें आहे कीं, सत्याचरणाच्या योगानें व विष्णूच्या आशीर्वादानें सध्यांच्या पुरंदर नांवाच्या इंद्रानें आपली जागा सोडिली म्हणजे पुढें तें इंद्रपद बलीला मिळावयाचें आहे.×

ज्याअर्थी सत्य हेंच ब्रह्म आहे त्याअर्थी ब्रह्मपदाची इच्छा करणारांनीं सत्याचरणी असलें पाहिजे. म्हणून मुलांनीं इतर कशाहीपेक्षां सत्याचरणाचा विशेष प्रयत्न केला पाहिजे.

जायमानो ब्राह्मणस्त्रिभिर्ऋणैर्ऋणवाञ्जायते
यज्ञेन देवेभ्यः प्रजया पितृभ्यः स्वाध्यायेन ऋषिभ्यः ॥ *

ब्राह्मण जन्मास आल्यापासून तीन प्रकारांनीं ऋणी असतो. देवांचें ऋण यज्ञ, पितरांचें ऋण प्रजोत्पत्ति व ऋषींचें ऋण अध्ययन, हीं त्याचीं ऋणें असतात.

ऋणानि त्रीण्यपाकृत्य मनो मोक्षे निवेशयेत् ।
अनपाकृत्य मोक्षं तु सेवमानो व्रजत्यधः ॥
अधीत्य विधिवद्वेदान्पुत्रांश्चोत्पाद्य धर्मतः ।
इष्ट्वा च शक्तितो यज्ञैर्मनो मोक्षे निवेशयेत् ॥ ‡

तीनही ऋणांची फेड करून नंतर मोक्षमार्गाकडे आपलें लक्ष लावावें; ऋणाची फेड न करितां मोक्षमार्गाची वाट धरिली तर अधोगतीला जावें लागतें.

---

† विष्णुभागवत, ८. १५–१८

× इंद्र हा देवकोटीच्या अधिपतींची गादी आहे, व्यक्तीचें नांव नव्हे.

* मनुस्मृति. ६.३६ यावरील कुल्लूकभट्टाच्या टीकेंत दिलेला वेदांतील उतारा.

‡ मनुस्मृति, ६. ३५, ३६.

यथाशास्त्र वेदाध्ययन करून, धर्मनियमानुसार प्रजोत्पत्ति करून व यथाशक्ति यज्ञ करून नंतर मोक्षमार्गाकडे मन वळवावें.

परस्परं भावयंतः श्रेयः परमवाप्स्यथ ।
एवं प्रवर्तितं चक्रं नानुवर्तयतीह यः ।
अघायुरिंद्रियारामो मोघं पार्थ स जीवति ॥ ❀

( देव व तुम्ही ) परस्परांची संभावना करून परम कल्याण प्राप्त करून घ्या.

ह्याप्रमाणें सुरू केलेलें चक्र ह्या लोकीं जो पुढें चालवीत नाहीं, त्याचें जीवित पापमय असून, हे पार्था, त्या इंद्रियलंपटाचें जिणें व्यर्थ होय.

सत्यं सत्सु सदा धर्मः सत्यं धर्मः सनातनः ।
सत्यमेव नमस्येत सत्यं हि परमा गतिः ॥
सत्यं धर्मस्तपो योगः सत्यं ब्रह्म सनातनम् ।
सत्यं यज्ञः परः प्रोक्तः सर्वं सत्ये प्रतिष्ठितम् ॥
सत्यं नामाव्ययं नित्यमविकारि तथैव च ।
सर्वधर्माविरुद्धेन योगेनैतदवाप्यते ॥
सत्यं च समता चैव दमश्चैव न संशयः ।
अमात्सर्यं क्षमा चैव ह्रीस्तितिक्षाऽनसूयता ॥
त्यागो ध्यानमथार्यत्वं धृतिश्च सततं दया ।
अहिंसा चैव राजेन्द्र सत्याकारास्त्रयोदश ॥ †

सत्य हाच सज्जनांचा धर्म आहे; व तोच सनातन धर्म होय. त्यालाच नमस्कार करावा; तीच श्रेष्ठ गति होय.

सत्य हाच धर्म, हेंच तप, हाच योग, हेंच सनातन ब्रह्म व हाच श्रेष्ठ यज्ञ होय; म्हणून सर्व कांहीं सत्याच्या ठिकाणीं आहे.

जें अविनाशि, नित्य व विकाररहित त्याचेंच नांव सत्य. धर्मसंमत जो योग त्यानेंच तें प्राप्त होतें.

सत्य, समता, इंद्रियदमन, मत्सराभाव, क्षमा, नम्रता, सहनशीलता, परोत्कर्षसहिष्णुता, त्याग, ध्यान, आर्यत्व, धैर्य, व सतत दयायुक्त अहिंसा, हे सत्याचे तेरा आकार ( स्वरूपें ) होत.

---

❀ भगवद्गीता, ३. ११. १६. † महाभारत, अनुशासनपर्व १६२.

चत्वार एकतो वेदाः सांगोपांगाः सविस्तराः ।
स्वधीता मनुजव्याघ्र सत्यमेकं किलैकतः ॥ †

हे मनुजश्रेष्ठा, चांगल्या रीतानें सांगोपांग व सविस्तर पठन केलेले चारही वेद एकीकडे व केवळ एकटें सत्य एकीकडे, इतकें सत्याचें महत्त्व आहे !

आत्मन्यपि न विश्वासस्तथा भवति सत्सु यः ।
तस्मात्सत्सु विशेषेण सर्वः प्रणयमिच्छति ॥ ☼

लोकांचा जेवढा विश्वास सदाचारी मनुष्यावर असतो तेवढा स्वतःवरही नसतो; म्हणून सर्व लोक विशेषेंकरून सदाचारी मनुष्याची मैत्री संपादण्याची इच्छा करितात.

सतां सदा शाश्वतधर्मवृत्तिः सन्तो न सीदन्ति न च व्यथन्ति ।
सतां सद्भिर्नाफलः संगमोऽस्ति सद्भ्यो भयं नानुवर्तन्ति सन्तः ॥
सन्तो हि सत्येन नयन्ति सूर्यम् सन्तो भूमिं तपसा धारयन्ति ॥
सन्तो गतिर्भूतभव्यस्य राजन् सतां मध्ये नावसीदन्ति सन्तः ॥ ¶

सदाचरणी लोक नेहमीं शाश्वतधर्माप्रमाणें वागतात. ते नाश पावत नाहींत किंवा त्यांना पीडाही होत नाहीं. त्यांचा सहवास केव्हांही निष्फळ नसतो, व त्यांच्यापासून सदाचरणी मनुष्यांना भीतिही नसते.

सदाचरणी लोक सत्याच्या योगानें सूर्याला मार्गदर्शक होतात, व तपाच्या योगानें पृथ्वीला आधारभूत होतात. हे राजा, सदाचरणी लोक पूर्वी होऊन गेलेल्यांना व पुढें होणाऱ्यांना मार्गदर्शक होतात. सदाचरणी लोकांमध्यें सज्जनांचा नाश होत नाहीं.

( यतः प्रभवति ) क्रोधः कामो वा भरतर्षभ ।
शोकमोहौ विधित्सा च परासुत्वं च ( तद्वत् ) ॥
लोभो मात्सर्यमीर्ष्या च कुत्साऽसूयाऽकृपा भयम् ।
त्रयोदशैतेऽतिबलाः शत्रवः प्राणिनां स्मृताः ॥ ‡

हे राजा, क्रोध, काम, शोक, मोह, दुष्टपणा. पीडाजनक वर्तन, लोभ,

---

† महाभारत, वनपर्व ६४. ☼ महाभारत, वनपर्व २९१.
¶ महाभारत, वनपर्व २९१. ‡ महाभारत, शांतिपर्व ३३.

मत्सर, ईर्ष्या, कुत्सितपणा, असूया, तिरस्कार व भ्रांति हे तेराही दुर्गुण ( असत्याचे आकार ) प्राणिमात्राचे बलाढ्य शत्रु होत.

यस्य विद्वान्हि वदतः क्षेत्रज्ञो नाभिशंकते ।
तस्मान्न देवाः श्रेयांसं लोकेऽन्यं पुरुषं विदुः ॥ †

जो बोलला असतां ज्ञानवान् जीवालासुद्धां शंका येत नाहीं त्याच्याहून अधिक कल्याणकारक मनुष्य ह्या विश्वामध्यें देवांनाही माहीत नाहीं.

कर्मण्येवाधिकारस्ते मा फलेषु कदाचन ।
मा कर्मफलहेतुर्भूर्मा ते संगोऽस्त्वकर्मणि ॥ ❀

कर्म करण्यापुरताच तुझा अधिकार आहे; फळाचा विचार तूं करूं नको. अमुक फळ मिळेल असा हेतु ठेवून काम करूं नको, व कर्में न करण्याचाही आग्रह धरूं नको.

ऋतं सत्यं च ब्रह्म । *

सत् व सत्य हेंच ब्रह्म.

---

## प्रकरण सहावें.

# सत्, चित् आणि आनंद.

ईश्वर हा सत्, चित् व आनंदस्वरूपी आहे हें आपण पूर्वी पाहिलेंच आहे;× मनुष्य हा त्याच्याचपासून उत्पन्न झाल्याकारणानें त्याच्यांतही हे गुण आहेत. जेव्हां जीवात्मा जड प्रकृतीनें वेष्टिलेला असतो तेव्हां त्याचें आनंद-स्वरूप बाह्य सृष्टीशीं तादात्म्य पावून तद्द्वारा स्वस्वरूपाचा अनुभव घेण्यास प्रवृत्त होत असतें. ह्या प्रवृत्तीलाच इच्छा अगर वासना असें म्हणतात; जेव्हां तिच्या योगानें जीवात्म्याचा व बाह्य सुखोत्पादक विषयांचा संयोग घडतो व तेणेंकरून पुन्हा पुन्हा तसाच संयोग व्हावा अशी त्याला इच्छा

---

† मनुस्मृति, ८. ९६. ❀ भगवद्गीता, २. ४७.

* नृसिंहोत्तरतापनीयोपनिषत्, १. ६.

× स. ध. प्रवेश, पूर्वार्ध, भाग १, प्रकरण १ पहा.

उत्पन्न होते; तेव्हां ह्या त्याच्या मनोवृत्तीला प्रेम किंवा आवड असें म्हणतात. उलट जेव्हां दुःखोत्पादक विषयांशीं त्याचा संयोग घडतो व तेणेंकरून तशा प्रकारचा संयोग टाळण्याची त्याला इच्छा होते, तेव्हां त्या त्याच्या मनोवृत्तीला द्वेष अथवा नावड असें म्हणतात. पहिल्या मनोवृत्तीनें जीवात्म्याचा विषयांशीं स्नेह जडतो, व दुसऱ्या मनोवृत्तीनें द्वेष उत्पन्न होतो.

ह्या रागद्वेषांचा पुन्हा पुन्हा विचार करून जीवात्मा आपल्या मनोवृत्ति योग्य मार्गानें वळवितो. अशा रीतीनें ईश्वरेच्छेला अनुसरून बुद्धीच्या साहाय्यानें सन्मार्गाला लाविलेल्या वृत्तिच सद्गुण बनतात. म्हणून मनोवृत्तींना सन्मार्गाचें वळण लावणें म्हणजेच मनुष्याचा नैतिक विकास करणें होय. जसजसें स्नेहवृत्तीचें पोषण होत जातें तसतसें उत्तरोत्तर विस्तार पावणाऱ्या भूतसंघांवर, म्हणजे कुटुंब, समाज, राष्ट्र व मानवजाति ह्यांच्यावर आत्मवत् प्रेम करून तो त्यांच्याशीं तादात्म्य करून घेत असतो; व हें प्रेम त्या जीवात्म्याच्या मूळ आनंदस्वरूपाचें उत्तरोत्तर वाढत जाणारें बाह्यस्वरूप बनतें; आणि सर्व विश्वाशीं ऐक्य पावून त्याची पूर्तता होते.

उत्क्रान्तीचा प्रवाह सध्यां आपणांला ऐक्याकडे नेत आहे, अर्थात् सुट्या झालेल्या जीवांनीं परस्परांशीं व ईश्वराशीं तादात्म्य करून घ्यावें असें ईश्वराचें मनोगत आहे, हें आपण नुक्तेंच पाहिलें आहे.

ह्या ऐक्यामध्येंच आनंद आहे; म्हणून सत् ( किंवा नीति ) व आनंद हीं अभिन्न आहेत. सनातनधर्म आपणांला वरचेवर हेंच तत्त्व शिकवीत आहे. "आनंदं ब्रह्म" म्हणजे ब्रह्म आनंदमयच आहे, व जीवात्माही ब्रह्मस्वरूपी असल्याकारणानें तोही आनंदमयच असावयाचा. दुःख होतें तें जेव्हां जीवात्मा ईश्वरेच्छेच्या विरुद्ध जातो, उत्क्रान्तीस विरोध करतो, अनीतीनें वागतो, तेव्हांच होतें.

ब्रह्मैवेदं सर्वं सच्चिदानंदरूपम्
सच्चिदानंदरूपमिदं सर्वम् ॥ †

हें सर्व ब्रह्म आहे, सच्चिदानंदरूप आहे. जें आहे तें सर्व सत्-चित्-आनंदरूपी आहे.

---

† नृसिंहोत्तरतापनीयोपनिषत् ७.

पराञ्चि खानि व्यतृणत् स्वयंभूः ।
तस्मात्पराङ् पश्यति नांतरात्मन् ॥ †

आत्म्यानें बहिर्मुख इंद्रियद्वारें पाडिलीं; म्हणून जीव आंतून बाहेर पाहातो, आंतल्या आत्म्याकडे पहात नाहीं.

यदा वै सुखं लभतेऽथ करोति, नासुखं लब्ध्वा करोति,
सुखमेव लब्ध्वा करोति ॥
यो वै भूमा तत्सुखं, नाल्पे सुखमस्ति, भूमैव सुखम् ।
यत्र नान्यत्पश्यति नान्यच्छृणोति नान्यद्विजानाति स भूमा,
अथ यत्रान्यत्पश्यन्यच्छृणोत्यन्यद्विजानाति तदल्पं, यो
वै भूमा तदमृतमथ यदल्पं तन्मर्त्यम् ॥ ❀

जेव्हां जीवाला सुख प्राप्त होतें तेव्हांच तो कर्माला प्रवृत्त होतो, दुःख-प्राप्ति झाली तर होत नाहीं. सुखामुळेंच त्याची कर्माकडे प्रवृत्ति होते.

जें अनंत आहे तेंच खरें आनंदमय आहे. जें अल्प म्हणजे अंतवत् आहे त्यांत आनंद नाहीं. फक्त अनंत तेंच आनंदमय होय.

जेथें आत्मा ( आपल्याशिवाय ) दुसऱ्याला पहात नाहीं, ऐकत नाहीं, व जाणत नाहीं तेंच अनंत होय. जेथें तो दुसऱ्याला पहातो, ऐकतो व जाणतो तें अल्प अथवा अंतवत् होय. जें अनंत तें अमर्त्य व जें अल्प तें मर्त्य होय.

सुखचैतन्यस्वरूपोऽपरिमितानन्दसमुद्रोऽविशिष्ट-
सुखस्वरूपश्चानन्द इति ॥ ×

आनंद हा सुखस्वरूप व चैतन्यस्वरूप आहे. तो अपरिमित सुखाचा निधि आहे. त्याच्याहून विशेष महत्त्वाचें सुखस्वरूप दुसरें नाहीं.

इष्टविषये बुद्धिः सुखबुद्धिरनिष्टविषये बुद्धिर्दुःखबुद्धिः ॥ ⁂

इष्ट विषयावरील आपला ओढा सुखाची भावना उत्पन्न करितो व अनिष्ट विषयावरील ओढा दुःखाची भावना उत्पन्न करितो.

---

† कठोपनिषत् ४. १.
❀ छांदोग्योपनिषत् ७. २२, २३, २४.
× सर्वसारोपनिषत्.
⁂ सर्वसारोपनिषत्.

सर्वाणि भूतानि सुखे रमन्ते ।
सर्वाणि दुःखस्य भृशं त्रसन्ते ॥ †

सर्वांना सुखामध्यें आनंद वाटतो, व सर्वांना दुःखाचें भय वाटतें.

इच्छाद्वेषसमुत्थेन द्वंद्वमोहेन भारत ।
सर्वभूतानि संमोहं सर्गे यान्ति परंतप ॥ *

हे भारता, इच्छा व द्वेष ह्यांपासून उद्भवणाऱ्या ( सुखदुःखादि ) द्वंद्वांच्या मोहानें सर्व जीव ह्या सृष्टींत मोहित होतात.

इच्छा द्वेषः सुखं दुःखं संघातश्चेतना धृतिः ।
एतत्क्षेत्रं समासेन सविकारमुदाहृतम् ॥

इच्छा, द्वेष, सुख, दुःख, संघात (समूह), चेतना व धैर्य ह्या समुदायास सविकार क्षेत्र असें म्हणतात.

काम एष क्रोध एष रजोगुणसमुद्भवः ॥ ¶

हा काम व हा क्रोध हे रजोगुणापासून उत्पन्न झालेले आहेत.

इन्द्रियस्येन्द्रियस्यार्थे रागद्वेषौ व्यवस्थितौ ।
तयोर्न वशमागच्छेत्तौ ह्यस्य परिपन्थिनौ ॥ ×

इंद्रियें व त्यांचे विषय ह्यांच्यामधील प्रीति व द्वेष हीं मूळचीं इंद्रियांत असतात. ह्या रागद्वेषांच्या ताब्यांत आपण जाऊं नये; कारण ते मनुष्याचे वाटमारे शत्रु होत.

रागद्वेषवियुक्तैस्तु विषयानिन्द्रियैश्चरन् ।
आत्मवश्यैर्विधेयात्मा प्रसादमधिगच्छति ॥ ※

आपलें अंतःकरण ज्याच्या ताब्यांत आहे तो, राग व द्वेष ह्यांपासून मुक्त झालेल्या व आपल्या स्वाधीन असलेल्या इंद्रियांनीं विषयांमध्यें वागूनही प्रसन्न असतो.

---

† महाभारत, शांतिपर्व २३१. २२७. * भगवद्गीता, ७. २७.

¶ भगवद्गीता, ३. ३७. × भगवद्गीता ३. ३४.

※ भगवद्गीता, २. ३४.

यः शास्त्रविधिमुत्सृज्य वर्तते कामकारतः ।
न स सिद्धिमवाप्नोति न सुखं न परां गतिम् ॥ †

जो शास्त्रोक्त विधि सोडून मनास वाटेल त्याप्रमाणें वागतो त्याला सिद्धि प्राप्त होत नाहीं, सुख मिळत नाहीं व उत्तम गतिही मिळत नाहीं.

एको वशी सर्वभूतान्तरात्मा
एकं रूपं बहुधा यः करोति ।
तमात्मस्थं येऽनुपश्यन्ति धीरा-
स्तेषां सुखं शाश्वत नेतरेषाम् ॥ ×

सर्व ज्याच्या स्वाधीन आहे, जो एक सर्वांच्या अंतर्यामी आहे, जो एकाचीं अनेक रूपें करितो, त्या सर्वांतर्यामीं असणाऱ्याला जे बुद्धिमान् पुरुष जाण-तात त्यांनाच शाश्वत सुख लाभतें, इतरांना नाहीं.

---

## प्रकरण सातवें

# स्वविषयक सद्गुण.

जीवात्म्याचा संबंध सर्व बाह्य जगाशीं जोडलेला आहे हें आपणांला माहीतच आहे. हा संबंध शक्य तेवढा गोड व सुखाचा व्हावा हाच नीति-शास्त्राचा उद्देश आहे. परंतु द्रव्याचीं जीं आवरणें स्वतःभोंवतीं जीवान गुंडाळून घेतलेलीं असतात त्या कोशांशीं अगर शरीरांशीं त्याचा अत्यंत निकट संबंध असतो. अर्थात् ह्या स्वतःच्याच शरीरांशीं त्याचा संबंध नीट असल्या-शिवाय अन्य जीवांशीं त्याला नीट ऋणानुबंध ठेवितां येणार नाहीं, ही गोष्ट विसरतां कामा नये. जोंपर्यंत हा जीवात्मा अज्ञ असतो तोंपर्यंत त्याच्या शरीराची सत्ता त्याजवर चालते व त्यामुळें तो अनेक संकटांमध्यें पडतो; परंतु जसजसें त्याला ज्ञान प्राप्त होत जाईल तसतशी तो आपली सत्ता शरीरांवर बसवूं लागतो. त्यासाठीं त्याला कितीतरी खटाटोप करावा लागतो. अशा रीतीनें मनोनिग्रह, म्हणजे जीवात्म्याची शरीरावर सत्ता चालण्याचा गुण वाढत

---

† भगवद्गीता, १६. २३. × कठोपनिषत्, ५. १२.

जातो. सद्गुणांचें वर्गीकरण केलें तर निरनिराळ्या जीवात्म्यांचे संबंध जोडणारे जे सद्गुण तेही निराळे, व एका जीवात्म्याचे स्वतःच्या शरीराशीं संबंध जोडणारे जे सद्गुण तेही निराळे, असा विभाग करावयास हवा. या उत्तरोक्त सद्गुणांस सांप्रत काळीं स्वविषयक सद्गुण असें नांव देत असतात. ज्याचें स्वविषयक वर्तन नीट असेल तोच इतरांशीं अधिक सलोख्यानें वागेल हें कोणालाही सांगतां येईल.

मनूनें आपल्या धर्मग्रंथांत मनोनिग्रहाबद्दल विशेष जोराचें प्रतिपादन केलें आहे. व त्यासंबंधानें फारच उपयुक्त व उपदेशपर असें विवेचन केलें आहे. प्रत्येक कर्माला तीन शक्तींचें अधिष्ठान असतें, व त्या तीनही शक्ति आपण आपल्या ताब्यांत आणल्या पाहिजेत असें त्याचें म्हणणें आहे. "प्रत्येक कर्म काया, वाचा व मन ह्यांपासून उत्पन्न होतें."†

मनोमय कोशांत मनोविकारांचा प्रादुर्भाव होतो. तो कोश अर्थात् मन माणसानें आपल्या स्वाधीन ठेविलें पाहिजे. हें काम सर्वांत कठीण आहे. कारण ज्या विषयांपासून आपणाला सुख होईल असें वाटतें ते विषय प्राप्त करून घेण्यासाठीं मन त्यांच्या मागें धांवत असतें. मनोवृत्ति आपली तृप्ति करण्यासाठीं धडपडत असतात, व मन त्यांच्या आधीन होऊन त्यांना मदत करीत असतें. जीवात्म्यानें आपल्या मनाला ह्या दास्यांतून सोडविलें पाहिजे, व इंद्रियांवर व इंद्रियद्वारांवर मनाची सत्ता चालवून त्यांना स्वतःच्या उपयोगास लावण्यासाठीं स्वाधीन ठेविलें पाहिजे. मनु म्हणतो, "हें मन जिंकिलें म्हणजे दोन्ही प्रकारचें इंद्रियपंचक जिंकल्यासारखें आहे."❀ दोन प्रकारचें इंद्रियपंचक म्हणजे पांच ज्ञानेंद्रियें व पांच कर्मेंद्रियें मिळून दहा इंद्रियें होत.

म्हणून विद्यार्थ्यानें आपलें मन जिंकण्याचा प्रयत्न केला पाहिजे. जर त्याचा वाईट गोष्टींकडे ओढा असेल तर तेथून त्याला मागें फिरविलें पाहिजे व कोणत्या तरी चांगल्या गोष्टीकडे त्याला वळविलें पाहिजे. मनोनिग्रहाचें हें अत्यंत कठीण परंतु अत्यंत आवश्यक असें पहिलें काम आहे.

दुसरें काम वाणीचा निग्रह करणें हें होय. बोलण्यापूर्वी विचार केला पाहिजे. उतावळपणानें बोललें असतां अनेक संकटें उत्पन्न होतात. अर्जुनानें

---

† मनुस्मृति, १२. ३. ❀ मनुस्मृति, २. ९२.

उताविळपणानें बोलून बरींच संकटें ओढून घेतलीं. आपल्या मुलाचा वध करणाऱ्या जयद्रथाला सूर्यास्तापूर्वीं मीं मारलें नाहीं, तर आत्महत्या करीन, अशी अर्जुनानें उताविळपणानें प्रतिज्ञा केली. तेव्हां त्याच्या रक्षणार्थ श्रीकृष्णाला मध्यें पडावें लागलें; व जयद्रथानें आपलें आश्रयस्थान सोडून बाहेर यावें म्हणून अस्त होण्यापूर्वींच सूर्याला अदृश्य करणें भाग पडलें.† त्याचप्रमाणें युधिष्ठिरानें केलेला उपहास सहन न होऊन अर्जुनानें त्याच्याशीं कलह केला.❀ असे आणखीही कांहीं प्रसंग आहेत. उताविळपणानें केलेल्या प्रतिज्ञा त्याला पाळतां आल्या नाहींत, म्हणून महाप्रस्थानाच्या वेळीं त्याला मृत्यु प्राप्त झाला. 'आपल्या सर्व शत्रूंचा एका दिवसांत नाश करीन' अशी अर्जुनानें प्रतिज्ञा केली होती. आपल्या शौर्याबद्दल त्याला गर्व झाला होता; परंतु गर्वोक्तीप्रमाणें त्याच्या हातून घडलें नाहीं. म्हणून तो पतन पावला.× ज्यानें वाणीचा निग्रह केला तो मनोनिग्रहाच्या पुष्कळच जवळ आला असें म्हणण्यास हरकत नाहीं.

तिसरें काम देहनिग्रह करणें, म्हणजे देहसुखासाठीं आपल्या हातून उताविळपणानें कोणतेंही पापाचरण घडूं न देणें, हें होय. श्रीकृष्ण म्हणतात, "देव, ब्राह्मण, गुरु व विद्वान् ह्यांचें पूजन, पवित्रपणा, सरळपणा, ब्रह्मचर्य व अहिंसा ह्यांस शारीरिक तप असें म्हणतात."❋ देहनिग्रह करण्याला लहानपणचाच काळ अत्युत्तम आहे. कारण त्याच वेळीं देहाचा अल्पप्रयासानें निग्रह होतो व त्याला योग्य मार्गाला लावितां येतें; कारण शरीराला जी संवय लावावी ती लागते, व जरी प्रथमतः नवीन संवय लावण्याच्या वेळीं जीवात्म्याच्या इच्छेला देहानें जोराचा विरोध केला, तरी थोड्याशा चिकाटीनें देहास वठणीवर आणितां येतें, आणि मग या नव्या संवयीचा अंगीकार आनंदानें करून त्या मार्गानें तो आपोआप जाऊं लागतो.

दुःखांचीं व संकटांचीं जीं अनेक कारणें आहेत व ज्यांचा मनो-

---

† महाभारत, द्रोणपर्व. ❀ महाभारत, कर्णपर्व.

× महाभारत, महाप्रस्थानिक पर्व.

❋ देवद्विजगुरुप्राज्ञपूजनं शौचमार्जवम् ।
ब्रह्मचर्यमहिंसा च शारीरं तप उच्यते ॥—भगवद्गीता, १७. १४.

निग्रहानें नाश करण्याचा आपण प्रयत्न केला पाहिजे त्यांमध्यें स्वार्थाची लालसा हें एककारण आहे. ऐहिक संपत्ति व ऐहिक सुख ह्यांच्या अत्युत्कट स्वार्थी लालसेनेंच अनेक दुःखें उद्भवतात; तिची पुन्हा पुन्हा तृप्ति करून-सुद्धां समाधान प्राप्त होत नाहीं. तिचा नाश झाला तरच समाधान प्राप्त होतें. हाच अनुभव मंकी ब्राह्मणाला आला; कारण संपत्तीवर अत्यंत लोलुप होऊन ती मिळविण्यासाठीं त्यानें फार प्रयत्न केले, परंतु नेहमीं त्याची निराशाच होत गेली. जें कांहीं धन उरलें त्याचे त्यानें ( शेतीच्या कामाला तयार करण्यासाठीं ) दोन बैल विकत घेतले; परंतु तेथेंही त्याचें दुर्दैव आडवें आलें. कारण त्यांना हांकून नेत असतां त्या बैलांची दोरी वाटेनें जाणाऱ्या उंटाला अडकून ते मरण पावले. ह्या शेवटच्या आघातानें मंकी ब्राह्मणाचे डोळे उघडले. शेवटीं त्याच्या हृदयामध्यें ऐहिक वासनेचा अंशही उरला नाहीं. तेव्हां तो म्हणतो, "ज्याला सुखप्राप्तीची इच्छा असेल त्यानें वासना सोडिली पाहिजे. जो आपल्या वासना तृप्त करूं पहातो त्याच्यापेक्षां जो वासना टाकून देतो तो मनुष्य अधिक श्रेष्ठ गणिला पाहिजे, असें जें शुकानें म्हटलें आहे तें अक्षरशः बरोबर आहे; कारण आपल्या सर्व वासनांची तृप्ति कोणालाही कदापि करितां येणें शक्य नाहीं. हे जीवा, आजपर्यंत तूं वासनेचा दास होऊन राहिला होतास परंतु आतां स्वतंत्रतेचा व शांतिसुखाचा तूं यथेच्छ उपभोग घे. दीर्घ-कालपर्यंत मी अज्ञानांधकारामध्यें गाढ झोंपलों होतों, परंतु आतां तसा झोंपून राहणार नाहीं. मी पूर्ण जागृत झालों आहें. हे वासनांनो, मी आतां तुम्हांला फसणार नाहीं, तुमच्यामुळें ज्या ज्या विषयावर माझें मन आसक्त झालें त्या त्या विषयाच्या मागें, आपल्या वासना पूर्ण होणें शक्य आहे किंवा नाहीं ह्याचा विचार न करितां, गाफील-पणानें लागलों. हे वासनांनो, तुम्ही अज्ञ आहां; तुम्ही मूर्ख आहां. तुमची केव्हांही तृप्ति होत नसते; अग्नीप्रमाणें अधिकाधिक आहुति घेण्याकडेच तुमची प्रवृत्ति असते. आकाशाप्रमाणें तुमची पूर्तता केव्हांही होणार नाहीं. मला दुःखामध्यें लोटावें हाच एक तुमचा उद्देश आहे. आजपासून तुमचा व माझा वियोग झाला आहे. हे वासनांनो, आजपासून मीं तुमचा सहवास सोडला आहे. आतां मला तुम्हांपैकीं एकाचेंही

स्मरणसुद्धां नको. सर्व मनोवृत्तींसह मी तुमचा त्याग करीत आहें. पूर्वी मला निराशेनें पूर्ण ग्रासून टाकिलें होतें. परंतु आतां मला पूर्ण शांति प्राप्त झाली आहे. हे माझ्या शत्रूंनो, माझें मन आतां समाधानें पावलें आहे, इंद्रियें शांत झालीं आहेत, तेव्हां आतां मला जें मिळेल त्यावर मी संतुष्ट राहीन; तुमचें समाधान करण्यासाठीं यत्किंचितही प्रयत्न करणार नाहीं. तुम्हां सर्वांचा मी त्याग करून त्याऐवजीं मनःस्वास्थ्य, आत्मनिग्रह, भूतदया, क्षमा व स्वतंत्रता हीं मिळविलीं आहेत. ''

ह्याप्रमाणें मंकी ब्राह्मणानें थोड्याशा त्यागानें सर्वस्व जें ब्रह्मपद तें प्राप्त करून घेतलें.†

ययाति राजाची गोष्टही अशीच आहे. कधींही तृप्त न होणाऱ्या अशा उद्दाम वासनेनें प्रेरित होऊन ती तृप्त करण्यासाठीं आपल्या स्वतःच्याच मुलाचें तारुण्य त्यानें घेतलें. त्याची गोष्ट अशीः—

सोमवंशांतील नहुष राजाचा पुत्र ययाति हा अतिशय इंद्रिय-सुख-लंपट असल्यामुळें त्याच्या हातून पापाचरण घडलें. तेव्हां त्याचा सासरा असुरांचा गुरु जो शुक्र त्याचा त्याजवर कोप झाला. त्या कोपामुळें ययातीचें तारुण्य नष्ट होऊन त्याला जरा प्राप्त झाली. ययातीनें शुक्राची प्रार्थना केली तेव्हां त्याचा राग शांत होऊन त्यानें असा उच्छाप दिला कीं, तुझ्या पुत्रांपैकीं जर कोणी खुषीनें आपलें तारुण्य तुला देऊन तुझी जरा पत्करण्यास कबूल असेल तर तसा विनियम करून एक हजार वर्षेंपर्यंत तुला तारुण्याचा उपभोग घेतां येईल. ययातीनें आपल्या पांचही पुत्रांना क्रमाक्रमानें विचारिलें, तेव्हां त्याचा कनिष्ठ पुत्र पुरु ह्यानें आदरपूर्वक पितृप्रेमामुळें त्याला आपलें तारुण्य दिलें व त्याची जरा एक हजार वर्षेंपर्यंत आपण घेतली. ह्या दीर्घ कालावधीमध्यें ययातीनें पूर्णपणानें इंद्रियसुखाचा उपभोग घेतला व भौतिक सृष्टींतील सर्व सुखें अनुभाविलीं. परंतु भोगातिरेकानें विटून इंद्रियें सुस्त झालीं तरीसुद्धां त्याची विषयेच्छा एकसारखी वाढतच चालली; उपभोगानें वासना तृप्त होतील ही त्याची

---

† महाभारत, शांतिपर्व १७७.

आशा व्यर्थ झाली. रहाटगाडग्याचें फिरणें जरी संपत नाहीं, तसें वासना तृप्त करण्यासाठीं विषयांमागून फिरत राहिल्यास तेंही संपत नाहीं हें त्याच्या अनुभवास आलें. शेवटीं एक हजार वर्षें पूर्ण होत आलीं तेव्हां त्याच्या मनांत वैराग्य उत्पन्न झालें, व वासनांचें शमन उपभोगानें होत नसून त्यांचा निग्रहच झाला पाहिजे हें त्याला कळून आलें. मग त्यानें पुरूला आपल्याजवळ बोलाविलें आणि मोठ्या आनंदानें त्याजकडून आपली जरा परत घेतली, त्याचें तारुण्य त्याला दिलें, राज्यही त्याच्या स्वाधीन केलें व आपल्या सर्व आयुष्यांतला अनुभव ज्यांत सांठविलेला आहे असा एक श्लोक म्हणत तो वनांत गेला! तो श्लोक असाः—

न जातु कामः कामानामुपभोगेन शाम्यति।
हविषा कृष्णवर्त्मेव भूय एवाभिवर्धते ॥ †

[अर्थ—विषयांच्या उपभोगानें विषयवासना शांत होत नाहींत. उलट उपभोगानें आहुति दिलेल्या अग्नीप्रमाणें त्या बहुगुणित होतात.]

श्रीकृष्णाच्या वाक्यांतील अहिंसा× ह्या शब्दाचा आपण येथें थोडासा विचार करूं. भीष्म म्हणतात, "अहिंसा हा श्रेष्ठ धर्म आहे. म्हणजे आपण कोणालाही अपकार करतां नये. आपल्या आचरणानें कोणालाही पीडा होऊं न देतां उलट मदत झाली पाहिजे. ह्यासाठीं इंद्रियनिग्रह पाहिजे." बृहस्पति म्हणतो, "जो मनुष्य सर्व भूतमात्रांवर दया करितो त्यालाच सर्व सिद्धि प्राप्त होते. जें स्वतःला प्रतिकूल वाटतें असें आचरण माणसानें दुसऱ्याशीं केव्हांही करूं नये. हाच संक्षेपानें आपला धर्म आहे."※

पुष्कळ वेळां मनुष्य केवळ अविचारानें दुसऱ्याला अपकार करीत असतो, व त्यामुळें अनेक संकटें उद्भवतात. युधिष्ठिर, दुर्योधन वगैरे बंधु लहान असतांना एकत्र अध्ययन करीत असत. त्यावेळीं भीम हा त्या सर्वांमध्यें शक्तिमान् असल्यामुळें तो केवळ आपल्या पोरकटपणामुळें त्यांची कुचेष्टा

---

† महाभारत, अनुशासनपर्व. ११६. ३७.

× पान १११ वरील टीपेंत दिलेला श्लोक पहा.

※ महाभारत, अनुशासनपर्व ११३.

करीत असे, आडदांडपणानें त्यांच्याशीं वागत असे व आपल्याहून लहान व दुर्बल मुलांवर आपल्या शक्तीचा प्रयोग करीत असे. एखादेवेळीं बरींचशीं मुलें फळें काढण्यासाठीं वृक्षावर चढलीं असतां ह्यानें त्या वृक्षाला विळखा घालून हालवावें, म्हणजे पिकलेल्या फळां-प्रमाणें तीं मुलें पटापट खालीं पडत. भीमाला ती मजा वाटून तो हंसे, परंतु मुलांना इजा होत असे; येवढेंच नव्हे तर त्यांच्या मनाला या गोष्टी लागून राहूं लागल्या. हस्तिनापूरच्या तटाखालून वाहणाऱ्या नदीमध्यें हीं मुलें पोहावयास गेलीं असतां हा त्यांच्या खालून पोहत जाऊन बऱ्याचशा मुलांना एकत्र धरीत असे व तीं गुदमरेपर्यंत त्यांना पाण्यांत बुडवीत असे ! ह्याची स्वतःची श्वास कोंडून धरण्याची शक्ति विलक्षण असल्यामुळें ह्याला मात्र त्या मुलांप्रमाणें त्रास होत नसे. ह्याला त्या गोष्टींत आनंदच वाटत असे, परंतु इतर मुलांना मात्र अत्यंत दुःख होत असे. त्याचा परिणाम असा झाला कीं, त्यांच्यामध्यें द्वेष व तिरस्कार वाढत जाऊन पुढें कौरव व पांडव ह्या दोघांनाही जाळून खाक करणारा द्वेषाग्नि भडकला. भारतीय महायुद्धाच्या अनेक मुख्य कारणांपैकीं भीमाचा पोरकटपणा हें एक होय. ज्वालाग्राही पदार्थ असल्याशिवाय ठिणगी पेट घेत नाहीं, किंवा शरीरांत दोष असल्या-शिवाय रोगजंतूंस घर करावयास सांपडत नाहीं हें खरें. म्हणून शक्य तेवढी काळजी घेऊन व शक्य असेल तेथपर्यंत ठिणगी पडूं न देणें व प्राणविघातक जंतूंना शरीरांत प्रवेश करूं न देणें हें आपलें कर्तव्य आहे, हें विसरून चालावयाचें नाहीं. आपल्या शक्तीचा दुरुपयोग करून, ज्यांना प्रतिकार करण्याचें सामर्थ्य नाहीं अशा दुर्बळांना आपण अपकार केला, तर त्यांस क्रोध येतो, व प्रथमतः कांहीं काळपर्यंत त्यांस वाव न सांपडला तरी मागाहून त्याचा स्फोट होऊन द्वेष अथवा मत्सर ह्यांमध्यें त्याचें पर्यवसान होतें. अशा रीतीनें द्वेषाग्नि भडकला म्हणजे लोक द्वेष करणारांस नांवें ठेवितात, पण द्वेष करणारापेक्षां दुर्बळावर अपकार कर-णाऱ्या माणसाकडे यांत खरोखरी अधिक दोष येतो. ज्याच्या अंतः-करणांत दुसऱ्यावर जुलूम करण्याची इच्छा लुप्त असते, त्याला वरवर पाह-तांना असलीं कृत्यें निंद्य वाटणार नाहींत, एवढेंच नव्हे तर तीं स्तुत्यही वाटतील; परंतु पीडितांचें रक्षण करणें हेंच ज्यांचें व्रत त्यांच्या न्यायदृष्टीला

असल्या कृत्यांचें सत्यस्वरूप उघड होतें व तीं कृत्यें जुलमी व कुत्सित-पणाचीं दिसतात. जो कोणी महाभारताचें विचारपूर्वक अध्ययन करील त्याला पांडव हे सर्वस्वी निर्दोष आहेत व कौरव सर्वस्वी दोषी आहेत असेंच केवळ वाटणार नाहीं.

काया, वाचा व मन यांचा निग्रह करणें हाच सद्धर्म. या निग्रहानें सत् शील उत्पन्न होतें. सत् शीलाचें व्यक्त स्वरूप सदाचार. माणसास अगदीं निकट असणाऱ्या गोष्टी म्हणजे त्याच्या मनोवृत्ति, व त्याचा देह हीं होत. त्यांशीं स्वतःचा संबंध जसा पाहिजे तसा मनुष्यानें ठेविला व पाश्चात्य नीतिग्रंथांतून ज्यांना Self-regarding किंवा Egoistic म्हणजे स्वविषयक सद्‌गुण म्हणतात ते अंशतः तरी संपादन केले तरच त्यास Altruistic सद्गुण—दुसऱ्या माणसाशीं व्यवहार करतांना आवश्यक असणारे सद्गुण अंगांत आणून अधिक चांगल्या रीतीनें कृतींत उतरवितां येतील.

आतां आपणांला मनुष्यामनुष्यांमधील व्यवहारासंबंधानें उत्पन्न होणाऱ्या सद्गुणांचा व दुर्गुणांचा विचार कर्तव्य आहे. त्यांचे वर्ग असेः—

१. श्रेष्ठांसंबंधानें उत्पन्न होणारे सद्‌गुण व दुर्गुण.

२. बरोबरीच्या लोकांसंबंधानें उत्पन्न होणारे सद्‌गुण व दुर्गुण.

३. कनिष्ठांसंबंधानें उत्पन्न होणारे सद्गुण व दुर्गुण.

या रीतीनें सभोंवतालच्या सर्वांशीं आपले ऋणानुबंध नीट व सुरळीत ठेवण्यास अवश्य असणारे जे सर्व सद्गुण त्यांचे सुबोध व स्पष्ट असे विभाग पाडतां येतात; व कोणते गुण अवश्य आहेत तें या विभागणीवरून नीट समजलें म्हणजे आपणांस ते अंगीं आणण्याचा प्रयत्न करण्यास सोपें जातें. उलटपक्षीं, इतरांशीं आपले संबंध ज्यांमुळें बिघडतात ते दुर्गुणही स्पष्ट रीतीनें नजरेसमोर येऊन त्यांपासून दूर राहण्याचा प्रयत्न करतां येतो. या सर्व सद्-गुणांच्या मुळाशीं शुद्ध प्रेम आहे, व आनंद हें त्यांचें फळ आहे; तसेंच सर्व दुर्गुणांच्या मुळाशीं द्वेष आहे व दुःख हें त्यांचें फळ आहे, हें लक्षांत येणें कठीण नाहीं.

———

शुभाशुभफलं कर्म मनोवाग्देहसंभवम् ।
कर्मणां गतयो नृणामुत्तमाधममध्यमाः ॥
मानसं मनसैवायमुपभुङ्क्ते शुभाशुभम् ।
वाचा वाचाकृतं कर्म कायेनैव तु कायिकम् ॥
वाग्दंडोऽथ मनोदंडः कर्मदंडस्तथैव च ।
यस्यैते निहिता बुद्धौ त्रिदंडीति स उच्यते ॥
त्रिदंडमेतन्निक्षिप्य सर्वभूतेषु मानवः ।
कामक्रोधौ तु संयम्य ततः सिद्धिं निगच्छति ॥ †

बरेंवाईट फळ देणारें कर्म काया, वाचा व मन ह्यांपासून उत्पन्न होतें. कर्मांच्या उत्तम, मध्यम व नीच अशा प्रकारानुसार मनुष्याच्या तीन गति आहेत.

हा जीव मानसिक कर्मांचें मनानें, वाचिक कर्मांचें वाणीनें व कायिक कर्मांचें देहानें बरेंवाईट फळ भोगतो.

वाग्दंड, मनोदंड व कर्मदंड ह्यांच्यायोगानें जो आपल्या चित्ताचें नियमन करितो त्यालाच त्रिदंडी म्हणतात.

सर्वभूतमात्रासंबंधानें ह्या त्रिदंडानें आपलें नियमन करून व कामक्रोधाचें संयमन करून जीवाला सिद्धि प्राप्त होते.

देवद्विजगुरुप्राज्ञपूजनं शौचमार्जवम् ।
ब्रह्मचर्यमहिंसा च शारीरं तप उच्यते ॥
अनुद्वेगकरं वाक्यं सत्यं प्रियहितं च यत् ।
स्वाध्यायाभ्यसनं चैव वाङ्मयं तप उच्यते ।
मनःप्रसादः सौम्यत्वं मौनमात्मविनिग्रहः ।
भावसंशुद्धिरित्येतत्तपो मानसमुच्यते ॥ ❀

देव, ब्राह्मण, गुरु व विद्वान् ह्यांचें पूजन, शुचिर्भूतता, सरळपणा, ब्रह्मचर्य व अहिंसा ह्यांस शारीरिक तप म्हणतात.

कोणालाही उद्विग्न न करणारे, सत्य, प्रिय व हितकारक असें जें भाषण त्याला व स्वतःविषयींचे अध्ययनाला वाचिक तप म्हणतात.

---

† मनुस्मृति, १२. ३, ४. ८, १०, ११. ❀ भगवद्गीता, १७. १४–१६.

मन प्रसन्न ठेवणें, सौम्यता, मौन, मनोनिग्रह आणि शुद्ध भावना ह्यांस मानसिक तप म्हणतात.

न जातु कामः कामानामुपभोगेन शाम्यति ।
हविषा कृष्णवर्त्मेव भूय एवाभिवर्धते ॥ †

उपभोगानें वासना तृप्त होत नसतात; आहुतींच्या योगानें जसा अग्नि प्रज्वलित होतो त्याप्रमाणें त्या त्यायोगें प्रज्वलित होतात.

असंशयं महाबाहो मनो दुर्निग्रहं चलम् ।
अभ्यासेन तु कौंतेय वैराग्येण च गृह्यते ॥
यतो यतो निश्चरति मनश्चंचलमस्थिरम् ।
ततस्ततो नियम्यैतदात्मन्येव वशं नयेत् ॥ ❀

हे महाबाहो अर्जुना, मन हें चंचल असून त्याचा निग्रह करणें दुर्घट आहे ह्याबद्दल कांहींच शंका नाहीं. पण अभ्यासानें आणि वैराग्यानें तें स्वाधीन ठेवितां येतें.

चंचल व अस्थिर मन जिकडून जिकडून बाहेर जाऊं लागेल तिकडून तिकडून त्याचा निरोध करून तें आपल्या ताब्यांत आणावें.

अभ्यासेऽप्यसमर्थोऽसि मत्कर्मपरमो भव ।
मदर्थमपि कर्माणि कुर्वन् सिद्धिमवाप्स्यसि ॥ ×

अभ्यास करण्यासही तूं असमर्थ असशील तर माझ्याकरितां कर्मे करीत जा. माझ्याकरितां कर्मे केल्यानेंही तूं सिद्धि पावशील.

नित्यो नित्यानां चेतनश्चेतनानाम्
एको बहूनां यो विदधाति कामान् ।
तमात्मस्थं येऽनुपश्यन्ति धीराः
तेषां शान्तिः शाश्वती नेतरेषाम् ॥ §

जो नित्यांमधील नित्य, सचेतनांतील सचेतन, जो एक असून अनंत

---

† महाभारत, अनुशासनपर्व ११६.३७. ❀ भगवद्गीता, ६. ३५, २६.
× भगवद्गीता, १२. १०. § कठोपनिषत्, २. १३.

जीवांमध्यें वासना उत्पन्न करितो, त्या आपल्या अंतर्यामी असणाऱ्याला ज्ञानी लोक जाणतात व त्यांनाच शाश्वत शांति मिळते, इतरांना नाहीं.

गोत्रजः सहजशत्रुरित्यसौ
नीतिरस्तु धनलोभदुर्धियाम् ।
वृद्धतुल्यलघुसंवृतं जगत्
धीधनस्य पितृमित्रपुत्रवत् । †

भाऊबंद आपले जन्मतःच शत्रु असतात अशी धनलोभानें दुर्बुद्ध झालेल्या लोकांची नीति असेल; परंतु ज्ञान हेंच ज्यांचें धन अशा लोकांना आपल्याहून वडील, आपल्या बरोबरीचे, व आपल्याहून कनिष्ठ अशांनीं भरलेलें हें सारें जग पितृ, मित्र व पुत्र ह्यांनीं भरल्याप्रमाणें वाटतें.

अविजित्य य आत्मानममात्यान्विजिगीषते ।
अमित्रान्वाऽजितामात्यः सोऽवशः परिहीयते ॥
आत्मानमेव प्रथमं द्वेषरूपेण यो जयेत् ।
ततोऽमात्यानमित्रांश्च न मोक्षं विजिगीषते ॥ ‡

स्वतःला न जिंकतां जो आपल्या अमात्यांना जिंकण्याची इच्छा करितो; अथवा आपल्या अमात्यांना जिंकल्याशिवाय जो आपल्या शत्रूंना जिंकण्याची इच्छा करितो तो निखालस फसतो.

परंतु जो प्रथम स्वतःलाच शत्रु समजून स्वतःस जिंकितो त्याची आपल्या अमात्यांना व शत्रूंना जिंकण्याची इच्छा व्यर्थ होत नाहीं.

धर्मस्य विधयो नैके ये वै प्रोक्ता मनीषिभिः ।
स्वं स्वं विज्ञानमाश्रित्य दमस्तेषां परायणम् ॥
दमं निःश्रेयसे प्राहुर्वृद्धा निश्चितदर्शिनः ।
ब्राह्मणस्य विशेषेण दमो धर्मः सनातनः ॥
अदान्तः पुरुषः क्लेशमभीक्ष्णं प्रतिपद्यते ।
अनर्थांश्च बहूनन्यान्प्रसृजत्यात्मदोषजान् ॥

---

† महाभारत, उद्योगपर्व १. १७.
‡ महाभारत, उद्योगपर्व १२८. २९,३०.

आश्रमेषु चतुर्ष्वाहुर्दममेवोत्तमं व्रतम् ।
तस्य लिंगानि वक्ष्यामि येषां समुदयो दमः ॥
क्षमा धृतिरहिंसा च समता सत्यमार्जवम् ।
इंद्रियाभिजयो दाक्ष्यं मार्दवं ह्रीरचापलम् ॥
अकार्पण्यमसंरंभः संतोषः प्रियवादिता ।
अविहिंसानसूया चाप्येषां समुदयो दमः ॥ †

आपापल्या अनुभवाला अनुसरून असणारे असे धर्मांचे अनेक विधि ज्ञानी मनुष्यांनीं सांगितले आहेत. आत्मनिग्रह ( दम ) हें त्या सर्वांचें मूळ होय.

आत्मनिग्रहानें पारमार्थिक कल्याण प्राप्त होतें असें निश्चित बुद्धीचे वृद्ध लोक म्हणतात. आत्मनिग्रह हा विशेषतः ब्राह्मणांचा सनातनधर्म होय.

ज्याला आत्मनिग्रह नाहीं त्याला वारंवार क्लेशच प्राप्त होतात, व त्याच्या स्वतःच्या दोषांमुळें पुष्कळ अनर्थ उद्भवतात.

चारही आश्रमांमध्यें आत्मनिग्रह हेंच उत्तम व्रत होय. ज्या गुणांच्या समुच्चयानें आत्मनिग्रह उत्पन्न होतो ते गुण मी तुला सांगतों.

क्षमा, धैर्य, अहिंसा, समता, सत्य, सरळपणा, इंद्रियनिग्रह, निपुणता, मृदुत्व, विनय व स्थिरता.

मनाचा खंबीरपणा, चित्तस्वास्थ्य, संतोष, मधुर भाषण, अनपकारपणा व मत्सराभाव ह्या गुणांच्या समुच्चयाला आत्मनिग्रह असें म्हणतात.

धृतिः क्षमा दमोऽस्तेयं शौचमिंद्रियनिग्रहः ।
धीर्विद्यासत्यमक्रोधो दशकं धर्मलक्षणम् ※

धैर्य, क्षमा, आत्मनिग्रह, प्रामाणिकपणा, पवित्रता, इंद्रियनिग्रह, बुद्धि, विद्या, सत्य व अक्रोध हीं धर्माचीं दहा प्रकारचीं लक्षणें आहेत.

अहिंसा सत्यमस्तेयं शौचमिंद्रियनिग्रहः ।
एतं सामासिकं धर्मं चातुर्वर्ण्येऽब्रवीन्मनुः ॥ ×

---

† महाभारत, शांतिपर्व १६०. ६, १७, १३-१६. ※मनुस्मृति, ६.९२.
× मनुस्मृति, १०. ६३.

अहिंसा, सत्य, प्रामाणिकपणा, पवित्रता व इंद्रियनिग्रह हा संक्षिप्त धर्म मनूनें चारही वर्णांमध्यें सांगितला आहे.

सत्यमस्तेयमक्रोधो ह्रीः शौचं धीर्धृतिर्दमः ।
संयतेंद्रियता विद्या धर्मः सर्व उदाहृतः ।[१]

सत्य, प्रामाणिकपणा, अक्रोध, विनय, पवित्रता, बुद्धि, धैर्य, मनोनिग्रह, इंद्रियनिग्रह व विद्या हाच सर्व धर्म असें म्हटलें आहे.

---

## प्रकरण आठवें

# श्रेष्ठांसंबंधींचे सद्गुण दुर्गुण.

निःस्वार्थी प्रेमामुळें आपणांकडून स्वार्थत्याग होतो, व सार्वत्रिक कल्याणाकरितां अवश्य लागणारा आत्मनिग्रहही होतो; म्हणून हें निःस्वार्थ प्रेम सर्व सद्गुणांचें, सर्व ऐक्योत्पादक गुणांचें उगमस्थान होय. उलटपक्षीं, दुसऱ्याकडून मिळेल तेवढें घ्यावें, व दुसऱ्यांना अपाय झाला तरी तो करून स्वतःच्या उपभोगाकरितां सर्व विषय मिळवावे, ही प्रवृत्ति द्वेषामुळें उत्पन्न होते; म्हणून द्वेष हा सर्व दुर्गुणांचें, सर्व भेदोत्पादक गुणांचें मूळ होय. दुसरें असें कीं, ज्या वेळीं आपण प्रिय मनुष्याकरितां स्वार्थत्याग करितों त्या वेळीं त्या त्यागामध्येंच आपणांला आनंद होतो; व त्यावरून आपणांस समजून येतें कीं, खरें सुख, खरा पूर्णानंद दुसऱ्यास देण्यांत असतो, त्याचेकडून घेण्यांत असत नाहीं; व तो जीवात्म्याचा आनंद असल्यामुळें दुसऱ्याकडून घेण्यांत जें देहास सुख वाटतें त्या देहसुखाहून तो भिन्न असतो.

आतां प्रेमाच्या योगानें मनुष्याचें आपल्या श्रेष्ठांशीं म्हणजे ज्यांच्या आश्रयाची त्याला अपेक्षा असते अशा लोकांशीं कोणत्या प्रकारचें वर्तन असावयास पाहिजे तें पाहूं. मनुष्यास श्रेष्ठ म्हणजे ईश्वर, राजा, आईबाप, गुरु व वृद्ध मनुष्यें हे होत.

ईश्वरावरील प्रेम व्यक्त होण्याचे मार्ग म्हणजे म्हटले **पूज्यभाव, भक्ति,**

---

[१] याज्ञवल्क्यस्मृति, ३. ६६.

पूजा व त्याच्या इच्छेनुसार वर्तन हे होत. सर्व ईश्वरभक्तांमध्यें हे गुण दिसून येतात. विष्णूचा अवतार जो श्रीकृष्ण त्याजवर भीष्माचा पूज्यभाव व भक्ति केवढी होती ती पहा. युधिष्ठिराच्या राजसूय-यज्ञाच्या वेळीं पहिलें अर्घ्य श्रीकृष्णाला द्यावें असें भीष्माचें म्हणणें पडलें; व "पुराणपुरुष जो श्रीकृष्ण त्याचें पूजन ज्याला पसंत नसेल त्याचें सांत्वन करणें किंवा त्याच्याशीं नम्र भाषण करणें योग्य नाहीं, व जो श्रीकृष्णाची पूजा करणार नाहीं. तो जिवंत असला तरी मृतच समजावा,"† असें नारदानें निक्षून सांगितलें. त्याचप्रमाणें भीष्म ज्या वेळीं शरपंजरीं पडला तेव्हां तो कायावाचामनानें श्रीकृष्णाचेंच ध्यान करीत राहिला व त्याचा आशीर्वाद मिळवावा हाच एक त्याचा हेतु होता.❀ विष्णुसहस्रनाम म्हणून त्यानें त्याचें स्तवन केलें, व शेवटीं सर्वांचा निरोप घेण्यापूर्वीं हा लोक सोडण्याला श्रीकृष्णाचीच परवानगी मागितली.×

हिरण्यकश्यपूचा मुलगा प्रल्हाद हाही भक्तशिरोमणींपैकींच होता. त्याची भक्ति पराकाष्ठेची होती. आपल्या सर्व गुरूंच्या उपदेशाला न जुमानितां तो अव्याहत हरीचेंच कीर्तनस्तवन करीत असे. बापानें त्याला धमकावण्याचा व ठार मारण्याचा पुष्कळ प्रयत्न केला, परंतु व्यर्थ. त्याला तुडवून ठार मारण्याकरतां हत्ती पाठविले ते मागें फिरले. त्याला चिरडून मारण्याकरितां मोठमोठ्या शिळा त्याच्या अंगावर फेकल्या, त्याही कापसाप्रमाणें हलक्या झाल्या. त्याचें डोकें उडविण्याकरितां तरवारीचा घाव घातला, पण तीही बोथट होऊन लागना; ठार करण्यासाठीं विष दिलें, परंतु तेंही पाण्याप्रमाणें निर्दोष बनलें! शेवटीं ईश्वरानें नृसिंहाचा अवतार घेऊन तो स्वतः स्तंभांतून बाहेर प्रगट झाला व आपल्या भक्ताला छळणाऱ्या त्याच्या त्याच्या दुष्ट पित्यापासून त्यानें त्याला मुक्त केलें.❋

ध्रुव आपल्या सावत्र आईच्या निर्दय वर्तनाला त्रासून बापाच्या राज्याचा त्याग करून चालता झाला, व तो ईश्वराचा इतका एकनिष्ठ भक्त बनला, व त्यानें ईश्वराची इतक्या निश्चयानें उपासना केली कीं, ईश्वरानें शेवटीं

---

† महाभारत, सभापर्व ३८.८. ❀ महाभारत, शांतिपर्व.

× महाभारत, अनुशासनपर्व १४९. ❋ विष्णुपुराण, १.१६ २०

त्याला दर्शन देऊन त्रिलोकींच्या मर्यादेवरील ध्रुवपदावर अढळ बसविलें व त्या ठिकाणीं त्याचें आधिपत्य कायम झालें.❀

केव्हांही न चुकतां ईश्वरेच्छेनुसार वर्तणें हा गुण, मनुष्यस्वभावाचा परिपूर्ण आदर्श ज्या पुरुषामध्यें प्रतिबिंबित झाला आहे त्या श्रीरामचंद्राच्या चरित्रामध्यें ढळढळीतपणें दिसून येतो. राज्याचा अकस्मात् त्याग करून त्याला जो दीर्घ वनवास पत्करावा लागला त्यामध्यें, जें जें कांहीं घडतें तें ईश्वरेच्छेप्रमाणेंच घडतें, असें तो आपल्या सहचरांना वारंवार सांगून त्यांचें सांत्वन करीत असे व आपण स्वतः ह्या अनित्य सृष्टीमधील नित्य व सत्स्वरूपी जो ईश्वर त्यावर चित्त ठेवून त्या विपत्स्थितीमध्येंही पूर्ण समाधानानें राहात असे.

उलटपक्षीं, ईश्वरेच्छेला प्रतिरोध करून राहणारांचा कसा नाश होतो याचींही उदाहरणें ग्रंथांत आहेत. लंकाधिपति रावणासारखे बलाढ्य राजे ईश्वराचे प्रतिस्पर्धी बनून व ईश्वराच्या सृष्टीसंबंधीं सदिच्छेला विरोध करून नाश पावले.† मगधाधिपति जरासंध, कैद केलेल्या राजांना बंधमुक्त करण्याविषयीं त्याला श्रीकृष्णानें सांगितलें असतांही ऐकेना, म्हणून त्यास भीमाचे हातून मरण आलें.* ईश्वराला न जुमानल्यामुळें शिशुपाल सुदर्शनचक्राला बळी पडला.× श्रीकृष्णानें केलेल्या उपदेशाचा दुराग्रहपूर्वक धिक्कार करून दुर्योधनानें आपले मित्र व अनुचर यांसह आपला नाश करून घेतला.† असलीं आणखीही पुष्कळ उदाहरणें देतां येतील. सर्वांचा निष्कर्ष येवढाच कीं, ईश्वराशीं द्वेषबुद्धि बाळगणारांचा नाश निश्चयानें होतो.

देशाच्या अधिपतीवर पूर्ण निष्ठा-राजनिष्ठा-असली पाहिजे अशीं शास्त्रवचनें आहेत, इतकेंच नव्हे तर ग्रंथांत तें उदाहरणें देऊनही सांगितलें आहे. इंद्रप्रस्थामध्यें युधिष्ठिर राज्यपदारूढ असतांना त्याचे चौघेही बंधु शत्रूंना जिंकण्यासाठीं जात असत व मिळालेलें सर्व द्रव्य राजाच्या स्वाधीन करीत असत; ते स्वतःकरितां न लढतां राज्याकरितां लढत असत.❀ म्हणून

---

❀ विष्णुपुराण, १.११,१२. † रामायण, युद्धकांड. * महाभारत, शल्यपर्व २०
× महाभारत, शल्यपर्व ४९. † महाभारत, शल्य आणि सौप्तिकपर्व.
❀ महाभारत, सभापर्व २५–३३.

युधिष्ठिराला द्यूतांत हरल्यानंतर जेव्हां वनवास पत्करावा लागला, व धृत-राष्ट्राला आपला राजा असें मानण्यास कबूल न होतां, जेव्हां सर्व प्रजाजन युधिष्ठिराच्या बरोबर वनांत जावयास निघाले, तेव्हां त्या राजनिष्ठ युधिष्ठिरानें त्या सर्वांना, तुम्ही हस्तिनापुराला परत चला व आपल्या राजाची आज्ञा पाळा, कारण तेणेंकरूनच राष्ट्राचा अभ्युदय होणार, असें निक्षून सांगितलें.†

राजाची स्वकर्तव्यावर पूर्ण निष्ठा असली पाहिजे अशी शास्त्राची आज्ञा होती, व राजपदाचें उच्चतम ध्येय राजासमोर ठेवण्यांत आलें होतें. त्यामुळें प्रजेमध्यें राजनिष्ठेचा विकास सहजच होत असे. युवनाश्वाचा पुत्र राजा मांधाता, ह्याला अंगिरस वंशांतील उतथ्यानें उपदेश केला कीं, "राजाची योजना त्यानें धर्माचें रक्षण करावें म्हणून असते, स्वतःच्या लहरीप्रमाणें वागावें म्हणून नसते. हे मांधात्या, राजा हा सृष्टीचा पालनकर्ता आहे. जर तो धर्मानें वागत असला तरच त्याला ह्या पृथ्वीवर खऱ्याखुऱ्या देवाची योग्यता प्राप्त होते; परंतु जर तो अधर्मानें वागत असेल तर त्याला नरकवास प्राप्त होतो. सर्व जीवांचें अधिष्ठान धर्म आहे व धर्माचें अधिष्ठान राजा आहे. जो धर्मरक्षण करितो तोच खरा राजा होय. जर तो अधर्मानें वागणाऱ्या लोकांना शिक्षा न करील तर देव त्याला सोडून जातील व लोकांकडूनही त्याला दोष लागेल.❀

देशभक्ति अथवा स्वदेशावरील प्रेम, आणि **लोककल्याणेच्छा**, अथवा स्वतःपेक्षां लोकहिताची अधिक कळकळ असणें ह्या दोन्ही गुणांचें राज-निष्ठेशीं इतकें जवळचें नातें आहे कीं, त्यांचा वियोग केव्हांही होतां कामा नये. "राजा व देशभूमि" या दोन्हींसंबंधानें खरी निष्ठा पाहिजे. राष्ट्र-हिताची कळकळ व स्वदेशप्रीत्यर्थ आत्मत्यागाची तत्परता प्रत्येक व्यक्तीमध्यें असली पाहिजे; कारण स्वदेशभूमिप्रेम व लोककल्याणेच्छा ह्या गुणांशिवाय राष्ट्राचें वैभव केव्हांही टिकणार नाहीं; व राष्ट्राचें वैभव म्हणजेच शेवटीं कुटुंबाचें व व्यक्तीचें वैभव होय. हा संबंध शरीर व अवयव ह्यांच्या संबंधा-प्रमाणें नित्य व अविभाज्य आहे. लोककल्याणेच्छेमुळें मनुष्याला स्वदेशाची उन्नति अथवा अवनति स्वतःच्या उन्नतीप्रमाणें अथवा अवनतीप्रमाणें वाटते,

---

† महाभारत, वनपर्व. ❀ महाभारत, शांतिपर्व ९०.

व तसें खरोखर वाटलेंही पाहिजे. ह्या लोककल्याणेच्छेमुळेंच त्याच्याकडून अन्यायापासून दुर्बलांचें रक्षण करण्याचा, जुलमाचा प्रतिकार करण्याचा, धर्माचें रक्षण करण्याचा, न्यायाची बाजू सांभाळण्याचा, व कोणालाही समाजहिताकडे दुर्लक्ष करून अयोग्य रीतीनें स्वार्थसाधन करूं न देण्याचा आणि त्याचप्रमाणें आपल्या सामाजिक कर्तव्यांची टाळाटाळ करून समाजाला कोणालाही फसवूं न देण्याचा प्रयत्न होत असतो. प्राचीन आर्यावर्तांतील थोर वीरांना "परहिततत्पर" असें विशेषण मिळालेलें सर्वत्र आढळतें. भगवद्गीतेमध्यें श्रीकृष्णानें अर्जुनाला लोकसंग्रह करण्याचा उपदेश केलेला आहे.† जो मनुष्य केवळ स्वतःचाच व स्वतःच्या कुटुंबाचाच विचार करितो त्याला अदूरदर्शी म्हणण्यास हरकत नाहीं, कारण तेणेंकरून तो आपल्या व आपल्या कुटुंबाच्या भावी अकल्याणाचीच तयारी करीत असतो.

मनुष्यामध्यें जे कांहीं सद्गुण अवश्य असले पाहिजेत असें सनातनधर्माचें विशेष आग्रहाचें म्हणणें आहे, त्यांपैकीं वडिलांची आज्ञा पाळणें—**आज्ञाधारकत्व** हा एक होय. रामचंद्रानें आपल्या वडिलांची आज्ञा कशी पाळिली ती पहा. जेव्हां दशरथ राजानें मोहवश होऊन रामाला वनवासाला पाठविण्याचें कबूल केलें, आणि रामाला आपली इच्छा बोलून दाखविण्याची भीति वाटते असें कैकेयी रामाला म्हणाली, तेव्हां तो लगेच म्हणाला, "हे माते, राजाची इच्छा काय आहे तें सांग; ती मी अक्षरशः पाळण्यास तयार आहें. वडिलांची सेवा करणें व त्यांची आज्ञा पाळणें ह्यापेक्षां दुसरी कोणतीही सेवा श्रेष्ठ नाहीं." दशरथाच्या ह्या आज्ञेचें उल्लंघन करावें म्हणून नानातऱ्हेनें जेव्हां त्याला सांगण्यांत आलें, तेव्हां तो निग्रहानें म्हणाला, "वडिलांची आज्ञा मोडण्याचें सामर्थ्य माझ्या अंगीं नाहीं. त्यांच्या आज्ञेप्रमाणेंच वागण्याचा माझा निश्चय आहे."❀ कांहीं काळानंतर जेव्हां दशरथ राजा मृत्यु पावला व भरत आपण राज्याचा स्वीकार न करितां रामानेंच सिंहासनारूढ व्हावें अशी सद्गदित अंतःकरणानें त्याची विनवणी करूं लागला, तेव्हां रामानें उत्तर दिलें कीं, मला राजानें वनवासास पाठविलें आहे

---

† भगवद्गीता, ३. २०, २५. ❀ रामायण, अयोध्याकांड १५–३०.

व तुला सिंहासनारूढ केलें आहे; म्हणून प्रत्येकानें पित्राज्ञेप्रमाणें, आपणाला नेमून दिलेलें काम केलें पाहिजे. "वडिलांनीं मला जी आज्ञा केली आहे ती केव्हांही अन्यथा होतां कामा नये."†

अपवित्र अशा व्याधकुलामध्यें असलेल्या एका ब्रह्मज्ञान्याची गोष्ट महाभारतामध्यें दिली आहे. त्या व्याधाजवळ ज्ञान संपादन करण्यासाठीं एके समयीं कौशिक नांवाचा एक ब्राह्मण आला. त्याला त्यानें आपल्या वृद्ध मातापितरांकडे नेलें. त्यानें मातापितरांना एका सुंदर खोलीमध्यें ठेविलें होतें; त्यांच्याकडे त्या ब्राह्मणाला नेऊन तो म्हणाला कीं, मला जें ज्ञान व समाधान प्राप्त झालें आहे तें मातृपितृभक्तीमुळेंच होय. वडिलांच्या चरणांवर मस्तक ठेवून त्यानें त्या कौशिक ब्राह्मणाची त्यांना ओळख करून दिली व नंतर तो म्हणाला, "माझे आईबाप हेंच माझें दैवत; देवांची जशी पूजा करावी तशी मी ह्यांची करितों. ज्ञानी माणसें तीन अग्नींची जी किंमत समजतात तितकीच पूज्यता मला यांच्याविषयीं वाटते. हे ब्राह्मणा, माझे यज्ञ व चतुर्वेद सर्व हेच आहेत. आई, बाप, अग्नि, आत्मा व गुरु हे पंचही परमपूज्य आहेत." नंतर तो पुनः त्याला म्हणाला कीं, तूं वेदाध्ययन करण्याच्या इच्छेनें आपल्या आईबापांना सोडून आलास ही मोठी चूक केलीस. तूं पुन्हां परत जा व त्यांचें सांत्वन कर. "तूं आपल्या आईबापांजवळ परत जा, व त्यांची निरलसपणें सेवा कर; कारण ह्याच्यापेक्षां दुसरा कोणताही धर्म श्रेष्ठ आहे असें मला वाटत नाहीं."❀

आपल्या बापाचें प्रेम ज्या स्त्रीवर गुप्तपणानें जडलें होतें ती त्याला प्राप्त व्हावी म्हणून भीष्मानें राज्यावरील आपला हक्क सोडण्याची व आमरण ब्रह्मचर्यव्रत पाळण्याची प्रतिज्ञा केली, व त्या योगानें तो इच्छामरणी बनला, ही गोष्ट कोणाला माहीत नाहीं? सोमवंशांतील शंतनु राजाला सत्यवती नांवाच्या एका सुंदर स्त्रीशीं विवाह करावा अशी इच्छा झाली; परंतु आपला पुत्र भीष्म ह्याच्यासाठीं त्याचें मन तळमळूं

---

† रामायण, अयोध्याकांड ९०. ❀ महाभारत, वनपर्व २१

लागलें. सावत्र आई आपल्या प्रिय पुत्राशीं कदाचित् चांगल्या रीतानं वागणार नाहीं असें त्याला वाटूं लागलें. ह्या काळजीचा परिणाम शंतनु राजाच्या चेहऱ्यावर स्पष्ट दिसूं लागला, म्हणून भीष्मानें आपल्या अमात्यांजवळ चौकशी केली. तेव्हां त्याला त्याचें कारण कळलें. तो सत्यवतीच्या बापाकडे गेला व आपल्या बापाबरोबर तिचें लग्न लावावें अशी तो त्याची विनंति करूं लागला. तेव्हां सत्यवतीचा बाप म्हणाला, "राजा वृद्ध झाला आहे; त्याच्या मागाहून लवकरच तूं गादीवर बसशील, म्हणून तूंच तिच्याबरोबर लग्न करावें अशी माझी इच्छा आहे," परंतु भीष्म म्हणाला, "असें बोलूं नको; ज्या अर्थी तिच्याबरोबर लग्न करावें अशी माझ्या बापाची इच्छा आहे त्या अर्थी ती आतां माझी आई आहे. म्हणून तूं ती माझ्या पित्याला अर्पण कर" तेहां सत्यवतीचा बाप म्हणाला, "जर तिचा मुलगा गादीचा वारस होईल तरच मी ती त्याला देईन." भीष्मानें लगेच उत्तर दिलें, "मी माझा गादीचा हक्क सोडून देण्याचें तुला अभिवचन देतों. माझ्या त्या धाकट्या भावालाच मी सिंहासनावर बसवीन." परंतु सत्यवतीचा बाप पुन्हा म्हणाला, "तूं दिलेलें वचन केव्हांही खोटें होणार नाहीं हें मला माहीत आहे; परंतु तुला पुत्र होतील ते गादीवर हक्क सांगणार नाहींत म्हणून कशावरून ?" तेहां भीष्मानें उत्तर दिलें, "मी केव्हांही लग्नच करणार नाहीं अशी प्रतिज्ञा करितों, म्हणजे गादीवर हक्क सांगण्याला कोणी उत्पन्नच होणार नाहीं. आतां तरी माझ्या बापाची इच्छा पूर्ण होऊं दे." ही कठोर प्रतिज्ञा ऐकून देव आकाशवाणीनें म्हणाले, "भीष्म हा आजपर्यंत देवव्रत या नांवानें प्रसिद्ध आहे; आतां तो भीष्म† ह्या नांवानें प्रसिद्ध होईल." भीष्म या नांवाचा अर्थ भयंकर असा आहे. आत्मनिग्रहाच्या बाबतींत भीष्म भयंकर होता. त्यामुळेंच प्रत्येक हिंदूला तो अत्यंत प्रिय झाला आहे. भीष्मानें ही प्रतिज्ञा केली व आतां ती मोडणें शक्य नाहीं असें जेव्हां शंतनु राजाला समजलें, तेव्हां त्यानें सत्यवतीशीं विवाह केला. परंतु उत्कट पुत्रप्रेमानें प्रेरित होऊन त्यानें त्याला इच्छामरणी होशील असा वर दिला.† ह्याप्रमाणें ज्यांना आपल्या मनोविकारांवर पगडा बसवितां येतो व आपलें पौरुष

---

† महाभारत, आदिपर्व १००.

पूर्णपणें रक्षण करितां येतें, त्यांना वाटेल तेथपर्यंत जगून मृत्यूलाही दडपून टाकण्याचें सामर्थ्य कां येऊं नये ?

आतां उलट उदाहरण घेऊं. दुर्योधनाच्या दुराग्रहानें, उद्धटपणानें व त्यानें वडिलांची अवज्ञा केल्यामुळें अखिल कुरुकुलाचा नाश करणारें महायुद्ध त्यानें आपल्या अंगावर ओढून घेतलें.† पांडवांनीं केलेली न्याय्य मागणी तूं कबूल कर आणि वडिलोपार्जित राज्याचा योग्य हिस्सा त्यांना दे असें त्याला धृतराष्ट्रानें वारंवार बजाविलें; परंतु दुर्योधनानें तें सर्व तुच्छ मानिलें व आपलाच हेका तो धरून बसला. जेव्हां गांधारीनें त्याला वडील सांगतात त्याप्रमाणें कर व धर्माप्रमाणें वाग अशी भरसभेमध्यें विनंति केली, तेव्हां त्यानें तिचा उद्दामपणानें अवमान केला व आपल्या कपाळावर अपयशाचें खापर फोडून घेतलें. आपल्या आईबापांची अवज्ञा करून व त्यांचा अपमान करून त्यांना दुःख देणाऱ्या कोणत्याही पुत्राला केव्हांही भाग्याचे दिवस येत नाहींत.

सनातनधर्माप्रमाणें आईबाप हे दोन जसे आदरणीय व सेव्य आहेत तसाच तिसरा गुरुही आहे. हा आदरभाव आणि सेव्यभाव ज्या प्राचीन थोर विभूतींमध्यें दिसून येतो, त्यांचें हल्लींच्या सर्व हिंदू मुलांनीं अनुकरण करण्यासारखें आहे. भीष्मद्रोणांच्या विरुद्ध लढण्याचा प्रसंग आला असतांही त्यांच्यासंबंधानें पांडवांनीं केवढें उत्कट प्रेम व केवढा दृढ पूज्यभाव दर्शविला आहे पहा. कुरुक्षेत्रावर लढाईला प्रारंभ होण्यापूर्वी त्यांनीं आपल्या गुरूंच्या चरणांवर मस्तक ठेविलें;❀ व धृष्टद्युम्नानें जेव्हां द्रोणाचार्यांच्या पिकलेल्या केशांना हात घातला तेव्हां अर्जुनाच्या अंतःकरणाला पीळ बसल्याप्रमाणें होऊन तो धृष्टद्युम्नास ओरडून म्हणाला, "गुरुजींना जिवंत धरून आण, त्यांना ठार मारूं नको; त्यांचा वध करणें योग्य नाहीं." धृष्टद्युम्नानें द्रोणाचार्यांचा वध केलेला पाहतांच तो अगदीं हताश होऊन, "लज्जेनें ग्रस्त होऊन जणुंकाय मी नरकवासच भोगीत आहें" असे दुःखोद्गार त्याच्या तोंडून निघाले.×

---

† महाभारत, उद्योगपर्व १३०    ❀ महाभारत, भीष्मपर्व ४३.

× महाभारत, द्रोणपर्व. १९३, १९४.

गुरूच्या आज्ञेविरुद्ध जर एखाद्याची पूर्वप्रतिज्ञा असेल, किंवा तसें वागण हा त्याचा उघड धर्म ठरत असेल तरच गुर्वाज्ञेचें उल्लंघन करण्याचें तें एक योग्य कारण होऊं शकेल. प्रत्यक्ष धर्ममूर्ति जो भीष्म त्याच्या चरित्रामध्यें ही गोष्ट ठळक रीतीनें दिसून येते. शंतनूच्या मरणानंतर भीष्मानें आपल्या प्रतिज्ञेला अनुसरून आपला कनिष्ठ बंधु चित्रांगद ह्याला हस्तिनापुराच्या गादीवर बसविलें, व जेव्हां चित्रांगद लढाईमध्यें मरण पावला तेव्हां दुसरा बंधु विचित्रवीर्य ह्याला गादीवर बसविलें. विचित्रवीर्याला अनुरूप भार्या मिळावी म्हणून मुलीचा शोध करीत असतां काशिराजाच्या कन्यकांनीं स्वयंवर लाविला आहे व त्या आपल्या बंधूला सर्वतोपरी योग्य आहेत असें भीष्माच्या कानावर आलें. तेव्हां भीष्म काशीस गेला व स्वयंवरासाठीं जमलेल्या सर्व राजांबरोबर युद्ध करून त्यानें स्वसामर्थ्यानें त्या मुलींना पळवून आणिलें. जेव्हां त्या हस्तिनापुरास आल्या तेव्हां त्यांतील धाकट्या दोन मुली अंबिका व अंबालिका विचित्रवीर्याशीं स्वसंतोषानें विवाह करण्यास कबूल झाल्या; परंतु सर्वांत ज्येष्ठ कन्या अंबा म्हणाली कीं, ज्याअर्थीं आपण दुसऱ्या एका देशाच्या शाल्व नामक राजाला पूर्वींच मनानें वरिलें आहे, त्याअर्थीं आपण त्याच्याबरोबरच विवाह करणार.† तेव्हां भीष्मानें तिला सन्मानपूर्वक शाल्व राजाकडे पाठविलें. परंतु ज्याअर्थीं मजबरोबर युद्ध करून भीष्मानें तिला जिंकून नेली, त्या अर्थीं आतां ती त्याची देणगी म्हणून मी स्वीकार करणार नाहीं. असें म्हणून शाल्व राजानें तिला परत पाठविलें. तेव्हां अंबा भीष्माला म्हणाली, "ज्याअर्थीं तूं शाल्व राजाबरोबर युद्ध करून मला जिंकून आणिलीस म्हणून तो माझ्याशीं विवाह करीत नाहीं, त्याअर्थीं आतां तूंच माझ्याशीं विवाह केला पाहिजे." तेव्हां भीष्माला फारच वाईट वाटलें, परंतु आमरण ब्रह्मचर्यव्रत पाळण्याची प्रतिज्ञा केल्यामुळें त्याला तिच्या म्हणण्यास रुकार देतां येईना. त्यामुळें अंबा क्रुद्ध होऊन भीष्माचा गुरु परशुराम ह्याजकडे गेली. तेव्हां तिच्याशीं विवाह करण्याविषयीं परशुरामानें तिच्या वतीनें भीष्माला आज्ञा केली. परंतु आपल्या गुरूची अयोग्य आज्ञा पाळण्यापेक्षां आपली पूर्वप्रतिज्ञा राखणें हा श्रेष्ठ धर्म

---

† महाभारत, आदिपर्व १०२.

होय असें मानून भीष्मानें त्या आज्ञेचा अनादर केला; त्यामुळें परशुरामाचें व त्याचें भयंकर युद्ध जुंपलें. हें द्वंद्वयुद्ध बरेच दिवस चाललें व त्यामध्यें दोघांनाहीं बऱ्याच जखमा झाल्या. ह्या युद्धाच्या श्रमानें, रक्तस्रावानें व भयंकर जखमांनीं दोघेही पुन्हा पुन्हा मूर्च्छित होऊन पडत. परंतु पुन्हा सावध होऊन एकमेकांशीं लढत. अशा रीतीनें द्वंद्वयुद्ध अठ्ठावीस दिवसपर्यंत चाललें. सरते शेवटीं, भीष्माचा पराजय आपल्या हातून होत नाहीं असें परशुरामाला कबूल करणें भाग पडलें. भीष्माला जय प्राप्त झाला, तथापि नाइलाजास्तव कां होईना ज्याअर्थी भीष्माच्या या कृत्यामुळें अंबेला महद्दुःख सहन करावें लागलें, त्याअर्थी तीच त्याच्या मृत्यूला कारण व्हावी असा कर्मानें पुढें योगायोग घडवून आणिला.

वृद्ध माणसासंबंधानें आदर हा श्रेष्ठांसंबंधानें आवश्यक असणाऱ्या सद्गुणमालिकेंतील शेवटचा सद्गुण होय. प्राचीन आर्य लोकांच्या स्वभावामध्यें हा सद्गुण प्राधान्यानें दिसून येतो. दीर्घ अनुभवानें उत्पन्न झालेलें ज्ञान हेंच वृद्ध माणसांचें अमूल्य धन होय, व तें अध्ययनशील, विनयशील व आदरयुक्त अशा तरुणांच्या कल्याणाकरितां मोठ्या स्वसंतोषानें ते देत असतात. अर्वाचीन जीवनकलहाच्या झटापटींत हा वृद्ध माणसांसंबंधाचा आदर नष्ट होण्याचा संभव आहे, म्हणून त्याचा योग्य विकास करण्याची विशेष खबरदारी आतांच घेतली पाहिजे.

---

न युज्यमानया भक्त्या भगवत्यखिलात्मनि।
सदृशोऽस्ति शिवः पंथा योगिनां ब्रह्मसिद्धये ॥
ज्ञानवैराग्ययुक्तेन भक्तियुक्तेन चात्मना ।
परिपश्यत्युदासीनं प्रकृतिं च हतौजसम् ॥

सतां प्रसंगान्मम वीर्यसंविदो । भवन्ति हृत्कर्णरसायनाः कथाः ॥
तज्जोषणादाश्वपवर्गवर्त्मनि । श्रद्धारतिर्भक्तिरनुक्रमिष्यति ॥
भक्त्या पुमान् जातविराग ऐंद्रियात् । दृष्टश्रुतान्मद्रचनानुचिंतया ॥
चित्तस्य यत्तो ग्रहणे योगयुक्तो । यतिष्यते ऋजुभिर्योगमार्गैः ॥

**असेवयाज्यं प्रकृतेर्गुणानां । ज्ञानेन वैराग्यविजृम्भितेन ।**
**योगेन मय्यर्पितया च भक्त्या । मां प्रत्यगात्मानमिहावरुन्धे ॥ †**

अखिल विश्वव्यापी परमेश्वराच्या भक्तीसारखा योग्यांना ब्रह्मप्राप्तीचा दुसरा कल्याणदायक मार्ग नाहीं.

ज्ञान, वैराग्य व भक्ति ह्यांच्या योगानें, त्याला आढळून येतें कीं, आत्मा हा निर्लेप आहे व प्रकृति ही हतबल आहे.

सज्जनाशीं संबंध घडला असतां, हृदयाला व कानाला अमृततुल्य आनंद देणाऱ्या व माझ्या (ईश्वराच्या) सामर्थ्याचें ज्ञान करून देणाऱ्या गोष्टी ऐकावयास मिळतात, व त्या उल्हासानें ऐकिल्यानें मनुष्य श्रद्धा, आनंद व भक्ति यांनीं युक्त होऊन मोक्षमार्गाकडे ताबडतोब वळतो.

भक्तीच्या योगानें व मीं उत्पन्न केलेल्या सृष्टीचा विचार केल्यानें, नेत्र-श्रोत्रादि इंद्रियांच्या विषयांबद्दल वैराग्य उत्पन्न होऊन व चित्ताचें नियमन करून मनुष्य सरळ योगमार्गानें जाण्याचा प्रयत्न करितो व योग प्राप्त करून घेतो.

प्रकृतीच्या गुणांवर आसक्त न होतां वैराग्यजन्य ज्ञानानें, योगानें व माझ्या ठिकाणीं ठेविलेल्या भक्तीनें प्रत्यगात्मा जो मी त्या मला तो प्राप्त करून घेतो.

स्वभावमेके कवयो वदन्ति कालं तथान्ये परिमुह्यमानाः ।
देवस्यैष महिमा तु लोके येनेदं भ्राम्यते ब्रह्मचक्रम् ॥
तमीश्वराणां परमं महेश्वरं तं देवतानां परमं च दैवतम् ।
पतिं पतीनां परमं परस्तात् विदाम देवं भुवनेशमीड्यम् ॥
न तस्य कार्यं करणं च विद्यते न तत्समश्चाभ्यधिकश्च दृश्यते ।
पराऽस्य शक्तिर्विविधैव श्रूयते स्वाभाविकी ज्ञानबलक्रिया च ॥
न तस्य कश्चित्पतिरस्ति लोके न चेशिता नैव च तस्य लिङ्गम् ।
स कारणं करणाधिपाधिपो न चास्य कश्चिज्जनिता न चाधिपः ॥
एको वशी निष्क्रियाणां बहूनामेकं बीजं बहुधा यः करोति ॥
तमात्मस्थं येऽनुपश्यन्ति धीरास्तेषां सुखं शाश्वतं नेतरेषाम् ॥

† विष्णुभागवत, ३. २५. १८, १९ २५–२७.

**नित्यो नित्यानां चेतनश्चेतनानां । एको बहूनां यो विदधाति कामान् ।**
**तत्कारणं सांख्ययोगाधिगम्यं । ज्ञात्वा देवं मुच्यते सर्वपाशैः**

हें ब्रह्मचक्र स्वाभाविक रीतीनेंच फिरतें असें कांहीं कवि म्हणतात. कांहीं मोहानें ग्रस्त झालेले लोक तें काळाच्या योगानें फिरतें असें म्हणतात; परंतु वास्तविक तें ईश्वराच्याच शक्तीनें फिरत असतें.

सर्व सृष्टीचा वेदनीय व श्रेष्ठ जो अधिपति त्याला आम्ही ईश्वरांमध्यें श्रेष्ठ ईश्वर, देवतांमध्यें श्रेष्ठ दैवत, जगत्पतींमध्यें श्रेष्ठ जगत्पति अशा प्रकारानें ओळखतों.

त्याला कांहीं कर्तव्य नाहीं व कोणत्याही साधनाची गरज नाहीं; किंवा त्याच्या बरोबरीचा अथवा त्याहून श्रेष्ठही कोणी दिसत नाहीं; त्याचें सामर्थ्य श्रेष्ठ प्रकारचें असून विविध आहे, व त्याचें ज्ञान, बल व क्रिया हीं स्वाभाविक (परतंत्र नसणारीं) आहेत.

ह्या जगामध्यें त्याला कोणीही श्रेष्ठ नाहीं, त्याचा कोणी शास्ता नाहीं व त्याचें कारणही कोणतें नाहीं. तोच सर्वांचें कारण असून इंद्रियाधिपतींचा अधिपतिही तोच आहे; त्याला उत्पन्न करणाराही कोणी नाहीं व त्याला अधिपतिही कोणी नाहीं.

सर्व निष्क्रियांचें नियमन करणारा तोच एकटा असून एकाच बीजापासून तो अनंत सृष्टि निर्माण करितो. अशा या आपल्या अंतर्यामीं वास करणाऱ्याला जे ज्ञानी लोक जाणतात त्यांनाच शाश्वत सुख प्राप्त होतें, इतरांना नाहीं.

जो सर्व नित्यांमधला नित्य, चेतनांमधला चेतन, अनेकांमधला एक, सर्व इच्छा पुरविणारा व सांख्य आणि योग-मार्गानें जाणिला जाणारा व सर्वांचें आदिकरण असा जो देव त्याचें ज्ञान झालें असतां सर्व बंधांपासून मुक्तता होते.

**अराजके हि लोकेऽस्मिन् सर्वतो विद्रुते भयात् ।**
**रक्षार्थमस्य सर्वस्य राजानमसृजत्प्रभुः**
**इंद्रानिलयमार्काणामग्नेश्च वरुणस्य च ।**
**चंद्रवित्तेशयोश्चैव मात्रा निर्हृत्य शाश्वतीः ॥**

तदर्थं सर्वभूतानां गोप्तारं धर्ममात्मजम् ।
ब्रह्मतेजोमयं दंडमसृजत्पूर्वमीश्वरः ॥
दंडः शास्ति प्रजाः सर्वा दंड एवाभिरक्षति ।
दंडः सुप्तेषु जागर्ति दंडं धर्मं विदुर्बुधाः ॥
तस्याहुः संप्रणेतारं राजानं सत्यवादिनम् ।
समीक्ष्यकारिणं प्राज्ञं धर्मकामार्थकोविदम् ॥
तं राजा प्रणयन्सम्यक् त्रिवर्गेणाभिवर्धते ।
कामात्मा विषमः क्षुद्रो दंडेनैव निहन्यते ॥
दंडो हि सुमहत्तेजो दुर्धरश्चाकृतात्मभिः ।
धर्माद्विचलितं हन्ति नृपमेव सबांधवम् ॥[1]

ह्या जगांत जेव्हां अराजक स्थितीमध्यें लोक भयानें सैरावैरा पळत असत तेव्हां त्यांच्या रक्षणाकरितां ईश्वरानें राजा उत्पन्न केला.

इंद्र, वायु, यम, सूर्य, अग्नि, वरुण, चंद्र आणि कुबेर ह्या प्रत्येकांतील शाश्वत अंश घेऊन (त्यांचा राजा निर्माण केला).

त्याच्याकरितां ब्रह्मतेजोमय दंड म्हणून, सर्व प्रजेचें पालन करणारा असा धर्म, आपला पुत्र म्हणून, ईश्वरानें उत्पन्न केला.

हा दंड सर्व प्रजेचें नियमन करितो, तोच सर्वांचें रक्षण करितो, व इतर सर्व झोंपले असतां तोच जागृत असतो. ह्या दंडालाच ज्ञानी लोक धर्म असें म्हणतात.

जो राजा सत्यवादी आहे, विचारानें चालणारा आहे, शहाणा आहे व धर्म, अर्थ व काम जाणणारा आहे त्यालाच राजा असें म्हणतात.

ह्या दंडाचा योग्य उपयोग केल्यानें राजाला तीनही पुरुषार्थ प्राप्त होतात; परंतु जो केवळ कामासक्त, कुटिल व क्षुद्र असतो त्याचा त्याच दंडाच्या योगानें नाश होतो.

हा दंड दिव्य तेजोमय आहे; ज्यांना आत्मप्राप्ति झालेली नाहीं त्यांना तो पेलण्यास कठीण आहे. धर्मबाह्य आचरण करणाऱ्या राजाचा व त्याच्या कुळाचा तो समूळ नाश करितो.

---

[1] मनुस्मृति, ७. ३, ४, १४, १८, २६–२८.

तेन धर्मोत्तरश्चायं कृतो लोको महात्मना ।
रंजिताश्च प्रजाः सर्वास्तेन राजेति शब्द्यते ॥*

थोर अंतःकरणाच्या राजामुळेंच लोक धर्मवान् बनतात, व त्याच्यामुळेंच सर्व प्रजेचें 'रंजन' होतें ( प्रजेला आनंद होतो ); म्हणून त्याला राजा असें म्हणतात.

राजा प्रजानां हृदयं गरीयो गतिः प्रतिष्ठा सुखमुत्तमं च ।
समाश्रिता लोकमिमं परं च जयन्ति सम्यक्पुरुषा नरेन्द्र ॥
नराधिपश्चाप्यनुशिष्य मेदिनीं दमेन सत्येन च सौहृदेन ।
महद्भिरिष्ट्वा क्रतुभिर्महायशा स्त्रिविष्टपे स्थानमुपैति शाश्वतम् †

राजा हाच प्रजेचा मुख्य प्राण, तोच तिचें आश्रयस्थान, तोच तिचें वैभव व तिचें परम सुखही तोच. हे नरेन्द्रा, लोक अशा राजाचाच आश्रय करून इहपर लोक न्यायमार्गानें जिंकितात.

राजा सुद्धां आत्मनिग्रहानें, सत्यानें व कोमलान्तःकरणानें पृथ्वीचें नियमन करून व पुष्कळ यज्ञांच्या योगानें उपासना करून मोठें यश मिळवितो व स्वर्गलोकांत शाश्वत स्थान संपादन करून घेतो.

उपाध्यायान्दशाचार्य आचार्याणां शतं पिता ।
सहस्रं तु पितॄन्माता गौरवेणातिरिच्यते ॥ ×

दहा उपाध्यायांहून आचार्य श्रेष्ठ, शंभर आचार्यांहून पिता श्रेष्ठ व सहस्र पित्यांहूनही मातेचा मान अधिक आहे.

आचार्यश्च पिता चैव माता भ्राता च पूर्वजः ।
नार्तेनाप्यवमन्तव्या ब्राह्मणेन विशेषतः ॥
तेषां त्रयाणां शुश्रूषा परमं तप उच्यते ॥
त एवहि त्रयो लोकास्त एव त्रय आश्रमाः ।
त एव हि त्रयो वेदास्त एवोक्तास्त्रयोऽग्नयः ॥
सर्वे तस्यादृता धर्मा यस्यैते त्रय आदृताः ।
अनादृतास्तु यस्यैते सर्वास्तस्याफलाः क्रियाः ॥ §

---

* महाभारत, शांतिपर्व ५९. १४५. † महाभारत, शांतिपर्व ६८.५९.६०.
× मनुस्मृति, २. १४५. § मनुस्मृति, २. २२५, २२९ २३०, २३४.

आचार्य, पिता, माता व वडील बंधु ह्यांचा, जरी त्यांच्याकडून त्रास झाला असला तरी, कोणीही अवमान करूं नये; आणि ब्राह्मणानें तर कधींच करूं नये.

आचार्य, माता व पिता या तिघांची शुश्रूषा करणें हेंच श्रेष्ठ तप होय.

कारण तेच तिघे तीन लोक, तेच तीन आश्रम, तेच तीन वेद, व तेच तीन पवित्र अग्नि आहेत असें म्हणतात.

जो ह्या तिघांना मान देतो त्याचाच सर्व धर्मांच्या ठिकाणीं आदर असतो; परंतु जो ह्यांचा अवमान करितो त्याचीं सर्व कर्में निष्फळ होतात.

> ऊर्ध्वं प्राणा ह्युत्क्रामन्ति यूनः स्थविर आयति ।
> प्रत्युत्थानाभिवादाभ्यां पुनस्तान्प्रतिपद्यते ॥
> अभिवादनशीलस्य नित्यं वृद्धोपसेविनः ।
> चत्वारि तस्य वर्धन्त आयुः प्रज्ञा यशो बलम् ॥ ❀

वृद्ध मनुष्य जवळ आला असतां तरुण मनुष्याचे प्राण बाहेर पडण्याकरितां वर जाऊं लागतात; परंतु उठून नमस्कार केला असतां ते पुन्हा त्याला प्राप्त होतात.†

जो वडिलांना नेहमीं वंदन करून त्यांचा मान राखितो त्याचें आयुष्य, बुद्धि, यश व बल हीं चारही वृद्धि पावतात.

---

❀ मनुस्मृति, २. १२०, १२१.

† एक थंड पदार्थ व एक उष्ण पदार्थ हे जवळजवळ ठेविले असतां उष्ण पदार्थांतील उष्णता थंड पदार्थाकडून शोषिली जाऊन दोन्ही पदार्थ उष्णतेनं 'सम' होण्याची प्रवृत्ति उत्पन्न होते, हा आपला नित्याचा अनुभव आहे. 'सम' स्थिति उत्पन्न करणारा हा नियम सार्वत्रिक आहे. तरुण व वृद्ध या दोघांच्या प्राणशक्तींत कमीअधिकपणा असतो. तरुणाच्या प्राणशक्ति त्याच्या सूक्ष्म कोणातून अधिक जोरानें वहात असतात. वृद्धाच्या प्राणशक्ति तितक्या जोरदार नसतात. म्हणून वृद्ध व तरुण हे जवळजवळ आले म्हणजे वरील नियमानुसार तरुणाच्या प्राणशक्ति वृद्धाच्या शरीरांत जाऊन तरुणास तितकें शक्तिहीनत्व येतें. अशा वेळीं तरुणानें वृद्धास आदरपूर्वक अभिवादन केल्यास वृद्धाच्या मनांत प्रेम व औदार्य या वृत्ति जागृत होऊन तरुणाच्या प्राणशक्ति वृद्धाच्या शरीरांत शोषण्याची जी स्वाभाविक क्रिया चालू असते तींत खंड पडतो. ही गोष्ट या श्लोकांत ध्वनित केली आहे. Advanced Text Book—पृष्ठ ३५६ पाहा.

## प्रकरण नववें

# स्वसम जनांसंबंधीं सद्‌गुण दुर्गुण.

आतां ह्या प्रकरणांत माणसानें सभोंवतालीं असलेल्या आपल्या बरोबरीच्या लोकांशीं संबंध कसा ठेवावा व कुटुंबांतील व बाहेरील आपल्या बरोबरीच्या लोकांशीं आपला संबंध सलोख्याचा व सुखाचा होण्यास कोणत्या गुणांचा विकास झाला पाहिजे व कोणते दुर्गुण नष्ट झाले पाहिजेत, ह्याचा विचार करावयाचा आहे. प्रथमतः आपण कुटुंबांतील मनुष्यांचाच विचार करूं; कारण त्यांचें आपणांस विशेष महत्त्व आहे. ज्या ठिकाणीं कौटुंबिक सद्‌गुणांचें पोषण होतें अशीं पवित्र व सुखी कुटुंबें हेच ऊर्जितावस्थेस पोहोंचलेल्या व यशस्वी राष्ट्राचे आधारस्तंभ होत. आईबाप व मुलें ह्यांच्यामधील संबंध कसा असावा हें आपण मागें पाहिलें आहे.† आतां पति व पत्नी, बंधु व भगिनी ह्यांच्यामधील संबंध कसा असावा हें आपणांला पहावयाचें आहे.

पतिपत्नींना एकत्र निबद्ध करणारें जें **पतिपत्नीप्रेम** त्याविषयींच्या गोष्टी हिंदुधर्माच्या ग्रंथांमध्यें पुष्कळच आहेत. "जो पति तीच पत्नी"‡ असें मनूचें वचन आहे. तीं एकच आहेत, दोन नव्हत. प्रेमरज्जूनें दोघेंही एकजीव बनलेलीं असतात. पतीचें प्रेम संरक्षक, आश्रयदायक असतें, त्यांत माया असते; आणि पत्नीचें प्रेम निराग्रही, मधुर असतें; त्यांत निष्ठा असते. "पतिपत्नीधर्म आमरण रहावयाचा असतो."§ रामचंद्र आणि सीता हें आदर्शदांपत्य आहे. त्यांनीं आपल्या आयुष्यांतील सर्व सुखदुःखांचा अनुभव एकत्रच घेतला; अडचणीच्या वेळीं परस्परांचा विचार घेतला, व संकटसमयीं परस्परांनीं दुःखसंविभाग केला. प्रथमप्रथम कांहीं काळपर्यंत तीं अत्यंत आनंदामध्यें होतीं. जेव्हां रामचंद्राला राज्याभिषेक करण्याचा समय प्राप्त झाला, तेव्हां दोघांनींही एकाच वेळीं उपोषणें केलीं व ईश्वरप्रार्थना केली; व जेव्हां रामचंद्रास वनवासाचें

---

† प्रकरण ८ वें पहा. ‡ यो भर्ता सा स्मृतांऽगना ।—मनुस्मृति, ९. ४५.

§ अन्योन्यस्याव्यभिचारो भवेदामरणान्तिकः । —मनुस्मृति ९. १०१.

भयंकर शासन झालें, तेव्हां सीतेनें आपल्याला पतीचें सांनिध्य नष्ट होऊं नये येवढ्याच कारणानें अगदीं निर्धास्तपणानें वनवासाचा स्वीकार केला. पतीच्या ठिकाणीं तिचा अनन्यभाव व नित्य दृढनिष्ठा होती आणि पतिवियोग झाला तर तें तिला मरणासारखें वाटत होतें. तेव्हां ती सहजच त्याच्याबरोबर निघण्यास एका पायावर तयार झाली. पतीच्या साहचर्यामध्यें वनांतील कांटे सुद्धां मला रेशमासारखे मऊ वाटतील, धूळ मी चंदनाच्या उटीसमान मानीन, गवताचें मी अंथरूण करीन व फलमूलादिकांचें मिष्टान्नाप्रमाणें भोजन करीन, असे तिचे शब्द आहेत. कारण पतीचा सहवास हा तिला स्वर्गवास व पतिवियोग हा नरकवास वाटत होता. रामानें तिला तूं घरींच रहा म्हणून जेव्हां सांगितलें तेव्हां तिला अत्यंत दुःख झालें; व जेव्हां नंतर बरोबर येण्याची अनुज्ञा दिली तेव्हां तिनें लगेच आपलीं मूल्यवान् वस्त्रें व अलंकार मोठ्या आनंदानें काढून दासीपाशीं दिले. वनवासामुळें पतीच्या सहवासाला आपण अंतरत नाहीं येवढ्या एकाच विचारानें ती आनंदित होऊन स्त्रियांना प्रिय असणाऱ्या सर्व वस्तु तिनें बिनदिक्कत फेंकून दिल्या. अहर्निश पतीच्या सहवासांत असल्यामुळें, नष्ट झालेल्या राजवैभवाचा तिला विसर पडून अरण्यामध्यें एखाद्या लहान मुलीप्रमाणें तिचें मन आनंदमग्न होऊन मोठ्या हौसेनें रमत असे, असें वर्णन केलेलें आहे. ती जरी येवढ्या आनंदांत रहात असे तरी सदा शहाणपणानेंही वागत असे. दंडकारण्याच्या आसपास फिरत असतांना आपल्या पतीला विचारपूर्वक व प्रगल्भ असा सल्ला देई. जेव्हां महापराक्रमी रावणानें तिला पळवून नेली तेव्हां तिच्या पतीनें जो तिचा दीर्घ शोध चालविला, आणि हा शोध चालू असतांना, "हा सीते, हा सीते, तूं कोठें तरी लपून राहिली आहेस काय ? हा तुझा खेळ चालला आहे काय ? हा तुझा खेळ म्हणजे माझें मरणच होय." असे जे दुःखालाप काढिले त्यावरून त्याचें तिच्यावरील प्रेम व्यक्त होतें. इकडे तिचा पति तिच्याबद्दल शोक करीत शोधार्थ फिरत असतां, तिनें पतिनिष्ठा सोडावी म्हणून अनेक प्रकारें तिला मोहांत पाडण्याचे प्रयत्न झाले, दहशत दाखविण्यांत आली व भयंकर धाकही घालण्यांत आले; परंतु, "मी एकनिष्ठ पतिव्रता असल्यामुळें पातिव्रत्यभंगाचें पातक माझ्या हातून केव्हांही होणार नाहीं; तुझ्या वैभवाच्या व संपत्तीच्या मोहांत मी केव्हांही पडणार नाहीं.

ज्याप्रमाणें सूर्यकिरण हे एकट्या सूर्याचे त्याप्रमाणें मीही एकट्या राघवाचीच आहें," असा रावणाला तिनें सडेतोड जबाब दिला.†

यमाच्या पाशांतून आपल्या पतीला मुक्त करणाऱ्या सावित्रीचीही गोष्ट अशीच आहे. देवांच्या दीर्घकालिक आराधनेनें मद्रदेशाचा राजा अश्वपति ह्याला एक कन्या झाली. तिचें त्यानें सावित्री असें नांव ठेविलें. ती एखाद्या सुवर्णमूर्तीप्रमाणें तेजस्वी व जाईच्या पुष्पाप्रमाणें मनोहर होती. आपल्या पुण्यकर्मामुळें आपणांला ही देवीच प्राप्त झाली आहे असें सर्व लोक मानीत. ती उपवर झाल्यानंतर, तुला योग्य असा पति तूं शोधून काढ, असें तिच्या बापानें तिला सांगितलें. तेव्हां आपले परिजन घेऊन ती शोधासाठीं निघाली. कांहीं महिन्यांनीं जेव्हां ती परत आली तेव्हां नारदमुनि तिच्या बापाच्या घरीं आले होते. त्यांच्या समक्ष आपण कोणाला पसंत केलें तें तिनें सांगितलें. "शाल्व देशाचा वृद्ध व अंध राजा द्युमत्सेन ह्याला त्याच्या शत्रूंनीं राज्यभ्रष्ट केलें, आणि तो आतां अरण्यामध्यें तपश्चर्या करीत आहे; त्याचा पुत्र सत्यवान् ह्याला मीं पति म्हणून पसंत केला आहे," असें ती म्हणाली. तेव्हां नारदमुनि म्हणाले, "हे राजा, तुझ्या ह्या निष्कपट कन्येनें केलेली निवड ठीक नाहीं." त्यावर राजानें नारदमुनींला प्रश्न केला कीं, "सावित्रीला तो पति योग्य नाहीं काय? मनानें व शरीरानें तो दुर्बळ आहे काय? व क्षमा आणि धृति हे गुण त्याच्या अंगीं नाहींत काय?" तेव्हां नारदमुनि म्हणाले, "ह्यांपैकीं कोणताही गुण त्याच्यामध्यें कमी नाहीं; येवढेंच नव्हे तर सत्यवान् स्वतः सूर्याप्रमाणें तेजस्वी आणि प्रतापी आहे, शिबिराजाप्रमाणें न्यायी आहे, रंतिदेवाप्रमाणें उदारचरित आहे, ययातीप्रमाणें विलासी आहे व चंद्राप्रमाणें सुंदर आहे. परंतु हा सर्व गुणनिधि एका वर्षांतच नामशेष होणार आहे! त्याची आयुष्यमर्यादा अगदीं अल्प आहे!" हे नारदमुनींचे शब्द ऐकून सावित्री विकल झाली. तथापि ती म्हणाली, "मनुष्याला एकदांच काय तें स्वतःचें दान करतां येतें आणि मी तर पूर्वींच स्वतःला सत्यवानाला अर्पण करून चुकलेली आहें. आतां ही गोष्ट फिरणार नाहीं." तेव्हां "ज्याअर्थीं हे राजा, तुझी कन्या आपल्या निश्चयापासून ढळत नाहीं, त्याअर्थीं तिच्या विवाहाला माझा पूर्ण आशीर्वाद आहे." असें म्हणून नारदमुनि निघून गेले.

† रामायण, अयोध्याकांड.

सावित्रीच्या विवाहनिश्चयाची बातमी द्युमत्सेनाला कळविण्याकरितां तावडतोब दूत पाठविण्यांत आले. त्यांच्याबरोबर द्युमत्सेनानें निरोप पाठविला कीं, "हे राजा, तुझ्याशीं माझा संबंध घडून यावा अशी माझी पूर्वीपासून इच्छा होती, परंतु आजच्या माझ्या ह्या खालावलेल्या स्थितींत ती तुला कशी कळवावी हा मला मोठा प्रश्न होता; परंतु आतां सती सावित्री आपणच होऊन हा संबंध घडवून आणूं पहात आहे, तेव्हां माझ्या पूर्वीच्या घरामध्यें पुन्हा ही साक्षात् लक्ष्मीच येत आहे असें मला निश्चयानें वाटतें." नंतर विवाह झाला आणि सावित्री आपला राजवाडा सोडून मोठ्या आनंदानें तपस्व्यांच्या पर्णकुटिकेंत जाऊन राहिली; आपल्या वृद्ध सासूसासऱ्यांची शुश्रूषा मनोभावानें व एकनिष्ठेनें करूं लागली; पर्णकुटिकेंतील अगदीं हलकींसलकीं कामें सुद्धां स्वतः करण्यांत तिला आनंद वाटूं लागला; व आपल्या मायाळू वागणुकीनें व प्रेमळ वाणीनें, तिनें आपल्या पतीचें अंतःकरण वेधून टाकिलें. परंतु अशा तऱ्हेनें तिची बाह्य वर्तणूक आनंदी असली तरी नारदमुनीनें सांगितलेल्या गोष्टीनें तिच्या अंतःकरणाचा आंतल्या आंत सतत दाह होत होता, व त्या वर्षाचे दिवस ती सारखी मोजीत राहिली होती. शेवटीं नारदमुनीनें सांगितल्याप्रमाणें सत्यवानाच्या मृत्यूला चार दिवस राहिले तेव्हां उपोषणें करून व व्रतारंभ करून देवांची आराधना करण्याचा तिनें निश्चय केला. तीनही दिवस तिनें कडक उपोषण केलें; पाण्याचाही एक बिंदु पोटांत घेतला नाहीं. शेवटच्या त्या अशुभ दिवशीं तिनें पहांटेस उठून प्रातर्विधि उरकले आणि वडिलांच्या चरणांला वंदन केलें. त्या दिवशीं अरण्यांतील सर्व तपस्व्यांनीं तुला वैधव्यदुःख कधींही होणार नाहीं असा तिला आशीर्वाद दिला. नंतर जेव्हां सत्यवान् आपली कुऱ्हाड घेऊन लांकडें आणण्यासाठीं नेहमींप्रमाणें जंगलांत जावयास निघाला, तेव्हां आपलें मन घट्ट करून तीही त्याच्याबरोबर निघाली. सत्यवानाला आश्चर्य वाटून, आज तूं कां येतेस, असें त्यानें तिला विचारिलें. तेव्हां आज मी बरोबर येणारच, असा तिनें आग्रह धरिला. नंतर तीं दोघेंही टेंकड्यांची, नद्यांची, वनराजींची व पशुपक्ष्यांची शोभा पहात पहात निघालीं. शेवटीं सत्यवानानें आपल्या कामाला सुरवात केली. फळें जमवून टोपलींत भरलीं व तो लांकडें तोडावयास लागला. इतक्यांत एकाएकीं

त्याला चक्कर येऊं लागली, व डोकें अतिशय दुखूं लागलें. तेव्हां तें सावित्रीला सांगून तेथेंच त्यानें खालीं डोकें टेकिलें. तेव्हां सावित्रीचें अंतःकरण विदीर्ण झालें व त्याचें मस्तक आपल्या मांडीवर घेऊन ती भवितव्यतेची वाट पहात बसली! एकाएकीं तिला एक भव्य व भीतिजनक, कृष्णवर्णीय परंतु तेजस्वी, रक्तवस्त्र परिधान केलेली व आपल्या सतेज दृष्टीनें सत्यवानाकडे एकसारखी टक लावून पहात असलेली अशी मूर्ति आपल्या शेजारींच दिसली. तेव्हां तिनें आपल्या पतीचें मस्तक हळूच जमिनीवर ठेविलें, व उठून उभी राहून त्या मूर्तीला वंदन केलें. तेव्हां ती मूर्ति म्हणाली, "सत्यवानाचें आयुष्य संपलें आहे; मी प्रत्यक्ष यमधर्म आहें. सत्यवान् अत्यंत पुण्यशील असल्यामुळें त्याला नेण्यासाठीं दूत न पाठवितां मी स्वतः आलों आहें." नंतर त्यानें सत्यवानाचें सूक्ष्म शरीर त्याच्या स्थूल शरीरापासून ओढून घेतलें आणि तो दक्षिण दिशेकडे जावयास निघाला. सावित्री त्याच्यामागून चालली; तेव्हां यम तिला म्हणाला, "सावित्री, तूं येऊं नकोस, मागें फीर. पतीची और्ध्वदेहिक क्रिया उरकून घे. तूं आपलें कर्तव्य केलें आहेस व मर्त्य मनुष्याला जेथपर्यंत जाणें शक्य आहे तेथपर्यंत तूं आपल्या पतीच्या मागाहून आली आहेस." तेव्हां सावित्री म्हणाली, "जेथपर्यंत माझा पति जाणार तेथपर्यंत मी जाणार. हा पतिपत्नींचा शाश्वत धर्म आहे. मीं जर माझ्या पतीवर अनन्य प्रेम ठेविलें असेल, जर मीं आपल्या वडिलांची पूज्यभावानें शुश्रूषा केली असेल व जर तपश्चर्येमध्यें कांहीं सामर्थ्य असेल, तर हे यमधर्मा, तुझ्या कृपेनें माझ्या मार्गांत विघ्न न येवो. "असें म्हणून एखाद्या लहान बालकाप्रमाणें तिच्या प्रेमळ वडिलांनीं तिला शिकविलेलीं व स्वयंस्फूर्तीनें तिच्या मुखांतून निघणारीं धर्मवचनें म्हणत ती त्यांच्यामागून चालली. ती यमाला म्हणाली, "हे यमधर्मा, एकनिष्ठ सेवा करून व गृहिणीधर्म यथायोग्य पाळून मीं ज्ञानसंचय व पुण्यसंचय केला आहे. म्हणून माझ्या कर्मफलाच्या आड येऊन माझा मार्ग तूं बंद करूं नकोस." तेव्हां यम म्हणाला, "सावित्री, तूं शहाणी आणि समजूतदार आहेस व तुझी वाणीही मधुर आहे. पतीच्या जीविताशिवाय तूं पाहिजे तो वर माग, मी तुला देतों." सावित्री म्हणाली, "दयाळू यमराजा, माझा श्वशुर अंध आहे; तुझ्या प्रसादानें त्याला पुन्हा दृष्टि येऊं दे." त्यावर यम

म्हणाला, "हे सुंदर मुली, तूं मागतेस तो वर मी तुला देतों; आतां तरी तूं मागें फीर. ह्या यमलोकाचा मार्ग चालून चालून तुझे पाय थकले आहेत." त्यावर सावित्रीनें पुन्हा उत्तर केलें, "ज्या ठिकाणीं माझा भर्ता जाईल त्या ठिकाणीं त्याच्याबरोबर मला गेलेंच पाहिजे. हे यमधर्मा, सज्जनांची संगति पुण्यफलदायी असते, आणि त्यांतून तर तुझ्यासारख्याचा सहवास अत्यंत श्रेष्ठ आहे. सत्पुरुषांची संगति केव्हांही निष्फल होत नाहीं." यम पुन्हां तिला म्हणाला, "हे अलौकिक मुली, सत्यवानाच्या जीविताशिवाय दुसरा कोणताही वर माग, मी तो तुला देतों." सावित्री म्हणाली, "हे मृत्युलोकाधिपते, शत्रूंनीं माझ्या श्वशुराचें राज्य हरण केलें आहे तें त्याला परत मिळूं दे." यम म्हणाला, "त्याला राज्य परत मिळेल; परंतु आतां तूं मागें फीर, पुढें येऊं नको." परंतु गोड गोड बोलत व मोहक शब्दांनीं त्याची स्तुति करीत करीत ती यमाबरोबर चालली व त्याच्याकडून आपल्या बापाला शंभर पुत्र व आपल्याला शंभर पुत्र प्राप्त व्हावे असे आणखी दोन वर तिनें मिळविले. जेव्हां चौथा वर मिळाला तेव्हां सावित्री धर्माचरणाचें व श्रेष्ठ कर्तव्यपरतेचें वर्णन करूं लागली. त्या तिच्या शहाणपणाच्या भाषणानें मोहित होऊन यमानें आणखी एक वर तिला दिला. तेव्हां तिनें ताबडतोब आपला पति जिवंत होऊं दे असा वर मागितला; कारण यमानें तिला शतपुत्रांचा चौथा वर दिला होता व पति जिवंत झाल्याविना त्या वराची पूर्तता होणें म्हणजे अधर्माचरण करणें होय. ह्याप्रमाणें त्या एकनिष्ठ पत्नीनें यमाच्या हातून आपल्या पतीची मुक्तता केली, व आपल्या कुटुंबांतील माणसांना वैभव, संपत्ति व दीर्घायुष्य प्राप्त करून दिलें; कारण, शुद्धांतःकरणाच्या एकनिष्ठ पत्नीच्या प्रेमसामर्थ्यापेक्षां प्रत्यक्ष मृत्युलोकाधिपति जो यम त्याचेंही सामर्थ्य कमी आहे.†

नलराजाची पत्नी दमयंती हिची गोष्ट प्रत्येक हिंदूला माहीत असलीच पाहिजे. निषध देशाचा राजा वीरसेन ह्याचा पुत्र नल, व विदर्भ देशाचा राजा भीम ह्याची कन्या दमयंती ह्या दोघांचीही जरी प्रत्यक्ष भेट झाली नव्हती, तरी दोघेंही ह्या पृथ्वीतलावर अप्रतिम असल्याबद्दलची ख्याति पर-

† महाभारत, वनपर्व २९३–२९८.

स्परांच्या कानीं आल्यावरून, दोघांचेंही एकमेकांवर अत्यंत प्रेम जडलें होतें. राजकन्येचें स्वयंवर व्हावयाचें ठरलें त्या वेळीं त्या स्वयंवराला नलराजा गेला होता; आणि तिला वरण्यासाठीं जरी इंद्र, अग्नि, वरुण आणि यम हे देव त्या ठिकाणीं आले होते, तरी दमयंतीनें नलराजालाच पसंत करून त्यासच वरिलें. पुढें त्या दोघांनींही प्रेमबद्ध होऊन अकरा वर्षें मोठ्या आनंदांत घालविलीं. त्यांना दोन मुलेंही झालीं. बाराव्या वर्षीं पुष्करानें येऊन नलराजाला स्वतःशीं द्यूत खेळण्याला आव्हान केलें, तेव्हां नलराजा त्याच्याशीं द्यूत खेळला, परंतु एकसारखा डाव हरतच गेला, आणि सरतेशेवटीं त्याचें सर्व राज्य गेलें, संपत्ति गेली, वस्त्रालंकारही गेले, व त्याला एका वस्त्रानिशीं अरण्यवास पत्करावा लागला. हें द्यूत चालू असतांनाच त्याचा परिणाम काय होणार हें जाणून दमयंतीनें आपल्या मुलांस आपल्या बापाच्या घरीं पूर्वींच पाठविलें होतें; व नंतर स्वतः ती एकाच वस्त्रानें नलराजाबरोबर वनास जाण्यास निघाली. तीं दोघेंही शहराच्या बाह्यप्रदेशामध्यें क्षुधेनें व तहानेनें व्याकुळ होऊन फिरत होतीं. खाण्याकरितां कांहीं पक्षी पकडण्याचा प्रयत्न करीत असतां नलराजाचें एकच वस्त्र होतें तेंही नाहींसें झालें व दुःखाची परमावधि झाली. नलराजा अगदीं हताश होऊन दमयंतीला क्षुधेची व्यथा होऊं नये म्हणून तिला आपल्या बापाच्या घरीं जाण्याविषयीं पुन्हापुन्हा सांगूं लागला; परंतु, "आपल्या दुःखाच्या वेळीं आपलें सांत्वन करणारी मीच एकटी आहें; पतीच्या दुःखशमनाला प्रेमळ आणि एकनिष्ठ पत्नीखेरीज दुसरें औषध नाहीं," असें आर्तस्वरानें म्हणून ती नलराजाच्या बरोबरच राहिली, त्याला सोडून जाण्यास कबूल होईना. परंतु श्रमाधिक्यानें अतिशय थकवा आल्यामुळें तिनें उघड्या जमिनीवर अंग टेंकलें व तेथेंच ती झोंपी गेली. तेव्हां ह्यापुढें आणखी तिला संकटांत घालण्यापेक्षां आपणच तिला सोडून जावें हें अधिक चांगलें, म्हणजे ती आपण होऊनच कोणातरी नातलगाच्या आश्रयाला जाईल असें नलराजानें मनांत ठरवून जवळच तेथें पडलेल्या एका तलवारीनें त्यानें तिच्या वस्त्राचे दोन तुकडे केले, व अर्धें वस्त्र तिच्या देहास गुंडाळलेलें तसेंच ठेवून बाकीचें अर्धें वस्त्र आपल्या शरीराभोंवतीं गुंडाळून, दुःखावेगानें वेडा झालेला नल तिला टाकून निघून गेला. दमयंती जागी होऊन पहाते तों जवळ कोणी नाहीं; तेव्हां

आपल्या स्वतःच्या दुःखापेक्षां आपला पति आतां एकटा पडला ही कल्पनाच तिला अतिशय दुःसह झाली, व तिनें मोठ्या उत्कंटेनें आपल्या पतीचा शोध चालविला. पतीचा शोध तर तिला लागेनाच; परंतु ती मात्र भयंकर सर्पाच्या तडाख्यांत सांपडली. त्यांतून तिची कशी सुटका झाली, व नंतर तिच्यावर आणखी काय काय संकटें येऊन कोसळलीं, व शेवटीं चेदी देशाच्या राजकन्येजवळ तिची सखी म्हणून ती कशी आश्रयास राहिली, वगैरे सर्व गोष्टींचें वर्णन नलोपाख्यानांत सविस्तर दिलेलें आहे. इकडे मध्यंतरीं दावाग्नीनें वेढिलेल्या एका सर्पाला नलराजानें सोडविलें व त्या सर्पाच्या दंशानें आश्चर्यकारक रीतीनें त्याचें स्वरूप एकदम पालटून तो ओळखितां येईनासा झाला मग तो फिरतफिरत ऋतुपर्ण राजाच्या नगरांत येऊन पोहोंचला, व त्याचा सारथि म्हणून तेथें राहिला. ह्याप्रमाणें परस्परांवर अत्यंत प्रेम करणाऱ्या त्या दंपत्याचा वियोग झाला. इकडे भीमराजानें आपली कन्या दमयंती व नलराजा ह्यांच्या शोधार्थ जिकडे तिकडे ब्राह्मण पाठविले. त्यापैकीं सुदेवनामक एका ब्राह्मणानें चेदीराजाच्या राजवाड्यांत राणी दमयंती बसली होती तिला ओळखिलें व तिचा दुःखाचा पूर्वेतिहास त्यानें राजमातेला निवेदन केला. ही राजमाता आपल्या आईची बहीण आहे असें मागाहून तिला कळलें. नंतर तिचें त्या ठिकाणीं उत्तम प्रकारें आणखी आदरातिथ्य करण्यास जरी ती राजमाता तयार होती तरीही दमयंतीस आपल्या बापाच्या घरीं जाणें इष्ट वाटल्यावरून ती तिकडे गेली. पुढें भीमराजानें पुन्हा नलराजाच्या शोधार्थ दूत पाठविले व त्यांना असें सांगितलें कीं, " तूं आपल्या प्रेमळ व दुःखानें विव्हळ झालेल्या पत्नीकडे परत जा " अशा तऱ्हेच्या गुप्त अर्थाचे परंतु फक्त नलराजालाच पटतील असे शब्द तुम्ही प्रत्येक जनसमूहाच्या ठिकाणीं मोठ्यानें ओरडून म्हणावे. त्याप्रमाणें त्या दूतांनीं पुष्कळ दिवसपर्यंत शोध केला. शेवटीं एके दिवशीं अयोध्येचा राजा ऋतुपर्ण ह्याचा बाहुक नांवाचा सारथि त्यांना भेटला. त्यानें ते दूतांचे शब्द ऐकून पतींनीं त्याग केलेल्या स्त्रियांबद्दल त्या दूताजवळ दुःखोद्गार काढिले. पर्णाद नामक दूतानें ही बातमी दमयंतीला येऊन कळविली. तेव्हां बाहुक हाच नल असावा असें दमयंतीस वाटून तिनें त्याला आपल्या सांनिध आणण्याची युक्ति ताबडतोब योजिली. ती दूताला म्हणाली, " तूं ऋतुपर्ण राजाकडे जा, व तूं अयोध्येला जाऊन

पोहोंचशील त्याच्या दुसऱ्या दिवशीं दमयंती दुसरा स्वयंवर करणार आहे असें त्याला सांग.'' अयोध्येहून इतक्या अंतरावरील आपल्या नगरामध्यें एका दिवसांत नलराजावांचून दुसऱ्या कोणालाही येतां येणार नाहीं हें दमयंतीला पक्कें माहीत होतें. ही तिची युक्ति सफल झाली. कारण स्वयंवराची वार्ता ऐकून त्या स्वयंवरास जाण्यासाठीं ऋतुपर्ण राजा निघाला व विदर्भ देशाला आपण ताबडतोब जाऊन पोहोंचूं इतक्या जलदीनें रथ हांक अशी त्यानें त्या बाहुकाला आज्ञा केली. स्वयंवराची बातमी ऐकून बाहुकाला अत्यंत दुःख झालें; परंतु त्यानें अत्यंत जलद चालणारे घोडे रथाला जोडिले व त्याच दिवशीं संध्याकाळीं विदर्भ राजाच्या नगरांत तो जाऊन पोहोंचला. त्या ठिकाणीं दमयंतीनें असे कांहीं कुशलतेनें डाव योजिले कीं, तिचा संशय खरा ठरला, व तो नलराजाच असला पाहिजे असें स्पष्टपणें दर्शविणाऱ्या कांहीं गोष्टी दृष्टोत्पत्तीस आल्या. आपल्या अपत्यांना पाहिल्याबरोबर त्याच्या डोळ्यांत आंसवें आलीं व पाकशास्त्रामधील नलराजाचें विशेष कौशल्य बाहुकाच्या स्वयंपाकांत दिसून आलें. नंतर तिनें बाहुकाला आपल्या जवळ घेऊन येण्यास दूतांना सांगितलें; तेथें त्यांनीं परस्परांस ओळखिलें व पुढें दीर्घकालपर्यंत तीं एकत्र सुखानें राहिलीं. त्यांचें राज्य त्यांना परत मिळालें व पुत्रसुखाचाहि त्यांस लाभ झाला.*

शिवाय जी स्त्री आपल्या पतीवर खरें प्रेम करून त्याच्या उपयोगी पडते तिचा आत्मविकास व ज्ञानपरिपोष, दीर्घ तपश्चर्या व खडतर व्रताचरणें ह्यांच्यापेक्षां अधिक होतो, असें कौशिक नांवाच्या एका ब्राह्मणाच्या गोष्टीवरून दिसून येतें. ह्या कौशिक ब्राह्मणानें मोठी तपश्चर्या केली. एके दिवशीं तो एका वृक्षाखालीं ध्यानस्थ बसला असतां त्या वृक्षाच्या एका फांदीवर बसलेल्या एका बगळ्याची विष्टा त्याच्या अंगावर पडली. तों त्यानें वर डोळे करून क्रोधयुक्त मुद्रेनें त्या बगळ्याकडे पाहिलें. त्या ब्राह्मणाचें तपःसामर्थ्य येवढें होतें कीं, ज्याप्रमाणें विजेचा तडाखा बसावा त्याप्रमाणें त्याच्या त्या नेत्रकटाक्षानें तो बगळा मरून खालीं पडला. बगळा मेला म्हणून कौशिकाला वाईट वाटलें खरें; परंतु आपलें तपःसामर्थ्य कसोटीला उतरलें म्हणून

* महाभारत, वनपर्व ५३–७९.

गर्वानें त्यास आनंदही वाटला. पुढें तो नित्यक्रमाप्रमाणें एकदां एका शेजारच्या गांवीं भोजनभिक्षा मागण्याकरितां गेला असतां प्रथमतःच त्याला एक स्त्री आढळली. तिच्याजवळ तो भिक्षान्न मागूं लागला. ती अन्न आणण्यासाठीं घरांत गेली. इतक्यांत तिचा पति आला. तो दिवसभर काम केल्यामुळें अगदीं थकून गेला होता, व त्याचें शरीर धुळीनें मलिन झालें होतें. तेव्हां कौशिकाला कांहीं वेळ थांबण्यास सांगून ती आपल्या पतीच्या सेवेस लागली. तिला थोडासा विलंब लागला, त्याबरोबर कौशिक अधीर झाला. कांहीं वेळानें त्याला देण्यासाठीं अन्न घेऊन ती बाहेर आली, त्या वेळीं बगळ्याकडे त्यानें ज्या क्रोधयुक्त नजरेनें पाहिलें होतें त्याहीपेक्षां अधिक क्रोधानें तो तिच्याकडे पाहूं लागला. येवढा वेळपर्यंत तूं माझी उपेक्षा कां केलीस म्हणून तो तिला विचारूं लागला. परंतु ती सौम्यपणानें म्हणाली, "तुझी सेवा करण्यापेक्षां माझ्या पतीची सेवा करणें हें माझें अधिक महत्त्वाचें कर्तव्य होतें. हे ब्राह्मणा, आपला राग आंवर व मनामध्यें थोडी तरी क्षमा बाळग. माझ्याकडे क्रोधानें पाहूं नकोस. त्यामुळें तुलाच अपाय होईल. मी कांहीं तो बगळा नव्हे!" कौशिक ब्राह्मण ह्या तिच्या भाषणानें थक्क झाला, व हें ज्ञान तुला कसें झालें म्हणून त्यानें तिला विचारिलें. तेव्हां ती म्हणाली, "सिद्धि प्राप्त करून घेण्यासाठीं मीं कांहीं तपश्चर्या केलली नाहीं. मी फक्त माझ्या पतीची एकनिष्ठपणें सेवा करीत असतें. ह्या आमच्या साध्या गृहधर्मांतील सदाचाराविषयीं आणखी माहिती पाहिजे असेल तर मिथिला नगरींतील व्याधाकडे जा." तें ऐकून विनीतचित्त होऊन कौशिक ब्राह्मण मिथिला नगरीमध्यें गेला व त्या व्याधाच्या दुकानाभोंवतीं जमलेल्या गिऱ्हाइकांच्या दाटीमध्यें जाऊन उभा राहिला. व्याधानें कौशिकाला पाहिलें, व उठून पुढें येऊन त्याला प्रणिपात केला, आणि तो म्हणाला, "त्या एकनिष्ठ पतिव्रतेनें तुला माझ्याकडे कां पाठविलें तें मला माहीत आहे. तुझ्या शंकांचें मी निरसन करीन, व एवढें सामर्थ्य मला कसें प्राप्त झालें तेंहीपण तुला दाखवीन." नंतर कौशिकाला तो आपल्या घरीं कसें घेऊन गेला, आपल्या वृद्ध आईबापांचें त्याला त्यानें कसें दर्शन करून दिलें, वगैरे सर्व प्रकार पूर्वीं आलेलाच आहे.†

† महाभारत, वनपर्व २०५. प्रस्तुत पुस्तक, प्रकरण ८ पहा.

भावाभावांमधील बंधुप्रेम कसें असावें हें रामायणामध्यें आपल्याला आढळून येतें. लक्ष्मण हा रामाचा दुसरा प्राणच होता असें वर्णन तेथें आहे. त्यांचें परस्परांवरील प्रेमही तसेंच उत्कट होतें. ते एकत्र खेळत व एकत्र निजत. राम वनवासाला गेला तेव्हां लक्ष्मण त्याच्याबरोबर गेला. तेथें राम झोंपला असला म्हणजे हा जागत पहारा करीत असे. सीतेच्या शोधार्थ ह्यानेंही प्रयत्न केले व नेहमीं शहाणपणाचा सल्ला देऊन भक्ति व प्रेम व्यक्त केलें. युद्धांत बाण लागल्यामुळें जेव्हां तो लंकेमध्यें मूर्च्छित होऊन पडला, तेव्हां शोकाकुल होऊन राम म्हणाला, "लक्ष्मण तर रणभूमीवर जखमी होऊन पडला; आतां मला ह्या माझ्या जीविताशीं व युद्धाशीं काय कर्तव्य आहे ? हे लक्ष्मणा, मला टाकून तूं परलोकाला कां चाललास ? तुझ्यावांचून हें माझें जीवित, युद्धांतील जय, इतकेंच नव्हे तर; प्रत्यक्ष सीतासुद्धां मला व्यर्थ आहे."

भावाभावांतील एकोप्यामुळें व बंधुप्रेमामुळें ऐश्वर्य व कीर्ति ह्यांचा उत्कर्ष कसा होतो हें महाभारतांतील सर्व हकीकतीवरून चांगलें निदर्शनास येतें. पांडवांमध्यें केव्हांही फाटाफूट झाल्याचें किंवा वैषम्य आल्याचें दिसून येत नाहीं. युधिष्ठिर हाच सर्व पांडवांचा प्रतिनिधि, व त्याचेंच वैभव व धन वाढविण्याकरितां त्याच्या कनिष्ठ बंधूंचे सर्व प्रयत्न होते. त्याच्याच-करितां ते युद्ध करीत व संपत्ति मिळवीत. अर्जुनानें दुःखदायक व दीर्घ प्रवास करून, भयंकर कष्ट सोसून व उग्र तपश्चर्या करून जीं दिव्यास्त्रें मिळविलीं तीं त्याच्याचकरितां. युधिष्ठिरही त्यांचीं सुखदुःखें तींच आपलीं सुखदुःखें असें मानून त्यांच्याशीं वागत असे.

युधिष्ठिर ज्या वेळीं स्वर्गलोकांत गेला तेव्हां आपले बंधु व पत्नी कोठें आहेत म्हणून इकडे तिकडे पाहूं लागला. "ज्या ठिकाणीं माझे बंधु असतील त्या ठिकाणीं मी जाणार" असें वारंवार म्हणे, परंतु त्या तेजस्वी देवांमध्यें व यशस्वी राजेलोकांमध्यें त्याचीं प्रिय माणसें त्याला कोठें आढळेनात. सरतेशेवटीं तो मोठ्यानें ओरडून म्हणाला, "हे दिव्य लोकहो, माझे प्रिय बंधु जर ह्या ठिकाणीं नसतील तर ह्या तुमच्या स्वर्ग-लोकाशीं मला कांहीं कर्तव्य नाहीं. ज्या ठिकाणीं ते असतील तोच माझा स्वर्ग; हा नव्हे." तेव्हां ज्या ठिकाणीं त्याचे ते बंधु होते त्या ठिकाणीं त्याला घेऊन जाण्याविषयीं देवांनीं एका दूताला आज्ञा केली. नंतर तो स्वर्गलोक सोडून

बाहेर पडला, व क्रमाक्रमानें अधिकाधिक निस्तेज होत जाणाऱ्या प्रदेशांतून आपला मार्ग आक्रमीत चालला. हळुहळू अंधकार वाढत चालला व मार्गही भयंकर होत चालला. जातां जातां असह्य दुर्गंधीनें युक्त व हिडिस अशा आकृति त्याच्या सभोंवार दिसूं लागल्या व त्याचा मार्गही मृत शरीरांनीं आच्छादिलेला व रक्तानें भरलेला असून अधिकाधिक भीषण होत चालला. तीक्ष्ण कांट्यांनीं, टोंचणाऱ्या पानांनीं, तापलेल्या वाळूनें व दगडांनीं तो मार्ग भरलेला असल्यामुळें त्याची गति कुंठित झाली. तेव्हां त्यानें आश्चर्य-चकित होऊन, मला ह्या ठिकाणीं आणण्याला तुला कोणीं सांगितलें, असें त्या देवदूताला विचारलें. देवदूत बोलला, मी देवांच्या आज्ञेनुसार या ठिकाणीं आलों आहें. आपणांस पुढें जावयाचें नसल्यास मागें फिरण्यास हरकत नाहीं." असल्या दुर्गंधियुक्त व हिडिस प्रदेशामध्यें आपले बंधु असणें शक्य नाहीं असें युधिष्ठिराला खात्रीपूर्वक वाटत होतें; म्हणून तो सावकाश विचार करीत परंतु साशंक वृत्तीनें मागें वळला. इतक्यांत, आपण कांहीं वेळ थांबावें, असें आर्तस्वरानें कोणी तरी सांगताहेत, असें जिकडून तिकडून त्याच्या कानीं आलें. तेव्हां "तुम्ही कोण ?" म्हणून राजानें आश्चर्यचकित होऊन विचा-रिलें. त्यावर "मी कर्ण आहें," "मी भीष्म आहें," "मी अर्जुन आहें," "मी नकुल आहें," "मी सहदेव आहें," "मी द्रौपदी आहें," अशीं त्याच्या बंधूंचीं व इतर इष्टमित्रांचीं उत्तरें सर्व बाजूंनीं आलीं. आपल्या बंधूंसंबंधानें झालेल्या ह्या अन्यायानें संतप्त होऊन तो देव-दूताला म्हणाला, "जा, स्वर्गाला जा ! ज्यांनीं तुला दूत म्हणून पाठविला त्यांच्याकडे जा. मला त्या देवलोकाशीं कांहीं कर्तव्य नाहीं. ज्या ठिकाणीं माझीं प्रिय माणसें राहतात त्याच ठिकाणीं मी राहणार. जा, तूं स्वर्ग-लोकांतील रुक्ष आनंद उपभोगण्यास जा. त्या कोरड्या आनंदांत एकट्यानें राहाण्यापेक्षां ह्या लोकांबरोबर दुःखामध्यें राहिलेलें पुरवलें." असे उद्गार त्याच्या तोंडून निघाले; तोंच त्या प्रदेशाचें सर्व स्वरूप पालटलें, स्वर्गीय सुगंध सर्वत्र पसरला, सर्व हवा सुखकर झाली, जिकडे तिकडे दिव्य तेज दिसूं लागलें व सर्वत्र देवांची दाटी दिसूं लागली ! कारण प्रेम हें यमलोका-पेक्षां बलवत्तर आहे व निष्ठा ही दुःखाहूनही बलवत्तर आहे.†

---

† महाभारत, महाप्रस्थानिकपर्व व स्वर्गारोहणपर्व.

कुटुंबाबाहेरील आपल्या बरोबरीच्या इतर लोकांसंबंधानें जे सद्गुण आहेत त्यांत आदरातिथ्य हा प्रमुख होय. ह्या गुणाला केवढें महत्त्व आहे हें महाभारतांतील अर्धें शरीर सुवर्णमय असलेल्या एका नकुलाच्या ( मुंगुसाच्या ) गोष्टीवरून दिसून येतें. युधिष्ठिर राजानें राजसूययज्ञ केला; त्या वेळीं यज्ञमंडपाच्या सर्व कमानी, स्तंभ व यज्ञासंबंधीं सर्व पात्रें सुवर्णाचीं केलेलीं होतीं. यज्ञास आलेल्या लोकांना लागेल तेवढें द्रव्य व रत्नें घेऊन जाण्याची पूर्ण मुभा होती. ह्या यज्ञाला तो नकुलही आलेला होता. युधिष्ठिराचें तें द्रव्यदान पाहून तो म्हणाला, "एका गरीब ब्राह्मणानें अतिथीला दिलेल्या मूठभर सातूच्या पिठाची किंमत ह्या सर्व द्रव्यदानापेक्षां मोठी आहे." असें म्हणून त्यानें एक गोष्ट सांगितली, ती अशीः—एका ब्राह्मणानें उञ्छव्रत¶ घेतलें होतें. तो, त्याची भार्या, त्याचा मुलगा व सून जें धान्य मिळेल त्यावर एकभुक्त राहून आपली जीवितयात्रा चालवीत असत. एकदां एक भयंकर दुष्काळ पडला व व्रतानुसार वेंचून मिळण्याजोगें धान्य अधिक अधिक दुर्मिळ झालें. तेव्हां त्यांची उपासमार होऊं लागली व त्यामुळें तीं क्षीण होत जाऊन केवळ सजीव अस्थिपंजर बनलीं. एके दिवशीं असें घडून आलें कीं, त्या ब्राह्मणाला थोडेसे सातू मिळाले. त्यांचें त्याच्या पत्नीनें पीठ करून तें चौघांना थोडथोडें वांटून दिलें व तीं चौघेंही मोठ्या आनंदानें तें खाण्यासाठीं बसलीं. परंतु त्यांनीं तें खाण्यास सुरवात करण्यापूर्वींच एक अतिथि त्यांच्या दारीं आला. लगेच ब्राह्मणानें उठून त्याला आंत आणिलें, पाणी व आसन दिलें व आपल्या पुढील अन्न त्याच्यापुढें ठेविलें. अतिथीनें तें भक्षण केलें, तथापि त्याची क्षुधा शांत होईना. तेव्हां ब्राह्मणपत्नीनें आपल्या वांट्याचें अन्न अतिथीला देण्यासाठीं आपल्या पतीजवळ दिलें. तेव्हां ब्राह्मण तिला म्हणाला, "भार्ये, क्षीणतेनें व्याकुळ होऊन तुझा देह कांपतो आहे. हें अन्न तूंच खा, नाहीं तर माझें कुटुंब आजच नाहींसें होऊन जाईल." तरीसुद्धां आतिथ्यधर्म मोडला जाऊं नये म्हणून तिनें आग्रहच धरिला, तेव्हां ब्राह्मणानें एक दीर्घ निश्वास सोडून तें अन्न घेतलें व अतिथीला दिलें. तथापि तेवढ्यानेंही त्याचें भागेना. म्हणून पुत्रानें आपला अल्पसा वांटा पुढें केला, तोही त्या ब्राह्मणानें अतिथीला

¶ शेतावर वगैरे पडलेले दाणे वेंचून त्यावर उपजीविका करण्याचें व्रत.

दिला. इकडे आपल्या पुत्राची क्षुत्पीडा व शरीरक्षीणता पाहून ब्राह्मणाचें अंतःकरण कालवूं लागलें; परंतु तिकडे अतिथीची क्षुधा कांहीं केल्या शांत होईना. तेव्हां ब्राह्मणाच्या सुनेनें आपला वांटा पुढें केला; परंतु तो घेण्यास ब्राह्मणाच्यानें आपले हात पुढें करवेनात. ते लटलट कांपूं लागले. त्याचें हृदय करपून गेलें व त्यानें मोठ्या कष्टानें पुढें केलेले हात मागें घेतले आणि तो म्हणाला, "नको नको, मुली, तुझा वांटा नको." तेव्हां गोड आणि सौम्य शब्दांनीं ती म्हणाली, "मामंजी, आपल्या पुण्यकर्माची वांटेकरीण होण्यास मला प्रतिबंध करूं नका. अतिथि हा देवाप्रमाणें आहे. हा माझा वांटा त्याला द्या. मला तें अन्न आतां आपल्या मांसासमान वाटणार आहे." ब्राह्मण सद्गदित झाला, त्यानें तें अन्न हातांत घेतलें आणि किंचित् स्मित मुद्रेनें तें अतिथीला दिलें. अतिथीनें तें अन्न खाल्लें व तो जाण्यासाठीं उठला, इतक्यांत त्या ठिकाणीं दिव्य तेज प्रगट झालें व त्याच्या मध्यभागीं त्या अतिथीची तेजस्वी आणि सुंदर मूर्ति दिसूं लागली. खरोखरच तो अतिथि म्हणजे पवित्र महानुभाव धर्मदेवच होता. त्याचें थोडेंसें उच्छिष्ट पडलें होतें, त्यांत तो नकुल जाऊन लोळला. त्याबरोबर त्या महान् अतिथि-यज्ञाच्या पुण्यप्रभावानें त्याचें अर्ध शरीर सुवर्णमय झालें! युधिष्ठिराच्या त्या द्रव्यदानांतही हा एवढा प्रभाव नव्हता! असा हा आतिथ्यधर्म श्रेष्ठ व बहुमोल आहे व त्याचें सामर्थ्यही फार विलक्षण आहे.†

एक व्याध होता. निरुपद्रवी पशुपक्ष्यांना नित्य ठार मारण्याचीं कृष्ण-कृत्यें तो करी. त्याचें शरीरही त्याच्या कृत्यासारखेंच म्हणजे कृष्णवर्ण होतें. या मुक्या प्राण्यांविषयीं त्याच्या मनांत द्वेषाग्नि असे. त्यास शोभण्या-सारखे त्याचे नेत्रही आरक्त होते. हा दुष्ट व्याध एके दिवशीं अरण्यामध्यें गेला असतां त्याला जोराच्या पर्जन्यवृष्टीनें गांठलें. एका क्षणामध्यें त्या अरण्यांतील सर्व बखळी पाण्यानें भरून त्यांचे तलाव बनले व रस्त्यांतून नाल्यांप्रमाणें पाणी वाहूं लागलें. कांहीं उंचवट्याच्या जमिनीवर जाण्याचा त्यानें प्रयत्न केला; परंतु त्या जागा सिंह, अस्वलादि हिंस्र श्वापदांनीं पूर्वीच व्यापून टाकिल्या होत्या. व्याध थंडीनें कुडकुडतो आहे, भीतीनें कांपतो आहे, तरी सुद्धां त्याचीं दुष्ट कृत्यें चालूच होती. पर्जन्यवृष्टीच्या तडाख्या-

† महाभारत, वनपर्व ४-६.

मुळें व थंडीनें गारठून गेल्यामुळें जमिनीवर पडलेली बिचारी एक कपोती त्याला दिसली. तिला त्यानें वर उचललें व बरोबर आणिलेल्या पिंजऱ्यामध्यें निष्ठुरपणानें तिला कोंडून टाकिलें. पुढें भटकत भटकत चालला असतां थोड्याच वेळामध्यें अरण्याचे मध्यभागीं असलेल्या एका मोठ्या वृक्षाखालीं तो आला. त्या वृक्षावर असंख्य पक्षी छायेसाठीं व आश्रयासाठीं येऊन बसत असत. ज्याप्रमाणें जगाच्या कल्याणाकरितां एखाद्या साधूचा जन्म असतो तद्वत् जणुं सर्व पशुपक्ष्यादि प्राण्यांच्या हिताकरितां विधात्यानें हा वृक्ष त्या ठिकाणीं उत्पन्न केला होता. व्याधानें त्या वृक्षाच्या विस्तृत छायेचा आश्रय केला. हळुहळू मेघ नाहींसे होऊं लागले व आकाशांत तारे चमकूं लागले. व्याध आपल्या घरापासून फार दूर अंतरावर आल्यामुळें ती रात्र त्या वृक्षाखालींच घालविण्याचा त्यानें निश्चय केला. तो त्या वृक्षाखालीं पडला असतां कपोताचे पुढीलप्रमाणें दुःखोद्गार त्याला ऐकूं आले. "हाय, हाय! प्रिये, तूं अजून आली नाहींसना ? तुझ्यावर कोणतें संकट आलें असेल बरें! केवढें तुझ्यावर माझें प्रेम! जर का तूं पुन्हा घरट्यामध्यें परत आली नाहींस, तर यापुढें मला जिवंत राहणें शक्य नाहीं. घर हें खरें घर नव्हे, तर गृहिणी हेंच खरें घर होय. मीं खाल्ल्यानंतर तूं खातेस; मीं स्नान केल्यानंतर तूं स्नान करितेस; मला आनंद झाला कीं तुला होतो व मला दुःख झालें तर तुला दुःख होतें; तथापि मी जरी रागावलों तरी तुझ्या मुखांतून मधुरच शब्द येतात. अशा गृहिणीवांचून जीवित शुष्क होय. अशी गृहिणी नसेल तर राजवाडासुद्धां अरण्यवत् होय. अशा प्रकारची गृहिणी ही धर्म, अर्थ व काम ह्या तीनही पुरुषार्थांमध्यें आपल्या पतीची खरी प्रेमळ सहचारिणी व विश्वासार्ह सखी असते. पत्नी हें पतीचें एक अमूल्य निधान होय. त्याच्या जीवितयात्रेंतील सदा सन्निध असणारी अशी ती एकच सहचारिणी होय. पतीच्या मानसिक दुःखाचा परिहार करणारी ती अमोघ अमृतवल्लीच होय. तिच्यासारखा दुसरा सखा नाहीं व तिच्यासारखें दुसरें आश्रयस्थानही नाहीं."

आपल्या पतीच्या मुखांतून निघालेले हे दुःखालाप ऐकून त्या दुष्ट व्याधानें पिंजऱ्यांत कोंडून ठेविलेली ती कपोती आपल्याशींच म्हणाली, "माझ्याबद्दलचे माझ्या पतीचे हे विचार ऐकून ह्या माझ्या दुःस्थितीमध्यें

सुद्धां माझ्या मनाला अपरिमित समाधान होत आहे. जिच्यापासून पतीला समाधान होत नाहीं ती पत्नीच नव्हे; परंतु भयंकर तुफानाच्या तडाख्यांत सांपडून आपल्या घरास मुकलेल्या ह्या बिचाऱ्या व्याधाचीहि आपण काळजी घेतली पाहिजे. ह्या आमच्या वृक्षाचा त्यानें आश्रय केल्यामुळें तो आतां आमचा अतिथि बनला आहे." असा विचार करून तिनें त्या व्याधाच्या कष्टमय स्थितीचें वर्णन आपल्या पतीला ऐकूं जाईल असें मोठ्यानें केलें. तेव्हां कपोताला सुद्धां लगेच त्या व्याधाची दया आली व आपलीं सर्व दुःखें विसरून तो व्याधाला म्हणाला, "हे व्याधा, तूं आमचा अतिथि आहेस; तुझें मी स्वागत करितों. तुझ्यासाठीं मीं काय केलें पाहिजे तें सांग." व्याध म्हणाला, "थंडीनें माझीं गात्रें आंखडून गेलीं आहेत, तेव्हां शक्य असेल तर अग्नि आणून माझ्या थंडीचें निवारण कर." कपोतानें वाळलेला पाला जमा करून त्याची रास केली व एक पान आपल्या चोंचींत धरून तो जवळच्या खेड्यांत गेला व त्या पानावरून एक लहानसा निखारा घेऊन आला. त्या अग्नीमुळें व्याधाच्या शरीरांत लगेच उबारा उत्पन्न झाला. पुढें आणखी कोणती सेवा केली पाहिजे असें कपोतानें विचारिल्यावरून व्याधानें अन्न मागितलें. तेव्हां कपोतानें विचार केला, "व्याधाला देण्यास मजजवळ अन्न-संचय नाहीं; परंतु भुकेलेल्या अतिथीला उपाशीं तर ठेवितां येत नाहीं." असा मनांत विचार चालला असतां त्याच्या अंतःकरणांत एकाएकीं नवीन विचार आला व तो व्याधाला म्हणाला, "मी तुझी क्षुधा शांत करितों. अतिथी-चा सत्कार करण्यांत महत्पुण्य आहे असें ऋषि, देव, पितर अशा महात्म्यांच्या तोंडून मीं पूर्वीं ऐकिलें आहे. म्हणून हे मित्रा, माझ्यावर मेहरबानी करून माझ्या ह्या अल्पशा सेवेचा स्वीकार कर." असें म्हणून त्यानें अग्नीला तीन प्रदक्षिणा केल्या व त्यांत उडी टाकिली. अशा रीतीनें त्या कपोतानें अतिथीला अन्न देण्यासाठीं आपला देह अर्पण केला !

अप्रतिम अतिथिसत्काराच्या ह्या दारुण कृत्यानें व्याधाच्या मनासमोर त्याच्या पूर्व पापकर्मांचा समग्र इतिहास उभा राहिला व तद्विषयक भीतीचा मनावर पगडा बसून एका फटक्यासरसें त्याच्या दुष्टवृत्तीचें उच्चाटन झालें. त्याच्या मनास जबर धक्का बसला. तेव्हां "हे महानुभाव कपोता, तूं माझा परम गुरु आहेस. तूं मला माझ्या धर्माची ओळख करून दिलीस. ज्या-

प्रमाणें ग्रीष्म ऋतूंतील सूर्याच्या किरणांनीं एखादें लहानसें घाणेरडें डबकें कोरडें ठणठणीत होऊन जातें, तद्वत् शारीरिक सुखोपभोगांचा त्याग करून नित्य उपोषणानें व तपश्चरणानें दोषांसहित हें सर्व शरीर हळुहळू क्षीण करून मी आजपासून सर्व पापांचें क्षालन करणार व हें तुझें उदाहरण डोळ्यांपुढें ठेवून आजपासून मी धर्मानें वागणार" असें म्हणून त्यानें आपल्या हातांतील बडगा, जाळें, फांस व लोखंडी पिंजरा हीं फेंकून दिलीं व आत्मयज्ञ करणाऱ्या कपोताच्या स्त्रीला बंधमुक्त केली. तेव्हां बंधमुक्त झालेल्या त्या कपोतीनें आपल्या पतीच्या चितेभोंवतीं प्रदक्षिणा केली व सद्गदित अंत:करणानें पतीला उद्देशून म्हणाली, "स्त्रीला तिच्या पित्याकडून, मातेकडून अगर पुत्राकडून जें कांहीं मिळतें त्याला कांहींतरी मर्यादा असते. परंतु पतीकडून जें मिळतें तें अमर्याद असतें. पति आपल्या पत्नीला सर्वस्व अर्पण करितो. तुझ्या सहवासांत इतकीं वर्षें मोठ्या आनंदानें काढिलीं, आतां एकटी जिवंत राहणें मला अशक्य आहे." असें म्हणून तिनेंही त्या अग्नींत उडी टाकली.

व्याधास नवीन दृष्टि प्राप्त झाली व त्यामुळें तीं कपोत व कपोती दोघेंही दिव्य देह धारण करून स्वर्गलोकीं जात आहेत असें त्या व्याधाला दिसून आलें. तेव्हां तर त्याचा कृतनिश्चय दृढतर होऊन त्यानें त्याच अरण्याचा आश्रय केला व ह्यानंतर आपलें आचरण निर्दोष करून शेवटीं तपश्चरणाच्या योगानें आपलीं सर्व पापें भस्म केलीं आणि ग्रीष्म ऋतूंतील वादळानें अरण्यांतील वृक्षांच्या कोरड्या फांद्यांचें एकमेकांवर घर्षण होऊन उत्पन्न झालेल्या दावाग्नींत त्यानें आपला देहही पापांप्रमाणें भस्मसात् केला. †

दुसऱ्यांच्या अपराधांबद्दल त्यांस क्षमा करणें हें खऱ्या उदात्त स्वभावाचें लक्षण होय. रामचंद्राविषयीं असें वर्णन आहे कीं, दुसऱ्यांचे शेंकडों अपराध झाले तरी त्यांच्या स्मृतिपटलावर त्यांचा मागमूसही नसे; परंतु एखाद्या सत्कृत्याचा ठसा मात्र अगदीं कोरल्याप्रमाणें त्यावर राहात असे.* विदुरानें आपला अपमान विसरून धृतराष्ट्राला कशी क्षमा केली तें पाहण्याजोगें आहे. दुर्योधनाच्या दुर्वर्तनाच्या बाबतींत धृतराष्ट्रानें विदुरास विचारिलें. तेव्हां विदुरानें त्याला शहाणपणाचा परंतु निर्भिडपणाचा सल्ला देऊन, पांडवांशीं साम करणें

---

† महाभारत, शांतिपर्व १४३–१४९. * रामायण, अयोध्याकांड.

हें दुर्योधनाचें कर्तव्य आहे, तें बजावण्याविषयीं त्याला तूं भाग पाड व त्याला मदत करणाऱ्या त्याच्या अनुयायांना, छळ करून हद्दपार केलेल्या राजपुत्रांची क्षमा मागण्यास लाव, अशी विनंति केली. तें ऐकून धृतराष्ट्राला फार राग आला व त्यानें आपल्या धर्मशील बंधूवर–विदुरावर–पक्षपातीपणाचा व बेइमानीपणाचा आरोप करून त्याला एकदम दोष दिला व ह्या आरोपावर आणखी अपमानाचा डाग देऊन, क्रोधवश होऊन धृतराष्ट्र तेथून निघून गेला. तेव्हां विदुराला वाईट वाटून तो पांडवांकडे गेला व आपणाला धृतराष्ट्र कसा टाकून बोलला व आपणाला इकडे कां यावें लागलें, तें सर्व सांगून त्यानें शहाणपणानें व शिष्टपणानें वागण्याबद्दल त्यांना उपदेश केला. विदुर गेल्यानंतर त्याच्याशीं कठोरपणाचें व अन्यायाचें वर्तन केल्याबद्दल धृतराष्ट्राला पश्चात्ताप झाला व त्याला परत येण्याबद्दल विनंति करण्यासाठीं संजयाला पाठविण्याचें ठरवून तो संजयास म्हणाला, "हे संजया, मी क्रोधवश होऊन मूर्खपणानें माझ्या भावाला घालवून दिलें. तो जिवंत आहे कीं काय तें पाहा. त्यानें केव्हांही माझा अपराध केलेला नाहीं. मीं मात्र त्याचा भयंकर अपमान केलेला आहे. तर त्याचा शोध करून त्याला इकडे घेऊन ये." तेव्हां संजय निघाला. परंतु विदुर आपल्या बंधूला त्याच्या लहरी स्वभावाबद्दल क्षमा करून पूर्ववत् त्याच्या राज्याच्या आधारस्तंभासारखा होईल किंवा नाहीं याबद्दल मात्र त्याला जबर शंका उत्पन्न झाली. तो वनामध्यें गेला व विदुराला भेटला. त्या ठिकाणीं पांडव व इतर सर्व लोक विदुराचा योग्य सन्मान ठेवीत आहेत असें त्याला आढळलें. विदुराजवळ जाऊन त्यानें त्याला परत हस्तिनापुरास येण्याबद्दल विनंति केली. तेव्हां क्षणाचाही विलंब न लावितां विदुर उठला, त्यानें आपल्या पुतण्यांचा निरोप घेतला व तो वडील बंधूकडे–धृतराष्ट्राकडे–आला. धृतराष्ट्रानें झालेल्या अपराधाबद्दल त्याची क्षमा मागितली. तेव्हां विदुर सौम्यपणानें म्हणाला, "हे राजा, मीं क्षमा केली आहे. तूं माझा ज्येष्ठ बंधु असल्यामुळें तुझ्याविषयीं माझी अतिशय पूज्यबुद्धि आहे. तुला पाहावें ह्या उत्कंठेनें मी घाईघाईनें आलों आहें. पांडवांचा मी कैवार घेतों असें जें दिसतें त्याचें कारण हेंच कीं, विपन्नावस्थेंत सांपडलेल्या माणसांबद्दल एखाद्याच्या अंतःकरणाला पीळ बसतो व तो केवळ विचारानेंच बसतो असें नव्हे तर

भावनांच्या उत्कटतेमुळेंही बसतो. हे राजा, पांडवांप्रमाणेंच तुझेही पुत्र मला प्रिय आहेत; परंतु पांडवांची विपन्नावस्था पाहून माझें अंतःकरण कळवळतें." ह्याप्रमाणें आपला झालेला अपमान यःकश्चित् आहे असें विदुरानें मानिलें व तो अपमान विसरून जाऊन आपल्या मनाचा मोठेपणा त्यानें व्यक्त केला.꙳

सभ्यपणा हा गुण प्राचीन हिंदुलोकांच्या आचरणामध्यें प्राधान्यानें दिसून येतो. महाकाव्यांतील प्रमुख प्रमुख माणसें, मग तीं चांगलीं असोत वा वाईट असोत; आपापल्या अतिथींशीं, मित्रांशीं अगर शत्रूंशीं वागतांना किंवा बोलतांना किती पराकाष्ठेचा सभ्यपणा दाखवीत असत हें त्या काव्यांवरून दिसून येतें. रामचंद्राचें बोलणें नेहमीं सभ्यपणाचें असून बोलतांना त्याच्या चेहऱ्यावर स्मित दिसे.† देवी लक्ष्मी दानवांसंबंधानें म्हणते-ते मधुरभाषी, मित्रत्वानें वागणारे व क्षमाशील होते तोंपर्यंत त्यांच्या त्या गुणांवर लुब्ध होऊन आपण त्यांच्यापाशीं राहिलें; परंतु जेव्हां ते क्रोधाविष्ट होऊन कठोर बनले व अन्यायानें वागूं लागले, तेव्हां आपण आपल्या सहचरी देवी आशा, श्रद्धा, धृति, शांति, विजिति, सन्नति व क्षमा ह्यांसह त्यांना सोडून गेलें.× त्याचप्रमाणें नारद हा मधुरभाषी, थोर अंतःकरणाचा, सरळ व क्रोध आणि लोभ ह्यांपासून अलिप्त असा होता, म्हणूनच तो सर्वांना प्रिय असून त्याचा सर्वत्र बहुमान होत असे.¶ भीष्म सुद्धां आपणांला हेंच सांगतात कीं, आम्हीं आपल्या दृष्टिक्षेपानें, वाचेनें अगर मनानें सुद्धां दुसऱ्यांचा अवमान करितां नये, किंवा कोणाविषयींही वाईट बोलतां नये. दुसऱ्याला पीडा देतां नये किंवा कोणाशींही शत्रुत्वानें वागतां नये. दुसऱ्यांच्या कुत्सित भाषणाकडे दुर्लक्ष केलें पाहिजे, आणि जरी एखाद्यानें आपणांला राग येण्यासारखें कांहीं केलें तरी आपण त्याच्याशीं गोडच भाषण केलें पाहिजे. त्यानें आपली निंदा केली तरी आपण त्याची उलट निंदा करितां नये.‡ कर्म, ज्ञान व भक्ति ह्या

꙳ महाभारत, अश्वमेधपर्व ९२.

† रामायण, अयोध्याकांड १.

× महाभारत, शांतिपर्व २३०.

¶ महाभारत, शांतिपर्व. २२८.

‡ महाभारत, शांतिपर्व २७. ८.

तीनही मार्गांचें अवलंबन करून वागणाऱ्या पद्म नामक नागाचें नारदानें वर्णन केलें आहे. तें असें कीं, तो नेहमीं आतिथ्यतत्पर व क्षमाशील असे, व त्याच्यापासून परपीडा केव्हांही होत नसे. तो सत्यवादी असून निर्मत्सर होता, तसाच प्रियवाक् असून परहितेच्छुही होता. एक ब्राह्मण त्याला भेटून विद्या संपादन करण्यासाठीं त्याच्याजवळ गेला; परंतु त्याच्या घरीं जातो तों तो घरीं नाहीं असें त्याला आढळलें. नागपत्नीनें ह्या अतिथीचा आदरसत्कार केला व त्यानेंही तिच्याशीं शिष्टाचाराला अनुसरून भाषण केलें. मग नदीच्या कांठावर जाऊन शांतपणानें तो तिच्या पतीची वाट पहात राहिला. त्या मुदतींत त्यानें कांहीं सुद्धां भक्षण केलें नाहीं. हें पाहून नागाच्या कुटुंबांतील माणसांला महद्दुःख झालें व तीं त्याच्याकडे जाऊन आपलें आतिथ्य करणें हा आमचा धर्म आहे अशी त्याला विनंति करूं लागलीं. "आम्हीं आमचा आतिथ्यधर्म निष्काळजीपणानें टाकून दिला आहे, असें ह्या आपल्या अनशन वृत्तीमुळें उघड होत आहे, व त्याबद्दल नागवंशांतील लहानथोर सर्व मंडळीला हळहळ वाटत आहे," असें ती मंडळी म्हणूं लागली; तेव्हां ब्राह्मणानें सौम्यपणानें उत्तर दिलें कीं, तुमच्या ह्या प्रेमपूर्वक सदिच्छेनेंच माझी क्षुधा शांत झाली आहे व तुमच्या घरचा यजमान परत येईपर्यंत मी अन्नग्रहण करणार नाहीं, नंतर अंमळशानें नाग आला. तेव्हां त्याच्या पत्नीबरोबर जें त्याचें संभाषण झालें त्यांत गृहधर्माचें विवेचन केलेलें आहे. सर्वांचें प्रिय करणें हा गृहस्थाचा धर्म आहे; आलेल्या अतिथीचा आदरसत्कार करणें हें त्याचें कर्तव्य आहे; त्यानें सभ्य असलें पाहिजे, क्रोध व गर्व ह्यांपासून अलिप्त राहिलें पाहिजे व उदारमनस्क आणि सत्यवादी झालें पाहिजे.* सभोंवतालच्या लोकांसंबंधानें प्रत्येक नागरिकाचा धर्म काय आहे याची प्राचीनकाळची ही अशी शिकवण होती.

---

पितृभिर्भ्रातृभिश्चैताः पतिभिर्देवरैस्तथा ।
पूज्या भूषयितव्याश्च बहुकल्याणमीप्सुभिः ॥

---

* महाभारत, शांतिपर्व ३५६–३६१.

यत्र नार्यस्तु पूज्यन्ते रमन्ते तत्र देवताः।
यत्रैतास्तु न पूज्यन्ते सर्वास्तत्राफलाः क्रियाः॥
शोचन्ति जामयो यत्र विनश्यत्याशु तत्कुलम्।
न शोचन्ति तु यत्रैता वर्द्धते तद्धि सर्वदा॥
जामयो यानि गेहानि शपन्त्यप्रतिपूजिताः।
तानि कृत्याहतानीव विनश्यन्ति समन्ततः॥†

कल्याण प्राप्त करून घेण्याची इच्छा असेल तर स्त्रियांना त्यांच्या पित्यानें, बंधूनें, पतीनें व दिरानें पूज्य मानून विभूषित केलें पाहिजे.

ज्या ठिकाणीं स्त्रियांना मान दिला जातो त्या ठिकाणीं देवता संतुष्ट असतात. जेथें त्यांना मान दिला जात नाहीं तेथें सर्व कर्में निष्फल होतात.

ज्या कुलामध्यें स्त्रीवर्गाला दुःखांत रहावें लागतें तें कुल ताबडतोब नाश पावतें, आणि ज्यामध्यें त्यांना दुःख प्राप्त होत नाहीं त्या कुलाची सर्वदा भरभराट होत जाते.

स्त्रीवर्गाला योग्य मान न मिळाल्यामुळें स्त्रिया ज्या कुलांना शाप देतात तीं कुलें जादूच्या प्रयोगाप्रमाणें सर्वस्वीं नाश पावतात.

एतावानेव पुरुषो यज्जायात्मा प्रजेति ह।
विप्राः प्राहुस्तथा चैतद्यो भर्ता सा स्मृताऽङ्गना॥‡

स्वतः पति, त्याची भार्या व मुलें येवढ्यांना मिळून पुरुष ही संज्ञा आहे. जो पति तीच पत्नी असें ज्ञानी लोक म्हणतात.

अन्योन्यस्याव्यभीचारो भवेदामरणान्तिकः।
एष धर्मः समासेन ज्ञेयः स्त्रीपुंसयोः परः॥
तथा नित्यं यतेयातां स्त्रीपुंसौ तु कृतक्रियौ।
यथा नातिचरेतां तौ वियुक्ताविरेतरम्॥※

परस्परांवर मरेपर्यंत निष्ठा असावी, हा नवराबायकोंचा थोडक्यांत सांगितलेला धर्म आहे असें जाणावें.

---

† मनुस्मृति, ३.५५,५८. ‡ मनुस्मृति, ९. ४५.
※ मनुस्मृति, ९. १०१, १०२.

विवाह झाल्यानंतर स्त्री-पुरुषांनीं नेहमीं असें वागावें कीं, एकमेकांचा वियोग होऊं नये व परस्परांवरील निष्ठेचा भंग होऊं नये.

तृणानि भूमिरुदकं वाक्चतुर्थी च सूनृता।
एतान्यपि सतां गेहे नोच्छिद्यन्ते कदाचन॥
अप्रणोद्योऽतिथिः सायं सूर्योढो गृहमेधिना।
काले प्राप्तस्त्वकाले वा नास्यानश्नन्गृहे वसेत्॥
न वै स्वयं तदश्नीयादतिथिं यन्न भोजयेत्।
धन्यं यशस्यमायुष्यं स्वर्ग्यं चातिथिभोजनम्॥†

गवत, जागा, उदक व चौथी गोड वाणी ह्यांची कोणाही सद्गृहस्थाच्या घरीं केव्हांही वाण नसते.

कोणाही गृहस्थानें संध्याकाळीं सूर्यास्ताच्या वेळीं आलेल्या अतिथीला विन्मुख घालवूं नये. तो योग्य वेळीं येवो अथवा अयोग्य वेळीं येवो, तो उपाशीं राहातां कामा नये.

अतिथीला जें अन्न आपण दिलें नाहीं तें गृहस्थानें आपण स्वतः सेवन करूं नये. अतिथिसत्कारानें त्याला धन, कीर्ति, आयुष्य व स्वर्गसुख हीं प्राप्त होतात.

सत्यं ब्रूयात्प्रियं ब्रूयान्न ब्रूयात्सत्यमप्रियम्।
प्रियं च नानृतं ब्रूयादेष धर्मः सनातनः॥ ❀

सत्य व प्रिय बोलावें; परंतु सत्य असलें तरी अप्रिय बोलूं नये, किंवा प्रिय असलें तरी असत्य बोलूं नये, हा सनातन धर्म होय.

यस्य वाङ्मनसी शुद्धे सम्यग्गुप्ते च सर्वदा।
स वै सर्वमवाप्नोति वेदान्तोपगतं फलम्॥
नारुन्तुदः स्यादार्तोऽपि न परद्रोहकर्मधीः।
ययास्योद्विजते वाचा नालोक्यां तामुदीरयेत्॥ ×

---

† मनुस्मृति, ३. १०१, १०५, १०६. ❀ मनुस्मृति, ४. १३८.

× मनुस्मृति, १६०, १६१.

ज्याची वाणी व मन हीं सर्वदा शुद्ध असतात, आणि जे त्यांची काळजीपूर्वक जोपासना करतात, त्यांना वेदान्तानें प्राप्त होणारें सर्व फळ मिळतें.

स्वतःला दुःख झालें असलें तरी दुसऱ्याचा मर्मच्छेद करूं नये किंवा त्याच्याशीं वैर करण्याची बुद्धि धरूं नये; आणि ज्या भाषणानें दुसऱ्याला उद्वेग होतो तसलें भाषण करूं नये.

नास्तिक्यं वेदनिन्दां च देवतानां च कुत्सनम् ।
द्वेषं स्तंभं च मानं च क्रोधं तैक्ष्ण्यं च वर्जयेत् ॥†

नास्तिकपणा, वेदांची व देवतांची निंदा, द्वेष, ताठा, गर्व, क्रोध व कठोरपणा हे वर्ज करावेत.

नारुन्तुदः स्यान्न नृशंसवादी न हीनतः परमभ्याददीत ।
ययाऽस्य वाचा पर उद्विजेत न तां वदेदुषतीं पापलोक्याम् ॥
अरुन्तुदं परुषं तीक्ष्णवाचम् वाक्कंटकैर्वितुदन्तं मनुष्यान् ।
विद्यादलक्ष्मीकतमं जनानाम् सुखे निबद्धां निर्ऋतिं वहन्तम् ।
वाक्सायका वदनान्निष्पतन्ति यैराहतः शोचति रात्र्यहानि ।
परस्य नाम मर्मसु ते पतन्ति तान्पण्डितो नावसृजेत्परेषु ॥
न हीदृशं संवननं त्रिषु लोकेषु विद्यते ।
दया मैत्री च भूतेषु दानं च मधुरा च वाक् ॥
तस्मात्सांत्वं सदा वाक्यं न वाक्यं परुषं क्वचित् ।
पूज्यान्संपूजयेद्दद्यान्न च याचेत्कदाचन ॥ ❀

कोणींही दुसऱ्याचा मर्मभेद करूं नये, दुष्टपणानें बोलूं नये, किंवा निंद्य उपायांनीं दुसऱ्यावर पगडा बसवूं नये. ज्या भाषणानें दुसऱ्याच्या मनांत उद्वेग उत्पन्न होतो अशा तऱ्हेचें पापलोकामध्यें शोभणारें मर्मभेदक भाषण करूं नये.

जो दुसऱ्याचा मर्मभेद करितो, कठोरपणानें वागतो, ज्याची वाणी तीक्ष्ण असते, व जो दुसऱ्या लोकांना मनास झोंबतील अशा शब्दांनीं पीडा

---

† मनुस्मृति, २. १६३. ❀ महाभारत, आदिपर्व ८७. ८, ९, ११–१३.

देतो त्याच्यावर इतरांपेक्षां लक्ष्मीची अधिक अवकृपा असते व त्या मुखामध्यें सदोदित राक्षसांची वसती असते.

मुखांतून निघणारे अशा प्रकारचे शब्द खरोखर वाग्बाणच होत; ज्याच्यावर त्यांचा प्रहार होतो त्याला अहोरात्र दुःख होत असतें, कारण ते त्याचा मर्मभेद करितात. शहाण्या मनुष्यानें असले वाग्बाण दुसऱ्यावर सोडूं नयेत.

दया, सर्वांशीं मैत्री, दान व मधुर वाणी ह्यांच्यासारखें तीनही लोकांमध्यें वश करण्याचें दुसरें साधन नाहीं.

म्हणून नेहमीं गोड बोलावें; कठोर भाषण कधींही करूं नये. तसेंच, पूज्य मनुष्याचा सन्मान करावा; आणि नेहमीं दान करावें, परंतु याचना कधीं करूं नये.

क्रुद्धः पापं नरः कुर्यात्क्रुद्धो हन्याद् गुरूनपि ।
क्रुद्धः परुषया वाचा श्रेयसोऽप्यवमन्यते ॥

आत्मानमपि च क्रुद्धः प्रेषयेद्यमसादनम् ।
एतान्दोषान्प्रपश्यद्भिर्जितः क्रोधो मनीषिभिः ॥ †

रागावलेला मनुष्य कोणतेंही पाप करील, वडील माणसांचा सुद्धां वध करील व कठोर भाषणानें पूज्य मनुष्यांचाही अवमान करील.

रागावलेला मनुष्य आपलाही प्राणघात करील. क्रोधापासून उत्पन्न होणारे हे अशा प्रकारचे दोष आहेत हें जाणून शहाणे लोक क्रोधाला जिंकितात.

किंस्विदेकपदं ब्रह्मन् पुरुषः सम्यगाचरन् ।
प्रमाणं सर्वभूतानां यशश्चैवाप्नुयान्महत् ॥
सांत्वमेकपदं शक्र पुरुषः सम्यगाचरन् ।
प्रमाणं सर्वभूतानां यशश्चैवाप्नुयान्महत् ॥
एतदेकपदं शक्र सर्वलोकसुखावहम् ।
आचरन्सर्वभूतेषु प्रियो भवति सर्वदा ॥❀

आपला गुरु जो बृहस्पति त्यास इंद्र विचारतोः—हे ब्रह्मन्, अशी कोणती

---

† महाभारत, वनपर्व २९. ४, ६. ❀ महाभारत, शांतिपर्व ८४. २, ४.

एक गोष्ट आहे कीं, जिच्या योगानें चांगल्या रीतीनें वागणारा मनुष्य सर्व जीवांना आदर्शवत् होईल व महत्कीर्ति मिळवील ?

हे इंद्रा, चांगल्या रीतीनें वागणारा मनुष्य सर्व जीवांना आदर्शवत् होऊन महत्कीर्ति मिळवील अशी गोष्ट म्हणजे एक सौजन्यच होय.

हे इंद्रा, ही एकच गोष्ट सर्व लोकांना आनंद देणारी आहे. जो मनुष्य सौजन्यानें वागतो तो सर्व जीवांना नेहमीं प्रिय होतो.

यस्तु क्रोधं समुत्पन्नं प्रज्ञया प्रतिबाधते ।*
तेजस्विनं तं विद्वांसो मन्यन्ते तत्त्वदर्शिनः ॥

जो मनुष्य आपला क्रोध शहाणपणानें नाहींसा करितो त्याला तत्त्व जाणणारे ज्ञानी लोक खरा तेजस्वी असें समजतात.

---

## प्रकरण दहावें

# कनिष्ठांसंबंधीं सद्गुण-दुर्गुण.

जसजसे आपण ह्या संसारांत अधिकाधिक शिरत जातों तसतसा आपल्यापेक्षां कनिष्ठ लोकांशीं म्हणजे पुढच्या पिढींतील लोकांशीं, किंवा शिक्षणानें अगर संपत्तीनें आपल्याहून मागासलेल्या लोकांशीं, किंवा सामाजिक दृष्ट्या खालच्या पायरीवर असलेल्या लोकांशीं, आपला अधिकाधिक संबंध येत जातो. जेव्हां अशा कोणत्या तरी विशिष्ट बाबतीमध्यें साधारणतः आपल्याहून कनिष्ठ असलेल्या लोकांशीं आपला संबंध येतो, तेव्हां तो संबंध सुरळीत व सलोख्याचा होण्यासाठीं आपल्या अंगीं कोणत्या सद्गुणांचा विकास झाला पाहिजे व कोणते दुर्गुण आपण टाळिले पाहिजेत हें पाहाणें अवश्य आहे.

ह्यासंबंधांपैकीं सर्वांत मुख्य व ठळक संबंध म्हटला म्हणजे आपल्या पुढच्या पिढींतील लोकांशीं येणारा संबंध होय, व त्याला आवश्यक सद्गुणांचीं सर्वांत उत्कृष्ट उदाहरणें म्हटलीं म्हणजे आईबाप व मुलें ह्यांच्यासंबंधांत दिसून येणारे सद्गुण होत. प्रेमळ आईबापांच्या अंतःकरणांमध्यें

---

* महाभारत, वनपर्व २९. १७.

शांतपणा, दयालुत्व, सौजन्य व प्रेमळपणा हे गुण अतिशय ठळक रीतीनें दिसून येतात, व त्यामुळें त्यांचें सर्व कुटुंब सुखी व आनंदी असतें. आईबाप आपल्या मुलांच्या दुःखांचे वांटेकरी होतात, त्यांच्या सुखानें आनंदित होतात, व प्रत्येक बाबतीमध्यें त्यांच्याशीं आपलेपणानें वागतात.

आपलीं मुलें संकटामध्यें असलेलीं पाहून दुःखित झालेल्या सुरभीच्या एका प्राचीन गोष्टीमध्यें ह्या गुणांचें सुंदर वर्णन केलेलें आढळतें, प्राचीन काळीं एकदां स्वर्गीय गोमाता सुरभि अश्रु ढाळीत देवेंद्रासमोर जाऊन उभी राहिली. इंद्रानें तिला मोठ्या उत्कंठेनें विचारिलें, "हे सुभगे गोमाते, तूं अशी कां रडत आहेस ? असें कोणतें संकट तुझ्यावर कोसळलें आहे ?" तेव्हां सुरभीनें उत्तर केलें, "हे त्रिलोकाधिपते, स्वतः माझ्यावर कोणतेंही संकट आलेलें नाहीं. परंतु माझ्या संततीबद्दल मला फार दुःख होत आहे. तो पहा दुष्ट शेतकरी माझ्या दुर्बल पुत्राला कसा बडवीत आहे. माझा पुत्र तर मोठ्या कष्टानें नांगर ओढीत आहे व निःशक्त झाल्यामुळें वारंवार जमिनीवर पडत आहे. त्याच्या जोडीचा माझा दुसरा पुत्र नेटानें काम करीत आहे, पण ह्याला मोठे कष्ट होत आहेत. त्याच्याचसाठीं माझें हृदय भडभडून आलें आहे व डोळे पाण्यानें भरले आहेत." नंतर इंद्रानें आश्चर्यानें विचारिलें, "तुझे हजारो पुत्र दररोज अशाच रीतीनें वागविले जात आहेत;" तेव्हां सुरभि पुन्हा म्हणाली, "देवेंद्रा, अशा प्रत्येक पुत्रासाठीं माझें मन हळहळत आहे व त्यांतल्यात्यांत दुर्बलांबद्दल तर मला अतिशयच दुःख होत आहे." हें ऐकतांच आपल्या विपद्ग्रस्त पुत्रांबद्दल त्या गोमातेच्या हृदयांत केवढें उत्कट प्रेम वास करीत आहे हें इंद्राला कळून आलें, व त्यानें पृथ्वीवर पर्जन्यवृष्टि करून मनुष्यांना व जनावरांना आनंदित केलें.†

रामचंद्रासारख्या अलौकिक पुत्राचे सद्गुण पाहून दशरथाला केवढा आनंद होत असे व तो वनवासाला जातांना त्याला केवढें भयंकर दुःख झालें हें पाहिलें म्हणजे रामचंद्राविषयीं दशरथाच्या मनांत केवढें प्रेम होतें तें दिसून येईल. आपल्या पश्चात् रामचंद्राला गादीवर बसविण्याचें

---

† रामायण, अयोध्याकांड ६४.

ठरवून त्याला राज्याभिषेक करावा असें जेव्हां दशरथानें आपल्या मंत्रिमंडळाला सुचविलें त्या वेळेच्या त्याच्या भाषणांतील प्रत्येक वाक्य रामचंद्राविषयींच्या प्रेमानें व अभिमामानें परिपूर्ण भरलेलें दिसून येतें. त्याचप्रमाणें जेव्हां कैकेयीनें आपल्या दोन्ही वरांची मागणी करून रामानें वनवास पत्करावा असें ती म्हणूं लागली तेव्हां, "एक वेळ सूर्य नसला तरी सृष्टि जिवंत राहील, परंतु रामाच्या वियोगानें मी जिवंत राहाणें शक्य नाहीं" असें म्हणून दशरथ तिच्या पायां पडला व तिला म्हणाला, "मी तुझ्या चरणांवर डोकें ठेवितों, माझ्यावर दया कर! मी आतां वृद्ध झालों आहें व मृत्यु अगदीं समीप येऊन ठेपला आहे." हे शब्द पुढें खरे झाले. जेव्हां राम वनवासाला निघाला तेव्हां दशरथाचें हृदय विदीर्ण होऊन पुत्रशोकानें तो लागलींच मरण पावला. तसेंच रामचंद्रानें आपल्या वनवासाची बातमी कौसल्येला कळविली त्या वेळच्या त्या हृदयद्रावक देखाव्याचें चित्र मनापुढें आणा. चित्तक्षोभ होऊन ती म्हणाली, "तुला वनाला मी जाऊं देणार नाहीं. तुझ्यावांचून मी झुरणीस लागून मरेन! पित्याची आज्ञा शिरसावंद्य मानून वनास जाण्याचा तुझा निश्चय दृढ झाला असेल तर मीही तुझ्याबरोबर येणार. माझ्या प्रिय पुत्रा, गाय ज्याप्रमाणें आपल्या वांसराच्या मागोमाग जाते, त्याप्रमाणें जेथें जेथें तूं जाशील तेथें तेथें मी तुझ्याबरोबर येणारच."*

द्यूतामध्यें सर्वस्व हरल्यांमुळें पांडवांना जेव्हां वनवास पत्करावा लागला, तेव्हां ते वनवासाला जात असतांना त्यांची आई कुंती हिला केवढें अनिवार दुःख झालें! कुंती खरी वीरस्त्री व खरी वीरमाता होती. जेव्हां महायुद्धाचा प्रसंग प्राप्त झाला तेव्हां तिनें आपल्या पुत्रांना श्रीकृष्णाकडे असा निरोप पाठविला कीं, क्षत्रिय मातेच्या उदरांत जन्म घेतल्याचें सार्थक करण्याची आज तुम्हांला संधि आली आहे, तेव्हां क्षात्रियवृत्ति रक्षण करण्यासाठीं प्राण खर्चीं घालावे लागले तरी हरकत नाहीं! परंतु तीच वीरमाता कुंती आपले पुत्र वनवासाला जात असतां त्यांचा वियोग सहन होईना म्हणून भग्नहृदय होऊन आक्रोश करूं लागली व आपल्या पुत्रांचा वियोग तिनें मोठ्या कष्टानें व नाइलाजानें सहन केला.†

---

* रामायण, अयोध्याकांड २०–२५. † महाभारत, सभापर्व ७९.

महापराक्रमी पुत्र अभिमन्यु मृत्यु पावल्याचें वर्तमान समजलें तेव्हां अर्जुन किती शोकाकुल झाला तें पाहा. तो समरांगणांतून आपल्या छावणींत परत येत असतां त्याच्या हृदयामध्यें, कांहीं तरी विपरीत घडलें आहे अशी भावना उद्भूत झाली; तेव्हां त्याचें कारण काय असावें असें त्यानें श्रीकृष्णाला विचारिलें. आपल्या बंधूंना सुद्धां त्यानें प्रश्न केले, परंतु भीतीनें त्याला कोणीच उत्तर देईना. नंतर आपल्या पुत्राच्या मृत्यूबद्दल जेव्हां त्याची खात्री झाली, तेव्हां दुःखातिरेकानें त्याला असह्य वेदना होऊं लागल्या! त्याला वाटलें कीं, आपल्या पुत्राला जेव्हां शत्रूंनीं वेढिला तेव्हां "ह्या महत्संकटांतून माझा पिता मला सोडवील." अशी आशा त्या बाळकाच्या मनांत उत्पन्न झाली असेल; परंतु मज पित्याकडून त्याचें रक्षण झालें नाहीं! अर्थात् रणांगणांत शेंकडों बाणांनीं विद्ध होऊन तो इहलोक सोडून गेला असला पाहिजे. आपल्या पुत्राचें रक्षण करण्यास आपणास जातां आलें नाहीं, हा विचार मनांत येतांच तो वेडा होऊन गेला! कारण दुर्बलांचें रक्षण करणें हें वीरवृत्तीच्या लोकांचें श्रेष्ठ ध्येय होय; आणि ह्या ठिकाणीं तर रक्षण करणारा वीर हा स्वतः बाप व ज्याचें रक्षण करावयाचें तो त्याचा अत्यंत प्रिय पुत्र† अशी स्थिति होती.

दुर्बलांचें संरक्षण करण्याचा गुण सर्व प्राचीन धर्मशील राजांच्या ठिकाणीं मूर्तिमंत दिसून येतो; ह्या स्वधर्माचरणामुळेंच त्यांच्या प्रजेच्या मनांत त्यांच्यासंबंधीं राजनिष्ठा जागृत होत असे.

"प्रजेचें संरक्षण करणें हा राजधर्मापैकीं एक श्रेष्ठ धर्म होय."‡ असें भीष्मानें म्हटलें आहे. "आईचें आपल्या पोटच्या पोराशीं जसें वर्तन असतें त्याप्रमाणें राजाचें आपल्या प्रजेशीं असलें पाहिजे. आई ज्याप्रमाणें स्वतःचे सर्व इष्ट मनोरथ बाजूला सारून आपल्या बालकाच्या हितार्थ झटत असते, त्याचप्रमाणें राजाचीही वर्तणूक असली पाहिजे, ह्यांत संशय नाहीं."※ हा प्रजापालनधर्म इतका कठोर आहे कीं, आपला ज्येष्ठ पुत्र असमंजस ह्यानें

---

† महाभारत, द्रोणपर्व ७२. ‡ महाभारत, शांतिपर्व ५८.
※ महाभारत, शांतिपर्व ५६.

आपल्या राज्यांतील लोकांच्या मुलांना बेपर्वा होऊन निष्ठुरतेनें नदींत बुडविलें म्हणून सगर राजानें त्याला आपल्या राज्याच्या हद्दपार केलें.†

राजा आपलें संरक्षण करणार असा विश्वास बाळगून राहणाऱ्या दीन दुबळ्या प्रजेचें रक्षण चांगल्या राजाकडून कशा प्रकारें केलें जातें ह्याबद्दल अनेक गोष्टी प्रसिद्ध आहेत. ह्या प्रजापालनक्षेत्राची मर्यादा मनुष्यप्राण्यापुरतीच नसून तींत इतर सर्व प्राणिमात्रांचाही समावेश होतो. धर्मनिष्ठ युधिष्ठिर राजा अखेरीस हस्तिनापुराहून महाप्रस्थानाला निघाला तेव्हां त्याच्या त्या दीर्घ व कष्टमय प्रवासाच्या वेळीं एक कुत्रा त्याच्या मागोमाग जाऊं लागला. तो त्या दीर्घ प्रवासामध्यें राजाचा एकटाच सहचर राहिला होता, व राजाबरोबरच विस्तीर्ण अरण्य ओलांडून तो जाऊं लागला. राजाला स्वर्गांत नेण्यासाठीं स्वतः इंद्र स्वर्गांतून खालीं आला व आपल्या रथांतून स्वर्गास चल असें त्याला सांगूं लागला. राजानें खालीं वांकून आपल्या त्या एकनिष्ठ अनुचराच्या मस्तकाला हळूच स्पर्श केला व तो म्हणाला, "हे भूतभवत् प्रभो, ह्या श्वानाची माझ्यावर उत्कट भक्ति आहे, म्हणून त्यालाही बरोबर घेतलें पाहिजे. धरित्रीमातेच्या ह्या दीन बालकाबद्दल माझें मन दयेनें कसें द्रवत आहे." इंद्र म्हणाला, "हे राजा, स्वर्गभूमीमध्यें श्वानाचा प्रवेश होणार नाहीं. आज तुला अमरत्व, मत्सदृश योग्यता, महद्भाग्य, अप्रतिम विजय व अखिल स्वर्गसुख प्राप्त झालें आहे. हा श्वान त्या तुझ्या स्वर्गसुखाच्या आड येत आहे. तेव्हां त्याचा तूं त्याग कर. ह्यामध्यें कोणत्याही प्रकारचा दुष्टपणा नाहीं. तो पृथ्वीतलावरच राहणारा असल्यामुळें तेथेंच राहील." राजा म्हणाला, "हे सहस्राक्ष पुण्यचरित प्रभो, खरा आर्यजन आर्यांना न शोभणारें वर्तन केव्हांही करणार नाहीं. माझ्यावर एकनिष्ठपणें भक्ति करणाऱ्याचा त्याग करून मिळविलेल्या स्वर्गसुखाची मला किंमत वाटत नाहीं." तेव्हां जरा कठोरतेनें तो म्हणाला, "कुत्र्याला बरोबर घेऊन येणाऱ्या लोकांना स्वर्गाचीं द्वारें खुलीं नसतात; म्हणून तूं कुत्र्याला सोडून दे व चल. पहा, वेळ जात आहे!" राजा म्हणाला, "हे महानुभाव इंद्रा, भक्ताचा त्याग करणें हें महत्पाप आहे असें सुज्ञ लोक म्हणतात. दुर्बळाचा

† महाभारत, शांतिपर्व ५७.

त्याग म्हणजे ब्राह्मणहत्येप्रमाणें घोर पातक होय. स्वर्गसुखाच्या अभिलाषानें मी ह्या श्वानाचा त्याग करणार नाहीं." इंद्राची सर्व विनवणी व धमकी व्यर्थ गेली; राजा आपला आग्रह सोडीना. त्याच्या पूर्ण ज्ञानदृष्टीपुढें इंद्राचे कोटिक्रम चालेनात. आपल्या बंधूंचा व पत्नीचाही तूं त्याग केलास, मग ह्या कुत्र्याचा कां करूं नयेस, असेंही इंद्रानें त्याला विचारिलें. त्यावर तो म्हणाला, "मनुष्य मृत झाल्यानंतर त्याच्यासंबंधाचे रागद्वेष विलयाला जातात हें सर्वप्रसिद्धच आहे. जेव्हां माझे बंधु व पत्नी ह्यांचें देहावसान झालें, तेव्हां त्यांना फिरून सजीव करणें हें माझ्या सामर्थ्याच्या पलीकडचें होतें; म्हणूनच मला त्यांचा त्याग करावा लागला. जोंपर्यंत तीं जिवंत होतीं तोंपर्यंत मीं त्यांचा त्याग केला नाहीं. हा कुत्रा जिवंत आहे. ह्याच्यासारख्या एकनिष्ठ भक्ताचा त्याग करणें म्हणजे दुर्बलांना गांजणें, स्त्रीहत्या करणें, ब्राह्मणाच्या धनाचा अपहार करणें, मित्राला पीडा देणें ह्यांच्यासारखें महत्पाप होय." इतक्यांत तो कुत्रा अदृश्य होऊन त्याच्या जागीं धर्मदेवता आपल्या दिव्य तेजानें प्रगट झाली; आणि देव व ऋषि त्याचा स्तुतिपाठ गाऊं लागले. तेव्हां तशा स्थितींत धर्मदेवता व इंद्र ह्यांच्यासह तो धर्मनिष्ठ युधिष्ठिर राजा स्वर्गाला गेला.†

प्राचीन काळची आणखी एक गोष्ट ऐका:—

एके दिवशीं उशीनराचा पुत्र शिबीराजा आपल्या भव्य दिवाणखान्यांत मंत्रिमंडळासह बसला असतां एकाएकीं एक कपोत हवेंतून उडत येऊन दरबारांत घुसला, व श्रमानें आणि भीतीनें व्याकुळ होऊन धापा टाकीत टाकीत राजाच्या मांडीवर येऊन बसला. राजा आश्चर्यचकित झाला व सदयतेनें त्यानें त्याच्या विस्कळित पंखांवरून हात फिरविला. तेव्हां त्याच्या त्या गोंजारण्यानें कपोताला धीर येऊन तो सावध होत आहे, इतक्यांत मागाहून एक क्रुद्ध ससाणा दरबारांत शिरला व एकदम राजासमोर येऊन उभा राहिला. कपोत पुन्हा भीतीनें व्याकुळ होऊन मनुष्यवाणीनें राजाला उद्देशून म्हणाला, "हे राजा, ज्या प्रदेशांत मी राहतों त्या प्रदेशावर तुझें प्रभुत्व आहे; म्हणून तुझ्याकडून माझें संरक्षण व्हावें हा माझा नैसर्गिक हक्क आहे.

† महाभारत, महाप्रस्थानिक पर्व ३.

शत्रूपासून माझें संरक्षण व्हावें म्हणून मी तुझ्याकडे आलों आहें." परंतु ससाणासुद्धां मनुष्यवाणीनें राजाला म्हणाला, "मीही तुझ्याच अंमलाखालीं राहातों व हा कपोत हें माझें ईश्वरनिर्मित अन्न आहे. जर तूं तें माझ्या स्वाधीन केलें नाहींस तर तूं अशा रीतीनें माझ्या प्राणाचा नाश केल्यासारखें होईल." राजा थोडासा विचार करून म्हणाला, "तुमचें दोघांचेंही म्हणणें बरोबर आहे. कपोता, संकटापासून मीं तुझें संरक्षण केलें पाहिजे, हा तुझा नैसर्गिक हक्क आहे ह्यांत संशय नाहीं; त्याचप्रमाणें हे ससाण्या, ईश्वरनिर्मित अन्न मीं तुझ्या तोंडांतून काढून घेऊं नये हेंही निर्विवाद आहे. तेव्हां मी या धर्माधर्माच्या कोड्याचा उलगडा असा करितों कीं, हे ससाण्या, तुझी तृप्ति होईल इतकें दुसरें अन्न मी तुला देतों." परंतु ससाणा म्हणाला, "राजा, मला हा कपोतच पाहिजे, दुसरें कांहीं नको. जर दुसरें कांहीं देणारच तर ह्या कपोताच्या वजनाएवढें तुझ्याच शरीराचें मांस दे." हें ऐकतांच सर्व मंत्रिमंडळ क्रुद्ध झालें व आपल्या प्रिय प्रभूच्या अमूल्य जीवितावर गदा आणूं पाहणाऱ्या त्या ससाण्याला ठार करावें असें त्यांच्या मनांत आलें, व त्याप्रमाणें त्यांनीं उद्गारही काढिले. तेव्हां राजा म्हणाला, "माझ्या ठिकाणीं जें प्रभुत्व आहे तें लहान किंवा थोर, कपोत किंवा ससाणा ह्यांच्या-वर गाजविण्यासाठीं नव्हे, तर धर्माचें मूर्तिमंत स्वरूप प्रगट करावें व प्रजाजनांना कित्ता घालून द्यावा येवढ्यासाठीं आहे. जर मी लहानासंबं-धानें कर्तव्यांत चुकलों तर थोरासंबंधानेंही चुकेन व माझे प्रजाजन त्याच-प्रमाणें माझें अनुकरण करितील व कर्तव्यभ्रष्ट होतील; ह्यासाठीं तराजू आणा." मंत्रिमंडळाला महद्दुःख झालें, परंतु राजाज्ञा मोडणें शक्य नाहीं म्हणून दुःखाचा आवेग कसाबसा आवरून त्यांनीं तराजू आणून दिला. तेव्हां राजानें हळूच त्या कपोताला उचलून एका पारड्यांत ठेविलें व हृदय घट्ट करून दुसऱ्या पारड्यांत आपल्या शरीराचें मांस कापून काढून ते घातलें, परंतु कपोताचें पारडें उचलेना. म्हणून राजानें आणखी मांस काढून पारड्यांत घातलें, तरीही कपोताचें पारडें वर येईना. राजा आश्चर्यचकित होऊन पुन्हा पुन्हा आपल्या शरीराचें मांस काढून पारड्यांत घालूं लागला, तरीही कपोताचें पारडें हालेना. तेव्हां राजानें आपलें सर्व शरीरच दुसऱ्या पारड्यात घातलें. इतक्यांत चमत्कार असा झाला कीं, कपोत व ससाणा दोघेही अदृश्य झाले

व त्यांच्या जागीं इंद्र व अग्नि प्रगट होऊन ते राजाला म्हणाले, " तूं खरा राजा आहेस. तुझी कीर्ति आम्हीं ऐकिली त्याहीपेक्षां मोठी आहे असें आतां आम्हांला आढळून आलें आहे. तस्मात् तुझें शरीर छिन्नविच्छिन्न न राहातां पूर्ववत् होईल व प्रजाजनांचें प्रेम तुझ्यावर सदैव राहील." ✽

राजा हाच अनाथांचें रक्षण करणारा आहे अशी कल्पना असल्यामुळें फक्त राजांच्याच गोष्टी लिहिलेल्या आहेत, हें खरें; तथापि सर्वांनासुद्धां आपल्यापेक्षां दुर्बल असतील त्यांना, थोड्या प्रमाणांत कां होईना, परंतु साहाय्य करितां येईल. वरील गोष्टींपासून आपण बोध घ्यावा व त्यांतील गुण आपल्या प्रत्यक्ष आचरणांत आणावे येवढ्याचसाठीं त्या सांगितलेल्या आहेत.

राजा रंतिदेव म्हणजे प्रत्यक्ष कारुण्यमूर्तिच होय; व त्यावरूनच "रंतिदेवासारखा करुण" अशी म्हण पडली आहे. एकदां त्यानें व त्याच्या कुटुंबांतील लोकांनीं अठ्ठेचाळीस दिवसपर्यंत उपोषण केलें. एकुणपन्नासाव्या दिवशीं सकाळीं त्यांना थोडें तूप, दूध, जव व पाणी मिळालें. तेव्हां तें अल्पसें अन्न खाण्याकरितां ते बसले. तोंच एक ब्राह्मण अतिथि आला. तेव्हां प्रथम त्याला अन्न देऊन तृप्त केलें, व तो निघून गेल्यावर बाकी राहिलेलें अन्न त्यानें सर्वांना सारखें वाटून दिलें व आपणाला एक वांटा घेतला. हें अन्न तो ग्रहण करणार इतक्यांत एक शूद्र अतिथि आला. तेव्हां बाकी राहिलेल्या अन्नांतून त्यानें त्याला भोजन देऊन तृप्त केलें. तोही अतिथि गेला; व रंतिदेव आतां आपलें भोजन उरकणार तोंच दुसरा एक अतिथि कुत्र्यांसहित आला. तेव्हां एक घोटभर पाणी स्वतःकरितां ठेवून बाकीचें अन्न रंतिदेवानें त्यांना देऊन टाकिलें. हेही अतिथि तृप्त होऊन गेले; व रंतिदेव आपल्या तहानेनें शुष्क झालेल्या ओंठांना पाण्याचें भांडें लावणार, इतक्यांत तहानेनें व्याकुळ झालेला एक चांडाळ "पाणी दे, एक घोंटभर पाणी दे" असें मोठ्या दीनवाणीनें म्हणत जवळच जमिनीवर पडलेला आहे व दीनमुद्रेनें आपल्या हातांतील पाण्याच्या भांड्याकडे आशा धरून पहात आहे, असें रंतिदेवानें पाहिलें. तेव्हां तो त्याच्याजवळ गेला व दयार्द्रदृष्टीनें त्याच्याकडे पाहून हळूच त्यानें त्याचें डोकें आपल्या

---

✽ महाभारत, वनपर्व १३१. १९६. व अनुशासनपर्व ३२. ह्यांत निरनिराळ्या राजांच्या अशा सुंदर गोष्टी वर्णन केलेल्या आहेत.

हातांनीं वर उचललें व हातांतील शुद्ध गार पाण्याचें भांडें त्याच्या त्या शुष्क व मलिन झालेल्या ओंठांना लाविलें, व "अरे बाबा, पी हें पाणी" असें मोठ्या स्नेहार्द्र अंतःकरणानें म्हणून आपल्या त्या दानाचें पुण्य द्विगुणित केलें ! चांडाळ पाणी पिऊन तृप्त झाला, तेव्हां ईश्वराची प्रार्थना करून रंतिदेव म्हणाला, "मला अष्टसिद्धि नकोत, व निर्वाणही नको. सर्व भूतमात्रांशीं मी एकजीव व्हावें व त्यांना दुःखांतून मुक्त करण्यासाठीं त्यांचीं दुःखें मीं भोगावीं येवढेंच माझें मागणें आहे. ह्या तृषार्त चांडाळाला पाणी देऊन तृप्त केल्यानें माझी क्षुधा, तृषा, ग्लानि, दुःख, भोंवळ ह्या सर्वांचा परिहार झाला आहे !" अहाहा ! ही या रंतिदेवताची केवढी थोरवी ! ह्या रंतिदेवाच्या प्रार्थनेमध्यें भूतदयेचें स्वरूप पूर्ण प्रगट झालेलें दिसून येतें.*

दुसऱ्यावर दया करणें व अनाथांचें रक्षण करणें ह्या सद्गुणाबरोबरच त्यांच्या अनुषंगानें गर्व हा दुर्गुण उत्पन्न होण्याची भीति असते. "मी" व "तूं" हा भेदभाव जागृत करणाऱ्या अहंकारामुळें हा दोष उत्पन्न होतो. आपण सर्व एकाच भाण्डारांतून आपापले वांटे घेत असतों ही कल्पना दृष्टिआड होऊन, देहभिन्नत्वामुळें किंचित् काळ एक जीव त्या भाण्डारापासून जरा दूर असलेला पाहिला म्हणजे 'या अनाथास मी देत आहें' अशी उच्चभावाची द्वैतकल्पना जागृत होते. मी इतरांना साहाय्य करीत आहें व त्यांचें कल्याण करण्याची शक्ति माझ्यामध्यें आहे, ह्या भावनेनें मन व्यापलें गेलें म्हणजे गर्व उत्पन्न होतो, व त्यामुळें केलेल्या सर्व सत्कार्यांचा तत्काळ नाश होतो. ह्या अहंकाररूपी अति सूक्ष्म परंतु अत्यंत भयंकर शत्रूच्या कचाट्यांतून कोणताही देहधारी जीव बहुधा सुटूं शकत नाहीं. कितीही उन्नत प्राणी असो, थोडासा जर बेसावधपणा झाला तर तेवढ्यानें तो ह्या अहंकाराच्या तडाख्यांत सांपडतो व त्याचे दुष्परिणाम त्याला भोगावे लागतात; कारण कर्मबंधाचा पाश अत्यंत दृढ असून तो लहानथोर सर्वांनाच सारखा जखडून टाकणारा आहे. म्हणूनच स्मृतिग्रंथांतून ह्या अहंकाररूपी बलाढ्य शत्रूपासून सावध राहण्याविषयीं आग्रहपूर्वक सूचना दिलेल्या आहेत. त्यासंबंधाच्या कांहीं गोष्टी खालीं दिल्या आहेत.

---

* भागवतपुराण. ९. २१.

प्राचीन काळीं नारायण नांवाच्या ऋषीनें हिमालयपर्वतावरील बदरी नांवाच्या शिखरावर बसून कित्येक युगें कडक तपश्चर्या केली. त्याला विषयसुखाबद्दल वैराग्य उत्पन्न झालें आहे किंवा नाहीं हें पाहाण्याकरितां इंद्रानें त्याच्या तपोवनामध्यें, नाना प्रकारच्या लीला करून तपश्चर्येपासून त्याचें मन परावृत्त करण्याकरितां हजारों अप्सरा पाठविल्या. इंद्राच्या आज्ञाप्रमाणें त्यांनीं केलें. नारायण ऋषीनें आपल्या दिव्य दृष्टीनें त्यांचा उद्देश जाणिला व आत्मविश्वासामुळें तो किंचित् हंसला. आपल्या योगसामर्थ्यानें त्यानें तेवढ्याच व तशाच नवीन अप्सरा उत्पन्न केल्या व त्यांना इंद्रानें पाठविलेल्या अप्सरांचा सत्कार करण्यासाठीं पाठविलें. इंद्रानें पाठविलेल्या अप्सरा खजिल झाल्या व आपल्या दुष्ट हेतुबद्दल क्षमा करावी म्हणून ऋषीला विनवूं लागल्या. प्रसन्न होऊन ऋषीनें त्यांना क्षमा केली व एक वर मागण्यास सांगितलें. तेव्हां आपणच्च आमचे पति होऊन आमचें रक्षण करावें असा वर त्यांनीं मागितला. ऋषि मोठ्या गोंधळांत पडला. कारण आपणच वर मागा म्हणून सांगितलें तर आतां तो नाहीं म्हणतां येत नाहीं. त्याला भयंकर पश्चात्ताप होऊन तो म्हणाला, "माझ्या अहंकारामुळें तर येवढें संकट प्राप्त झालें ह्यांत संशय नाहीं. अहंकार हाच सर्व धर्माच्या नाशाचें आदिकारण होय." नंतर तो अप्सरांना म्हणाला, "ह्या जन्मामध्यें गृहस्थाश्रम स्वीकारणें हें माझ्या प्रतिज्ञेच्या विरुद्ध आहे; म्हणून पुढच्या जन्मीं इतर कारणांमुळें मला कृष्णरूपानें जन्म घ्यावयाचाच आहे त्या वेळीं तुम्हीसुद्धां सर्व मोठमोठ्या कुळांमध्यें जन्म घ्याल व त्या वेळीं तुमच्याशीं विवाह करून ह्या वचनांतून मी मुक्त होईन व गृहस्थाश्रमाचा जड भार सहन करीन."†

ब्रह्मदेवापासून उत्पन्न झालेल्या कुशानें प्रस्थापित केलेल्या क्षत्रिय राजवंशांतील गाधिपुत्र विश्वामित्र दिग्विजय करून सैन्यासहवर्तमान आपल्या राज्यांत परत येत असतांना वशिष्ठ ऋषीच्या तपोवनामध्यें प्राप्त झाला. आपलें सैन्य दूर अंतरावर ठेवून ऋषीचें दर्शन घेण्यासाठीं तो मोठ्या आदरानें त्याच्या आश्रमांत गेला. वशिष्ठानें सन्मानपूर्वक व प्रेमपूर्वक त्याचें आदरातिथ्य केलें. कदाचित् आपल्या सैन्यापासून ह्या शांत तपोवनाला त्रास

---

† देवीभागवत, ४. ६, ७.

होईल म्हणून विश्वामित्र लवकर निघण्यासाठीं उठला. तेव्हां सर्व सैनिकांसह राजानें आपला पाहुणचार स्वीकारावा अशी इच्छा वसिष्ठानें प्रगट केली; परंतु ऋषीच्या अल्प सामुग्रीचा फडशा उडूं नये म्हणून विश्वामित्र पाहुणचार स्वीकारण्यास कबूल होईना. तेव्हां आपल्या तपोबलानें व नंदिनी नामक आपल्या कामधेनूच्या साहाय्यानें आपलें व आपल्या सर्व परिवाराचें यथोचित आतिथ्य करण्यास आपण समर्थ आहों असें सुचवून वसिष्ठानें विश्वामित्राला फारच आग्रह केला. ह्याप्रमाणें वसिष्ठाच्या अंतःकरणांत अहंकार प्रादुर्भूत झाला. अत्यंत आग्रहामुळें विश्वामित्राला त्याचें म्हणणें मान्य करणें भाग पडलें, व कामधेनूचें सामर्थ्यही त्याच्या नजरेस आलें. तें पाहून त्याच्या मनांत लोभ उत्पन्न झाला व "असली धेनु ब्राह्मणाला काय करावयाची आहे? ती राजाकडे असणें योग्य," असें म्हणून ती धेनु आपणास देण्याविषयीं वसिष्ठाला त्यानें विनंति केली. वसिष्ठाला वाईट वाटलें; परंतु तो म्हणाला, "जर ती कबूल असेल तर घेऊन जा." परंतु ती स्वामिनिष्ठ धेनु कबूल होईना; तेव्हां विश्वामित्राच्या सैनिकांनीं तिला जबरीनें ओढून नेण्याचा प्रयत्न केला. तेव्हां आपला त्याग करूं नये म्हणून वसिष्ठाकडे येऊन मोठ्या आर्तस्वरानें तिनें विनंति केली. हें पाहून वसिष्ठाला राग आला. अंतःकरणामध्यें गूढ असलेल्या अहंकारामुळें व दर्पामुळें असा क्रोध उत्पन्न होणें साहजिकच आहे. त्यामुळें त्या ब्राह्मण-क्षत्रियांमध्यें भयंकर युद्ध झालें व तेणेंकरून देशाच्या इतिहासांत मोटाच फरक पडला. त्या धेनूनें स्वसामर्थ्यानें आपल्या मदतीकरितां शक, पल्हव, यवन, बर्बर वगैरे अनार्य लोक त्या ठिकाणीं उत्पन्न केले. परंतु विश्वामित्रानें त्या सर्वांचा फडशा उडविला. तथापि शेवटीं विश्वामित्राचें क्षात्रिय तेज वसिष्ठाच्या ब्रह्मतेजापुढें फिकें पडलें. पुढें विश्वामित्राला वैराग्य उत्पन्न होऊन त्यानें आपल्या राज्याचा त्याग केला; व ब्रह्मतेज प्राप्त करून घेण्यासाठीं कित्येक युगांपर्यंत कडक तपश्चर्या केली; दीर्घ काळपर्यंत वैराग्याचें कडक आचरण केल्यामुळें शेवटीं त्याला ब्रह्मतेज प्राप्त झालें, वसिष्ठाचें व त्याचें सख्य झालें व वसिष्ठानें त्याला ब्रह्मर्षि म्हणून मान्य केलें.

देवांचा राजा होणें म्हणजे येवढी मोठी योग्यता आहे कीं, त्यामुळें अहंकार उत्पन्न होणें अगदीं साहजिक आहे, व त्या कारणानेंच इंद्राला

आपल्या स्थानापासून कित्येक वेळां भ्रष्ट व्हावें लागलें आहे. एकदां इंद्र देवसभेमध्यें बसला असतां देवगुरु बृहस्पति त्या ठिकाणीं आले. परंतु त्यानें उठून त्यांचा सत्कार केला नाहीं. तेव्हां बृहस्पति तसेच मागें फिरून देवांचा पक्ष सोडून निघून गेले. तेव्हां असुरांनीं देवांचा पराजय करून त्यांना इंद्रासह स्वर्गांतून हांकून लाविलें. ह्या अहंकारामुळें इंद्रावर आणखीही पुष्कळ संकटें आलीं. दोनदां तर त्याच्या हातून ब्रह्महत्याही घडली, व पुन्हा पावन होण्याकरितां त्याला बरीच तपश्चर्या करावी लागली.¶

ह्याप्रमाणें इंद्र दीर्घकाळपर्यंत तपश्चर्येमध्यें गुंतला असल्यामुळें स्वर्गांत अराजकता होऊं नये म्हणून देवांनीं पृथ्वीवरील सोमवंशीय नहुष राजाला स्वर्गाधिपति नेमिलें. कारण त्या जागेला दुसरा कोणीही योग्य अधिकारी मिळेना. परंतु नहुषाचा कारभार इंद्रापेक्षांही अधिक चांगल्या रीतीनें चालल्यामुळें त्याच्या अंतःकरणांत दिवसेंदिवस अधिकाधिक अभिमान जागृत होत चालला व तदनुषंगानें पापवासनाही उत्पन्न होत चालली. एके दिवशीं तो देवांना म्हणाला, "ज्याअर्थी मला इंद्रपदाचा सर्व भार सहन करावा लागत आहे, त्याअर्थी इंद्रपदाचे सर्व हक्कही मला मिळाले पाहिजेत. यासाठीं इंद्रपत्नी शचीला माझ्याकडे घेऊन या." देव कष्टी होऊन आपआपसांत विचार करूं लागले व नहुषराजा इंद्रपदाचा अधिकार चालविण्यास आतां योग्य नाहीं असें त्यांनीं ठरविलें; इंद्राचा परत येण्याचा समयही जवळ आला आहे हेंही त्यांना पक्कें माहीत होतें. पण नहुषराजापुढें उभें राहण्याची कोणाची छाती होतो? त्याचें पूर्वपुण्य फार जबर होतें. जर नहुषाकडून कोणा तरी मोठ्या ऋषीचा अपराध घडून त्या ऋषीचा कोप प्रज्वलित झाला, तरच त्या पुण्याचा नाश होणें शक्य होतें. ही सर्व हकीकत देवांनीं शचीला कळविली; तेव्हां 'तूं ऋषींच्या खांद्यावर पालखी देऊन तींतून आपल्या घरीं येशील तर मी तुझा स्वीकार करीन' असा शचीचा उलट निरोप नहुषाला कळविला. नहुषानें त्याप्रमाणें पालखी तयार करण्याचा हुकूम सोडिला, व अगस्त्यादि ऋषींना पालखी वाहून नेण्यासाठीं इंद्राज्ञेनें बोलाविण्यांत आलें. ऋषींनीं पालखी घेतली. मार्ग चालत असतांना नहुषाला

---

¶ भागवतपुराण, ६. ७. ८.

उत्कट आतुरता व दृढ अहंकार असल्यामुळें त्यानें अगस्ति ऋषींच्या मस्तकाला आपल्या पायानें डिवचून त्याला जलद चालण्याविषयीं आज्ञा केली. तेव्हां नहुषाची घटका भरली आहे असें पाहून अगस्तीनें त्याला शाप दिला व त्या शापानें नहुष राजा सर्प होऊन स्वर्गांतून खालीं पृथ्वीवर येऊन पडला. याप्रमाणें त्याला सर्परूपानें दीर्घकाळ काढावा लागल्यामुळें अत्यंत दुःख सोसावें लागलें. शेवटीं त्याच्याच वंशांतील अजातशत्रु युधिष्ठिराच्या उपदेशानें त्याची मुक्तता झाली.*

विरोचनाचा पुत्र बलि आपल्या महत्पुण्यप्रभावानें देवी लक्ष्मीला प्रसन्न करून घेऊन दीर्घकाळपर्यंत मोठ्या वैभवाचा उपभोग घेत होता. परंतु आपल्या महत्पुण्याविषयीं व त्यापासून प्राप्त झालेल्या वैभवाविषयीं त्याच्या अंतःकरणांत गर्व उत्पन्न झाला, व त्यामुळें तो स्वतःची आढ्यता मानून व इतरांची अवहेलना करून पूर्वीप्रमाणें त्यांच्या कल्याणाची इच्छा न बाळगितां त्यांना उलट त्रास देऊं लागला. तेव्हां लक्ष्मीचा त्याच्यावर कोप होऊन तिनें त्याला सोडून त्याचा शत्रु इंद्र ह्याच्याकडे स्वर्गांत जाऊन राहण्याचा निश्चय केला. आपल्याला प्रसन्न झालेली देवी आतां आपल्या शत्रूकडे जाऊन रहात आहे हें पाहून बळीला आपल्या मूर्खपणाबद्दल पश्चात्ताप झाला. परंतु व्यर्थ! मांधाता राजाला ही गोष्ट सांगून उतथ्य म्हणाला, "राजा, बलीचा द्वेष व अहंकार ह्यांचा हा परिणाम बरें! लक्ष्मीचा तुझ्यावर कोप होऊं नये व तिनें तुझा त्याग करूं नये, अशी इच्छा असेल तर तूं सावध राहा. लक्ष्मीच्या पोटीं अहंकाररूपी पुत्र अधर्मानें उत्पन्न केला आहे असें श्रुति सांगतात. हे राजा, ह्या अहंकारामुळें पुष्कळ सुर व असुर नाश पावले आहेत. पुष्कळ राजर्षिही त्यामुळेंच गतवैभव झालेले आहेत. म्हणून तूं सावध राहा. जो अहंकाराला जिंकितो तोच वैभवसंपन्न होतो व जो त्याच्या तावडींत सांपडतो तो गुलाम बनतो.§

कधीं कधीं एखादा लहान मनुष्यही क्रोध व अहंकार ह्यांमुळें उत्पन्न होणाऱ्या पापापासून आपल्या शहाणपणाच्या योगानें आपणांहून श्रेष्ठ असलेल्या मनुष्याचें रक्षण करीत असतो. मुलानें आपल्या बापाचें अशाच प्रकारें

---

* महाभारत, वनपर्व १८१. § महाभारत, वनपर्व १९०.

संरक्षण केल्याचें प्राचीन काळचें एक उदाहरण आहे. अंगिरस वंशांतील गौतमाचा पुत्र चिरकारिन्‡ हा आपल्या नांवाप्रमाणेंच कोणतेंही कृत्य करण्यापूर्वीं दीर्घ विचार करणारा व सावधपणानें आणि शहाणपणानें वागणारा होता. एकदां गौतमानें आपल्या पत्नीला पापाचरण करितांना पाहिलें व अतिसंतप्त होऊन त्यानें आपल्या मुलाला त्या स्त्रीला ठार मारण्याविषयीं आज्ञा केली व आपण निघून गेला. चिरकारिन् याला काय करावें ह्याबद्दल मोठा विचार पडला. पित्राज्ञा पाळणें हें जसें त्याचें कर्तव्य होतें त्याचप्रमाणें आपल्या जन्मदात्या मातेविषयीं पूज्यभाव बाळगणें हेंही त्याचें कर्तव्य होतें. तो म्हणाला, "पित्राज्ञेप्रमाणें वागणें हें महत्पुण्य आहे, परंतु त्याचप्रमाणें मातेचें संरक्षण करणें हाही पुत्रधर्म आहे. तर मग मी ह्या संकटांतून कसा सुटणार? पित्याचा व मातेचा दोघांचाही मी पुत्रच. पित्याकडून पुत्राला सर्वस्व मिळतें. पितृसंतोष हाच सर्व देवतांचा संतोष होय. पित्याच्या मुखांतून निघालेला संतोषाचा शब्द हाच पुत्राला आशीर्वाद होय. परंतु मातेपासून तर पुत्रदेह निर्माण झाला; बालपणीं पुत्राचें रक्षण तिनेंच केलें. मातृवियोग म्हणजे पुत्राला सर्व जगत् शून्य होय. पुत्राला मातेशिवाय दुसरा आधार नाहीं व दुसरी गतिही नाहीं." ह्या कर्तव्यविरोधामुळें त्याचें मन क्षुब्ध होऊन त्याला काय करावें हें सुचेना. पुन्हा तो म्हणाला, "पति हा आपल्या पत्नीचें पालन व पोषण करणारा आहे. जर तो पत्नीचें पालनपोषण करणार नाहीं तर तो पति किंवा भर्ता कसला? मातेसंबंधानें माझा तर अत्यंत पूज्यभाव आहे." चिरकारिन् ह्याप्रमाणें विचार करीत आहे इतक्यात गौतम घाईघाईनें घरीं आला. ह्या वेळीं त्याचें मन ध्यानाच्या योगानें शांत झालें होतें; व आपल्या पत्नीला ठार मारण्याविषयीं पुत्राला आपण आज्ञा केली हें केवढें तरी महत्पाप आपण केलें असें वाटून तो दुःखाश्रु गाळीत, व पत्नीच्या अपराधाबद्दल आपण केवढा तरी अविचार केला म्हणून स्वतःला दोष देत, आणि आपल्या आज्ञेप्रमाणें पुत्रानें आपल्या मातेचा वध अद्यापि केला नसेल तर किती बरें होईल, असें मनांत म्हणत

‡ चिर+कारिन्=वेळानें करणारा. कोणतेंही कृत्य उतावीळपणानें न करितां सावकाश. विचारपूर्वक करणारा.

आला होता. पुत्राला पाहतांच तो एकदम म्हणाला, "ह्या घोर पापापासून माझें व आपल्या मातेचें संरक्षण कर; व माझ्या तपश्चर्येस व आपणां स्वतःस तूं सुरक्षित ठेव." अशा रीतीनें चिरकारिन्नें आपल्या बापानें उतावळपणानें केलेली आज्ञा जरी पाळली नाहीं, तरी तो बापाच्या खऱ्या इच्छेप्रमाणें वागला, व क्रोध आणि अहंकार ह्यांपासून उत्पन्न होणाऱ्या भयंकर पापापासून होणारे दुष्ट परिणाम त्यानें टाळले.↑

---

अहिंसयैव भूतानां कार्यं श्रेयोऽनुशासनम् ।
वाक् चैव मधुरा श्लक्ष्णा प्रयोज्या धर्ममिच्छता ॥❀

प्राण्यांना, त्यांचें कल्याण व्हावें म्हणून जें शिक्षण द्यावयाचें तें त्यांना पीडा न होईल अशा रीतीनें द्यावें व धर्मबुद्धीनें त्यांच्याशीं गोड व सौम्य भाषण करावें.

रक्षणादार्यवृत्तानां कण्टकानां च शोधनात् ।
नरेन्द्रास्त्रिदिवं यान्ति प्रजापालनतत्पराः ॥×

प्रजापालन करण्यांत तत्पर असलेले राजे आर्यवृत्तीनें राहणाऱ्या प्रजेचें संरक्षण करून व त्यांच्यांतील कांटे काढून टाकून ( चोर वगैरे लोकांना शिक्षा करून ) स्वर्गाला जातात.

स्वे स्वे धर्मे निविष्टानां सर्वेषामनुपूर्वशः ।
वर्णानामाश्रमाणां च राजा सृष्टोऽभिरक्षिता ॥ ※

राजा हा आपआपल्या धर्माप्रमाणें वागणाऱ्या सर्व वर्णाश्रमांचें रक्षण करणारा म्हणूनच निर्माण झालेला असतो.

यथोद्धरति निर्दाता कक्षं धान्यं च रक्षति ।
तथा रक्षेन्नृपो राष्ट्रं हन्याच्च परिपंथिनः ॥ †

ज्याप्रमाणें शेतकरी आपल्या शेतांतील रान काढून टाकितो व धान्याचें रक्षण करितो, त्याप्रमाणें राजानें दुष्टांना शासन करून राष्ट्राचें रक्षण करावें.

---

↑ महाभारत, शांतिपर्व २४६. ❀ मनुस्मृति, २. १५९. × मनुस्मृति, ९. २५३. ※ मनुस्मृति, ७. ३५. † मनुस्मृति, ७. ११०.

सुवासिनीः कुमारीश्च रोगिण्यो गर्भिणीस्तथा ।
अतिथिभ्योऽग्र एवैतान्भोजयेदविचारयन् ॥ †

सुवासिनी, कुमारी, गरोदर व आजारी स्त्रिया ह्यांना अतिथींच्याही पूर्वी खुशाल भोजन घालावें विचार करीत बसूं नये.

चक्रिणो दशमीस्थस्य रोगिणो भारिणः स्त्रियाः ।
स्नातकस्य च राज्ञश्च पन्था देयो वरस्य च ॥ ❀

गाडींतून जाणाऱ्या मनुष्याला, नव्वद वर्षांपेक्षां अधिक वयाच्या मनुष्याला, रोग्याला, ओझें वाहणाऱ्याला, स्त्रीला, समावर्तन नुकतेंच झालें आहे अशा ब्रह्मचाऱ्याला, राजाला व वराला प्रथम मार्ग द्यावा.

अनुक्रोशो हि साधूनामापद्धर्मस्थलक्षणम् ।
अनुक्रोशश्च साधूनां सदा प्रीतिं प्रयच्छति ॥ §

दया हें साधूंच्या आपद्धर्माचें लक्षण होय; व दयेनेंच साधूंचा नेहमीं आशीर्वाद मिळत असतो.

न कामयेऽहं गतिमीश्वरात्परामष्टर्द्धियुक्तामपुनर्भवं वा ।
आर्तिं प्रपद्येऽखिलदेहभाजाम् अंतःस्थितो येन भवन्त्यदुःखाः ॥
क्षुत्तृट्श्रमो गात्रपरिश्रमश्च दैन्यं क्लमः शोकविषादमोहाः ।
सर्वे निवृत्तः कृपणस्य जन्तोः जिजीविषोर्जीवजलार्पणान्मे ॥ ※

---

## प्रकरण अकरावें

# सद्गुणदुर्गुणांची अन्योन्य-प्रतिक्रिया.

पुष्कळ सद्गुणांचा व दुर्गुणांचा येथपर्यंत आपण पृथक् पृथक् विचार केला; व सद्गुणानें सुख आणि दुर्गुणानें दुःख कसें प्राप्त होतें ह्याचींही पुष्कळ उदाहरणें पाहिलीं. आतां आपल्या सद्गुणानें अगर दुर्गुणानें इतरां-

---

† मनुस्मृति, २. १३८. ❀ मनुस्मृति, २. १३८. § महाभारत, अनुशासनपर्व ५. २८. ※ याचा अर्थ पान १६८ वर पहा.

च्या ठिकाणीं सद्गुण अगर दुर्गुण उत्पन्न होण्यास कशी मदत होते हें आपणांला पहावयाचें आहे म्हणजे त्यांचे आचारविचार शुद्ध होण्यास आपल्याकडून कशी मदत करितां येईल, व त्यामुळें त्यांचें सुखसंवर्धन कसें होईल हें आपणांला कळेल. आपण दुसऱ्यांवर प्रेम केलें तर त्यांच्या ठिकाणीं प्रेमबुद्धि जागृत होते; व त्यांचा द्वेष केला तर द्वेषबुद्धि जागृत होते. दुसऱ्यांच्या विचारांप्रमाणेंच आपलेही विचार होण्याचा संभव असतो. एखाद्या मनुष्याला राग आला म्हणजे त्यामुळें आजूबाजूचे लोकही रागावतात व नंतर भांडणें उत्पन्न होऊन तीं विकोपास जातात. रागाच्या शब्दांना प्रत्युत्तरही रागाचेंच मिळतें, व त्यामुळें प्रत्येकाचा संताप वाढत वाढत जाऊन शेवटीं तो अमर्याद होतो. त्याचप्रमाणें सौम्य शब्दांना प्रत्युत्तरही सौम्यच मिळतें. आपल्या प्रेमानें इतरांच्या ठिकाणीं प्रेमबुद्धि उत्पन्न होते व आपल्या चांगुलपणामुळें इतर लोकही चांगुलपणानेंच वागतात.

हा नियम लक्षांत आला म्हणजे इतरांच्या दुष्ट मनोवृत्तींचा पगडा आपल्यावर बसूं देऊन आपणही त्याच वृत्तींच्या ताब्यांत न सांपडतां उलट त्यांचे ते दुष्ट मनोविकार नष्ट करण्यासाठीं आपल्या मनोविकारांचा योग्य उपयोग करण्यास समर्थ होऊं. जर एखादा मनुष्य आपणाला रागानें बोलला व त्याला रागानेंच प्रत्युत्तर द्यावें असें आपणांस वाटलें तर आपण मनोनिग्रह करून सौम्य शब्दांनीं उत्तर द्यावें म्हणजे त्यामुळें त्याचा राग शांत होत जाईल. अपकाराची फेड उपकारानें करावी असें म्हणतात त्याचा अर्थ हाच; व अशा रीतीनें आपण वागलों तरच माणसामाणसांमध्यें माजलेली तेढ नष्ट होऊन सर्वांचा सलोखा होईल व त्यानें सर्वांचें कल्याण होईल.

कौरवांनीं पांडवांना फसवून त्यांना सर्वस्वीं लुबाडलें, तेव्हां त्यांचा सूड उगवावा म्हणून द्रौपदी युधिष्ठिराला गळ घालूं लागली; तेव्हां अपकाराची फेड अपकारानें केल्यास अनंत संकटें उद्भवतील ही गोष्ट त्या धर्मनिष्ठ राजानें द्रौपदीच्या नजरेस आणिली. "जो ज्ञानी मनुष्य, क्लेश होत असतांही, क्रुद्ध होऊन, क्लेश देणाऱ्याचा नाश करीत नाहीं, त्याच्याकडे दुर्लक्षच करितो, तो परलोकीं आनंदांत राहातो. ह्यासाठीं ज्ञानी मनुष्यानें, मग तो सामर्थ्यवान् असो अगर असमर्थ असो, जरी तो संकटांत असला तरी त्यानें आपणांला क्लेश देणाऱ्यावर निरंतर क्षमाच केली पाहिजे. जर मानवजातीमध्यें पृथ्वी-

सारखे कांहीं क्षमाशील पुरुष नसते तर त्यांमध्यें शांतता नांदलीच नसती; क्रोधामुळें अव्याहत कलह माजले असते. लोक जर अपकाराची फेड अपकारानेंच करूं लागतील, वडिलांनीं आपणांस शिक्षा केली म्हणून उलट त्यांना शिक्षा करूं लागतील तर सर्व प्राणिमात्रांचा विनाश होऊन अधर्माचा फैलाव होईल. जर कोणी मनुष्य दुसऱ्यानें आपणास शिव्या दिल्या म्हणून त्याला उलट शिव्या देईल, दुसऱ्यानें आपणाला प्रहार केला म्हणून उलट त्याला प्रहार करील व दुसऱ्यानें आपणास दंड केला म्हणून उलट त्याला दंड करील तर पित्याकडून पुत्रांचे वध होतील; पुत्रांकडून पित्यांचे वध होतील, पतींकडून पत्नींचे वध होतील व पत्नींकडून पतींचे वध होतील ! हे द्रौपदी, अशा रीतीनें हें जग क्रोधाविष्ट झालें तर प्रजोत्पत्ति तरी होणार कशी ? कारण शांतता हेंच प्रजोत्पत्तीचें कारण होय."†

दशरथ राजानें नम्रपणानें आपल्या भार्येचा राग कसा शांत केला तो पहा. रामचंद्राला दीर्घकाळपर्यंत वनवासाला पाठविल्यामुळें पुत्राच्या विरह-व्यथेनें व्याकुळ होऊन कौसल्या दशरथाला रागानें म्हणाली, "हे राजा, आपल्याच हातांनीं तूं आपल्या पुत्राचा वध करीत आहेस. तुझ्या पूर्वजांनीं दीर्घ परिश्रमानें आंखून ठेवलेल्या धर्ममार्गाचें तूं चांगलेंच अवलंबन करीत आहेस ! स्त्रियांना पति हें पहिलें आश्रयस्थान, पुत्र हें दुसरें व आप्त-इष्ट हें तिसरें होय; चवथें आश्रयस्थान त्यांना नाहीं. तूं मला सोडिलेंस; राम गेला; आतां मी तुला इथून त्याच्याकडे जाऊं देणार नाहीं. तूं माझा, आपल्या राज्याचा व प्रजेचा सर्वस्वीं घात केला आहेस." राजानें हे मर्मभेदक शब्द ऐकिले व असह्य दुःखभारानें तो व्याकुळ झाला. दुःखातिरेकानें मन व्याप्त होऊन त्याला मूर्च्छा आली. कांहीं वेळानें तो सावध झाला तों कौसल्या अजून जवळच बसलेली आहे असें त्याला आढळलें. इतक्यांत ज्याच्यामुळें हें सर्व दुःख आपल्यावर कोसळलें त्या आपल्या हातून पूर्वीं घडलेल्या पापाची त्याला आठवण झाली. रामाचा विरह व आपल्या पूर्व पापकर्माची स्मृति ह्या दोन गोष्टींमुळें त्याचें दुःख दुणावलें व मान खालीं घालून आणि हात जोडून कांपत कांपत तो तिला म्हणाला, "कौसल्ये, मला क्षमा कर, मी तुला हात जोडितों. तूं आजपर्यंत कोणावरही रागावलेली नाहींस. तेव्हां

† महाभारत, वनपर्व २९.

ह्या तुझ्या पतीनें जर कांहीं बरेंवाईट केलें असेल तर त्याबद्दल त्याला क्षमा कर. आधींच मला माझें दुःख असह्य झालें आहे, ह्यासाठीं तुला कितीही दुःख झालें असलें तरी मला कठोर शब्दांनीं बोलूं नकोस.'' राजानें दीन वाणीनें उच्चारिलेले ते शब्द ऐकून तिच्या अंतःकरणांत दयेचा पाझर फुटला, व नेत्रांतून अश्रूंच्या धारा वाहूं लागल्या. तिचा राग शांत झाला, व आपण कठोर भाषण केलें हें महत्पाप केलें असा तिला पश्चात्ताप होऊन तिचें मन द्रवलें. तिनें राजाचे हात धरून आपल्या मस्तकावर ठेवले व दीनवदन होऊन त्याला म्हणाली, ''हे राजा, तुझ्या चरणांवर मी मस्तक ठेवीत आहें मला क्षमा कर. मीच तुझी क्षमा मागितली पाहिजे. तुला माझी क्षमा मागावयास लावणें हें माझें महत्पाप आहे. जी स्त्री आपल्या पतीला आराधना करावयास लाविते तिला इहपरलोकीं सुज्ञ मनुष्यांकडून मान मिळत नाहीं. मीही धर्म जाणतें व तूंही जाणतोस; तेव्हां आपली प्रतिज्ञा पाळून सत्याचें रक्षण कर. पुत्रविरहाच्या दुःखानें मी भ्रांतचित्त होऊन माझ्या मुखांतून कठोर शब्द निघून गेले. दुःखानें चित्ताची स्थिरता डळमळते व सर्व शहाणपण विलयास जातें. दुःखासारखा दुसरा शत्रु नाहीं. माझ्या प्रिय पुत्राची आठवण झाली म्हणजे वर्षाऋतूंतील नदीप्रमाणें माझें अंतःकरण उचंबळून येतें.''† ह्याप्रमाणें दशरथ राजाच्या विनयशीलतेमुळें व क्षमाशीलतेमुळें कौसल्येचा क्रोध शांत झाला. जर त्यानें तिला क्रोधानेंच प्रत्युत्तर दिलें असतें तर त्यांचा कलह वाढत जाऊन पुत्रविरहाच्या दुःखामुळें त्यांची कायमची ताटातूट झाली असती. परंतु आपल्या नम्रतेनें, मृदु भाषणानें व सौजन्यानें दशरथानें आपल्या पत्नीचा अभिमान, कठोरपणा व क्रोध नाहींसा करून तिच्या ठिकाणीं नम्रता व प्रेम उत्पन्न केलें.

त्याचप्रमाणें भरताविषयीं लक्ष्मणाच्या मनांत संशय व क्रोध उत्पन्न झाला होता, तो रामानें भरताबद्दल स्वतः दृढ विश्वास दाखवून नाहींसा केला. दशरथाचें वचन सत्य व्हावें म्हणून राम आपली पत्नी सीता व बंधु लक्ष्मण ह्यांसह अयोध्येहून निघून वनामध्यें जाऊन राहिला असतां एके दिवशीं दुरून येणाऱ्या सैन्याची गडबड त्याच्या कानीं पडली; तेव्हां त्यानें लक्ष्मणाला एका वृक्षावर चढून तें काय आहे हें पाहण्यास सांगितलें. लक्ष्मणानें पाहिलें तों भरत

† रामायण, अयोध्याकांड ६०. ६१.

बराच जनसमूह घेऊन अरण्यांतच येत आहे असें त्याला आढळलें. वनवास प्राप्त झाल्यामुळें लक्ष्मणाचें मन आधींच संतप्त झाल्याकारणानें भरताचा त्याला संशय आला, आणि घाईघाईनें येऊन तो रामाला मोठ्या रागानें म्हणाला कीं, "भरत तुला ठार मारून आपला राज्यावरील हक्क दृढ करण्यासाठीं येत आहे, तर त्याच्याबरोबर लढण्याची तयारी कर." परंतु भरताविषयीं रामाच्या मनांत प्रेम होतें. राग नव्हता. म्हणून तो लक्ष्मणाला सौम्यपणानें म्हणाला, "त्याच्याविषयीं संशय बाळगूं नको. हें सर्व राज्य लक्ष्मणाला दे असें मी त्याला सांगेन, व तो तें कबूलही करील." हे शब्द ऐकतांच लक्ष्मणाचा राग पार निघून गेला व त्याला लज्जा उत्पन्न झाली. इतक्यांत भरत तेथें आला व रामानें पुन्हा अयोध्येला यावें म्हणून नम्रपणानें त्याला विनवूं लागला. परंतु रामाला आपल्या पित्याचें वचन अक्षरशः पाळावयाचें होतें, म्हणून भरतानें रामाच्या पादुका घेऊन त्या सिंहासनावर ठेविल्या व राम वनवासांत असेपर्यंत त्याचा प्रतिनिधि म्हणून त्याच्याच नांवानें चौदा वर्षेंपर्यंत अयोध्येचें राज्य चालविलें.†

पांडव वनवासांत असतांना युधिष्ठिर कौरवांना आपण दिलेला शब्द एकनिष्ठपणानें पाळीत होता व सर्व दुःखें निमूटपणें सहन करीत होता; परंतु इतर पांडवांना तें असह्य होऊन ते त्याची वारंवार निर्भर्त्सना करीत. परंतु तें सर्व सहन करून आपल्या शांतवृत्तीनें तो त्यांना योग्य मार्गावर आणी. एकदां भीम अतिशय संतप्त झाला, व "ज्या जुगार खेळणाऱ्यांनीं द्यूतामध्यें आपणांला फसवून आपल्यावर डाव लादिला त्यांना दिलेला शब्द पाळण्याचें नीच पुण्य युधिष्ठिरानें संपादन केलें; पांडवांचें सर्व राज्य व वैभव युधिष्ठिरानेंच नष्ट केलें; तो भित्रा आहे; वर्णाश्रमधर्माचा त्यानें त्याग केला आहे व आपल्याच हातानें आपला उपहास करून घेतला आहे," इत्यादि कठोर शब्दांनीं त्यानें त्याची निर्भर्त्सना केली. परंतु युधिष्ठिरानें कांहीं वेळपर्यंत स्थिरचित्त राहून भीमाला प्रत्युत्तर दिलें. "भीमा, तुझें म्हणणें खरें आहे. माझा उपहास केल्याबद्दल व मला कठोर भाषणें बोलल्याबद्दल मी तुला दोष देणार नाहीं; कारण माझ्या मूर्खपणामुळेंच तुम्हां सर्वांवर हें संकट आलें आहे. मीं माझ्या मनाला दर्प व अहंकार ह्यांच्या तावडींत सांपडूं न

† रामायण, अयोध्याकांड १४.

देतां त्याचा निग्रह केला पाहिजे होता. तथापि आतां मी वचनबद्ध झालों आहें. आतां वचनभंग करणें शक्य नाहीं. असत्य बोलून राज्य मिळविण्यापेक्षां मृत्यु बरा. तर मग तुझ्या ह्या तीक्ष्ण वाक्प्रहारांनीं माझ्यावर काय परिणाम होणार आहे? माझ्यामुळें होत असलेले हे तुमचे हाल पाहून माझें अंतःकरण विदीर्ण होत आहे. तरीसुद्धां माझ्याकडून वचनभंग होणार नाहीं. भीमा, शेतकरी ज्याप्रमाणें पिकाची वाट पहात असतो त्याप्रमाणें चांगले दिवस येईपर्यंत तुम्ही स्वस्थ रहा. माझें वचन असत्य होणार नाहीं. धर्मरक्षण हें जीविताहून किंबहुना स्वर्गसुखाहूनही श्रेष्ठ आहे. राज्य, पुत्र, कीर्ति व संपत्ति ह्यांची योग्यता सत्याचरणाच्या एक षोडशांशही होणार नाहीं.'' ह्याप्रमाणें युधिष्ठिरानें आपल्या बंधूंचीं कठोर भाषणें सहन केलीं.—नेहमींच तो त्यांनीं केलेला उपहास शांतपणानें सहन करीत असे;—व त्यामुळेंच त्याच्या बंधूंची क्रोधवृत्ति शिथिल होऊन ते त्याच्याशीं प्रेमरज्जूनें बद्ध होत असत. तोच जर उलट क्रोधाविष्ट झाला असता तर त्यांच्यांतील प्रेमबंधन तुटून गेलें असतें.†

ज्याप्रमाणें सदयांतःकरणानें सहानुभूति दाखविली असतां प्रेम उत्पन्न होतें, त्याचप्रमाणें अविचारानें उपहास केला असतां द्वेष उत्पन्न होतो; व ह्या द्वेषापासून अनेक संकटें उद्भवतात. युधिष्ठिराची कीर्ति सर्वतोमुखीं झाली. व त्याच्या राजसूययज्ञाच्या वैभवाचें वर्णन सर्वत्र होऊं लागलें, तें ऐकून दुर्योधनाच्या अंतःकरणांत मत्सराग्नि प्रज्ज्वलित झाला व भीम वगैरे युधिष्ठिराचे बंधु दुर्योधनाबद्दल तुच्छता दर्शवीत असल्यामुळें तर तो विशेषच भडकला. एकदां युधिष्ठिर आपल्या सुवर्णमय सिंहासनावर बसला आहे, बाजूस त्याचे सर्व बंधु बसले आहेत व इतर राजे, मानकरी वगैरे लोक आपआपल्या आसनावर बसले आहेत, इतक्यांत दुर्योधन आपल्या बंधूंसह दरबारांत आला. मयासुरानें मोठ्या चातुर्यानें व कसबानें तयार केलेल्या त्या सभागृहामध्यें दुर्योधन भांबावून गेला; व त्या स्फटिकमय भूमीवरून चालतांना त्याला पाण्याचा भास झाल्यामुळें आपलीं वस्त्रें भिजतील म्हणून तीं वर करून चालूं लागला; व ज्या ठिकाणीं खरोखरच पाणी होतें त्या ठिकाणीं भूमि आहे असें समजून चालत असतां पाण्यांत

† महाभारत, वनपर्व ३३–३४.

पडून भिजला. हें पाहून भीम खदखदां हांसला व इतर लोकही हंसूं लागले. युधिष्ठिरानें या असभ्य वर्तनाबद्दल त्यांची कानउघाडणी केली खरी, तथापि दुर्योधन अतिशय खजिल झाला व रागानें डोळे वटारून आणि झालेल्या अपमानाबद्दल सूड उगवण्याचा मनामध्यें निश्चय करून हस्तिनापुराला परत गेला. कौरवपांडवांचें द्यूत, वनवास, कुरुक्षेत्रावरील महायुद्ध व कौरवपांडवांचा संहार ह्या सर्व गोष्टींना जीं अनेक कारणें झालीं त्यांपैकीं हें एक होय.†

अपकाराचा प्रतिकार अपकारानेंच केला असतां नवीन संकटें उत्पन्न होतात व संकटपरंपरा सुरू होते. भृगुऋषीचा पुत्र जमदग्नि हा महातपस्वी व संयमी म्हणून प्रख्यात होता. त्याच्या कुळामध्यें परशुराम जन्मास आला. परशुराम जरी ब्राह्मणकुळामध्यें जन्मास आला होता तरी तो क्षत्रियवृत्तीचा होता, व त्याचा आजा भृगु ह्यानें पूर्वींच भविष्य वर्तविल्याप्रमाणें त्याचा स्वभावही क्षत्रियधर्माला उचित असा होता. जमदग्नीनें जरी येवढी कडक तपश्चर्या केली होती तरी त्याच्या अंतःकरणांतील क्रोधाचें बीज समूळ नाहींसें झालें नव्हतें. ह्यामुळेंच तर त्याच्या कुळावर भयंकर प्रसंग व संकटें आलीं. जमदग्नीच्या मनांत आपल्या पत्नीच्या पातिव्रत्याबद्दल अविचारामुळें संशय उत्पन्न झाला, म्हणून एकामागून एक आपल्या सर्व मुलांना त्यानें आज्ञा केली कीं तुम्ही हिला ठार करा! परंतु आपल्या मातेच्या देहावर शस्त्र उचलण्यास कोणीही तयार होईना. शेवटीं कनिष्ठ पुत्र परशुराम ह्यानें आपल्या परशूनें तिचें शिर उडविलें. जमदग्नि प्रसन्न होऊन त्यानें त्याला वर दिला, तेव्हां आपली आई पुन्हा जिवंत होऊं दे असा वर त्यानें मागितला, व मातृहत्येच्या पापाचें क्षालन करण्यासाठीं तो तीर्थयात्रेला निघून गेला. परंतु जमदग्नीच्या क्रोधामुळें उत्पन्न झालेल्या संकटाचा परिहार येवढ्यानें होण्यासारखा नव्हता. एकदा जमदग्नीची भार्या रेणुका एकटीच आपल्या आश्रमामध्यें असतां कृतवीर्याचा पुत्र सहस्रार्जुन त्या ठिकाणीं आला. रेणुकेनें त्याचें योग्य प्रकारें आदरातिथ्य केलें. परंतु तें मनांत न आणितां, आपल्या क्षात्रतेजाच्या दर्पानें उन्मत्त होऊन, आश्रमांतील नित्य यज्ञयागांना लागणाऱ्या घृताचा पुरवठा करणाऱ्या गाईचें पाडस तो बलात्कारानें घेऊन गेला. परशुराम घरीं आल्यावर जमदग्नीनें घडलेली सर्व हकीकत त्याला सांगितली. ती

† भागवतपुराण, १०. ७५ व महाभारत, सभापर्व ४७.

ऐकून परशुराम संतप्त झाला व आपल्या वत्सासाठीं गाईनें फोडिलेला हंबरडा ऐकून तर त्याचा संताप अधिकच प्रदीप्त झाला. ह्या संतापातिरेकानें त्याचा आत्मनिग्रह नाहींसा होऊन तो एकदम सहस्रार्जुनावर चाल करून गेला, व त्याच्याबरोबर भयंकर युद्ध करून त्याला त्यानें ठार मारिलें. ह्यामुळें सहस्रार्जुनाच्या लोकांना त्वेष येऊन ते सूड घेण्याकरितां जमदग्नि एकटाच आपल्या आश्रमामध्यें ध्यानस्थ बसला आहे असें पाहून त्याच्यावर चाल करून गेले व त्यांनीं बाणांनीं त्याला ठार मारिलें. परंतु हें संहारकृत्य येवढ्यावरच थांबलें नाहीं; कारण परशुरामाच्या अंतःकरणांत क्षमेचा प्रादुर्भाव अद्यापि झाला नव्हता, व त्याशिवाय तर ही संकटपरंपरा तुटणें शक्य नव्हतें. पित्याच्या निधनाबद्दल परशुरामानें फार शोक केला व दहनक्रियेचें वगैरे सर्व काम आटपून सर्व क्षत्रियवंशाचें निर्दालन करीन अशी त्याच दहनभूमीवर त्यानें प्रतिज्ञा केली. अशा रीतीनें ही संकटपरंपरा अधिकाधिक वृद्धिंगत होत चालली. शेवटीं आपल्या परशूनें सहस्रार्जुनाच्या वंशाचा संहार करून परशुरामानें सर्व क्षत्रियांशीं युद्ध केलें व सर्व पृथ्वी जवळजवळ निःक्षत्रिय केली !†

जर एखाद्यानें आपणाशीं अन्यायानें व दुष्टपणानें वर्तन केलें असेल तर त्यावेळींसुद्धां, मग तो आपणाहून श्रेष्ठ असो, आपल्याबरोबरीचा असो अगर आपणाहून कनिष्ठ असो, आपण त्याच्याशीं सख्यत्वाचें व प्रेमाचें वर्तन ठेवून त्याला आपलासा करून घेणें हें सर्वांत चांगलें. एकदां दुर्वास ऋषि दुर्योधनाला भेटण्यासाठीं आला. दुर्योधनानें व त्याच्या बंधूंनीं रात्रंदिवस त्याच्या तैनातींत राहून त्याचें योग्य आदरातिथ्य करण्याची शिकस्त केली, परंतु कांहीं केल्या त्याची तृप्ति होईना. एखादे वेळीं दुर्वासानें म्हणावें, "राजा, मला फार क्षुधा लागली आहे; ताबडतोब अन्न दे." दुसऱ्या वेळीं दुर्वास स्नानास गेलेला पाहून तो परत येतांच त्याची खोटी होऊं नये म्हणून दुर्योधनानें अन्नाची सर्व तयारी करून ठेवावी, तर त्यानें म्हणावें, "आज मी कांहीं खाणार नाहीं; मला क्षुधाच नाहीं," पुन्हा लगेच परत येऊन म्हणावें, "मला ताबडतोब अन्न दे." एखादे वेळीं मध्यरात्रीला उठून त्यानें अन्न मागावें, व तें आणून दिलें म्हणजे त्याला

† महाभारत, वनपर्व ११५-११७.

नांवें ठेवावीं व त्याला स्पर्शही करूं नये. अशा रीतीनें दुर्वासानें कांहीं दिवसपर्यंत दुर्योधनाला छळिलें; व कांहीं झालें तरी दुर्योधनाला राग येत नाहीं व त्याच्या चित्ताची स्थिरताही मोडत नाहीं असें जेव्हां त्याला आढळून आलें तेव्हां तो कृपाळू होऊन म्हणाला, " राजा, तुला वर देण्याचें सामर्थ्य माझ्या अंगीं आहे; तुला पाहिजे तो वर माग. तुझ्यावर मी प्रसन्न झालों आहें, तेव्हां धर्मविरुद्ध किंवा नीतिविरुद्ध नसेल असें पाहिजे तें माग, मी तें तुला देतों."ꕥ

कित्येक वेळीं एखादा मनुष्य इतक्या कठोर अंतःकरणाचा असतो कीं, त्याच्याशीं कितीही प्रेमानें वागलें तरी त्याचें अंतःकरण द्रवत नाहीं, व तशाच स्थितींत त्याचा नाश होतो. ह्याचें उत्कृष्ट उदाहरण म्हणजे दुर्योधन होय. दुर्योधनानें आपल्या चुलत बंधूंचें राज्य व संपत्ति हिरावून घेऊन त्यांना वनवासाला पाठविलें, व शकुनीची दुष्ट मसलत ऐकून आपल्या प्रतिस्पर्ध्यांची वनवासांतील कष्टदशा व निर्धनता प्रत्यक्ष पाहून आपल्या नेत्रांचें पारणें फेडावें असा त्यानें बेत केला. पांडवांनीं आपलें वैभव पाहून खजिल व्हावें ह्या हेतूनें आपले सर्व बंधु, राजकुलांतील सर्व स्त्रिया व इष्टमित्र ह्यांसह तो पांडवांकडे गेला. परंतु मध्यंतरीं वाटेंत गंधर्वाधिपाचा त्यानें उद्दामपणानें अपमान केल्यामुळें त्याच्या सैन्यानें त्याजवर हल्ला करून त्याला पकडून नेलें. म्हणून त्याचा बेत फसला. दुर्योधनाकडील कांहीं माणसें निसटून पळालीं तीं युधिष्ठिराकडे आलीं व त्याच्याकडे मदत मागूं लागलीं. भीमानें साफ नाहीं म्हटलें. परंतु दुर्योधनास व त्याच्या स्त्रियांस पकडून नेणें म्हणजे आमच्याच कुळाचा अपमान करणें होय हें लक्षांत ठेवा, असें म्हणून युधिष्ठिरानें भीमाची कानउघाडणी केली व आपल्या बंधूंस सज्ज होऊन कौरवांची सुटका करण्यास सांगितलें. " मला कोणीतरी साहाय्य करा" अशी दीनवाणीची याचना करणाऱ्या शरणागत शत्रूला मदत करण्यास कोणता उदारधी मनुष्य पुढें सरसावणार नाहीं ! वरप्राप्ति, साम्राज्याधिकार व पुत्रजन्म हीं महोत्सवाला कारण तर खरींच, परंतु पंडुपुत्रांनो, आपल्या शत्रूची संकटांतून मुक्तता करणें ह्या एकाच गोष्टीची योग्यता वरील तीनही गोष्टी एकत्र केल्या तर त्यांच्या एवढी आहे." ह्याप्रमाणें त्या महात्म्याचें

ꕥ महाभारत, वनपर्व २६०

भाषण ऐकून पांडवांनीं त्याप्रमाणें केलें. कांहीं वेळपर्यंत दोघांचें तुमुल युद्ध झालें व नंतर अर्जुन व गंधर्वाधिपति ह्यांचें पूर्वींचें सख्य असल्यामुळें त्यांनीं युद्ध समाप्त केलें. नंतर दुर्योधनाला कां पकडण्यांत आलें म्हणून अर्जुनानें त्याला विचारलें तेव्हां दुर्योधन ह्या अरण्यामध्यें कोणत्या दुष्ट हेतूनें आला होता हें आपणांस माहीत होतें म्हणून त्याबद्दल त्याला शिक्षा करण्यासाठीं इंद्राकडे घेऊन जात होतों असें तो म्हणाला. नंतर अर्जुनानें दुर्योधनादिकांना मुक्त करण्याविषयीं प्रार्थना केली. तेव्हां सर्व हकीगत ऐकून घेतल्यावर त्यांना मुक्त करावें अशी जर युधिष्ठिराची इच्छा असेल तर आपण त्यांना मुक्त करितों असें गंधर्वाधिप म्हणाला, व दुर्योधन कोणत्या नीच व दुष्ट हेतूनें आला होता वगैरे सर्व हकीकत पांडवांना निवेदन केली. पांडवांनीं गंधर्वाधिपाची स्तुति करून त्याचे आभार मानिल्यावर दुर्योधनादिकांना त्यानें मुक्त केलें. गंधर्व गेल्यानंतर युधिष्ठिर आपल्या चुलत बंधूला प्रेमानें म्हणाला, "दुर्योधना, असलें अविचाराचें कृत्य पुन्हा करूं नको; अविचारानें कधींही सुख प्राप्त होत नाहीं. हे कौरवश्रेष्ठा, बंधूंसहवर्तमान तूं सुखानें रहा. आपल्या राजधानीला खुशाल जा; तुला खिन्न होण्याचें कांहीं कारण नाहीं." ह्याप्रमाणें आपणाला महद्विपत्तीमध्यें लोटून देणाऱ्या आपल्या भयंकर दीर्घद्वेषी शत्रूला त्या महानुभाव युधिष्ठिरानें मोठ्या प्रेमानें वागविलें. परंतु तेथून गेल्यानंतर दुर्योधनाचा द्वेष व क्रोध अनेक पटीनें वृद्धिंगत झाला. युधिष्ठिरानें दर्शविलेलें प्रेम अधिक द्वेषाला कारण झालें, व आपल्या उपकारकर्त्यांचा तो पूर्वींहूनही अधिक द्वेष करूं लागला.†

असल्या तऱ्हेची द्वेषवृत्ति क्वचितच आढळते ही सुदैवाची गोष्ट होय. प्रायः उष्णतेनें लोणी विरघळतें, त्याप्रमाणें प्रेमाच्या योगानें द्वेषवृत्ति शिथिल होत जाते.

दुसरा मनुष्य आपल्यावर रागावला असतां आपल्याही मनामध्यें क्रोध उत्पन्न होतो, परंतु आपण त्याचा निग्रह करण्याचा प्रयत्न केला पाहिजे व आपल्या वाणीनें, मुद्रेनें अगर आचरणानें तो प्रगट न करण्याची खबरदारी घेतली पाहिजे. अशा तऱ्हेनें निग्रह करीत राहिलें असतां हळुहळू क्रोधवृत्ति कमी कमी होत जाते व शेवटीं अग्नीला इंधन न मिळाल्यामुळें तो जसा

---

† महाभारत, वनपर्व २३५–२५०.

अजिबात शांत होतो त्याप्रमाणें ती समूळ नष्ट होते. अशी एकदां संवय लागली म्हणजे दुसरा रागावला असतांही आपल्या अंतःकरणांत क्रोध उत्पन्न होईनासा होईल व दुसऱ्याच्या कठोर मनोवृत्तीला आपल्या प्रेमानें आळा घालण्याची शक्ति आपल्यामध्यें येईल.

वाईट संगति आपण कां टाळिली पाहिजे हें येवढ्यावरून आपल्या लक्षांत येईल. निर्दय, कठोर अगर दुष्ट विचारांच्या मनुष्याशीं, किंवा अशुद्ध, निरर्गल व बेमुर्वत वर्तनाच्या मनुष्याशीं जर आपण सहवास ठेविला तर त्याच्या आचारविचारांचा पगडा आपल्यावर बसून आपले आचारविचारही त्याच्याप्रमाणेंच बनूं लागतात; व आपल्यामध्यें असल्या दुष्ट आचारविचारांचे जर कांहीं अंकुर असतील तर ते असल्या सहवासानें फोंफावून अधिक बळकट होतील व नंतर त्यांना समूळ उपटून काढणें दुष्कर होईल. येवढ्यासाठीं आपला गृहस्थाश्रम उदात्त व सर्वोपयुक्त व्हावा म्हणून ब्रह्मचर्याश्रमामध्यें पवित्रता व उद्योगशीलता अंगीं बाणविण्याची ज्या मुलांची इच्छा असेल त्यांनीं शक्य तेवढा वाईट संगतीचा परिहार केला पाहिजे. व जर कदाचित् असली संगति टाळणें अशक्यच झालें तर निदान त्यांनीं आपलें मन शुद्ध व उदात्त विचारांमध्यें गुंतवून ठेविलें पाहिजे, व आपल्या सहवासांतील मुलांच्या कुविचारांच्या ओघांत आपण न सांपडतां आपल्या सुविचारांचा पगडा त्यांच्या मनावर बसविण्याचा प्रयत्न केला पाहिजे. अशा रीतीनें स्वतःच्या जीवनक्रमामध्यें आपलें ज्ञान कृतीमध्यें उतरवून आपण वागलों तरच आपल्या ज्ञानाचा खरा उपयोग होऊन आपल्या उदात्त आचरणानें जगाच्या सुखामध्यें आपण भर टाकिलीसें होईल.

---

क्रुध्यन्तं न प्रतिक्रुध्येदाक्रुष्टः कुशलं वदेत् ॥ †

आपल्यावर कोणी रागावला असेल तर त्याच्यावर उलट रागावूं नये. कोणी कठोर बोलला असेल तर त्याला सौम्यपणानें उत्तर द्यावें.

सेतूंस्तर दुस्तरानक्रोधेन क्रोधं सत्येनानृतम् ॥ ❀

---

† मनुस्मृति, ६. ४३. ❀ सामवेद, आरण्यगान, अर्कपर्व. २ प्रपाठक.

अक्रोधानें क्रोधाला जिंक व सत्यानें असत्याला जिंक. अशा रीतीनें हे दुस्तर सेतु तरून जा.

आत्मानं च परांश्चैव त्रायते महतो भयात् ॥
क्रुध्यन्तमप्रतिक्रुध्यन्द्वयोरेव चिकित्सकः ॥ †

दुसरा आपल्यावर रागावला असतांही जो त्याच्यावर उलट रागावत नाहीं तो त्यायोगें स्वतःचें व इतरांचेंही महत् संकटापासून रक्षण करितो.

क्षमा ब्रह्म क्षमा सत्यं क्षमा भूतं च भावि च ।
क्षमा तपः क्षमा शौचं क्षमयेदं धृतं जगत् ॥ ※

क्षमा हेंच ब्रह्म, क्षमा हेंच सत्य व क्षमा हेंच भूतभविष्य होय. क्षमा हेंच तप, क्षमा हेंच शौच व क्षमा हाच सर्व जगताचा आधार होय.

परश्चेदेनमतिवाणैर्भृशं विध्येच्छम एवेह कार्यः ।
संरोष्यमाणः प्रतिहृष्यते यः स आदत्ते सुकृतं वै परस्य ।
आक्रुश्यमानो न वदामि किंचित्
क्षमाम्यहं ताडयमानश्च नित्यम् ।
श्रेष्ठ ह्येतद्यत् क्षमामाहुरार्याः
सत्यं तथैवार्जवमानृशंस्यम् ॥
आक्रुश्यमानो नाक्रुश्येन्मन्युरेनं तितिक्षतः ।
आक्रोष्टारं निर्दहति सुकृतं चास्य विंदति ॥
यो नात्युक्तः प्राहरूक्षं प्रियं वा यो वा हतो न प्रतिहन्तिधैर्यात् ।
पापं च यो नेच्छति तस्य हन्तुस्तस्येह देवाः स्पृहयन्ति नित्यम् ॥
पापीयसः क्षमेतैव श्रेयसः सदृशस्य च ।
विमानितो हतोत्क्रुष्ट एवं सिद्धिं गमिष्यति ॥ ‡

दुसऱ्यानें जर आपणास तीक्ष्ण वाग्बाणांनीं प्रहार केला असेल तर शहाण्या मनुष्यानें शांतपणाच स्वीकारिला पाहिजे. रागाला कारण झालें असतांही जो उलट हांसतो तो रागावणाऱ्याचें पुण्यच हरण करितो.

---

† महाभारत, वनपर्व. २९. ९. ※ महाभारत, वनपर्व ७३.
‡ महाभारत, शांतिपर्व ३००, १०, १२, १६–१८.

दुसरा कठोर बोलला असतांही मी कांहींसुद्धां बोलत नाहीं. मला मारिलें असतांही मी क्षमा करितों. ज्याला श्रेष्ठ लोक क्षमा, सत्य, सरळपणा किंवा सौजन्य म्हणतात तोच श्रेष्ठ गुण होय.

दुसरा आपणाला कठोर शब्द बोलला असतांही आपण उलट कठोर बोलूं नये. कारण सहन करणाऱ्याचा राग कठोर भाषण करणाऱ्याला जाळितो व त्याचें पुण्य हिरावून घेतो.

ज्याला कठोर बोललें असतांही जो कठोर किंवा सौम्य कांहींच बोलत नाहीं, किंवा ज्याला मार मिळाला असतांही जो तो सहन करतो, उलट मारीत नाहीं, किंवा आपल्या शत्रूचें अहितही चिंतीत नाहीं, अशा मनुष्याच्या त्या थोरपणाचा देव सुद्धां हेवा करितात.

नीच व पापी मनुष्यानें, आपल्याहून श्रेष्ठ मनुष्यानें किंवा बरोबरीच्यानें आपला अपमान केला असतां, आपणास ताडन केलें असतां अगर दुसरें कांहीं कठोर वर्तन आपणाशीं केलें असतां तें सर्व सहन करावें. तेणेंकरून सिद्धि प्राप्त होते.

आक्रुष्टस्ताडितः क्रुद्धः क्षमते यो बलीयसः।
यश्च नित्यं जितक्रोधो विद्वानुत्तमपूरुषः॥ †

बलवान् मनुष्य कठोरपणानें बोलला असतां, त्यानें मारिलें असतां किंवा तो रागावला असतांही जो आपला राग आवरून धरितो व क्षमा करितो तोच सुज्ञ व उत्तम पुरुष होय.

॥ ॐ तत्सत् ॥

---

† महाभारत, वनपर्व. २९. २५.

सर्वस्तरतु दुर्गाणि सर्वो भद्राणि पश्यतु।
सर्वः सुखमवाप्नोतु सर्वः सर्वत्र नन्दतु॥

ॐ सत्यं वद, धर्मं चर।

# थिऑसॉफिकल सोसायटी.

## ( सामान्य माहिती. )

अमेरिकेंत न्यूयॉर्क शहरी ता. १७ नवंबर १८७५ रोजीं थिऑसॉफिकल सोसायटीची स्थापना झाली व ता. ३ एप्रिल १९०५ या दिवशीं मद्रास येथें कायदेशीर रीतीनें ती नोंदण्यांत आली. ही सोसायटी कोणत्याहि एका पंथाची नसून ती सर्व सत्यजिज्ञासूंस एकवटणारी संस्था आहे. जडवादास आळा घालून धर्मजागृति करण्याचा व मानवजातीची अध्यात्मदृष्ट्या उन्नति करण्याचा तिचा यत्न आहे. मॅडम ब्लॅव्हॅट्स्की व कर्नल ऑलकॉट हे दोघे या सोसायटीचे आद्यसंस्थापक होत.

ही संस्था फक्त हिंदुस्थानांत प्रसृत झालेली आहे असें नाहीं. तिचा प्रसार सर्व जगभर झालेला आहे. तिच्या सुमारें पंधराशें शाखा सर्व जगभर आहेत व एकंदर सभासद चाळीस हजार आहेत. ज्या देशांत बऱ्याच शाखा आहेत असे देश सुमारें पस्तीस आहेत. या पस्तीसांस "सेक्शन" असें नांव आहे. दर सेक्शनच्या सभासदांनीं निवडलेला एक जनरल सेक्रेटरी असतो. हे सेक्शन (किंवा ह्या नॅशनल सोसायटीज्) आपापल्या अंतस्थ कारभारांत स्वतंत्र असतात. सर्व जनरल सेक्रेटरी व नियमानुसार निवडलेले अध्यक्ष, उपाध्यक्ष वगैरे सभासद यांचें मिळून 'जनरल कौन्सिल' होतें; व सोसायटीचा सर्व व्यवहार व कारभार या कौन्सिलच्या हातीं असतो. सोसायटीच्या अध्यक्षाची निवडणूक जगांतील सर्व सभासदांनीं सात वर्षांतून एकदां करावयाची असते. हल्लीं अध्यक्षस्थानीं ॲनी बेझंट डी. एल्. या आहेत व सी. जिनराजदास. एम्, ए. (केंब्रिज) हे उपाध्यक्ष आहेत. सोसायटीचे हे जे अधिकारी त्यांची सत्ता फक्त सोसायटीच्या कारभारांत असते. सभासदांच्या मतस्वातंत्र्यांत ढवळाढवळ करण्याचा त्यांस मुळींच अधिकार नाहीं; व सोसायटीच्या कोणत्याहि अधिकाऱ्यांची वैयक्तिक मतें सभासदांवर बंधनकारक नाहींत. सोसायटीचे सर्व जगभर

*

हरएक प्रकारचे उद्योग चालू आहेत. प्रत्येक सेक्शनचें बहुतकरून निदान एक मासिक पुस्तक असतें व त्यावरून त्या देशाच्या धार्मिक चळवळीची माहिती व तेथील सभासदांचे उद्योग लक्षांत येतात. हिंदुस्थानांत सोसायटीचीं जीं अनेक भाषांतील अनेक मासिकें आहेत, त्यापैकीं धर्मजागृति हें एक मासिक होय. सोसायटीचें मुख्य पीठ मद्रासनजीक अड्यार येथें आहे. हिंदुस्थानच्या सेक्शनचें मुख्य ठिकाण काशी येथें आहे, हिंदुस्थानांतील मराठी भाषा बोलणाऱ्या सोसायटीच्या शाखांस संघटीत करणारी जी संस्था आहे तिचें नांव 'मराठी थिऑसॉफिकल फेडरेशन' असें आहे. सोसायटीचे तीन उद्देश प्रसिद्ध आहेत. ते येणेंप्रमाणें:—

(१) जात, धर्म, लिंग, वर्ण इत्यादि भेद बाजूस ठेऊन मानवजातीच्या बंधुत्वाचा केंद्र बनविणें.

(२) धर्म, तत्वज्ञान व भौतिकशास्त्र यांच्या तुलनात्मक अध्ययनास उत्तेजन देणें.

(३) अज्ञात सृष्टिनियम व मनुष्याच्या अंतरंगांत असलेल्या गूढशक्ति यांचें संशोधन करणें.

थिऑसॉफिकल सोसायटी म्हणजे धर्म-जिज्ञासूंचा एक संघ होय. त्यांत प्रवेश करूं इच्छिणारा जिज्ञासु कोणत्याहि धर्माचा असो वा त्यास कोणताहि धर्म नसो, त्यास या संस्थेंत मज्जाव नाहीं. वरील उद्देश स्तुत्य आहेत असें त्या जिज्ञासूंस आढळून आल्यामुळें जगांतील धार्मिक कलह नाहींसे व्हावयाला पाहिजेत, सद्बुद्धि असणाऱ्या माणसांचीं धर्ममतें कांहींहि असलीं तरी त्या सर्वांत ऐक्यभावना उत्पन्न झाली पाहिजे असें त्यांस वाटत आहे व धर्मसिद्धान्तांचें अध्ययन करून आपण लोकांस ज्ञानदान करावें अशी त्या जिज्ञासूंची इच्छा आहे. अमुक गोष्टीवर आमची सर्वांची श्रद्धा आहे व म्हणून आम्ही या सोसायटींत आलों आहों असें त्यांचें म्हणणें नसून आम्हां सर्वांस सत्य जाणण्याची आवड आहे व त्यामुळेंच आम्ही या संस्थेच्या छत्राखालीं एकवटलों आहों असें ते मानतात. अध्ययन, मनन, शुद्ध आचरण, श्रेष्ठ ध्येयाविषयीं खरें प्रेम इत्यादिक अंतस्थ साधनांनीं सत्य सांपडतें, अर्थात् त्या साधनांची पराकाष्ठा करून जिज्ञासूनें सत्य हस्तगत करावें अशी त्यांची भावना असल्यामुळें अमुक एका सिद्धान्तावर

तुम्हीं श्रद्धा ठेविली पाहिजे असा कोणाशींहि आग्रह धरण्याचें त्यांच्या मनांत येत नाहीं. अंतःस्फूर्तीनें वा अभ्यासानें ज्ञान मिळाल्यावर आपोआप जिज्ञासूची श्रद्धा बसल हें जर खरें, तर कोणतेहि सिद्धान्त त्याच्या गळ्यांत आजच घाईनें बांधण्याचें प्रयोजन नाहीं. बाबावाक्यं प्रमाणम् या न्यायानें कोणत्याहि सिद्धान्तास मान डोलविण्यापेक्षां तद्विषयक ज्ञान संपादन केल्यास जी त्याबद्दल निश्चयबुद्धि वाटते तीस अर्थात् अधिक किंमत आहे. थिऑसॉफिकल सोसायटीच्या सभासदांची अशी विचारसरणी असल्यामुळें ते सर्वांशीं—अनुदार माणसाशींहि—उदारबुद्धीनें वागतात व असें वागणें अवश्य कर्तव्य समजतात हें उघडच आहे. लोक अज्ञानी असतील तर त्यांचें अज्ञान घालविलें पाहिजे, त्यांस शासन करण्यांत अर्थ नाहीं, ही त्यांची भावना; प्रत्येक धर्म म्हणजे पराविद्येचें एक विशिष्ट स्वरूप ही त्यांची समजूत. म्हणून धर्मांचे दोष काढीत बसण्यापेक्षां त्यांचें अध्ययन करणें, व धर्मांत श्रेष्ठकनिष्ट अशा प्रति लावीत बसून धर्मांतरास उत्तेजन देण्यापेक्षां प्रत्येकास आपपल्या धर्माप्रमाणें वागण्यास सांगणें हें अधिक श्रेयस्कर होय असें ते आपलें धोरण ठेवितात. सर्वांशीं समेट, सख्य व प्रेम हें त्या जिज्ञासूंचें ब्रीद आहे व सत्य हें त्यांचें ध्येय आहे.

सर्व धर्मांच्या मुळाशीं असलेले सिद्धान्त हीच आत्मविद्या किंवा थिऑसफी. अर्थात् ते सिद्धान्त फक्त आमच्याच धर्मांत आहेत असें कोणालाहि म्हणतां येणार नाहीं. आत्मविद्यांतर्गत तत्त्वज्ञानानें मानवी जीविताचा प्रश्न सुटतो, व प्रेम आणि न्याय हे उत्क्रान्तिक्रमाचे आधारस्तंभ आहेत हें सिद्ध होतें. जीवाच्या दीर्घ चरित्रांत देहास अनेकवार मृत्यु येत असतो व मृत्यूच्या द्वारांतून पलीकडे गेलें म्हणजे इहलोकींच्या आयुष्यापेक्षां अधिक तेजस्वी आयुष्यक्रमाचा अनुभव माणसास मिळतो, हें आत्मविद्येच्या अध्ययनानें त्यास समजतें व उत्क्रान्तिक्रमांतील मृत्यूचें स्थान त्याच्या ध्यानांत येऊन त्याविषयींचें त्याचें भय नाहींसें होतें. मनुष्य हा आत्मा आहे आणि देह व मन हे त्याचे सेवक आहेत, ही गोष्टहि आत्मविद्येनें सिद्ध होते. धर्मग्रंथ व धर्म—सिद्धान्त यांतील रहस्यात्मक भागहि आत्मविद्येनें उघड होतात व अंतःस्फूर्तीच्या कसोटीप्रमाणें बुद्धीच्याहि कसोटीस ते उतरूं लागतात.

थिऑसॉफिकल सोसायटीचे सभासद या सिद्धान्तांचें अध्ययन करतात व खरे थिऑसफिस्ट तद्वत् आचरण करण्याचा यत्न करतात. अध्ययन करणें, परमताविषयीं औदर्य ठेवणें, उच्च ध्येय बाळगून त्याकरितां सतत उद्योग करणें या गोष्टींची ज्यांस आवड असेल त्यांचें सभासद म्हणून सोसायटी आनंदानें स्वागत करील. पुढें खरा थिऑसफिस्ट होणें त्याच्या त्याच्या प्रयत्नावर अवलंबून राहणार आहे.

सोसायटीसंबंधानें कोणास कांहीं माहिती पाहिजे असल्यास कोणत्याहि शाखेकडून ती आनंदानें पुरविण्यांत येईल.

---

# धर्मजागृतिमाला

मराठी भाषेंत आजच्या काळच्या सुशिक्षित लोकांस पटेल अशा र्जाचें धर्मविषयक वाङ्मय फारसें नाहीं. आपण आज विसाव्या शतकांत आहों. सांप्रत सर्व जगभर युक्तिवादाचें व बुद्धीचें प्राबल्य कायम झालें आहे. अर्थात् अशा काळीं स्वतःची खात्री झाल्याशिवाय कोणीहि शिक्षित मनुष्य धर्मावर श्रद्धा ठेवण्यास तयार असणार नाहीं. जगांत जी द्या सर्वमान्य आहे, तिच्या जोरावर बुद्धिमान् माणसें धर्माविषयीं आज नवे नवे प्रश्न विचारूं लागलीं आहेत. अशा लोकांस जर धर्माचे सिद्धांत टवून द्यावयाचे असतील तर त्यांचेसमोर ते नवीन रीतीनें व भौतिक-शास्त्राचे भरभक्कम आधार देऊन मांडिले पाहिजेत. नुसत्या श्रद्धेनें धर्माचे द्धान्त प्रसार पावण्याचा काळ आतां राहिलेला नाहीं. योग्य साधनांच्या भावीं आजची जनता धर्माविषयीं साशंक बनत आहे, आणि तरुण-ढी धर्माचे सिद्धान्त भराभर विसरत चालली आहे. आजच्या शिक्षणां-तूनहि धर्माची हकालपट्टी झाली आहे हें लोकविश्रुतच आहे. एवंच आजचे लोक तत्त्वज्ञानाच्या खोल प्रश्नांविषयीं बेफिकीर व धर्माच्या प्रमेयां-विषयीं उदासीन होऊं लागले असून त्यांच्यावर जडवादाची छाप धिकाधिक पडत आहे. असेंच पुढें चाललें तर जनता धर्मशून्य व स्तिक बनून ती अनीतीकडे झुकण्यास वेळ लागणार नाहीं. यास उपाय णून आम्हीं "धर्मजागृतिमाला" नांवाची एक पुस्तकमाला मराठी षेंत प्रसिद्ध करण्याचें योजिलें आहे. या मालेंत कांहीं पुस्तकें इंग्रजींतून ठींत भाषांतरित करण्यांत येतील व कांहीं योग्य माणसांकडून स्वतंत्र लिहविण्यांत येतील. धर्मांची तुलना, त्यांतील महत्त्वाचे सिद्धान्त, भौतिक-शास्त्रें, सायकिकल रिसर्च, तत्त्वविचार, स्पिरिच्युॲलिझम्, मेस्मेरिझम्, वेदान्त, योगशास्त्र, आत्मविद्या, नीतिशास्त्र वगैरे अनेक विषयांवर अधिकारी विद्वानांचे ग्रंथ या मालेंत प्रसिद्ध होतील. "धर्मजागृति" मासिक आज अनेक वर्षें महाराष्ट्रासमोर आहे. या मालेचें धोरण त्या मासिकाप्रमाणें

सर्व बाबतींत उदार राहणार आहे. महाराष्ट्रांत व्यवस्थित रीतीनें धर्मजागृति करण्यासाठीं ही माला मुद्दाम चालू करण्यांत येत आहे. मालेंत दरवर्षी सुमारें चार रुपये किंमतीचीं पुस्तकें प्रसिद्ध होतील. **या मालेच्या कायमच्या ग्राहकांस सर्व पुस्तकें पाऊणपट किंमतीस मिळतील.** कायमच्या ग्राहकांस १ रुपया प्रवेश-फी अगोदर द्यावी लागेल.

ही पुस्तकमाला फायदा मिळविण्याच्या हेतूनें काढलेली नाहीं. महाराष्ट्रांत धर्मजागृति करावी या एकाच हेतूनें काढलेली आहे. तरी सर्व सुशिक्षित लोकांनीं कायमचे ग्राहक होऊन स्वतःच्या कुटुंबांतील लहानथोर माणसांस या मालेचा लाभ करून द्यावा अशी विनंति आहे. ज्यांस मालेचें कायम वर्गणीदार होणें असेल त्यांनीं खालील पत्त्यावर १ रुपया पाठवून नांव नोंदवावीं व आपला पत्ता सुवाच्य लिहून कळवावा. पुस्तकाच्या बांधणीचे दोन प्रकार आहेत. एक निमकापडी व दुसरी सुवर्णाक्षरांकित सबंध कापडी (लायब्ररी एडिशन). यांपैकीं जी पाहिजे असेल तिचा निर्देश करावा. कापडी बांधणीची किंमत निमकापडी बांधणीच्या सुमारें सवापट पडेल.

## धर्मजागृतिमालेचीं पुस्तकें.

आतांपर्यंत या मालेंत पुढील पुस्तकें प्रसिद्ध झालीं आहेत—

पुस्तक १ लें—**मुमुक्षुमार्ग** [ डॉ० ॲनी बेझंटकृत ] रा० रा० देवीदास भास्कर लेले, बी. ए., यांनीं मराठींत उतरलेलें. निमकापडी बांधणी, किंमत रु. ०।१३, कापडी बांधणी किंमत रु. १।०।१.

**केसरीचा अभिप्रायः—**

"मोक्षद्वार खुलें करून दाखविणारे जुने ग्रंथ मराठी भाषेंत विपुल आहेत. तथापि भौतिकशास्त्रांच्या प्रगतीमुळें त्या ग्रंथांनीं फार थोडें समाधान होतें, ती उणीव रा० लेले यांच्या रूपांतरानें अंशतः तरी दूर होईल. रा० लेले यांचें रूपांतर मराठीच्या सांच्यांत इतकें बेमालूम बसलें आहे कीं, त्यास रूपांतर म्हणणें जिवावर येतें."

पुस्तक २ रें—**सनातनधर्मप्रवेश**—सेंट्रल हिंदु कॉलेजनें प्रसिद्ध केलेल्या पुस्तकावरून रा० रा० कृष्णराव सीताराम देसाई यांनीं मराठींत उतरलेलें. हें पुस्तक हायस्कुलांतील विद्यार्थ्यांस हिंदु धर्माचें टेक्स्ट बुक म्हणून लावण्या-

झारखें आहे. निमकापडी प्रतीस रु. १८८ कापडी प्रतीस १८१२.

केसरीचा अभिप्राय:—

'सनातन-धर्म-प्रवेश'-श्रीक्षेत्र काशी येथील सेंट्रल हिंदु कॉलेजसाठीं लिहिलेल्या सनातन-धर्म ॲन् एलिमेंटरी टेक्स्ट् बुक ऑफ् रिलिजन ॲंड एथिक्स या पुस्तकाचें हें भाषांतर असून सनातन धर्मांतील धार्मिक व नैतिक उदात्त तत्त्वांचें सरळ सोपपत्तिक विवेचन त्यांत केलें आहे. विद्यार्थ्यांचें चारित्र्य निष्कलंक होण्यास धार्मिक शिक्षणाची परमावश्यकता आहे; व त्या दृष्टीनें अशा प्रकारचीं पुस्तकें विद्यार्थीवर्गाचे हातांत जातील तेवढीं पाहिजेतच. **अशा प्रकारचीं पुस्तकें शाळाखात्यानें व राष्ट्रीय शिक्षणसंस्थांनींहि आपल्या शाळांतून सुरू केल्यास शिक्षणाचा उद्देश बऱ्याच अंशीं सफल होणार आहे.**

पुस्तक ३ रें-आत्मविद्येचीं मूलतत्त्वें—[ सी. डब्ल्यू. लेडबीटर ] 'ए टेक्स्ट् बुक ऑफ थिऑसफी' या पुस्तकाचें प्रो० राजाराम सखाराम भागवतकृत मराठी रूपांतर. कापडी प्रतीस १। रु.; निमकापडी प्रतीस १रु.

केसरीचा अभिप्राय-( १८।३।२४ ).

सबंध पुस्तक वाचनीय असून त्यांतील 'मरणोत्तर स्थिति' व 'पुनर्जन्म' हीं प्रकरणें वाचण्याची इच्छा पुष्कळांस होण्यासारखी आहे.

चित्रमयजगत्‌चा अभिप्राय:—( जून १९२४ )

अध्यात्मविद्येचा अभ्यास करणारांस या पुस्तकाचा चांगला उपयोग होईल.

पुस्तक ४ थें-मेस्मेरिझम्-प्रो० राजाराम सखाराम भागवत. कांहीं इंग्रजी ग्रंथांच्या आधारानें व विशेषत: स्वानुभवानें लिहिलेला ग्रंथ-कापडी प्रतीस १५। रु. निमकापडी प्रतीस १। रु.

केसरीचा अभिप्राय-( ५।८।२४ )

प्रयोग कसे करावे त्याचें वर्णन प्रथम देऊन प्रयोगांचे निरनिराळे प्रकार, मेस्मेरिक् अवस्थेचें विवेचन, श्रेष्ठ दर्जाचे अनुभव, मेस्मेरिझमची उपपत्ति, मेस्मेरिझम् व आत्मविद्या, रोगनिवारण आणि मेस्मेरिझमचा इतिहास अशा निरनिराळ्या प्रकरणांत मेस्मेरिझमची समग्र माहिती दिली आहे. पुस्तक संग्राह्य आहे.

**आनंद मासिकाचा अभिप्रायः**—( सप्टेंबर १९२४)

या पुस्तकांत या विषयाची शास्त्रीय सोपपत्तिक माहिती उत्तमप्र दिली आहे. जिज्ञासूंना हें पुस्तक अपूर्व लाभ वाटेल.

---

## पुढील पुस्तकें.

(१) केवळ हिंदुधर्मासाठीं. (२) कर्ममीमांसा. (२) व त्याचे देह (सचित्र). (४) धर्म, धर्मसंस्थापक व त्यांचे संप्र य

हीं पुस्तकें लवकरच प्रसिद्ध होतील.

---

**धर्मजागृति मासिक--वार्षिक वर्गणी** टपालसह २॥ रुपये.

आत्मविद्या, धर्मांची तुलना, वेदान्त, योगशास्त्र वगैरे वि यांवर आधुनिक पद्धतीनें चर्चा करणारें मासिक.

मासिकाचा वर्षारंभ मार्च व सप्टेंबर महिन्यापासून होतो.

कामासंबंधीं पत्रव्यवहार, मनीऑर्डर वगैरे,

मॅनेजर, **धर्मजागृति**, ३२१ शनिवार, पुणें. या पत्त्यावर करावा.

नवीन पॉकेट आवृत्ति ] आल्किऑनीकृत [ नवीन पॉकेट आवृत्ति

AT THE FEET OF THE MASTER

या इंग्रजी पुस्तकाच्या आधारें

श्रीमती **काशीबाई कानिटकर** यांनीं केलेलें मराठी रूपांतर

**साधन--चतुष्टय**

साधी प्रत—किंमत ८३. सुपीरियर प्रत—किंमत

टपालखर्च निराळा.

पत्ताः—धर्मजागृति, ३२१ शनवार, पुणें.

विजय प्रेस, ५७० शनवार, पुणें.]